# <u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८</u>

## <u>मा.महापालिका सभा</u>

### <u>कार्यपत्रिका क्रमांक - ३३</u>

### <u>सभावृत्तांत</u>

<u>दिनांक – १९.०८.२०१४</u> <u>वेळ – दुपारी २.०० वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे ऑगस्ट २०१४ ची मासिक मा.महापालिका सभा मंगळवार दि.१९.०८.२०१४ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
३. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापु
४. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
५. मा.भालेकर अरुणा दिलीप
६. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
७. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
८. मा.सायकर अजय शंकरराव
९. मा.जाधव साधना रामदास
१०. मा.जाधव राहुल गुलाब
११. मा.आल्हाट मंदा उत्तम
१२. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१३. मा.काळजे नितीन प्रताप
१४. मा.जगदीश शेट्टी
१५. मा.बाबर शारदा प्रकाश
१६. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१७. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१८. मा.उल्हास शेट्टी
१९. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
२०. मा.पवार संगीता शाम
२१. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
२२. मा.तानाजी विठ्ठल खाडे
२३. मा.बो-हाडे शुभांगी संजय
२४. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर
२५. मा.भारती फरांदे
२६. मा.आर.एस.कुमार

२७.मा.जावेद रमजान शेख
२८.मा.चारुशीला प्रभाकर कुटे
२९.मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
३०.मा.नंदा विकास ताकवणे
३१.मा.नेटके सुमन राजेंद्र
३२.मा.तरस बाळासाहेब जयवंत
३३.मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३४.मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३५.मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
३६.मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३७.मा.लोंढे गणेश नारायण
३८.मा.शमीम पठाण (पठाणबाई)
३९.मा. †›.संदिप गुलाब चिंचवडे
४०.मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
४१.मा.अपर्णा निलेश डोके
४२.मा.अनंत सुभाष को-हाळे
४३.मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४४.मा.जयश्री वसंत गावडे
४५.मा.प्रसाद शेट्टी
४६.मा.अविनाश (दादा) टेकावडे
४७.मा.काळभोर वैशाली जालिंदर
४८.मा.सौ.साळुंके सविता सुरेश
४९.मा.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
५०.मा.मासुळकर समीर मोरेश्वर
५१.मा.वाबळे संजय मल्हारराव
५२.मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
५३.मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
५४.मा.सुपे आशा रविंद्र
५५.मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
५६.मा.अजित दामोदर गव्हाणे
५७.मा.गोफणे अनुराधा देविदास
५८.मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
५९.मा.गव्हाणे सुरेखा शंकर
६०.मा.महेशदादा किसन लांडगे
६१.मा.श्रद्धा बाजीराव लांडे
६२.मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
६३.मा.लोंढे शुभांगी संतोष

६४.मा.विश्वनाथ विठोबा लांडे
६५.मा.ननवरे जितेंद्र बाबा
६६.मा.सावळे सिमा रविंद्र
६७.मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
६८.मा.भोसले राहूल हनुमंतराव
६९.मा.पालांडे सुजाता सुनिल
७०.मा.बहल योगेश मंगलसेन
७१.मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
७२.मा.कदम सदगुरु महादेव
७३.मा.छाया जगन्नाथ साबळे
७४.मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास
७५.मा.वाघेरे सुनिता राजेश
७६.मा.आसवाणी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम
७७.मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
७८.मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
७९.मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
८०.मा.काळे विमल रमेश
८१.मा.पाडाळे निता विलास
८२.मा.विनोद जयवंत नढे
८३.मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
८४.मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
८५.मा.विमलताई सुरेश जगताप
८६.मा.बारणे निलेश हिरामण
८७.मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
८८.मा.बारणे माया संतोष
८९.मा.ओव्हाळ शेखर अशोक
९०.मा.यमुनाताई रमणनाना पवार
९१.मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
९२.मा.कलाटे स्वाती मयुर
९३.मा.नांदगुडे विलास एकनाथ
९४.मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
९५.मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे
९६.मा.बोकड रामदास गेणभाऊ
९७.मा.जवळकर वैशाली राहुल
९८.मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
९९.मा.जगताप राजेंद्र गणपत
१००.मा.शितोळे शैलजा बाबुराव

१०१.मा.जगताप नवनाथ दत्तु
१०२.मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
१०३.मा.अतुल अरविंद उर्फ नानासाहेब शितोळे
१०४.मा.जम सोनाली पोपट
१०५.मा.प्रशांत शितोळे
१०६.मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
१०७.मा.काटे रोहितअप्पा सुदाम
१०८.मा.गायकवाड संध्या सुरदास
१०९.मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
११०.मा.शेंडगे आशा सुखदेव
१११.मा.मोटे किरण बाळासाहेब
११२.मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
११३.मा.संजय केशवराव काटे
११४.मा.गावडे हनुमंत बाळासाहेब
११५.मा.पाटील सुजित वसंत
११६.मा.बो-हाडे अरुण तुकाराम
११७.मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.राजीव जाधव-आयुक्त,मा.तानाजी शिंदे-अति.आयुक्त,मा.डॉ.डोईफोडे,मा.गावडे, मा.माने,मा.कुलकर्णी,मा.ढेरे,मा.गायकवाड,मा.फुंदे,मा.खांडकेकर,मा.दुरगुडे,मा.माछरे-सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.चव्हाण,मा.पाटील,मा.तुपे-सहशहर अभियंता, मा.भोसले-मुख्य लेखापाल,मा.डॉ.रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.डॉ.मनोज देशमुख-वैद्यकीय अधिक्षक, मा.भदाणे-उपसंचालक(नगररचना),मा.दुधेकर,मा.निकम,मा.सवणे,मा.साळवी,मा.पठाण,मा.लडकत, मा.कुलकर्णी,मा.पिरजादे,मा.बरशेट्टी,मा.गलबले,मा.केदारी,मा.कांबळे-कार्य.अभियंता,मा.उबाळे-प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ) मा.कांबळे-प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक),मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पोमण-संगणक अधिकारी, मा.पवार-प्र.कायदा सल्लागार,मा.बोदडे-प्रशासन अधिकारी (जनसंपर्क) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर-**उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

-----------

(१) वाय.सी.एम. रुग्णालयातील रुबी एलकेअर संचलित कॅथलॅब सुविधेचा राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत समावेश करणेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेची मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता-

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(२) एम.आय.डी.सी. भोसरी पोलीस ठाणेसाठी डिस्ट्रीक्ट सेंटर प्लॉट नं.४ येथे इमारत बांधणे कामास प्रशासकीय मान्यता व कामाचा अंदाजपत्रकात समावेश करणेबाबत मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेची मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता –

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(३) मौजे चिंचवड स.न.२५४ ते २५८ येथील आरक्षण क्र.२५१, भाजी मंडई व आरक्षण क्र.२५३, मैलाशुद्धीकरण केंद्र या आरक्षणात फेरबदल करणेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेची मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता-

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(४) लोकशाहीर कै.आण्णाभाऊ साठे यांचे पुतळ्यासाठी जागा निश्चितीबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेची मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता –

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(५) मे.इंडोलिंक व युरोसिटी इंडस्ट्रीयल प्रिमायसेस को.ऑ.सो.लि. सोसायटीच्या जागेतुन मनपाच्या सुधारीत मंजूर विकास योजनेतील ४५.०० मी. रुंद रस्त्याच्या खाजगी वाटाघाटीद्वारे भूसंपादन करणेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेची मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता –

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.उल्हास शेट्टी** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, उपस्थित सभागृहाला विनंती करतो, खालील मान्यवरांचे निधन झाले आहे - किसनराव बाणखेले-माजी खासदार, स्मिता तळवलकर- जेष्ठ अभिनेत्री, निर्माती आणि दिग्दर्शिका, प्राणकुमार शर्मा ऊर्फ प्राण-जेष्ठ व्यंगचित्रकार, तुकाराम मिसाळ-उपमहापौर राजू मिसाळ यांचे काका, परशुराम ढोरे-माजी

उपमहापौर माई ढोरे यांचे दीर, विजय जगन्नाथ पाटील-मनसे कार्यकर्ते, मिलिंद गोविंद जगताप,लक्ष्मी अनंत निबंधे (काकी),तान्हुबाई अनंता आहेर,बाळासाहेब चिंचवडे,विलास भागवत,अनिता कांबळे,शंकरराव देशमुख,विलास काळभोर यांना आजच्या सभेत श्रध्दांजली अर्पण करुन सभा मंगळवार दि.१९/८/२०१४ रोजी दुपारी २.३० वा. पर्यंत तहकूब करणेत यावी अशी विनंती करतो.

**मा.प्रभाकर वाघेरे** – मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन देतो.

**मा.महापौर** - सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.महापौर** - उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीप्रमाणे दुपारी २.३० वाजेपर्यंत सभा तहकूब करण्यात येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक - ३३**

**सभावृत्तांत**

**(दिनांक १९.८.२०१४ दुपारी २.०० ची तहकूब सभा)**

दिनांक – १९.०८.२०१४ वेळ – दुपारी २.३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दिनांक १९.८.२०१४ दुपारी २.०० ची तहकूब मा.महापालिका सभा मंगळवार दि.१९.०८.२०१४ रोजी दुपारी २.३० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
३. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापु
४. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
५. मा.भालेकर अरुणा दिलीप
६. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
७. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
८. मा.सायकर अजय शंकरराव
९. मा.जाधव साधना रामदास
१०. मा.जाधव राहुल गुलाब
११. मा.आल्हाट मंदा उत्तम
१२. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१३. मा.काळजे नितीन प्रताप
१४. मा.जगदीश शेट्टी
१५. मा.बाबर शारदा प्रकाश
१६. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१७. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१८. मा.उल्हास शेट्टी
१९. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
२०. मा.पवार संगीता शाम
२१. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
२२. मा.तानाजी विठ्ठल खाडे
२३. मा.बो-हाडे शुभांगी संजय
२४. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर
२५. मा.भारती फरांदे

२६. मा.आर.एस.कुमार
२७. मा.जावेद रमजान शेख
२८. मा.चारुशीला प्रभाकर कुटे
२९. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
३०. मा.नंदा विकास ताकवणे
३१. मा.नेटके सुमन राजेंद्र
३२. मा.तरस बाळासाहेब जयवंत
३३. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३४. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३५. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
३६. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३७. मा.लोंढे गणेश नारायण
३८. मा.शमीम पठाण (पठाणबाई)
३९. मा. †›. संदिप गुलाब चिंचवडे
४०. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
४१. मा.अपर्णा निलेश डोके
४२. मा.अनंत सुभाष को-हाळे
४३. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४४. मा.जयश्री वसंत गावडे
४५. मा.प्रसाद शेट्टी
४६. मा.अविनाश (दादा) टेकावडे
४७. मा.काळभोर वैशाली जालिंदर
४८. मा.सौ.साळुंके सविता सुरेश
४९. मा.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
५०. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
५१. मा.वाबळे संजय मल्हारराव
५२. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
५३. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
५४. मा.सुपे आशा रविंद्र
५५. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
५६. मा.अजित दामोदर गव्हाणे
५७. मा.गोफणे अनुराधा देविदास
५८. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
५९. मा.महेशदादा किसन लांडगे
६०. मा.श्रद्धा बाजीराव लांडे
६१. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
६२. मा.लोंढे शुभांगी संतोष

६३. मा.विश्वनाथ विठोबा लांडे
६४. मा.ननवरे जितेंद्र बाबा
६५. मा.सावळे सिमा रविंद्र
६६. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
६७. मा.भोसले राहूल हनुमंतराव
६८. मा.पालांडे सुजाता सुनिल
६९. मा.बहल योगेश मंगलसेन
७०. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
७१. मा.कदम सदगुरु महादेव
७२. मा.गीता सुशील मंचरकर
७३. मा.छाया जगन्नाथ साबळे
७४. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास
७५. मा.वाघेरे सुनिता राजेश
७६. मा.आसवाणी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम
७७. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
७८. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
७९. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
८०. मा.काळे विमल रमेश
८१. मा.पाडाळे निता विलास
८२. मा.विनोद जयवंत नढे
८३. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
८४. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
८५. मा.विमलताई सुरेश जगताप
८६. मा.बारणे निलेश हिरामण
८७. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
८८. मा.बारणे माया संतोष
८९. मा.ओव्हाळ शेखर अशोक
९०. मा.यमुनाताई रमणनाना पवार
९१. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
९२. मा.कलाटे स्वाती मयुर
९३. मा.नांदगुडे विलास एकनाथ
९४. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
९५. मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे
९६. मा.बोकड रामदास गेणभाऊ
९७. मा.जवळकर वैशाली राहुल
९८. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
९९. मा.जगताप राजेंद्र गणपत

१००. मा.शितोळे शैलजा बाबुराव
१०१. मा.जगताप नवनाथ दत्तु
१०२. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
१०३. मा.अतुल अरविंद उर्फ नानासाहेब शितोळे
१०४. मा.जम सोनाली पोपट
१०५. मा.प्रशांत शितोळे
१०६. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
१०७. मा.काटे रोहितअप्पा सुदाम
१०८. मा.गायकवाड संध्या सुरदास
१०९. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
११०. मा.शेंडगे आशा सुखदेव
१११. मा.मोटे किरण बाळासाहेब
११२. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
११३. मा.संजय केशवराव काटे
११४. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब
११५. मा.पाटील सुजित वसंत
११६. मा.बो-हाडे अरुण तुकाराम
११७. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.राजीव जाधव-आयुक्त,मा.तानाजी शिंदे-अति.आयुक्त,मा.डॉ.डोईफोडे,मा.गावडे, मा.माने,मा.कुलकर्णी,मा.ढेरे,मा.गायकवाड,मा.फुंदे,मा.खांडकेकर,मा.दुरगुडे,मा.माछरे-सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.चव्हाण,मा.पाटील,मा.तुपे-सहशहर अभियंता, मा.भोसले-मुख्य लेखापाल,मा.डॉ.रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.डॉ.मनोज देशमुख-वैद्यकीय अधिक्षक, मा.भदाणे-उपसंचालक(नगररचना),मा.दुधेकर,मा.निकम,मा.सवणे,मा.साळवी,मा.पठाण,मा.लडकत, मा.कुलकर्णी,मा.पिरजादे,मा.बरशेट्टी,मा.गलबले,मा.केदारी,मा.कांबळे-कार्य.अभियंता,मा.उबाळे-प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ) मा.कांबळे-प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक),मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पोमण-संगणक अधिकारी, मा.पवार-प्र.कायदा सल्लागार,मा.बोदडे-प्रशासन अधिकारी (जनसंपर्क) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर-**उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग,पत्रकार,नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

-----------

मा.महापालिका सभा क्रमांक-३० दिनांक २०/५/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.भारती फरांदे** - मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १

दिनांक - १९/८/२०१४ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ– १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वैद्य/१/कावि/८२४/२०१४, दि.१४/०७/२०१४

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.७३९१ दि. २४/०७/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील कत्तलखाना व्यावसायिकांकरिता खडकी कॅन्टॉनमेंट बोर्डाचे कत्तलखान्यामध्ये जनावरांचे कत्तलीकरिता परवानगी मिळणेकामी बोर्डामार्फत त्यांचे कत्तलखान्यामध्ये ई.टी.पी. (Effluent Treatment Plant) बांधून देणेकामी कळविण्यात आलेले आहे. त्याकरिता अंदाजे र.रु. ७० लाख इतका खर्च अपेक्षित असल्याने खडकी कॅन्टॉनमेंट बोर्डाचे कत्तलखान्यामध्ये नविन ई.टी.पी. बांधणेकरिता, त्याकरिता होणा-या प्रत्यक्ष खर्चास, त्याकामी खडकी कॅन्टॉनमेंट बोर्डासमवेत करारनामा करणेस तसेच नविन ई.टी.पी. कार्यान्वित होईपर्यंत महानगरपालिकेचा ई.टी.पी. खडकी बोर्डाकडे स्थानांतरण करणेसाठी व त्याकामी होणा-या प्रत्यक्ष खर्चास तसेच परवानगी देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.प्रतिभा भालेराव** – मा.महापौर साहेब, सदर ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, संबंधित अधिका-यांनी विषयाचा खुलासा करावा.

**मा.डॉ.रॉय** (आरोग्य वैद्यकीय अधिकारी) – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब व सर्व उपस्थित सन्मा.सदस्य, विषय क्रमांक १चा विषय कत्तलखान्याबाबतीत आहे. पिंपरी चिंचवडमधील कत्तलखाना हा पिंपरी पुलाखाली होता. २०१२ पासून तो बंद पडलेला आहे. २०१३ला नॅशनल ट्रिब्युनल यांनी तो पुन्हा तेथे सुरु करण्यापासून बंदी घातली आहे. त्यानुसार इतर ठिकाणी कत्तलखान्यासाठी अडीच एकर जागा शोधली होती. परंतू ही पर्यायी जागा नियमांत बसत नसल्यामुळे परमिशन मिळाली नाही. म्हणून ख़डकी कैंटोनमेन्ट बोर्ड यांना यासंदर्भात संपर्क केली की, त्यांची कत्तलखान्यासाठी असलेली जागा पिंपरी चिंचवड महापालिकेसाठी वापरण्यात यावी. यास त्यांनी देखील परवानगी दिली. म्हणून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील कत्तलखाना व्यावसायिकांकरिता खडकी कॅन्टॉनमेंट बोर्डाचे कत्तलखान्यामध्ये जनावरांचे कत्तलीकरिता परवानगी मिळणेकामी बोर्डामार्फत त्यांचे कत्तलखान्यामध्ये ई.टी.पी. (Effluent Treatment Plant) बांधून देणेकामी कळविण्यात आलेले होते. म्हणून त्यांनी रु.१,२५,०००/- भाडे आकारले. यासाठी एम.पी.सी.बी.ची एन.ओ.सी. लागेल. आपला ई.टी.पी. नव्हता. आत्ता एन.ओ.सी. मिळाली असलीतरी ई.टी.पी. (Effluent Treatment Plant) जोपर्यंत बसवत नाही, तोपर्यंत ते आपल्याला परमिशन देणार नाही. खडकी कंटोनमेन्ट बोर्ड यांची कत्तरखान्याची कपॅसिटी थोडी आहे. आपले व त्यांचे एकत्र चालवता येणार नाही म्हणून तुम्ही करणार असाल तर टेंडर काढावे. आपण टेंडर काढून बसवणार आहोत. खडकी कॅन्टॉनमेंट बोर्ड, पिंपरी चिंचवड

महानगरपालिका व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांची बैठक लावण्यात येणार आहे. ही रक्कम प्रत्येक महिन्याला वजा होणार आहे. आपण ५ वर्षांचा करार करणार आहोत.

**मा.किरण मोटे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आपल्याकडे पर्याय नसल्यामुळे आपण पैसे भरतोय. कारण आपल्याला जागा मिळत नाही. परंतू ज्यावेळी जाणवले, एक वाहन जनावरे घेऊन खडकीकडे जात होते. त्यावेळी काही समाजकंटकांनी वेगवेगळ्या प्रकारचे आरोप करुन भोसरी पोलिस स्टेशनमध्ये चुकीचा गुन्हा दाखल झाला. माझ्या गावातील व खराळवाडीतील लोकांना त्याचा परिणाम भोगावा लागला. पिंपरी चिंचवडमध्ये जे सर्वसामान्य लोक राहतात, त्यांच्या गरजासुद्धा पूर्ण झाल्या पाहीजेत. पाणी प्रचंड जातेय. जाणीव निर्माण होते. कागदपत्रांची पूर्तता ही महापालिकेकडून करावी लागते. कोड नंबर  दिले पाहीजेत. जनावरे ट्रान्सफर करताना त्यांच्याकडे पेपर्स नसतात. त्यांच्याकडून चुकून राहीले जातात. त्यामुळे असे गैरप्रकार घडतात. पिंपरी चिंचवडचे शेजारी म्हणून त्यांचा विचार करुन पिंपरी चिंचवडमध्ये लवकरात लवकर कत्तलखाना सुरु केला पाहीजे आणि होणा-या दहशतीपासून सूटका मिळवली पाहीजे.

**मा.गोरक्षनाथ लोखंडे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आत्ताच आमच्या सहका-याने या विषयासंदर्भात त्यांच्या भावना व्यक्त केल्या आहेत. कोणी काय खावे, कुठले मीट कोणी खावे, हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. काही शेजारी हे करत होते म्हणून. We are municipal service people. हे आपले मत आहे. ज्यावेळी जनावरांची वाहतूक केली जाते, त्यावेळी काही लोक समाजात जाणीव निर्माण करायचा प्रयत्न करतात. आणि अनेक केसेस दाखल झाल्या आहेत. ॲनिमल कटींग ॲक्ट लावला आहे. त्यांच्याकडे सांगायची पद्धत असते, दूधदुभत्यासाठी जनावरे नेली जातात. परंतू पोलिस व काही लोकांकडून अडवले जाते. पुणे किंवा महाराष्ट्रातून इथे अशा पद्धतीने वाहतूक चालली आहे असे कळविल्यानंतर या लोकांकडून दादागिरी होते. गुंडगिरी होते. पोलिसांचा हात थांबवला जातो. मग ही जनावरे कुठेतरी एखाद्या संरक्षण केंद्रात टाकली जातात. त्यानंतर त्यांचे त्यावरुन वाहतूक केली जाते. आज शहरात आठ दिवसांपूर्वीची घटना आहे. एका कुरेशी नावाच्या व्यापा-याने जनावरे घेऊन जात असताना काही लोकांनी पोलीसांना सांगितले. त्याच्याकडे वाहन परवाना नाही, त्याचे रिन्युएशन नाही. अशी अनेक पद्धतीने अडवणूक केली जाते. त्याच्याकडे सगळी कागदपत्रे होती. वाडीत जनावरे ठेवायला जागा नसते. म्हणून कत्तलखाना होणे गरजेचे आहे. बाहेरुन जनावरे आणणे ही न परवडणारी गोष्ट आहे. जातीय तणाव निर्माण होऊ शकतो. म्हणून इतर गोष्टींवर पैसे घालवतो. प्रोजेक्टवर पैसे खर्च करतो. आरोग्याच्या दृष्टीने, स्वच्छतेच्या दृष्टीने, निरोगी जनावरांच्या दृष्टीने मुंबई इथे जगात भारतात नावाजलेला देवनारचा कत्तलखाना आहे. त्या-त्या गोष्टींची गरज आहे म्हणून we are providing services to the people. म्हणून नजिकच्या काळात चांगला सुसज्ज कत्तलखाना होणे गरजेचे आहे.

**मा.जावेद शेख** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब  या विषयाला माझी उपसूचना आहे, येणा-या ८ दिवसांत बकरी ईद आहे. म्हणून सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता ताबडतोब चेक रवाना केलाततर त्याची लवकरात लवकर अंमलबजावणी होईल. त्याचप्रमाणे आयुक्त साहेबांना सुद्धा मी परवा एक पत्र दिले आहे, त्यात विनंती केली आहे की, बकरी ईदच्या तीन दिवसांत कुर्बानी व्हावी म्हणून प्रशासनाकडून योजना राबवावी. कुर्बानीमध्ये जवळ जवळ १५० ते २०० जनावरांची कुर्बानी होत असते. खडकी कँटोनमेण्ट बोर्ड इथे पूर्णपणे कुर्बानी होऊ शकणार नाही. ते मांस खडकी पासून इथपर्यंत आणता येणार नाही. मागील वर्षी बोर्डाकडून परमिशन घेतली होती. त्याचप्रमाणे या वर्षापासून देखील त्याची अंमलबजावणी व्हावी. याची दक्षता आयुक्त साहेबांनी घ्यावी. व हा विषय मंजूर करावा अशी विनंती करतो.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आत्ता जो विषय शहराच्या दृष्टिकोणातून आला आहे, त्याला कोणाचा विरोध असायचे कारण नाही. कत्तलखाना होणे शहराच्या दृष्टीने गरजेचे आहे. जे रु.७० लाख खर्च करणार आहोत. त्यात भाड्यापोटी दर महिन्याला सव्वा लाख कमीत कमी गरज असणार आहे. मा.आयुक्त साहेब, माझी आपल्याला विनंती असणार आहे, ज्यावेळी वर्षाला रु.७० लाख इतके खर्च करणार आहोत, त्यावेळी त्यांच्याकडून दोन अटींना मंजूरी असली पाहीजे. ज्यावेळी एवढा खर्च करणार आहोत, त्यावेळी खडकी कॅटोनमेंट बोर्ड व पिंपरी चिंचवड या दोन्हीसाठीच हा कत्तलखाना वापरला गेला पाहीजे. ५ वर्षासाठी हा कत्तलखाना घेतला आहे, त्याऐवजी कमीत कमी ७/८ वर्षाचा आपला करार असला पाहीजे. रु.७० लाखांच्या व्याजाचा हिशोब केलातर व्याज किती जाणार, किंवा पाचच वर्षे कशी देणार. ५ वर्षांत रु.७० लाख मायनस होत नाहीत. ७ ते ८ वर्षांचा कालावधी असावा. माझी उपसूचना असणार आहे की, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील कत्तलखाना व्यावसायिकांना खडकी कॅन्टॉनमेंट बोर्डाचे कत्तलखान्यामध्ये जनावरांचे कत्तलीकरिता ५ वर्षे परवानगी ऐवजी ७ वर्षे परवानगी देण्यास मान्यता देणेत येत आहे तसेच भाग क्र.४१ प्रभागात निवीदा नोटिस क्र.२५/१८/२०१३-१४ अन्वये काम चालू असून (निविदा र.रु. ४१,९६,९८८/-) डाल्को कंपनी रस्ता, एच.ए. कॉलनी, फिनोलेक्स कंपनी रस्ता याठिकाणी डांबरीकरण करणे आवश्यक असल्याने सदर चालू कामातून सुधारीत ३ कोटीची प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**मा.जावेद शेख** – मा.महापौर साहेब, या उपसूचनेला अनुमोदन देतो.

**मा.भारती फरांदे** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारण्यात येत आहे.

**मा.महापौर** – आयुक्त साहेब, या विषयाचा खुलासा करतील.

**मा.आयुक्त** - मा.महापौर साहेब, उपस्थित सर्व सन्मा. नगरसेवक, नगरसेविका, माझी सभागृहाला एकच विनंती आहे की, आपण रु.७० लाखांचा व येणा-या भाड्याचा हिशोब केलातर दर महिन्याला सव्वा लाख म्हणजे एक वर्षाला रु.१५ लाख द्यावे लागणार आहेत. त्यामुळे आता गटनेत्यांनी विनंती केली. त्यापैकी खडकी व पिंपरी चिंचवड यांची अशी भावना असेल त्यांनाही ७ वर्षांसाठी करायचे असेल ते करु, नाही केलेतर पुन्हा गाडी थांबली. म्हणून विनंती आहे आपण ते करु.

**मा.महापौर** – हा विषय उपसूचनेसहित मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता -

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक - ५४८ | विषय क्रमांक - १ |
| दिनांक - १९/८/२०१४ | विभाग – मा.आयुक्त |

संदर्भ– १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वैद्य/१/कावि/८२४/२०१४, दि.१४/०७/२०१४
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.७३९१ दि. २४/०७/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील कत्तलखाना व्यावसायिकांकरिता खडकी कॅन्टॉनमेंट बोर्डाचे कत्तलखान्यामध्ये जनावरांचे कत्तलीकरिता परवानगी मिळणेकामी बोर्डामार्फत त्यांचे कत्तलखान्यामध्ये ई.टी.पी. ( Effluent Treatment Plant ) बांधून देणेकामी कळविण्यात आलेले आहे. त्याकरिता अंदाजे र.रु. ७० लाख इतका खर्च अपेक्षित असल्याने खडकी कॅन्टॉनमेंट बोर्डाचे कत्तलखान्यामध्ये नविन ई.टी.पी. बांधणेकरिता, त्याकरिता होणा-या प्रत्यक्ष खर्चास, त्याकामी खडकी कॅन्टॉनमेंट बोर्डासमवेत करारनामा करणेस तसेच नविन ई.टी.पी. कार्यान्वित होईपर्यंत महानगरपालिकेचा ई.टी.पी. खडकी बोर्डाकडे स्थानांतरण करणेसाठी व त्याकामी होणा-या प्रत्यक्ष खर्चास तसेच परवानगी देणेस मान्यता देणेत येत आहे तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील कत्तलखाना व्यावसायिकांना खडकी कॅन्टॉनमेंट बोर्डाचे कत्तलखान्यामध्ये जनावरांचे कत्तलीकरिता ५ वर्षे परवानगी ऐवजी ७ वर्षे परवानगी देण्यास मान्यता देणेत येत आहे तसेच भाग क्र.४१ प्रभागात निवीदा नोटिस क्र.२५/१८/२०१३-१४ अन्वये काम चालू असून (निविदा र.रु. ४१,९६,९८८/-) डाल्को कंपनी रस्ता, एच.ए. कॉलनी, फिनोलेक्स कंपनी रस्ता याठिकाणी डांबरीकरण करणे आवश्यक असल्याने सदर चालू कामातून सुधारीत ३ कोटीची प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| अनुकूल-८१ | प्रतिकूल-० |

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - २

दिनांक - १९/८/२०१४ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ– १) मा.शांताराम भालेकर, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.७४१७ दि.२४/०७/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना दि. १ मे २०१४ पासून राबविण्यात आली आहे. सदर योजनेच्या अनुषंगाने वाय.सी.एम. रुग्णालयातील योजनेच्या पात्र लाभार्थ्यांकडून दि. १ मे २०१४ पासून कोणतेही शुल्क आकारले नसलेने त्यास मान्यता देण्यात यावी व पुढील काळात केसपेपर शुल्क आकारण्यात येऊ नये. तसेच महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालयांत व दवाखान्यांमध्ये पिंपरी चिंचवड शहरातील पिवळे व केसरी शिधापत्रिकाधारक नागरीकांसाठी केसपेपरसाठी कोणतेही शुल्क आकारण्यात येऊ नये. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील दि.१ मे २०१४ पासून राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमधील पात्र लाभार्थ्यांकडून केसपेपरकरीता कोणतेही शुल्क आकारले नसलेने त्यास व पुढील काळात महानगरपालिकेच्या अन्य सर्व रुग्णालये व दवाखान्यांमध्ये दाखल होणा-या पिंपरी चिंचवड शहरातील पिवळे व केसरी शिधापत्रिकाधारक नागरीकांसाठी केसपेपरसाठी कोणतेही शुल्क आकारणेत येऊ नये यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब,सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.जितेंद्र ननवरे** – मा.महापौर साहेब, आज महापालिका सभागृहापुढे हा विषय आला आहे. डॉ.रॉय यांना विनंती करतो की, वाय.सी.एम.ची आजची परिस्थिती, शासनाकडून हा विषय आलेला आहे. हा विषय चांगला आहे. परंतू वाय.सी.एम.मध्ये अक्षरशः रुग्णांचा महापूर आहे. राजीव गांधी जिवनदायी योजना लागू झाल्यानंतर तिथे सुनामी आल्याशिवाय राहणार नाही. नामांकित वर्तमानपत्रांमध्ये बातम्या येतात. डायलिसिस मशिनरी याचा संबंध काय, त्याची अवस्था काय. आजची घटना सांगतो. ६४ नंबरची ओ.पी.डी. आहे. तिथे तीनच डॉक्टर आहेत. ते ७५० पेशंटला डॉक्टर्स तपासतात. आजचीच गोष्ट सांगतो, ७५० पेशंट तपासले गेलेत. डॉक्टर्स इतके कमी आहेत. आपण रुग्णांना मोफत सुविधा देतोय. फक्त ४ बेड आहेत. शहराची लोकसंख्या २० लाख आहे. फक्त आणखी २ बेड वाढवले. म्हणजे ६ बेड झाले. गरीब पेशंटला म्हणतात, प्रायव्हेट दवाखान्यांत जा. बाकी दवाखान्यांत गरीब पेशंट गेला की त्याला फासच लावून टाकतात. हे काय चालले आहे. राजीव गांधी जीवनदायी योजना लागू करावी, या मताचा मी आहे. परंतू स्टाफ वाढवायचे सुद्धा आपले काय धोरण आहे. डायलिसिस मशिनसंदर्भात डॉ.रॉय यांनी खुलासा करावा.

**मा.तानाजी खाडे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, हा विषय अतिशय चांगला आहे. परंतू आज आपल्या वायसीएमवर आख्या जिल्ह्याचा लोड आहे. इथे राज्यातील वेगवेगळ्या भागांतून पेशंट येत असतात. ट्रिटमेंट चांगली मिळते म्हणून येतात. वायसीएममध्ये डॉक्टर्सचा अभाव आहे, न्युरोसर्जन नाही. डॉक्टर्सची ऍग्रीमेंट संपली आहे. त्यामुळे बरेचसे डॉक्टर्स नाहीत. म्हणून पेशंटची हेळसांड व्हायला लागली आहे. म्हणून डॉक्टर्सची भरती करणे अतिशय गरजेचे आहे. किती डॉक्टर्स कमी आहेत याची माहिती डॉ.रॉय यांनी द्यावी. डॉक्टर पेशंटला ऑपरेशन करण्यासाठी वेळ देत नाहीत. डॉक्टर नसल्यामुळे ऑपरेशन वेळेवर न झाल्यामुळे दवाखान्यांत गर्दी फार वाढली आहे. म्हणून आयुक्त साहेब डॉक्टर्सची भरती लवकरात लवकर करावी व याची देखील माहिती द्यावी.

**मा.चंद्रकांता सोनकांबळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, हा विषय प्रशासनामार्फत का आला नाही. हा विषय सदस्य प्रस्ताव आहे. राजीव गांधी जीवनदायी योजना महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेली आहे हा एक भाग आहे. दुसरे म्हणजे राजीव गांधी योजना महापालिके मार्फत राबवतोय. परंतू खाजगी हॉस्पीटल्स इथे सुद्धा ही योजना आहे असे आम्हाला काल कळाले आहे. आपल्या हद्दीतील खाजगी हॉस्पीटल्समध्येही ही योजना आहे का, असावी किंवा नसावी यावर आपले काही नियंत्रण आहे का. कारण आपण वर्तमानपत्रामध्ये किंवा टि.व्ही चॅनल्सवर महाराष्ट्र शासनाच्या मोठमोठ्या जाहिराती बघतोय. साधारण दर एक तासाला जाहिरात असते. या जाहिरातीनुसार मी विचारले तेव्हा ते म्हणाले ही योजना शहरातील सर्व हॉस्पीटल्स् खाजगी हॉस्पीटल्समध्ये लागू झालेली नाही. फक्त २० ते ३० टक्के हॉस्पीटल्सनी ही योजना स्विकारलेली आहे. बाकी ७० टक्के हॉस्पिटल्स् नी मात्र ही योजना स्विकारलेली नाही. यासाठी आपण त्यांना पर्याय दिलेला आहे. याची माहिती आम्हाला देण्यात यावी. रुबी एलकेअर यांना वायसीएममध्ये आपण जागा दिलेली आहे. या योजनेमुळे आपला काही फायदा होऊ शकतो का याचा सुद्धा सविस्तर खुलासा करावा.

**मा.अनंत को-हाळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,प्रथमतः ही जी योजना आहे, या योजनेची माहिती आम्हालाच नाहीतर आम्ही नागरीकांना काय सांगणार? ही योजना कोणकोणत्या हॉस्पिटल्समध्ये उपलब्ध आहे. ती कशा पद्धतीने नागरीकांना मिळवून देणार आहोत? त्याचे कार्ड आहेत का? निविदा करणार आहोत का? कारण आम्हाला सुद्धा माहित नाही. ही योजना ऍक्टीव्हेट झाली नव्हती म्हणून त्यांना देखील या विषयाची माहिती नव्हती. म्हणून अशा पद्धतीने ठराव करणार आहेत. त्याची पूर्ण माहिती द्यावी. दुसरे म्हणजे मघाशी मा.जितेंद्र ननवरे व मा.तानाजी खाडे बोलल्याप्रमाणे डॉक्टर्स नाहीत. मग आपण योजना कशाला राबवतोय. पेशंटला उपचार देणार आहोत का. आपण उपचारच देऊ शकत नाही. काल रात्री १२.०० वा. तालेरा हॉस्पिटलमध्ये माझ्या मित्राची आई वारली. त्यांना श्वासोच्छवास घ्यायला त्रास होत होता. त्यांना अर्जंट ट्रिटमेंट द्यावी लागली. त्यांना वायसीएममध्ये नेले. तिथे कोणीच नाही, फिजिशियन नाही. त्या आजी तिथेच गेल्या. माझ्या वॉर्डात गेले ५ वर्षांपासून एक मोठी बिल्डींग पडून आहे. तिचे उद्घाटन झालेले नाही. तिथे डॉक्टर्स, नर्सेस स्टाफ उपलब्ध आहे का. पेशंटकडून पैसे घ्या, फुकट देऊ नका. पण प्रामाणिकपणे उपचार द्या. उपचार लवकर

मिळत नसतील तर काही उपयोग नाही. हा विषय खूप महत्वाचा आहे. रुग्णाच्या जीवनाशी खेळवण्याचा विषय आहे. तालेरा हॉस्पिटलमध्ये डोळ्याच्या ऑपरेशनसाठी डॉक्टर्स उपलब्ध होत नाहीत. कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर डॉक्टर्स उपलब्ध होत नाहीत. लोकांच्या आरोग्याचा विचार करुन त्यांना उपचार देण्यासाठी योजनेची माहिती द्या. ही योजना कोणकोणत्या हॉस्पीटल्समध्ये राबविणार आहोत याची माहिती द्या. तरच या योजनेचा अवलंब करा.

**मा.अनिता तापकीर** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, वाय.सी.एम.मध्ये पेशंट ॲडमिट असेलतर गोळ्यासुद्धा वेळेवर मिळत नाहीत. स्वस्त असलेल्या गोळ्या दिल्या जातात. महाग असलेल्या गोळ्या बाहेरुन आणा असे सांगतात. तिथे गरीब घरातले लोकच ॲडमिट असतात. गोळ्या मिळत नसतील तर त्यांचा काय उपयोग? पेशंटला बेड लवकर मिळत नाही. ऑपरेशसाठी लवकर घेतले जात नाही. टॉयलेट घाण असतात, त्यात पाणी नसते. काही काही पेशंट गोळ्या बाहेरुन आणायच्या परिस्थितीत नसतात. १२००/- रुपयाच्या गोळ्या बाहेरुन आणायच्या मग वायसीएममध्ये स्वस्तातल्या गोळ्या दिल्या जातात. तिथले डॉक्टर्स, नर्सेस यांना सुद्धा नीट बोलता येत नाही. अरेतुरेची भाषा केली जाते. असे असताना डॉ.रॉय यांनी तिथे खरोखर लक्ष दिले पाहीजे. लोक वायसीएममध्ये लांबलांबून येत असतात. नीट उपचार मिळत नसल्याने, औषधे मिळत नसल्याने पेशंट आजारी पडतो. टॉयलेटमध्ये दिवसभर पाणी नसते. गरोदर बाई असेल, अर्जंट डिलिव्हरीसाठी पेशंट आला असेलतरी लवकर बेड मिळत नाही. गरीब लोकांनी काय करायचे? तिथे गरीबांना उपचार दिले पाहीजेत. पिंपरी चिंचवड मधून येणारे तसेच लांबून येणा-या लोकांना उपचार मिळावेत.

**मा.अमिना पानसरे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आज जो विषय आला आहे, तो खूपच महत्वाचा आहे. आपल्या पिंपरी चिंचवडमध्ये एक पांढरा हत्ती असे म्हटले गेलेले असे वायसीएम हे हॉस्पिटल होते, त्याकडे लक्ष नाही. आमची वायसीएममध्ये रोज एक चक्कर असते. पेशंटला घेऊन जावे लागते. परिस्थिती खूप विचित्र आहे. डॉक्टर्सची भरती केलेली नाही. टोणपे सरांबरोबर एक डॉक्टर असतात ते सोडून गेले आहेत. तिथे डॉक्टर टिकत नाहीत. त्यांना पगार कमी आहे. आपण ब-याच नवीन योजना काढल्यात, त्या योजना राबवा. ५०/६० पेशंटसाठी एक नर्स असते. एक नर्स काय करणार, मी स्वतः डोळ्याने बघितले ही परिस्थिती आहे. यावर तुम्ही विचार केला आहे का? योजना चांगली आहे. नर्सेस, डॉक्टर्स किती कमी आहेत. जवळजवळ १२५ डॉक्टर्स कमी आहेत. प्रत्येक विभागात मानधनावर नर्सेस भरा. त्यांचे मानधन वाढवा. बाहेर जास्त पैसे मिळतात. आपल्याकडे डॉक्टर्स, नर्सेस कसे टिकतील याचा विचार केला पाहीजे. हा खूप महत्वाचा विषय आहे.

**मा.नारायण बहिरवाडे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, महाराष्ट्र शासनाच्या राजीव गांधी योजनेसंदर्भातील विषय चर्चेसाठी आला आहे. आघाडी सरकारने अतिशय महत्वाकांक्षी योजना राज्य सरकारने संपूर्ण महाराष्ट्रात लागू केलेली आहे. पिंपरी चिंचवडमध्ये वायसीएम हॉस्पिटल आदरणीय रामकृष्ण मोरे यांच्या कल्पनेतून उभारले गेले. ते उभारत असताना त्यावेळी अनेक

टिका पण त्यावर झाल्या. पांढरा हत्ती म्हणून या हॉस्पिटलला संबोधण्यात आले. परंतू शहरातील सर्वसामान्य नागरीकांना, झोपडपट्टीवासियांना, कामगारांना त्यांचे आरोग्य
चांगल्या पद्धतीने रहावे म्हणून, स्वस्त दरात, वेळेत वैद्यकीय उपचार मिळावेत म्हणून ख-या अर्थाने वायसीएमची स्थापना केली गेली. खरेतर वायसीएममधील डॉक्टर, कर्मचारी स्टाफ असेल त्यांनी अतिशय चांगल्या पद्धतीने सेवा दिली पाहीजे. जसे मा.तानाजी खाडे यांनी सांगितले, वायसीएममध्ये संपूर्ण महाराष्ट्रातून, कानाकोप-यातून लोक उपचार घेण्यासाठी येतात. वायसीएममध्ये अतिशय चांगल्या पद्धतीने उपचार होत असतात. वायसीएम हॉस्पिटल हे शहराच्या नावलौकिकात भर घालणारे आहे. काही महिन्यांतील कालखंडातील परिस्थिती बघितली तर जसे मा.जितेंद्र ननवरे यांनी सांगितले, आजच्या वर्तमानपत्रामध्ये सुद्धा आले आहे. स्पेशालिस्ट डॉक्टर्सची संख्या कमी आहे. याचे कारण काय आहे. जे डॉक्टर्स मानधनावर होते, त्यांची मुदत संपली आहे. त्या जागा रिक्त आहेत, त्या भरु शकत नाहीत. काही डॉक्टर्स रिटायर्ड झाले आहेत, त्यांची जागा भरु शकत नाही. प्रशासनाला काय अडचण आहे. संपूर्ण राज्यात किंवा पुणे शहरात अतिशय चांगल्या पद्धतीचे डॉक्टर्स आहेत. ते आपल्याकडे येऊ पाहतात. आपण त्यांना चांगली वागणूक देतो का. प्रशासनाने याकडे देखील लक्ष दिले पाहीजे. रुबी हॉस्पिटलमधील कॅन्सर स्पेशालिस्ट डॉक्टर एक हजार रुपये मानधनावर वायसीएममध्ये कामाला येतात. त्यांना इथे चांगली वागणूक का मिळत नाही. रुबी हॉस्पिटलचे डॉक्टर्स समाजसेवा म्हणून वायसीएममध्ये येतात. त्यांना चांगल्या पद्धतीने वागणूक दिली पाहीजे. डॉ.देशमुख यांनी आळंदी इथे मोठे कॅन्सर हॉस्पिटल सुरु केले आहे. वाय़सीएममधील स्वच्छता बघीतली, पेशंट बघितले, ऑपरेशन थिएटर्स बघितली तर त्यांना वाटते आपण इथे यावे, असे डॉक्टर्स असतील तर त्यांना इथे आमंत्रित करावे. किंवा अशा वेगवेगळ्या आजारांवर किंवा रोगांवर स्पेशालिस्ट डॉक्टर्स असतील तर त्यांना आमंत्रित करावे. जिथे डॉक्टर्स कमी आहेत, तिथे लवकरात लवकर ते भरावेत. जेणेकरुन शहरातील नागरीकांना चांगल्या पद्धतीने वैद्यकीय सेवा देता येईल. राजीव गांधी जीवनदायी योजनेत ९७२ आजारांवर उपचार आहेत. आपण किती आजारांवर उपचार देणार आहोत याची माहिती आपण दिली पाहीजे. ईगोला हा इतका भयानक आजार आहे. संसर्गजन्य आजार आहे. तो स्पर्शातून, थुंकीतून, आजारी माणसाच्या किंवा प्राण्याच्या संपर्कातून संसर्ग होऊ शकतो. जागतिक आरोग्य संघटनेने जागतिक आणीबाणी सुद्धा जाहीर केलेली आहे. असा आजार जर या शहरात आलातर आपण त्यावर काय खबरदारी घेणार आहोत? आरोग्य विभाग, वैद्यकीय विभाग याकरिता काय काळजी घेणार आहेत. आजार प्राण्यापासून हा ईबोला रोगाचा प्रसार होतो आहे. पिंपरी चिंचवडमधील भटक्या कुत्र्यांसंदर्भात सभागृहामध्ये वारंवार चर्चा होत असते. भटक्या कुत्र्यांना पकडले जाते आणि त्यांची नसबंदी केली जाते. त्यांना कुठे पकडले, तिथे त्यांना सोडले होते. त्यांना त्वचारोग होतात. ते कचराकुंडीच्या अवतीभोवती फिरत असतात. अशा कुत्र्यांना ईबोला रोग झालातर त्याचा प्रसार शहरात झाल्याशिवाय राहणार नाही. हा ईबोला संसर्गजन्य रोग काय आहे, त्याचा प्रसार कसा होणार. जरी शहरात ईबोलाचा पेशंट आलातर आम्ही काय काळजी घेतली पाहीजे, नागरीकांनी काय काळजी घ्यावी, यासंदर्भात प्रशासनाने याचा खुलासा करावा.

**मा.भारती फरांदे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आज जो विषय आहे तो खूप सत्य व खूप चांगला आहे. जेव्हा पेशंट वाय.सी.एम.मध्ये जातात, तेव्हा त्यांना बारीक सारीक गोष्टीसाठी थांबावे लागते. तेथे गेल्यावर सगळेजण काम करण्यासाठी बसलेले असतात. केस पेपर काढण्यासाठी एक नंबर खिडकीत गेल्यावर म्हणायचे दोन नंबर मध्ये जा, दोन नंबरला गेल्यावर म्हणायचे तीन नंबरला जा. स्टाफ उपलब्ध नसला की ११ वाजवायचे असे व्हायला नाही पाहीजे. उपचार घेण्यासाठी येतात ते गरीब लोक आहेत. त्यांना कळत नाही की, डिसचार्ज मिळत असताना यलो कार्डची झेरॉक्स काढायची असते तर त्यांना वायसीएमच्या बाहेर जाऊन झेरॉक्स काढून आणायला सांगतात. त्यापेक्षा वायसीएममध्येच झेरॉक्स मशीन उपलब्ध करुन द्यावी. डिसचार्ज कार्डवर काय ट्रिटमेंट केली ते लिहिलेले असते. वायसीएमचा कागद बाहेर नेऊन त्याची झेरॉक्स काढायची हे कशासाठी. ईबोला रोगाविषयी नगरसदस्यांनी विषय मांडला आहे. लोकांमध्ये या रोगाविषयी भितीची अवस्था आहे. हा रोग कशामुळे होतो, त्यासाठी काय प्रिकॉशन घेतली पाहीजे. याबाबत मिडीया, प्रसार माध्यमांकडून लोकांपर्यंत माहिती पोहोचवावी. कशामुळे हा रोग होतो. राजीव गांधी जीवनदायी योजनेचा फायदा जास्तीत जास्त लोकांना मिळण्यासाठी शासनाने हि योजना दिली आहे. तळागाळात काम करत असताना हे कसे सुहाय्य होईल या दृष्टीने विचार करावा.

**मा.अश्विनि चिंचवडे**–मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,वायसीएममध्ये कॅन्सर या रोगासाठी डॉक्टर कधीच उपलब्ध नसतात. माझ्या प्रभागातील एका व्यक्तीला केमोथेरपीसाठी तारीख दिली होती. डॉक्टर उपलब्ध नसल्यामुळे आज ती व्यक्ती दगावली आहे. त्यामुळे यामध्ये जातीने लक्ष देऊन ही समस्या सोडवावी अशी विनंती करते.

**मा.सुजाता पालांडे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,यशवंतराव चव्हाण रुग्णालय हा सगळ्यांच्याच जिव्हाळ्याचा विषय आहे. राजीव गांधी जीवनदायी योजना याचा समावेश झाला त्याबद्दल आयुक्त साहेब व सर्वांचे प्रथमतः आभार मानते. ही योजना करतो, त्यावेळी कार्ड बनवताना आम्हाला खूप त्रास होतो. कार्ड करताना त्याचे रेशन कार्ड करायचे. त्यानंतर सर्व सभासदांचे आधार कार्ड, ते पहिल्यांदा निगडी इथे रेशन कार्ड अपडेट करावे लागते. त्यानंतर दहा दिवस ओरिजनल कार्ड ठेवल्यानंतर राजीव गांधी योजनेचे कार्ड मिळते. या योजनेमध्ये कोणकोणत्या आजारांचा समावेश होतो हे समजत नाही. त्याचा तक्ता वाय.सी.एम.मध्ये न लावल्यामुळे विसंगती आहे. वाय.सी.एम.मध्ये ज्या वर्षी या सगळ्या योजना देतो. बाकी ब-याचशा गोष्टी करतो, त्यावेळी प्रथमतः लक्ष पाहिजे. खरेतर आजारी पेशंटकडे आपण किमान लक्ष देऊ शकतो का. आपला स्टाफ कमी आहे. ७०० बेडची क्षमता असलेले हॉस्पीटल असले तरी स्टाफ फक्त २५० लोकांचा आहे. डॉ.रॉय असतील किंवा डॉ.देशमुख असतील किंवा तिथला स्टाफ असेल त्या कोणालाही इथे दोष देऊ शकत नाही. एका वेळेला १५/२० पेशंट बघावे लागतात, त्यावेळी एक नर्स सुद्धा काम करु शकत नाही. प्रशासनाला विनंती आहे, ज्या नियुक्त्या द्यायच्या, त्यांची नियुक्ती लवकरात लवकर करावी. त्यामुळे जास्तीत जास्त स्टाफ मिळेल. वाय.सी.एम.,तालेरा या सगळ्या रुग्णालयांना चांगल्या पद्धतीने रुग्णांची सेवा करता येईल. वायसीएममध्ये असलेला सिक्युरीटी स्टाफ त्यातील १५ स्टाफ हा शारिरीक दृष्ट्या व्यंग

असलेला सिक्युरीटी स्टाफ इथे आहे. मी त्याचे उत्तर विचारले तेव्हा त्यांनी सांगितले, त्यांना स्वतःला आजार आहेत. त्यांना काही झालेतर लगेच उपचार मिळावा म्हणून वायसीएम दिले आहे. अशी शारिरीक दृष्ट्या व्यंग असलेली सिक्युरीटी वायसीएम सारख्या रुग्णालयात ठेवली असेल तर ती सिक्युरीटी काय कामाची? ईसीजी स्टाफ असेल, काम करणारे डॉक्टर्स असतील आज अडीच ते तीन वर्षांपासून ईसीजीचे काम करणारी डॉक्टर एकटिच काम करते आहे. त्यांना असिस्टंट नाही. तिथे दुसरे डॉक्टर नाहीत. त्यांच्याकडून कुठल्या कामाची अपेक्षा आम्ही करणार आहोत. वायसीएममध्ये डायलिसिससाठी यंत्रणा नाही. मी अनेक वेळा विनंती केली आहे की, मशीनरी देतो म्हणून त्यांनीही तयार दाखवली आहे. मग मला कळत नाही. वायसीएमने त्यांना नकार का दिला? आपण जर सगळ्या प्रोसेसमधून जाणार आहोत, जोपर्यंत डायलिसिस मशिनरी बंद असेल तर मग बाहेरुन मशीनरी घ्यायला काय हरकत आहे? त्यांनी स्वतःहून सांगितले, आम्ही डायलिसिस मशीनरी देतो. स्त्रियांचा जिव्हाळ्याचा विषय असतो गायनिक वॉर्डचा. महिलेची प्रसूती होत असताना बाहेर पुरुष थांबलेले असतात आणि त्यांना संपूर्ण प्रोसेस तिथे दिसत असते. हे काय चालले आहे. तिथे स्त्रियांना कोणत्याही पद्धतीने प्रायव्हसी राहिलेले नाही, याचा लवकरात लवकर विचार झालातर वायसीएम आणी जेवढी रुग्णालये आहेत हे चांगल्या पद्धतीने सेवा देणारे रुग्णालय म्हणून त्यांचे नाव आहे. आणि यापुढेही वायसीएममध्ये आपण चांगल्या पद्धतीने काम करु शकतो.

**मा.आर.एस.कुमार**–मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेसंदर्भात आपण चर्चा करतोय. या योजना लागू केल्यानंतर वायसीएममध्ये पेशंटची गर्दी वाढणार. सर्वांनी सांगितले, मीही सांगतो, तिथे स्टाफ फार कमी आहे. या विषयावर अनेक वर्षांपासून चर्चा होते. परंतू स्टाफची अपॉईंटमेंट का होत नाही. प्रोससला वेळ लागतो. म्हणून सुपरीटेंडंट यांना पॉवर्स दिल्या पाहीजेत. ते त्यांच्या पॉवर्स का वापरत नाहीत. सहा महिन्यांसाठी टेम्पपरी स्टाफ घ्या. काही वॉर्डांत ४० ते ५० पेशंट व एकच सिस्टर असते. संपूर्ण इन्फ्रास्ट्रक्चर उपलब्ध करुन देऊ शकलो नाहीतर हॉस्पिटल व्यवस्थित चालणार नाही. गरीब लोक तिथे येतात. त्यांना व्यवस्थित ट्रिटमेंट मिळण्यासाठी स्टाफ अपॉईंट करावे लागेल. स्टाफ ताबडतोब अपॉईंट करावा लागेल. सकाळ वर्तमानपत्रामध्ये बातमी होती, डॉक्टर्स इथे यायला तयार नाहीत. शंभर पेक्षा जास्त व्हेकन्सी आहे. माझ्या माहितीप्रमाणे मोठमोठे ड़ॉक्टर्सला, अनेक सर्जन्स यांना विचारले तर ते म्हणतात, वायसीएम नको. त्यांना माहित आहे, तिथे काय लफडी चालतात. गेले ५ वर्षांत ऑनररी सर्जन यांना कोणी मानधन दिले नाही. का दिले नाही. डॉ.जगदाळे स्टॅंडींगमध्ये ठराव पास करायला विसरलेत म्हणून त्यांना मानधन दिले नाही. येथे येणा-या डॉक्टर्स समाजातील नामवंत लोक असतात, त्यांना प्रॉपर रिस्पेक्ट दिला पाहीजे. त्यांना प्रॉपर रिस्पेक्ट मिळत नाही म्हणून ते आपल्याकडे येत नाहीत. सुपरिटेंडेंट, डेप्युटी सुपरिटेंडेंट यांना विश्वासात घ्या. त्यांना सांगा, ऑनररी डॉक्टर्स यांना प्रॉपर रिस्पेक्ट दिला पाहिजे. औषधाबाबतीत पूर्वी सुद्धा प्रॉब्लेम होता. आत्ता परिस्थिती सुधारली आहे. अजूनही त्यात परिस्थिती सुधारेल. रुबी एलकेअर यांना कमी भाड्याने जागा दिली. कोट्यावधी रुपयांचे साहित्य त्यांना दिले. तसे देताना त्यांना रेटस् सुद्धा ठरवून दिले. बायपाससाठी रु.१,१०,०००/-, ७०,०००/- असे रेट दिले तरी ते देताना पेशंटला कन्फ्युज

करतात. रु.७०,०००/- मध्ये लोकल कॅटेगरीचे येणार, ते टिकणार नाही. अजून रु.४०,०००/- जास्त द्यावे लागतील. रु.४०,०००/- जास्त दिलेतर दुसरा चांगल्या क्वालिटीचा बसवता येईल. गरीब माणूस कुठून पैसे देणार. खरेतर कोणते मशीन आतमध्ये लावतात ते या लोकांना माहित पडत नाही. जेव्हा रु.७०,०००/- रेट ठरवला, तेव्हा रु.७०,०००/-च घेतले पाहीजेत. कॅपिटल इन्व्हेस्टमेंट वर नॉमिनल भाडे घेतात, तेवढेच भाडे घेतले पाहीजे. त्यापेक्षा जास्त घेतले नाही पाहीजेत. अनेक जण या हॉस्पिटलबद्दल बोलले. हे हॉस्पिटल खरेतर कै.प्रा.रामकृष्ण मोरे साहेबांच्या कल्पनेतून आले आहे. मा.नारायण बहिरवाडे यांनी म्हटल्याप्रमाणे तेव्हा या हॉस्पिटलला पांढरा हत्ती म्हटले गेले. आज हजारो, शेकडो, लाखो गरीब लोकांना सेवा मिळते आहे. म्हणून मोरे साहेबांची आठवण काढून त्यांना नम्र अभिवादन करतो.

**मा.आशा शेंडगे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरेतर राजीव गांधी आरोग्य जीवनदायी योजना आलेली असलीतरी काही प्रमाणात पेशंट यांनी सुद्धा उपचार घेतले आहेत. परंतू मागील मंगळवारी स्थायी समितीमध्ये डायलिसिस मशीनचा विषय झाला होता. राजीवगांधी जीवनदायी योजनेमुळे रुग्णांची संख्या भरपूर प्रमाणात वाढणार आहे. जास्तीत जास्त रुग्णांना शहरातून उपचार मिळावेत ही चांगली गोष्ट असली तरीसुद्धा आपली सद्यस्थिती काय आहे हे नजरेआड करुन चालणार नाही. दीड महिना झाला, वायसीएममध्ये एकही डायलिसिस मशीन नाही. २००९मध्ये दोन मशीन्स बंद पडल्या होत्या. आपण या ७/८ वर्षांमध्ये एकतरी मशीन खरेदी करायला हवी होती. आपण ज्या डायलिसिस मशीन्स व्यवस्थित चालेल हे गृहित धरले तरीसुद्धा आपल्याकडे मागील वर्षापासून डायलिसिस मशीन बंद आहे. काम चालेल असे म्हणून चालणार नाही. आपल्याकडे उपचार मोफत आहेत. विषय सभागृहात येतो त्यावेळी दिसते, मागील कामाला मुदतवाढ देतो. तुमच्या हिशोबात जाण्यापर्यंत ठिक आहे, परंतू नागरीकांच्या रुग्णाच्या आरोग्याशी खेळणे कितपत योग्य आहे. ५ मशीन्स बंद पडल्या, १५ दिवस झाले तरी नागरीकांना योजना उपलब्ध करु शकत नाही. यापेक्षा वेगळी शोकांतिका कोणती आहे. ४०/४५ वयाच्या महिलेला किडनी प्रॉब्लेम असेल, तिला डायलिसिस करायची आवश्यकता होती. १८ सीआर कन्टेन्ट म्हणजे काय प्रकार आहे याबाबत मी डॉक्टरांशी चर्चा केली तर ते म्हणाले, ती कधीही अनकॉन्शस होऊ शकते, कधीही मरु शकते. वायसीएम हे रुग्णालय रुग्णांना बरे करण्यासाठी आहे का मारण्यासाठी केले आहे हे तरी सांगून टाका. होत नसेल तर सांगून टाका इथे पेशंट वर उपचार होऊ शकत नाही. आम्ही निकामी आहोत, कुचकामी आहोत. ७३ डॉक्टर्स पैकी ९० टक्के डॉक्टर्सची आपल्याकडील सेवा संपली आहे. वायसीएममधील गरज म्हणून काहीतरी केले पाहीजे. इतके नियम पाळतो मग इतके डॉक्टर्स पाहिजेत म्हणण्यापेक्षा माझ्या शहराची, आपल्या लोकांची, रुग्णांची काय गरज आहे ते लक्षात घेणे गरजेचे आहे. ७० टक्के डॉक्टर्स कॉन्ट्रॅक्टमधील असतात. चांगली प्रोसेस लागू करणार असाल, प्रशासनाला शिस्त लावणार असाल तर कोणालाही चालेल. आपल्या हातात काय आहे. सगळे निसटले आहे. २७ डॉक्टर्स नाहीत. ७० डॉक्टर्स नाहीत. या रुग्णांना कोण तपासणार ते सांगा. या सगळ्या गोष्टी अत्यंत गांभिर्याने घ्या. आपल्याकडे असे अनेक रुग्ण आहेत की ज्यांना रु.४००/- इतका डायलिसिसचा देखील खर्च परवडत नाही. ते महिन्यातून एखाद्या वेळेला डायलिसिस करतात. आपल्या निष्काळजीपणामुळे हे पेशंट भविष्य काळात मरतील का काय असे म्हणणे वावगे

ठरणार नाही. डायलिसिस मशीन निकडीची गरज आहे. कोणालाही डायलिसिसची गरज पडते. याची काही मर्यादा राहीली नाही. अशा वेळेला आपल्याकडे अद्ययावत सुविधा असली पाहीजे. माझ्याकडे फोटो आहेत. वायसीएममधील झेरॉक्स मशीनसुद्धा बंद आहे. आमच्याकडे इथे मरण्याची चांगली सुविधा करण्यात येईल असे आपण म्हणायचे का. उपचारासाठी डॉक्टर्स नसतील तर लोकांना कशासाठी आणायचे. एकिकडे लोकांना तयार करा. तुम्हीच खुशाल म्हणता, तेवढ्या सुविधा बाहेर घ्या. आमच्याकडे सुविधा पुरवत नाहीत. आपण लोकांना चांगली सुविधा देणे हे आपले मुलभूत कर्तव्य आहे. कुठेतरी ठाम भूमिका घेतली पाहीजे. १०० डॉक्टर्स उपलब्ध नसतील तर मी हे परवा सुद्धा सांगितले होते. रुग्णांशी इतक्या वाईट पद्धतीने बोलले जाते. एका पेशंटला जखम झाली होती. तेव्हा त्याला त्याच्या समोर डॉक्टरांनी सांगितले, तुझी जखम ६० इंच खोल आहे. आतून डॅमेज झाले असेल. त्याचे काहीही होऊ शकते. त्याला शेवटी सह्याद्री हॉस्पिटलला हलवले. नॉर्मल सर्दी झालेल्या रुग्णाला काहीच सांगायचे नाही म्हणजे तो खचून मरतो. काहीही झाले असले तरी विधीलिखित असल्यासारखे त्यांनी इथे मरण्यासाठी यायचे का. एकाला सांगितले, तुझ्या भावाने तुला किडनी दिलीतर तू वाचणार आहेस. नाहीतर तुझे मरण अटळ आहे. या बेसिक गोष्टीचा कुठेतरी विचार करा. आम्ही चांगला उपचार करु शकतो यावर काहीतरी निर्णय घेणे गरजेचे आहे. यावर योग्य तो निर्णय घ्यावा अशी विनंती करते.

**मा.शमिम पठाण** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, हा विषय सभासदांच्या चांगल्या भावनेतून मांडला आहे. आपण सगळ्यांनाच फ्रि उपचार देतो. म्हणून असा ओरडा खातो. अच्छे दिन आहेत म्हणून सगळे अच्छे त्यामुळे पैसे सुद्धा अच्छे पाहीजेत. त्यामुळे उपचार सुद्धा अच्छे पाहीजेत. याठिकाणी वायसीएममध्ये उपचार होत नाहीत म्हणून आपण जातो का? आपण वारंवार जातो. एकदा उपचार झाला नाहीतर पुन्हा जायचे नाही. एवढे मरणासाठी तिथे जात असू. पेशंट नेत असालतर कशाला विषाची परीक्षा घ्यायची. माझी सन्माननीयांना विनंती आहे,कोणाला मरणासाठी पेशंट न्यायचा असेलतर त्याने नेऊ नये. ही माझी कळकळीची विनंती आहे की, एखाद्या क्षेत्रात विश्वास महत्वाचा आहे. आपला पेशंट व्यवस्थित होणार, चांगला होणार या भावनेतून पेशंट न्यायचा. ज्या प्रकारच्या चष्म्यातून आपण बघतो, तसेच जग दिसते. पेशंटला मरणासाठी जाण्यासाठी नको, उपचारासाठी न्या. अनेक लाखो लोक बरे होतात. डॉक्टर म्हणजे काय ब्रह्मदेव नाहीत. डॉक्टरला पाठिशी घालणे योग्य नाही. डॉक्टर्सची वानवा मात्र खरोखर आहे. डॉक्टर्सनी बाहेर प्रॅक्टिस केलीतर त्यांना भरपूर पैसे मिळतात. झोपडपट्टीतला पेशंट गेला तरी पन्नास रुपये हातात देतात. असे ५० पेशंट गेलेतरी दिवसातून दोन हजार रुपये तरी मिळतील. असे असले तरी आपण त्यांना साधारणतः रु.६०,०००/- देतो. परंतू अनुभवी डॉक्टर असेल, ६ महिन्यांसाठी घेणार असू तरी पूर्वी रु.४५,०००/- देत होतो. हे स्केल कमी केले आहे. परंतू आता आपण अनुभव नसलेल्या डॉक्टर्सना रु.२५,०००/-, एक वर्षाचा अनुभव असेलतर रु.३०,०००/-, ५ वर्षांचा अनुभव असेल तर रु.३५,०००/- देऊ केले आहेत. ५ वर्षांचा अनुभव असेल तर डॉक्टर्स तिथे राहू शकणार नाहीत. आणखी एक सुधारणा करावी. सहा महिन्यांसाठी घेतलेल्या डॉक्टर्सची आपण लेखी परीक्षा, व मौखिक परीक्षा घेतो. सहा महिने पूर्ण झाल्यानंतर पुन्हा नवीन डॉक्टरच्या रांगेत या डॉक्टरला उभे करतो. प्रेफरन्स

देत नाही. त्यांना कंटिन्युएशन द्या. त्यांचे तिथे काम केल्यानंतर पेशंटशी जवळीक साधली गेलेली असते. तिथे जीव लागलेला असतो. तो पुन्हा चांगले काम करु शकतो. ६ महिन्यांनी नवीन येणारा माणूस तितक्याच आपुलकीने काम करणार का. जसे इंजिनिअरची भरती करुन घेतो, जसे ६ महिने बोर्डवर घेतो, नंतर पर्मनन्ट करतो. असे असेलतर वाटते, त्यांचे प्रॅक्टीकली काम पाहून त्यांना त्यातून निवडायचे का नाही ते ठरवा. ६ महिन्यांचा ठराव करुन मग पुन्हा त्यांना ६ महिन्यांसाठी घेतोय. रिक्त जागा आहेत त्या भराव्यात. शासनाची मान्यता आहे का ते स्पष्ट करावे. शासनाकडून डॉक्टर्स देत नसतील का शासनाकडे डॉक्टर्स नाहीत. माझ्या माहितीप्रमाणे शासनाकडून डॉक्टर्स पाठवणार नाहीत. त्यांच्याकडे वानवा आहे. मग आपण आपले डॉक्टर्स का भरू नयेत, काय अडचण आहे. मग ६ महिन्यांसाठी डॉक्टर्स भरतोय. डॉक्टर भरले नाहीतर डॉक्टर कुठून येणार. तालेरामध्ये डॉ. हांडे गेले आहेत. २ वर्षे झालीत, पण अजूनपर्यंत त्यांच्या जागेवर एम.डी. मेडीसीन डॉक्टर नाही. ते सोडून गेलेत. त्यांनी त्यांची सेपरेट ओपीडी काढली आहे. तिथे ते बसत असतात. डोळ्यांचे डॉक्टर ई.एन.टी. आत्ता आले आहेत. एक्स-रे मशीन अनेक वेळा बंदच असते. एक्स-रे टेक्निशियन घ्या. सहा महिन्यांसाठी घ्या, त्यांना कंटिन्यू करा. एक्स-रे काढण्यासाठी रुग्णाला चिंचवड गावातून वायसीएममध्ये पाठवतात. तालेरातून वायसीएमला जायला डायरेक्ट बस नाही. त्यापेक्षा पाचशे रुपयात एखादा एक्स-रे निघून जातो. सीटी स्कॅन मशीन डॉक्टर नसल्यामुळे धूळखात पडली आहे. डॉ.रॉय तुम्ही इथे आला आहात. आम्ही विरोध करणार होतो. परंतू पक्षनेत्यांच्या आदेशामुळे विरोध केला नाही. राष्ट्रवादी पक्षाच्या अध्यक्षांच्यामुळे आम्ही तुमच्यावर मेहेरबानी केली. तरी तुम्ही काम करावे अशी अपेक्षा आहे. म्हणून याठिकाणी पूर्णवेळासाठी डॉक्टर दिले पाहीजेत. त्यांची भरती करा, त्यांना नियमित करा. ६ महिन्यांसाठी कोणीच इथे येणार नाही. १०वी पास मुलगा देखील म्हणेल. ते पुन्हा पुन्हा परीक्षा घेतात. पुन्हा कामावर घेतले नाहीतर अपमान किती. एम.बी.बी.एस. व्हायला किती कष्ट लागतात. त्यांनी तुमच्याकडे परत का यावे. एका गोष्टीचे स्पष्टीकरण करा. महाराष्ट्र युनिव्हर्सिटी ऑफ हेल्थ सायन्स, नाशिक येथील पदव्युत्तर परीक्षेसाठी कॉलेज सुरु करण्यासाठी मान्यता घेतली आहे. त्याचे पुढे काय झाले? आपण कोर्ससाठी मान्यता घेतली आहे तर आपल्याला आपोआपच एमबीबीएस डॉक्टर्स मिळाले पाहीजेत. ही धावाधाव, भटकंती वाचली असती. हे घोडे कुठे अडकले आहे. तुम्ही सन्मा. मंत्री महोदयांना सांगितले असते तर, ज्यांना यातील ज्ञान आहे, अशा सदस्यांची मदत घेतली असती, हा कोर्स सुरु केला असतातर ही अडचण बरीचशी भागली असती. पूर्णवेळ डॉक्टर घेण्यासाठी तुमची जी पद्धती आहे,त्यात थोडासा बदल करा. कंटिन्युएशन अत्यंत महत्वाचे आहे. स्केल खूप कमी आहे. रु.३५,०००/- मानधनावर अनुभवी डॉक्टर मिळणार नाही. तुमचे स्केल आहे. ज्या पद्धतीने स्केल वाढवायचे असेल, ते त्याप्रकारे वाढवा. डॉक्टर उपलब्ध करुन द्या. तुम्ही चांगले, सुंदर हॉस्पिटल केले आहे. मॅनेजमेंट चांगली आहे. डॉ.भगत सर ओ.पी.डी.चे काम करत असतात. व पुन्हा इथे ३२ला येऊन बसलेले असतात. आमचे सुद्धा बरेच प्रश्न सोडवत असतात. काम करणारे, त्यांना साथ देणारे अनेक लोक आहेत. पुन्हा विनंती करते. आदरणीय सर्व सदस्यांना पुन्हा-पुन्हा विनंती करते की, याठिकाणी आपण अडचणी सोडवण्यासाठी हातभार लावा. आपण त्यांच्या वर्मावर बोट ठेवले तर अशी मोठमोठी कामे होणारच नाहीत. साथी हाथ बटाना, साथी रे, एक अकेला थक जाएगा, मिलकर बोझ उठाना।।

**मा.प्रशांत शितोळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मी जास्त वेळ बोलणार नाही. परंतू काही मुद्दे आहेत, जे सभागृहासमोर आलेले नाहीत. काही त्रुटी आहेत. आम्ही ज्या उपाययोजना केल्या होत्या, तुम्ही त्याचा पाठपुरावा करावा असा आग्रह आहे. सर्वात महत्वाचा विषय संपूर्ण सभागृहाला माहित आहे. या गोष्टीला ४ वर्षे झालीत. हेल्थ कार्ड योजना महापालिकेने मंजूर केली होती. वायसीएमचे कार्ड प्रत्येक नागरीकाला देणार होतो. त्या कार्डद्वारे रुग्णाला झालेल्या आजाराची माहिती, रुग्णाची हिस्टरी कळेल. त्याची अंमलबजावणी चांगल्या पद्धतीने करता येईल असा इश्यू होता. मी त्यावेळी मा.स्थायी समितीचा अध्यक्ष होतो. माझे हेल्थ कार्ड क्रमांक ३ आहे. परंतू या योजनेतून फार कमी कार्ड झालेत. हा आपला सिटीझन आहे. हा आपला नागरीक आहे. दुसरीकडे आपल्याला वर्गवारी करता येते. या चांगल्या योजना का गुंडाळून ठेवल्यात. अमृता या संस्थेने रु.५ कोटींचे काम घेतले आहे. मा.आशिष शर्मा यांनी ही अतिशय महत्वाकांक्षी प्रकल्प म्हणून या योजनेकडे लक्ष दिले होते. ही योजना राबवायचा प्रयत्न केला. जाणिवपूर्वक लक्ष द्या. ही योजना शहरातील नागरीकांसाठी फार चांगली आहे. काही वर्षांपूर्वी ही योजना आपल्या बजेटच्या मुख्य अजेंडावर होती. अजित दादांपासून, पवार साहेबांपासून सगळ्यांनी या योजनेचे कौतुक केले होते. शहरातील गरीब नागरीकांना याचा फायदा व्हावा. लोकांची वर्गवारी करता येईल, डिस्काऊंट देता येईल. अशाप्रकारची ही योजना का बंद पडली, का लागू झाली नाही. तुम्ही ही योजना चालू करावी. हा सदस्य प्रस्ताव असेल तर हा अतिशय जिव्हाळ्याचा प्रस्ताव आहे. वास्तविक पाहता, एक दीड वर्षांपूर्वी केंद्र शासनाने ही योजना संपूर्ण भारतात एका वेळी लागू केलेली योजना आहे. त्यामुळे आपण सरकारी संस्थेचा एक भाग म्हणून ही योजना स्विकारली पाहीजे. या योजना शंभर टक्के यंत्रणेला पूरक आहेत. ठराविक आजारापुरती न राहता जास्तीत जास्त लोकांना कसा उपयोग होईल. आपण ऑलरेडी रु.५० कोटी खर्च करतो. अजूनही बजेट वाढलेतरी फरक पडणार नाही. माळिण गावात दूर्घटना घडली. खेड, आंबेगाव तिथलेही रुग्ण वायसीएममध्ये उपचारांसाठी येत असतात. वायसीएमचे नाव चांगले आहे, चांगला उपचार मिळतो म्हणून लोक इथे येतात. वायसीएमचे नाव चांगले, उपचार चांगला म्हणून लोक इथे येतात. मानसिकतेच्या दृष्टीकोणातून याचा शंभर टक्के विचार केला गेला पाहीजे. यात अनेक त्रुटी सुद्धा आहेत. याचा सुद्धा विचार केला पाहीजे. मी कमीत कमी २० वेळा तरी बोललो असेल. आमच्याकडे औंध हॉस्पीटल आहे या रुग्णालयामध्ये एम.आर., सिटी स्कॅन मशीन्स आहेत. काही दिवसांपूर्वी भारतातील अतिशय चांगली टेक्नॉलॉजी, जगातली चांगली टेक्नॉलॉजी यातील हायर ग्रेडच्या मोठमोठ्या मशीनरी पीपीपी तत्वावर बसविल्या आहेत. महाराष्ट्र शासनाने ही योजना काढली, त्यातून एम.आर. केले जाते. यासाठी रु.१५ कोटी खर्च केला आहे. या हॉस्पीटलमध्ये रुग्णाला मोफत एमआरआय, सर्व प्रकारचे स्कॅनिंग केले जाते आहे. शासनाने काही बाहेरील रुग्णांसाठी रेट दिले आहेत. तीन/चार हजारापासून दहा हजारांपर्यंत एमआरआयचे रेटस् आहेत. इथे दरात सवलत मिळू शकेल. वायसीएममध्ये स्कॅनिंग होत नसेलतर औंध हॉस्पीटलला रिफर करा शहरात आपल्या चांगल्या वास्तू आहेत. शहराच्या लोकसंख्येच्या तुलनेत पाचशे/हजारावर रुग्णांची संख्या असेल तर त्यांचा उपचार वेळीच होणे गरजेचे असते. ते आपले कर्तव्य आहे. महापालिकेच्या माध्यमातून स्वाईन फ्ल्यूची साथ असताना औंध हॉस्पिटलमध्ये रु.१ कोटी खर्च केले. स्पेशल वॉर्ड तयार केला. आजही ते इन्फ्रास्ट्रकचर तयार आहे. डायलिसिसच्या १२ मशीनरी आहेत.

मोफत डायलिसिस केले जातात. पिंपरी चिंचवड शहराचा नागरीक म्हणून तिथे येण्याचे प्रमाण ५० टक्के आहे. उरलेले पेशंट महाराष्ट्राच्या कानाकोप-यातून येतात. या रुग्णालयातील सुविधा सर्वांना माहित झाल्या पाहीजेत. एवढे मोठे कोट्यावधी रुपये खर्च करुन बांधलेल्या रुग्णालयाचा वापर करता येत असेल तर नक्की करा. डॉ.जगदाळे यांना ब-याच वेळा घेऊन बसलो होतो. चांगला उपचार व्हावा म्हणून प्रयत्न करत असतो. परंतू इथल्या त्रुटींत सुद्धा लक्ष देणे गरजेचे आहे. केंद्र शासनाने दोन वर्षांपूर्वी लागू केलेली ही योजना आहे. या निमित्ताने त्यांना लागणा-या सर्व अडचणी दूर कराव्यात. हेल्थ कार्डची टॅक्स पावतीवर नोंद करु शकतो. हेल्थ कार्ड दिले आहेत. त्यांचा शंभर टक्के उपयोग होईल. तुम्ही हेल्थ कार्डचा विचार करावा. या विषयाची अंमलबजावणी करण्यासाठी हा विषय मंजूर करावा अशी विनंती आहे.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, केसपेपरचा विषय आहे. ब-याचशा वेळा केस पेपर काढायला जातो. ज्येष्ठ नागरीक सुद्धा यात असतात. ज्येष्ठ नागरिकांच्या लक्षात येत नाही. मग कशाला कार्ड काढले आहे? वायसीएममध्ये ज्येष्ठ नागरीकांना मोफत सेवा देणार म्हणून ठराव केला होता. रेशन कार्ड आणले आहे का. जर ज्येष्ठ नागरीकाचे कार्ड असेल तरीसुद्धा तिथे हे उत्तर दिले जाते. ते परत घरी जाऊन रेशन कार्ड आणू शकतात का. अनाथ अपंग ज्येष्ठ नागरीक असेल, मुका बहिरा असेल तर यांना केस पेपरचे दहा रुपये चार्जेस आहेत. वायसीएममध्ये पेपरलेस कारभार होणार होता यावर लक्ष केंद्रीत केले जावे. आजपर्यंत नगरसेवक लोकांना, राजकारणी लोकांनाच म्हटले जायचे, सत्ता बदलली, खुर्ची बदलली की त्याचे विषय बदलले जातात. तसे तुमच्या बाबतीत झाले आहे. पहिले आयुक्त डॉक्टर होते. शहरातील हॉस्पिटल्स् वर, आरोग्यावर जास्तीत जास्त लक्ष देत होते. त्यांनी वेगवेगळ्या योजना आणायचा प्रयत्न केला होता. डॉ. डोईफोडे आहेत. ते कोणत्या विषयाचे डॉक्टर आहे ते मला माहित नाही. ते वायसीएमसाठी काही सपोर्ट करु शकतील असे वाटत नाही. त्यांचा परिचय आपल्याकडे झाला नाही. खरेतर एवढे मोठे जॉईनिंग असताना त्यांचा परिचय होणे गरजेचे होते. आपल्याकडे सीपीएस कोर्स बंद झाला आहे. सीपीएस धरुन एकूण किती डॉक्टर्स कमी आहेत. कमीत कमी १५० डॉक्टर कमी आहेत. राजीव गांधी आरोग्य जीवनदायी योजना ही शासनाची योजना आहे. ही योजना करणे आपल्याला भागच आहे. ती बंद करु शकत नाही. आज कोण म्हणून एक हजार मानधनावर येईल. पूर्वी डॉक्टर येत होते. आपल्याकडे त्यांना सन्मानाची वागणूक मिळत नाही. मानधन हा शब्द होता तो फक्त त्यांना येण्यासाठी एन्ट्री होती. सिनिअर डॉक्टर्स ३५ ते ४० वर्षांपासून प्रॅक्टीस करणारे लोक आहेत. वायसीएममध्ये सन्मानाने त्यांना बोलवा. सगळ्या डॉक्टर लोकांची एक मिटींग लावा. त्यांचे मानधन एक हजार करु नका. किमान येण्याजाण्यासाठी पेट्रोलसाठी तरी त्यांचे मानधन कमीत कमी रु.२५,०००/- करा. आज आपल्या पिंपरी चिंचवडमध्ये परिस्थिती काय आहे. राजीव गांधी आरोग्यदायी योजना अंमलात आणली तर वायसीएमबाबत म्हणतो, तिथे योजना आहे तशी नाही. सन्माननीय म्हणतात. परंतू वायसीएमसारखे सुंदर हॉस्पीटल नाही. राजीव गांधी सारखी कोणतीही योजना आणली तर योजना बंद करणार आहोत का? तुम्हाला घ्यावी लागणार आहे. प्रायोरिटी पाहीजे. पिंपरी चिंचवड मधील इतर हॉस्पिटलवर तिथे सुद्धा वाढ केली गेली आहे. मोठ मोठे हॉस्पीटल्स यांना या योजनेमध्ये घेतले आहे. बाकी हॉस्पिटल्स् यांनी का घेतली

नाही? राजीव गांधी आरोग्य जीवनदायी योजनेसाठी फक्त लोकमान्य हॉस्पिटल यांनी घेतले आहे. यासाठी सगळ्या हॉस्पिटल्स् यांच्या वेगवेगळ्या मिटींग्ज् लागल्या. सिनिअर डॉक्टर्स यांना सन्मानाने बोलवावे. काही घटना इथे घडतात. त्यावेळी डॉक्टर लोकांबद्दल बोलले गेले जाते. तसे झाले नाही पाहीजे. ते इथे आल्यानंतर त्यांच्या डिग्री काढल्या जातात, इंटरेस्ट काढले जातात. वायसीएमची अशी अवस्था आज का झाली आहे. डॉ.रॉय यांनी खुलासा करावा की, कर्मचारी पुरेसे आहेत का. डॉक्टर पुरेसे आहेत का. सिक्युरीटी पुरेसी आहे का. पिंपरी चिंचवड याची जबाबदारी आपल्याला नाही का. आज सदस्य प्रस्ताव असू दे. परंतू तो विषय करताना आज आपण त्याची पूर्तता प्रत्येक ठिकाणी केली पाहीजे. नुसते वायसीएम म्हणून चालणार आहे का. तालेरा हॉस्पिटल आहे, जिजामाता हॉस्पिटल आहे, सगळी मोठी छोटी क्लिनिक्स् आहेत, ओपीडी आहेत. तिथे डॉक्टर्स आहेत का. तुमचे कौतुक करावे का नाही करावे हे मला कळत नाही. कमिशनर यांची सुद्धा इथे येताना परीक्षा घेतली पाहीजे. ते एम.डी., एम.बी.बी.एस. डॉक्टर आहेत. त्यांना आपण म्हणतो, तुम्ही पहिल्या परीक्षेला पास आहात का. हे लोक खोटी डिग्री घेऊन आले आहेत का? कोणत्याही माणसाला दुःख होईल. त्यांची सर्टिफिकेटस् बघा. त्यांचे क्वालिफिकेशन आहे का नाही ते बघा. त्याची डिग्री माहित आहे का. तुम्ही घेतलेल्या परीक्षेला काय महत्व आहे . त्याची डिग्री माहित नसेलतर त्यांची पुन्हा परीक्षा घ्या. त्यांच्या डिग्रीला महत्व नाही का. कुठेतरी चांगल्या पद्धतीने ताळमेळ घातला गेला पाहीजे. नवीन खुर्ची आहे. चांगल्या योजना राबवाव्यात असे वाटते. परंतू त्यांचा कुठेतरी अपमान होतो आहे का, हे सुद्धा बघितले गेले पाहीजे. वायसीएममध्ये चांगली प्रॅक्टीस करायला मिळते म्हणून तिथे यायचे असते. परंतू येत असताना त्यांना त्यासाठी तारेवरची कसरत होत असेलतर. कोण एक हजार मानधनावर येणार होते. माझ्यासारखी जाऊन म्हणू शकते, काय आमच्या पेशंटचे झाले आहे. आम्ही भावनेपोटी बोलतो. आम्हाला माहिती आहे का हा एक हजार मानधनावर आले आहेत. नवनवीन असाध्य ईबोला सारखे रोग येत आहेत. वॉटस् अपवर आले आहे, वायसीएमध्ये दोन पेशंट आले होते. अशी परिस्थिती आपल्या शहरात आलीतर आपली यंत्रणा सज्ज आहे का. पहिल्याच योजना पूर्ण करु शकत नाही. एक सिरिअस पेशंट आहे. त्यांना आयसीयू पाहिजे होते. पिंपरी चिंचवडमधील रहिवाशांसाठी आपण आयसीयू देऊ शकत नाही. जाधववाडीतील पेशंटला बाहेर जावे लागले. कालची १० वा. ची गोष्ट आहे. त्यांना विचारा. तुम्ही आयसीयू देऊ शकला नाहीत. जाधववाडीतली स्नेक बाईटची केस होती. जर पिंपरी चिंचवड शहरातील नागरीकांना वायसीएमसारखे मोठे हॉस्पिटल असताना त्यांना सुविधा देऊ शकत नाही. हेल्थ कार्ड योजना करा, काही योजना करा. अजून एक करता आलेतर बघा. सगळेच नगरसेवक वायसीएमची फॅसिलिटी घेतील का माहित नाही. परंतू खूप वेळा सभागृहामध्ये, आजी-माजी नगरसेवक यांच्या बाबतीत सुद्धा आज इतकी अवघड परिस्थिती आहे. काही लोक असलेतरी त्यांना फॅसिलिटी द्यायची आहे. त्या लोकांना काही चांगल्या सुविधा उपलब्ध करुन देता येत असतील, कुटूंबात कोणाला काही आजार असेल तर त्यात कुठे वावगे आहे. राजकारणी लोकांना समाजात चांगले काम करायचे असेल, खरच काही उलट पालट करणारे नगरसेवक नसतील तर ते एवढी फॅसिलिटी कुटूंबासाठी देऊ शकतात का. हा सुद्धा विचार केला गेला पाहीजे. नसेल होत तर गव्हर्नमेंटकडे पाठवून जरी होणार नसेल तरी विमा योजनेतून ब-याचशा गोष्टी केल्या आहेत. ज्या नगरसेवकांना या योजनेत यायचे असेल त्यांनी

२५ टक्के रक्कम द्यावी. परंतू ही योजना करावी. नगरसेवकांना सुद्धा ही फॅसिलिटी मिळाली गेली पाहीजे. या लोकांना ५ ते १० लाखापर्यंत द्या, हा विषय आज आम्ही देणार आहोत. त्यांना विमा योजनेत द्यायचे असेल तर २५ टक्के रक्कम घ्या. परंतू आजी-माजी नगरसेवकांना व त्यात करता आलेतर २१ वर्षाच्या आतील मुले आहेत त्यांच्यासाठी करता येईल. ते सुद्धा घ्यावे. कर्मचा-यांबाबतीत धन्वंतरी योजना आहे, मला माहित नाही, नियम हा शब्द व धोरण हा शब्द. यात कशाला महत्व आहे मला माहित नाही. आम्ही कितीतरी धोरणे सभागृहात केली. खूप अधिका-यांनी धोरण गुंडाळून ठेवायचे काम केले आहे. कर्मचा-यांसाठी धन्वंतरी योजना आहे. पिंपरी चिंचवडमध्ये काम करणारे कर्मचारी आहेत. ते २०१३च्या नियमावली ऐवजी धोरण शब्द म्हणून त्यांनी त्याची तातडीने अंमलबजावणी केली गेली पाहीजे. धोरण हा शब्द किती महत्वाचा आहे ते बघितले पाहीजे. महापालिकेचा ठराव आहे. ठराव क्र.४७५ दिनांक २०/२/२०१४ ला मान्यता दिली आहे. त्यात नियमावली ऐवजी त्याला धोरण म्हणून संबोधण्यात यावे अशी उपसूचना आहे. धोरण हा शब्द इतका महत्वाचा आहे. यात मला काम करता आले नाही. धन्वंतरी योजनेत धोरण हा शब्द टाकावा अशी सुद्धा विनंती करते. वायसीएममध्ये दोन मिटींग लावा. आम्ही बोलतो. त्याचे प्रोसिडींग बघा. डेंग्यूमुळे खूप पेशंट खूप प्रमाणात पसरलेला आहे. खूप पेशंट दगावले आहेत. पावसाळा गेल्यानंतर बरेचसे आजार तोंड वर काढतात. त्यामुळे आपल्याकडील यंत्रणा नसते. हे अज्ञान असू शकत नाही. दूर्घटनेत माणसे मरतात. घटना घडल्यानंतर माणूस दगावला. पिंपरी चिंचवडच्या दृष्टिकोणातून कोणकोणत्या अशा योजना आहेत. पिंपरी चिंचवड शहरातील लोकांसाठी त्यांचे आरोग्य महत्वपूर्ण आहे. त्यासाठी आरोग्यावर खूप लक्ष द्यावे लागणार आहे. तुम्ही जरी डॉक्टर नसलात तरी. वायसीएम व इतर हॉस्पिटल्स मध्ये डॉक्टर नसेल तर जास्तीत जास्त आम्ही भगत सरांकडे गेलोतर, देशमुख सरांकडे गेलोतर त्यांना काय म्हणणार. तिथे डॉक्टर नाहीत का. ते म्हणणार आत्ता त्यांची नियुक्ती संपली आहे. ज्यावेळी दुसरा डॉक्टर येईल त्यावेळी आम्ही भरु असे सांगतात. मग याची प्रोव्हिजन आपण आधीच करायला नको का. हे आपले कर्तव्य नाही का. मग तिथे कोणीतरी धिंगाणा करणार, आरडाओरडा करणार. मग या सुविधा तिथे उपलब्ध असणार. यापेक्षा तुम्ही यात जातीने लक्ष घालावे अशी विनंती करते. मी उपसूचना दिली आहे त्याचा स्विकार करावा अशी विनंती करते.

मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागामार्फत धन्वंतरी स्वास्थ योजना-२०१३ चे “धोरण” तयार करण्यात आले असून, सदर “धोरणास” मा.महापालिका सभेने ठराव क्र.४७५ दि. २०/०२/२०१४ अन्वये मान्यता दिलेली आहे. सदर ठरावामध्ये ज्या–ज्या ठिकाणी “नियमावली” असा उल्लेख आहे, त्या-त्या ठिकाणी “धोरण” असे वाचावे व सदरचे विषयांस “नियमावली” ऐवजी “धोरण” म्हणून संबोधण्यास व धन्वंतरी स्वास्थ योजना- २०१३ ची तातडीने अंमलबजावणी करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.सविता साळुंखे** – मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मंगलाताईंनी दिलेल्या धोरणाच्या सूचनेला अनुमोदन देतो. आधीचे आयुक्त डॉ.श्रीकर परदेशी यांनी केले ते आयुक्त साहेब मुळात करु नका. वायसीएमची वाट लावायचे काम त्यांनी केले. लोकल औषधे बंद झाली. रुग्णांना औषधे मिळत नाहीत. प्रिसक्रिप्शन बाहेर द्यावे लागते. सगळ्यांनी तळमळीने जे मत मांडले आहे की, इथे स्टाफ कमी आहे. विषय क्रमांक ९ हा हायकोर्टाच्या पद निर्मिती संदर्भातला आहे. यापूर्वी वायसीएमच्या स्टाफींग पॅटर्नला मंजूरी देण्यासाठी मा.महापालिका सभेने मंजूरी दिली होती. तो विषय पाठवला का नाही याची खातरजमा करावी. ही शासनाची योजना यशस्वीपणे राबवायची असेल तर मा.सुजाता पालांडे व अनेकांनी सांगितले आहे. वायसीएममध्ये गायनिक वॉर्डची काय अवस्था आहे. मा.शमिम पठाण यांनी सांगितले. तिथली दूरावस्था सांगितली. आम्हाला वायसीएमबद्दल सार्थ अभिमान आहे. तो असलाच पाहीजे. पण तिथे तशी सेवा मिळावी, फॅसिलिटीज तश्या मिळाव्यात. मा.भारती फरांदे ताईंनी सांगितले, वायसीएमची घडी मोडली आहे. थोडासा विस्कळीतपणा आला आहे. ही घडी बसविण्यासाठी आपण प्रयत्न करावेत. महत्वाचे म्हणे स्टाफ वाढवावा. मध्यंतरी नर्सेस यांनी संप केला होता. ६०/७० नर्सेस नाईट शिफ्टमध्ये कंटिन्यू काम करत असतात. आता त्यांचा एज बार व्हायला लागला आहे. गेल्या ७/८ वर्षांपासून त्या सेवा करत आहेत. आपण काय प्रायव्हेट लिमिटेड कंपनी नाही की कॉंट्रॅक्ट बेसिसवर राबवून घ्यायचे व नंतर काढून घ्यायचे. वाईट पद्धत म्हणजे ६ महिन्यांनंतर परत लेखी परीक्षा. वॉर्डबॉय, आया यांना सुद्धा हेच. डॉक्टर यांना सुद्धा तेच. त्याच पद्धतीने त्यांची लेखी परीक्षेत अपडेट होत असते. टेकाळे साहेबांनी एक पेपर काढला. नवीन डॉक्टर आला, त्याने वेगळा पेपर काढला. मागे बंड साहेब असताना असेच झाले होते. तिथे ९ वर्षांपासून काम करणारे डॉक्टर होते. त्यांची परीक्षा घेतली. ते लोक हायकोर्टात गेले. पुन्हा फेल्युअर झाले. ते सुप्रिम कोर्टात गेले. ५ जण नापास झाले. २३ लोकांना रेग्युलराईज केले. तुम्ही, डॉ.रॉय, संबंधित डॉक्टर यांनी एकत्र बसून ठरवा की, किमान आवश्यक पदे किती, ती पदे ताबडतोब कशी भरता येतील, आणि किमान वेतन देत असताना त्यांना आपण न्याय देतो का नाही हे बघितले पाहिजे. चांगल्या पद्धतीने मानवी सेवा लोकांना मिळावी. ओव्हरब्रीजची कामे होतील. रस्त्यांची कामे होतील. ड्रेनेजची कामे होतील. कोट्यावधींची कामे होतील. परंतू मानवी सेवा, मूळ हेल्थ पाहिजे. Because health is wealth. म्हणून मा.मंगलाताई कदम यांनी सांगितले होते. आयुक्त म्हणून आपण वायसीएमकडे व आरोग्याकडे लक्ष द्या. डॉ.श्रीकर परदेशी यांच्यासारखे लक्ष देऊ नका. चांगली सेवा कशी देता येईल. लोकांना चांगली सेवा उपलब्ध होईल. औषधे उपलब्ध होतील. यासाठी याकडे लक्ष द्यावे.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर** – हा विषय उपसूचनेसहित मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - ५४९ विषय क्रमांक - २
दिनांक - १९/८/२०१४ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ– १) मा.शांताराम भालेकर, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.७४१७ दि.२४/०७/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना दि. १ मे २०१४ पासून राबविण्यात आली आहे. सदर योजनेच्या अनुषंगाने वाय.सी.एम. रुग्णालयातील योजनेच्या पात्र लाभार्थ्यांकडून दि. १ मे २०१४ पासून कोणतेही शुल्क आकारले नसलेने त्यास मान्यता देण्यात यावी व पुढील काळात केसपेपर शुल्क आकारण्यात येऊ नये. तसेच महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालयांत व दवाखान्यांमध्ये पिंपरी चिंचवड शहरातील पिवळे व केसरी शिधापत्रिकाधारक नागरीकांसाठी केसपेपरसाठी कोणतेही शुल्क आकारण्यात येऊ नये. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील दि. १ मे २०१४ पासून राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमधील पात्र लाभार्थ्यांकडून केसपेपरकरीता कोणतेही शुल्क आकारले नसलेने त्यास व पुढील काळात महानगरपालिकेच्या अन्य सर्व रुग्णालये व दवाखान्यांमध्ये दाखल होणा-या पिंपरी चिंचवड शहरातील पिवळे व केसरी शिधापत्रिकाधारक नागरीकांसाठी केसपेपरसाठी कोणतेही शुल्क आकारणेत येऊ नये यास मान्यता देणेत येत आहे तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्दकीय विभागामार्फत धन्वंतरी स्वास्थ योजना-२०१३ चे "धोरण" तयार करण्यात आले असून, सदर "धोरणास" मा.महापालिका सभेने ठराव क्र.४७५ दि. २०/०२/२०१४ अन्वये मान्यता दिलेली आहे. सदर ठरावामध्ये ज्या–ज्या ठिकाणी "नियमावली" असा उल्लेख आहे, त्या-त्या ठिकाणी "धोरण" असे वाचावे व सदरचे विषयांस "नियमावली" ऐवजी "धोरण" म्हणून संबोधण्यास व धन्वंतरी स्वास्थ योजना- २०१३ ची तातडीने अंमलबजावणी करण्यास मान्यता देणेत येत आहे तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमधील आजी नगरसदस्य (पती / पत्नी) व त्यांचेवर अवलंबुन असलेली ०२ मुले (२१ वर्षापर्यंत अथवा नियमाप्रमाणे) यांचा र.रु.१० लाखापर्यंतचा आरोग्य विमा उतरविणेस व विम्याच्या हप्त्यापोटी २५% रक्कम संबंधीत आजी नगरसदस्याने व उर्वरित ७५% रक्कम महानगरपालिकेने देणेस व सदरची योजना / कामकाज वैद्दकीय विभागामार्फत करणेस मान्यता देणेत येत आहे तसेच ज्येष्ठ नागरीकांना हेल्थकार्ड मोफत देणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ३

दिनांक - १९/८/२०१४ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ :-१) मा.सुनिता गवळी, मा.विनय गायकवाड यांचा प्रस्ताव –
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.७५६७ दि. ०५/०८ /२०१४

घंटागाडी कर्मचा-यांना सन २०१३-२०१४ सालाकरिता र.रु.१५,०००/- (पंधरा हजार रुपये फक्त) दिपावलीनिमित्त बक्षिस रक्कम विनापरतावा विशेष बाब म्हणून अदा करणेस (एका वर्षामध्ये सहा महिन्यांपासून पूर्ण वर्षापर्यंत सलग काम केले असल्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.जितेंद्र ननावरे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - ऑफीसर ऑफ विक प्रमाणे वर्ग क्र. ३ व ४ चे कर्मचारी, सुरक्षा अधिकारी कर्मचारी/घंटागाडी कर्मचारी इ. यांचेसाठीही योजना सुरु करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.कैलास थोपटे** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,घंडागाडी कर्मचा-यांना रु.१५,०००/- दिवाळी बक्षिस अदा करण्यासंदर्भातील हा विषय आहे. प्रशासनाने याबाबतीत खुलासा करावा की, घंटागाडी कर्मचा-यांप्रमाणे असे बरेचसे कर्मचारी आहेत, त्यांना आपण दिवाळी बोनस देतो. यात सगळे विषय ऍड झाले पाहीजेत. आचारसंहिता लागेल म्हणून असे व्हायला नको आपला कर्मचारी दिवाळी बोनसपासून वंचित राहीला. आजपर्यंत घंटागाडी कर्मचा-यांसारखे कोणकोणते कर्मचारी आहेत ज्यांना आपण बक्षिस देऊ शकतो. घंटागाडीवाले कष्टाचे, मेहनतीचे काम करत असतात. बाकी सफाई कर्मचा-यांना बक्षिस द्यायला नको का? असे किती घटक आहेत, ज्यांना आपण बोनस देऊ शकतो.

**मा.प्रशांत खांडकेकर (सहा.आयुक्त)** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, महापालिकेच्या कर्मचारी संघाने तीन वर्षाचा करार केला आहे. त्यामुळे बाकी कर्मचारी समग्र अनुदानापासून ते वंचित राहणार नाहीत. हा सदस्य प्रस्ताव आहे. घंटागाडी कर्मचा-यांना सुद्धा काही वर्षापासून बक्षिस देतो आहोत. बक्षिस रुपाने रक्कम देतो आहोत. मागील वर्षी रु.१३,०००/- दिले होते. यावर्षी रु.१५,०००/- देणार आहोत.

**मा.मंगलाताई कदम** – मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते आहे - मागील वर्षी ज्या कर्मचा-यांना र.रु.१३,०००/- दिवाळीत मानधन देण्यात आले होते, त्या सर्व कर्मचा-यांना यावर्षी दिवाळीत र.रु.१५,०००/- मानधन देण्यात यावे.

**मा.सविता साळुंके** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर** – हा विषय उपसूचनेसहित मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - ५५० विषय क्रमांक - ३
दिनांक - १९/८/२०१४ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ :-१) मा.सुनिता गवळी, मा.विनय गायकवाड यांचा प्रस्ताव –
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.७५६७ दि.०५/०८ /२०१४

घंटागाडी कर्मचा-यांना सन २०१३-२०१४ सालाकरिता र.रु.१५,०००/- (पंधरा हजार रुपये फक्त) दिपावलीनिमित्त बक्षिस रक्कम विनापरतावा विशेष बाब म्हणून अदा करणेस (एका वर्षामध्ये सहा महिन्यांपासून पूर्ण वर्षापर्यंत सलग काम केले असल्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे तसेच ऑफीसर ऑफ विक प्रमाणे वर्ग क्र. ३ व ४ चे कर्मचारी, सुरक्षा अधिकारी कर्मचारी/घंटागाडी कर्मचारी इ. यांचेसाठीही योजना सुरु करणेस मान्यता देणेत येत आहे तसेच मागील वर्षी ज्या कर्मचा-यांना र.रु.१३,०००/- दिवाळीत मानधन देण्यात आले होते त्या सर्व कर्मचा-यांना यावर्षी दिवाळीत र.रु.१५,०००/- मानधन देणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल-०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ४
दिनांक - १९/८/२०१४ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.भूजि/१/कावि/३४८/२०१३ दि.०३/०९/२०१३
२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.१३१ दि.१२/११/२०१३
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४२४ दि.१८/०१/२०१४
४) मा.महापालिका सभा ठ.क्र.५०४ दि.०५/०७/२०१४
५) मा.महापालिका सभा ठ.क्र.५३३ दि.०५/०८/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मिळकत वाटप नियमावली २०१३ प्रस्तावासोबत नमुद केलेप्रमाणे (प्रारुप) तयार करणेत आलेली आहे त्यास तसेच मनपा मिळकत वाटप नियमावली २०१३ मधील भाग-५ मध्ये मिळकत विनियोगाचा प्राधान्यक्रम ठरविणेत आला आहे. तथापि सदर नमुद १ ते ७ प्राधान्य वर्गासाठी जाहिर निविदेद्वारे काही वर्गासाठी निविदा प्राप्त न झालेस किंवा कमी संख्येत प्राप्त झाल्यास इतर आरक्षीत वर्गासाठी त्या मिळकती वाटप करणेचे अधिकार मा.महापालिका सभेला असतील. यामध्ये ज्या आरक्षीत वर्गासाठी शासन निर्णय/आदेश असतील त्याला बाधा न येता मा.महापालिका सभेस निर्णय घेता येतील यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.शमिम पठाण** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, पिंपरी चिंचवड महानगरपालिका मिळकत वाटप नियमावली बरेच दिवसांपूर्वी दिलेली आहे. भूमि आणि जिंदगी विभागाने २०१३ला मिळकत वाटप नियमावली केली होती, ती आमच्याकडे दिली होती. मागील मिटींगमध्ये यादी मागितली होती, ती आत्ता आमच्याकडे दिली आहे. ही यादी परिपूर्ण नाही. साधा व सोप्पा उपाय म्हणजे प्रत्येक नगरसेवकाने आपल्या विभागातील महापालिकेच्या इमारतींबद्दल माहिती विचारलेली असती तर सहज ती त्याला माहित मिळाली असती. आपला कोणीतरी कर्मचारी, सर्व्हेअर तिथे आला, त्याने माहिती काढली, ती अपूर्ण आहे. याठिकाणी माझ्या प्रभागाबद्दल बोलायचे झालेतर, चिंचवड गावाबद्दल बोलायचे झालेतर या भागात अनेक व्यापारी गाळे यातून सुटलेले आहेत. ते का सोडले आहेत. जाणूनबुजून सोडले आहेत का अशी मला शंका आहे. माझ्या सहकारी नगरसेविका मा.अश्विनी चिंचवडे यांना याची कल्पना होती. मी सहा.आयुक्त श्री.खांडकेकर यांना सांगितले, चांगला उपक्रम आहे. परंतू कोणीतरी भाडे खातोय. आणि आपण बांधून मोकळे झालोत. वसुली किती झाली, भाडे किती आहे. सध्या तिथे काय उद्योग चालू आहेत?याची आपल्याला काही माहिती आहे का नाही. अगदी अर्धवट माहिती दिलेली आहे. ४/५ गाळे असताना एकच गाळा दिला जातो. आपले बांधण्यासाठी पैसे गेले आहेत. त्याठिकाणी ज्येष्ठांसाठी बांधलेले अनेक गाळे आहेत. त्यांची इथे नोंद नाही. मी स्वतः जाऊन नोंद केली आहे. महापालिकेची अनेक क्रिडांगणे आहेत. त्यांचे नाव नाही, गाव नाही. काय चालले आहे हे. आपल्या प्रॉपर्टीबद्दल आपण जागरुक नसाल, सजग नसाल तर या महापालिकेच्या इमारतींमध्ये कोणीही येऊन आपले ऑफीस उघडेल. दुकान टाकले तरी आश्चर्य वाटायला नको. प्रत्येक इमारतीचे जतन केले पाहीजे. त्याची वसूली केली पाहीजे. अप्पूघरवर खूप प्रचंड, कोट्यावधी रुपये खर्च केले. पिंपरी चिंचवडमधील प्रेक्षणीय स्थळांपैकी ते एक आहे. आज काय अवस्था आहे. कशासाठी आपण एखाद्या व्यक्तीला, संस्थेला डोळ्यापुढे ठेवून कित्येक वर्षांच्या कालावधीसाठी देतोय. त्याचे इतके लाड झाले आहेत. आत्ता त्याच्या दुरुस्तीसाठी आपण पैसे देतोय. आपला अभिमान वाढवणा-या अशा ज्या गोष्टी आहेत. जे पॉईंटस् आहेत, ते इतरांच्या हातात देऊ नका. आयुक्त साहेब, आमचे चुकलेतरी तुम्ही याठिकाणी चालक आहात, तुम्हाला अधिकार आहेत. आम्ही एखादा विषय केला, ठराव केला तरी तो अंमलात आणायचा का नाही ते तुम्ही ठरवणारे आहात. म्हणून आपल्या हातात जे काही आहेत, तिथे त्यासाठी

तडजोड करु नका. आपल्या मालमत्ता आहेत, त्या स्पष्ट नमूद केलेल्या नाहीत. जोपर्यंत आपल्या सर्व मालमत्ता, इमारती, जमिनी, दुकाने, शाळा जे सर्व काही आहे, ते जोपर्यंत नमूद होत नाही, त्याची नोंद होत नाही, तोपर्यंत हा विषय आपल्यापुढे आणू नये. हा विषय पुढील मिटींगपर्यंत तहकूब ठेवावा, अशी पक्षनेत्यांना व सभागृहाला मी विनंती करते.

**मा.प्रभाकर वाघेरे –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ तहकुब करणेत यावा.

**मा.साधना जाधव –** मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - ५५१ विषय क्रमांक - ४

दिनांक - १९/८/२०१४ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.भूजि/१/कावि/३४८/२०१३ दि.०३/०९/२०१३

२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.१३१ दि.१२/११/२०१३

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४२४ दि.१८/०१/२०१४

४) मा.महापालिका सभा ठ.क्र.५०४ दि.०५/०७/२०१४

५) मा.महापालिका सभा ठ.क्र.५३३ दि.०५/०८/२०१४

विषय क्र. ४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल-८१ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ५

दिनांक - १९/८/२०१४ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१०/५९२/२०१३ दि.०४/०९/२०१३

२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.४७ दि.१८/१२/२०१३

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४५८ दि.२०/०१/२०१४

४) मा.महापालिका सभा ठ.क्र.५१९ दि.०५/०७/२०१४

५) मा.महापालिका सभा ठ.क्र.५३६ दि.०५/०८/२०१४

पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत चाकण,देहू,आळंदी,हिंजवाडी,म्हाळुंगे मोई, मारुंजी व इतर परिसराचा समावेश करणेबाबत शासनास मनपाचे अभिप्राय सादर करणेपूर्वी सर्व पदाधिकारी यांची बैठक दि.३०/०८/२०१३ रोजी मा.आयुक्त यांचे कक्षात घेण्यात आली. सदर

बैठकीत मनपा हद्दीच्या उत्तरेकडील १४ गावे आणि मनपा हद्दीच्या पश्चिमेकडील ६ गावे मनपा हद्दीत समावेश करणेबाबत सविस्तर चर्चा करणेत आली आणि सदर हद्दवाढीचा प्रस्ताव मा.शहर सुधारणा समिती मार्फत मा.महापालिका सभेपुढे सादर करणेबाबत चर्चा झाली तथापि सद्य:स्थितीत मनपा हद्दीला लागून असलेली गावे मनपा हद्दीत समाविष्ट करणे योग्य होईल. त्यानुसार खालील नमुद मनपा हद्दीच्या उत्तरेकडील आळंदी, चिंबळी, कुरुळी, मोई, निघोजे, देहू, विठ्ठलनगर आणि मनपा हद्दीच्या पश्चिमेकडील गहुंजे,जांबे,मारुंजी,हिंजवाडी, माण,नेरे,सांगवडे ही मनपा हद्दीला लागून असलेली एकूण १४ गावे मनपा हद्दीत समाविष्ट करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.शमिम पठाण –** विषय क्रमांक ५ तहकूब करणेत यावा अशी सूचना मांडते.

**मा.अरुणा भालेकर** – मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - ५५२ विषय क्रमांक - ५
दिनांक - १९/८/२०१४ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१०/५९२/२०१३ दि.०४/०९/२०१३
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.४७ दि.१८/१२/२०१३
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४५८ दि.२०/०१/२०१४
४) मा.महापालिका सभा ठ.क्र.५१९ दि.०५/०७/२०१४
५) मा.महापालिका सभा ठ.क्र.५३६ दि.०५/०८/२०१४

विषय क्र. ५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल-८१ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ६

दिनांक - १९/८/२०१४ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. नरवि/कावि/१०/५९८/२०१३ दि.०७/१०/२०१३

२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.४८ दि.१८/१२/२०१३

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४५९ दि.२०/०१/२०१४

४) मा.महापालिका सभा ठ.क्र.५२० दि.०५/०७/२०१४

५) मा.महापालिका सभा ठ.क्र.५३७ दि.०५/०८/२०१४

पिंपरी चिंचवड मनपा हद्दीच्या उत्तरेकडील आणि मनपा हद्दीला लागून असलेली ७ गावे आणि मनपा हद्दीच्या पश्चीमेकडील ७ गांवे अशी एकूण १४ गावे मनपा हद्दीत समाविष्ट करणेबाबत प्रस्ताव मान्यतेकामी पुढील प्रमाणे आहे. मनपा हद्दीत समाविष्ट करावयाचे गांवे- मनपा हद्दीच्या उत्तरे कडील ७ गावे- आळंदी, चिंबळी, कुरुळी, मोई,निघोजे, देहू, विठ्ठलनगर. मनपा हद्दीच्या पश्चीमे कडील ७ गांवे- हिंजवडी, जांबे, माण, मारुंजी, नेरे, गहुंजे, सांगवडे वरीलप्रमाणे प्रस्ताव पत्र क्र.नरवि/कावि/१०/५९२/२०१३ दिनांक ४/९/२०१३ अन्वये मा.शहर सुधारणा समितीमार्फत मा.महापालिका सभेपुढे सादर केलेला आहे. प्रस्तुत विषयी मा.आमदार श्री.दिलीप मोहिते यांनी दि.१०/०९/२०१३ च्या पत्राने खेड तालुक्यातील आळंदी, चाकण, मोई, कुरुळी, निघोजे, चिंबळी, केळगांव, सालुंब्रे, महाळुंगे, खराबवाडी, नाणेकरवाडी, मेदनकरवाडी, कडाचीवाडी या गावांचा पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत समावेश होणेबाबत विरोध केला असल्याचे आणि सदर गांवे मनपा हद्दीत समावेश करु नये असे नमूद केले असून त्यासोबत ग्रामपंचायतीच्या ठरावाची प्रत जोडली आहे. प्रस्तुत विषय मा.महापालिका सभेपुढे सादर केलेला असल्याने या विषयासोबत मा.आमदार श्री.दिलीप मोहिते यांचे पत्र व त्यासोबतचे सहपत्रे मा.महापालिका सभेपुढे सादर करणेस मान्यता देणेत आहे.

**मा.श्रद्धा लांडे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.शमिम पठाण –** विषय क्रमांक ६ तहकूब करणेत यावा अशी सूचना मांडते.

**मा.अरुणा भालेकर** - मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - ५५३ विषय क्रमांक - ६
दिनांक - १९/८/२०१४ विभाग – मा.आयुक्त

संदर्भः-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. नरवि/कावि/१०/५९८/२०१३ दि.०७/१०/२०१३
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.४८ दि.१८/१२/२०१३
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४५९ दि.२०/०१/२०१४
४) मा.महापालिका सभा ठ.क्र.५२० दि.०५/०७/२०१४
५) मा.महापालिका सभा ठ.क्र.५३७ दि.०५/०८/२०१४

विषय क्र. ६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल-८१ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ७
दिनांक - १९/८/२०१४ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ–१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पअक/१०/कावि/८५४/२०१३ दि.१९/१०/२०१३
२) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ४४० दि.१८/०१/२०१४
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.५२४ दि.०५/०७/२०१४
४) मा.महापालिका सभा ठ.क्र.५४० दि.०५/०८/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये कासारवाडी येथे मनपामार्फत मैलापाणी शुद्धीकरणासाठी टप्पा क्र. १,२ व ३ असे एकुण तीन Sewage Treatment Plant आहेत. सदर प्लॅन्टमध्ये सद्यस्थिती सर्वसाधारण ७४ ते ८० एम.एल.डी. मैलापाण्यावर प्रक्रिया केली जाते. सद्यस्थितीत प्रक्रियायुक्त पाण्याचा पुर्नवापर काही प्रमाणात मनपाचे उद्यानासाठी करणेत येतो व उर्वरित पाणी नदीपात्रामध्ये सोडणेत येते. CME येथे कासारवाडी STP पासून पंपिंगद्वारे पाणी पुरविणेच्या कामाचे अंदाजपत्रक तयार केले असून सदर कामाची एकुण अंदाजपत्रकीय रक्कम २,४७,४८,२११/- इतकी येत असलेबाबत, त्यांना यापूर्वी कळविलेले आहे. त्यानंतर त्यांनी दिनांक २५/०७/२०१३ रोजीचे पत्रानुसार सदर कामासाठी आवश्यक असणारी रक्कम मनपाकडे डिपॉझीट म्हणून जमा करणेची, तसेच या रक्कमेतून काम पूर्ण झालेनंतर देखभाल, दुरुस्तीकामी प्रति महिना आवश्यक ती रक्कम देणेची संमती दर्शविलेली आहे. तसेच सदरचे काम त्यांनी त्वरीत पूर्ण करुन देणेबाबत कळविलेले आहे. परंतु सदर कामासाठी CME

यांचेकडून सन २०१३-१४ चे अंदाजपत्रकानंतर (म्हणजे २५ जुलै २०१३ रोजी) पत्र मिळाले असून या विभागामार्फत सदर कामाचे खर्चासाठीची तरतुद या वर्षाच्या मनपाच्या अंदाजपत्रकामध्ये करणेत आलेली नाही. परंतू सदर कामासाठी आवश्यक असणारी रक्कम CME कडून मनपाकडे जमा होणार असलेने त्या रक्कमेतून सदर काम मनपामार्फत करुन घेणेस येणारे अंदाजे सुमारे र.रु.२,४८,००,०००/- चे रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.श्रद्धा लांडे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.संजय काटे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, हा विषय सभागृहापुढे गेले १० महिन्यांपासून येतो आहे. कमीत कमी २० वेळा हा विषय सभागृहापुढे आला आहे. ट्रिट केलेले वॉटर सीएमई यांना देण्याबाबत हा विषय आहे. याबद्दल दुमत नाही. परंतू पिंपरी चिंचवड महापालिका व सीएमई या दोन संस्थांमधील हा विषय आहे. याचा सदस्यांमध्ये आपापसांत गैरसमज व्हायला नको. हा माझ्या वॉर्डातला विषय आहे. तुम्ही कशाला बोलता. आयुक्त साहेबांनी या विषयाचा खुलासा करावा, हा कोणाच्या वॉर्डातला विषय आहे का. दोन संस्थांमधील विषय आहे, हा गैरसमज पसरविला जातो आहे. त्याचा खुलासा करावा. हा विषय कोण लांबवतोय. हा विषय थांबवण्यासाठी मी का म्हणतो. ज्या सीएमई संस्थेला आपण पाणी द्यायचे म्हणतोय. त्यांच्या बोपखेल मधील हद्दीतून नागरीकांना जाता येता येत नाही. रस्त्याची अवस्था फार वाईट आहे. गेले दोन अडीच वर्षे मी सातत्याने मागणी करतोय. खड्डे बुजवा. पण खड्डे बुजवले नाही. दहा महिने विषय तहकूब ठेवून सुद्धा ते करत नाहीत. किती त्रास देतात. दुय्यम वागणूक देतात. याचा विचार आपण केला पाहीजे. दहा दिवसांपूर्वी एक्झिक्युटीव्ह इंजिनिअर निकम साहेब, संजय कुलकर्णी साहेब व मी स्वतः १२ तारखेला गेलो होतो. १३,१४,१५ व १६ या चार दिवसांत मी स्वतः खड्डे बुजवले. सीएमईकडून झाले नाही. आजतागायत तसे काही झालेले नाही. महापौर साहेब या स्वतः सीएमईच्या हद्दीत आल्या होत्या. त्यांनी परिस्थिती काय आहे ती पाहिली आहे. महापौर साहेब आपण योग्य तो निर्णय घ्यावा. हा विषय तहकूब करा. मान्य करु नका. मा.महापौर साहेब, आपण नागरीकांच्या हिताचा निर्णय घ्यावा.

**मा.आशा शेंडगे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरेतर मैलाशुद्धीकरणातून ट्रिट केलेले पाणी सीएमई यांना देणे हा विषय अनेक वेळा सभागृहापुढे आला आहे. त्यांची ही मागणी आहे. ती मोफत आहे. त्यांच्या प्रभागातील लोकांसाठी रस्ता आहे. रस्त्यावरील खड्डे बुजवले गेले पाहीजेत. परंतू मी विनंती करते, खरेतर त्यांना पाणी द्यावे. मैलापाणी शुध्दीकरणातील पाणी नदीत सोडले जाते तेव्हा त्याची व्हॅल्यू काहीच रहात नाही. सीएमई यांना पाणी दिलेतर चांगल्या प्रकारची रक्कम मिळेल. हा महत्वाचा पॉईट असलातरी रस्त्यांवरील खड्डे बुजवून देणे हा सुद्धा महत्वाचा भाग आहे. यात सीएमई व पिंपरी चिंचवड महापालिका यांच्यात कुठेतरी समन्वय साधला गेला पाहीजे. माझी आपल्याला विनंती राहील की, याचा खुलासा करावा. किती दिवसांत खड्डे बुजवणार आहेत. तुम्ही त्यांना पाणी सुद्धा दिले पाहीजे. यापुढे तुमची व महापौरांची पूर्ण जबाबदारी असेल. प्रत्येक वेळी किती दिवस हा विषय येणार. विषय

कितीवेळा तहकूब करणार. बोपखेल इथे जाऊन अवस्था बघा. अनेक नागरीकांच्या गाड्या स्लिप झाल्या आहेत. काही लोक या खड्यांमध्ये पडून जखमी झाले आहेत. आपलेच लोक आहेत. आपण सुविधा दिली पाहीजे. तिथल्या नागरीकांकडे आपण दूर्लक्ष का करतोय. दोघांमध्ये समन्वय धरून हा विषय करावा.

**मा.चंद्रकांता सोनकांबळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मा.संजय काटे यांनी सांगितलेले बरोबर आहे. गेल्या मार्च महिन्यापासून आम्ही स्वतः तिथल्या अधिका-यांना भेटलो. लेफ्टनंट कमांडंट यांनी सांगितले, हा रोड आहे, तो डिपार्टमेंटकडून करुन घ्या. त्याआधी महापालिकेने खड्डे बुजविण्यासाठी गाड्या घेऊन मुरुम घेऊन गेले होते. दोघांनाही परत पाठवून दिले. इथे मुरुम टाकायचे नाही. तेव्हा आम्ही सांगितले, ठिक आहे. आम्ही रोडचे टेंडर काढले आहे. आमच्या प्रिमायसेसमध्ये जेवढे रोड आहेत, त्याच संदर्भात हा रोड आहे. बोपोडी ते दापोडी हा रोड करुन देतो. हा शब्द त्यांनी आमच्या समोर दिला होता. आणि विनंती केली होती, आम्हाला आधार कार्ड मशीन आणून द्या. आपण दोन मशीन्स तिथे दिल्या. तिथे तीन हजार लोकांनी, स्थानिक लोकांनी, या लोकांनी सुद्धा आधार कार्ड काढले. हे झाल्यानंतर त्यांचे मार्च महिन्यात टेंडर निघाले. त्यांच्या प्रिमायसेसमध्ये इतका छान रस्ता केला. अत्यंत सुंदर रस्ता केला. तो मार्च महिना गेला. आत्ता हा मार्च महिना गेला. त्यांनी जो शब्द दिला होता तो त्यांनी पाळायला पाहिजे होता. त्यांनी रस्ता केला नाही. कायदे कडक आहेत. मिलिटरीच्या हद्दीमध्ये आहे म्हणून आपल्या नागरीकांना सुविधा द्यायची नाही का. आपल्या हद्दीतून मिलिटरीच्या मोठ मोठ्या गाड्या जात असतात. भाजी मंडईतून भाजी घेऊन जातात. असे असताना हा विषय गेले २/३ महिन्यांपासून पेंडींग आहे. तिथे नागरीकांना जाण्या येण्यासाठी नियम आहे. या रस्त्यांवरील खड्यांत पडून एखादा मुलगा किंवा माणूस मरेल. त्यानंतर खड्डे बुजवायचेत का. त्यानंतर मिलिटरी यांना विचारायचे का. नागरीकांना सुविधा देताना विरोध करायचा हा त्यांचा कायदा आहे. एखाद्याला घर बांधू देत नाहीत. रोड करु देत नाहीत. त्यांना सेवा देण्यापासून वंचित ठेवता. त्या मिलिटरी अधिका-यांना त्यासाठी नोटीस द्यावी. त्यांना नागरीकांना सुविधांपासून वंचित ठेवता येणार नाही. कमांडंट यांना बोलवून सांगा, जो रोड आहे, तो पूर्वीच्या वहिवाटीचा रस्ता आहे. बोपखेलमधील नागरीकांचा रस्ता आहे. जोपर्यंत आपण स्ट्राँग पाऊल उचलत नाहीत, तोपर्यंत त्यांना काही फरक पडणार नाही. मिलिटरी अधिका-यांवर ताबडतोब कारवाई करावी. तुमच्याकडून त्यांना नोटीस जाऊ देत अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, हा इतका जिव्हाळ्याचा विषय आहे. मा.नाना काटे असतील किंवा दापोडीतले नगरसेवक असतील, दर वेळी आपण सुद्धा त्यांना काही फॅसिलिटीज पुरवतो. पिंपरी चिंचवड महापालिका त्यांना ट्रिट केलेले पाणी देणार, व ते आपल्याला पैसे देणार हा मुद्दा वेगळा आहे. परंतू रस्त्याची दुरुस्ती करणे हे सुद्धा काम आहे का नाही. मिलिटरी हे केंद्र सरकारचे डिपार्टमेंट आहे. त्यांच्याविषयी आम्हाला फार आदर आहे. संरक्षित क्षेत्र म्हणून असले तरी ४०,००० माणसे रोडवर येता जाता मिळतील. एक हजार माणसे रस्त्यावरुन दगावली आहेत. तुम्ही त्यांच्या जीवनाची व्यवस्था करुन देऊ शकता का. २०० खड्यांतले ३ खड्डे बुजविणार. त्यांना होत नसेलतर

आम्हाला करायला द्या. कोणतेही साधे ड्रेनेज लाईनचे काम पूर्ण केले नसेल किंवा फ्लॅट धारकांना ड्रेनेजचा त्रास होत असेलतर आपण त्यांना त्रास होतो म्हणून त्याचे पिण्याचे पाणी बंद करु. आपण त्यांच्याविषयी असे काही बोलू शकत नाही. परंतू आपल्या लोकांना रस्ता नीट देणार नसतील तर पिण्याच्या पाण्याबद्दल काय करायला पाहीजे. नाक दाबल्यानंतर तोंड उघडणार असेल तर आपण कुठेतरी नाक दाबायला शिकले पाहिजे. आमच्या नगरसेवकांची बदनामी होते आहे. गेले ९ महिने हा विषय तहकूब ठेवतोय. अपघातात बोपखेलमधील दोन माणसे गेली तरी आख्खे कुटूंब उद्धवस्त होईल. किती वर्षे झाली आहेत. कुठेतरी पोटतिडकीने विषय सोडवला पाहिजे. यातून मार्ग काढला पाहीजे. रस्ता दुरुस्त करायला, दुरुस्ती करायला परमिशन द्या. नाहीतर आम्हाला तुमचे पिण्याचे पाणी बंद करावे लागेल असे सांगा. नागरीकांची मागणी आहे. ते माझ्याकडे येवून आत्ता बोलून गेले. आपण पिण्याचे पाणी का द्यायचे. आमच्या नागरीकांनी का खड्यात पडायचे. बोपखेले येथे आरक्षण आहे, तिथे ते आपल्यासाठीच आले होते. त्यांच्यासाठीच कुठेतरी तुम्ही त्यांना नोटीस देणार आहात का. करता येणार आहे का याचा खुलासा करावा. आत्ता तुम्हाला विचारायचे असेल तर ते विचारा. आत्ता येण्याजाण्याला रस्ता देणार नसाल तर आम्ही तुमचे पिण्याचे पाणी बंद करणार याचा खुलासा झाला पाहीजे. कारण सभागृहाची नाहक बदनामी होते आहे. गेले ९ महिने विषय पेंडींग का आहे. मागील मिटींगमध्ये सुद्धा खुलासा केला होता. श्री.संजय कुलकर्णी यांना सांगितले होते. विषयात दुरुस्ती होईल. खोटे करायचे का होईना रस्ता होईल. सांगवी इथे हेच आहे. खडकी इथे सुद्धा हेच आहे. खडकीत गेलोतर संध्याकाळी रस्ता बंद होतो. यावर कायदेशीर अंमलबजावणी करणार असाल तर विषय पोटतिडकीने सोडवला पाहीजे. हा ज्वलंत प्रश्न आहे.

**मा.आयुक्त** – मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह, सर्व सन्मा. सदस्य, हा विषय ब-याच वेळा सभागृहासमोर आला आहे ही वस्तुस्थिती आहे. हा विषय जास्त वेळा आला नाही पाहीजे. ही आपली भूमिका रास्तच आहे. या विषयाचा तुकडा पडला पाहिजे, निर्णय लागला पाहीजे. म्हणून आजच्या सन्मा. सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे मी व सदस्यांनी दोघांनी तिथे जाऊन चर्चा केली होती. चार दिवसांत रस्ता करायचा, ते परवानगी देतील असे ठरले होते. त्यांनी कामाची सुरुवात केली असे माहित होते. पाच टक्के का पंचवीस टक्के हा कायद्याचा मुद्दा आहे. सिक्युरीटीच्या नावाखाली दि. १५ ऑगस्ट रोजी स्ट्रीक्ट केले होते. त्याचा जे काही काम एजन्सीला दिले होते. त्यामुळे त्यांनी ते एकवेळ काम बंद केले असेल. सदस्यांना मान्य असेल तर त्यांनी कंडीशनली हा प्रस्ताव मान्य केला पाहीजे. हा रस्ता दुरुस्त झालाच पाहीजे. त्याची अंमलबजावणी केली जाईल. म्हणजे हा विषय परत परत सभागृहासमोर येणार नाही. ही प्रशासनाची जबाबदारी राहील. त्याचे सॅटीसफॅक्शन सर्टीफीकेट घेऊ. त्यानंतर या कामाची वर्कऑर्डर देऊ. ताबडतोब रस्ता दुरुस्त केला नाहीतर एकवेळ त्यांच्या खर्चात किंवा आपल्याला परमिशन दिली नाहीतर हा ठराव दसरी दाखल करु.

**मा.चंद्रकांता सोनकांबळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, तुम्ही नोटीस द्या. फक्त कडक बोला. नागरीकांना विविध सुविधा देताना विरोध करताय. एक कॉलम टाकू.

**मा.आयुक्त** – मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह, सर्व सन्मा.सदस्य, हा विषय सभागृहापुढे येऊ देत नसालतर परत हा विषय येण्यासाठी जेणेकरुन मधला मार्ग अवलंबता येईल.

**मा.संजय काटे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मी आयुक्त साहेबांच्या भावनाचा सन्मान करतो. परंतू आयुक्त साहेब यांनी नागरीकांच्या भावनेची कदर करावी एवढेच सांगतो. कारण हे सांगू इच्छितो, हा विषय पुन्हा आला तरी हरकत नाही. आदरणीय नेते शरदचंद्रजी पवार साहेबसांगत असतात, शासनाने कधीही व्यापारी व्यवहार करु नयेत. पहिले नागरीकांचे हित कशात आहे ते पहावे. त्यांच्या ब्रीद वाक्याचा आदर ठेवून हा विषय पुन्हा तहकूब ठेवण्यात यावा.

**मा.**†›**.संदिप चिंचवडे** – मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक – ५५४ विषय क्रमांक - ७
दिनांक - १९/८/२०१४ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ–१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पअक/१०/कावि/८५४/२०१३ दि.१९/१०/२०१३
२) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ४४० दि.१८/०१/२०१४
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.५२४ दि.०५/०७/२०१४
४) मा.महापालिका सभा ठ.क्र.५४० दि.०५/०८/२०१४

विषय क्रमांक ७चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल-८१ प्रतिकूल-०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ५५५ विषय क्रमांक - ८
दिनांक - १९/८/२०१४ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ– १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.भूजि/कावि/६//१७९/२०१४ दि.१/७/२०१४
२) मा.महापालिका सभा ठ.क्र.५४२ दि.०५/०८/२०१४

मनपा हद्दीत थेरगाव स.नं.९ येथे मनपा व दिलीप वेंगसरकर फौंडेशन यांचे वतीने संयुक्त क्रिकेट अकादमी प्रकल्प कार्यान्वित आहे. सदर ठिकाणचे वीजवापरापोटी एकूण र.रु.९०८९६४/- इतके बील थकीत होते. त्यामुळे तेथील क्रिकेटचे मैदानावरील हिरवळ व विकेट खराब झालेली असून पाण्याअभावी खराब होण्याची शक्यता होती. याबाबत तातडीने निर्णय घेणे आवश्यक होते.

दिलीप वेंगसरकर फौंडेशन यांनी सदरचा प्रकल्प मनपा बरोबर संयुक्त प्रकल्प असल्याने व सदर ठिकाणी उत्पन्नाचे स्त्रोत नसल्याने सदर ठिकाणचे विद्युतबील मनपाने भरणेबाबत pcmc s varroc vengsarkar cricket Academy यांचे दि.२९/३/२०१४ रोजीचे पत्रान्वये विनंती केली होती.

सदर ठिकाणी खेळाडूंना मोफत क्रिकेट प्रशिक्षण देणेत येत असून कोणत्याही प्रकारचा आर्थिक मोबदला घेत नसलेने सदरची सर्व प्रशिक्षणार्थी मुले मनपा परिसरातील असल्याने तसेच संस्थेची आर्थिक परिस्थिती पाहता मनपाच्या मालकीच्या इनडोअर स्टेडियमला असलेल्या विद्युत मीटर बिल (थकीत व पुढील काळातील) मनपाने भरणेत यावे. तसेच सदरच्या संस्थेबरोबर यापूर्वी झालेला करारनामा दुरुस्तीसाठी योग्य त्या बदलासह मंजुर करणेबाबत मा.नगरसदस्य पारित स्थायी समिती ठराव क्र.६३४० दि.२८/२/२०१४ अन्वये मान्यता मिळाली आहे.

प्रस्तुत विषयाची तातडी पाहता सदर थकीत विद्युतबिल र.रु.९०८९६४/- मनपामार्फत भरणेबाबत दि.११/३/२०१४ रोजीच्या आयुक्त यांचे बैठकीमध्ये निर्णय घेणेत आला आहे. थेरगाव येथील मनपा व दिलीप वेंगसरकर फौंडेशन संयुक्त क्रिकेट अकादमीचे थकीत विद्युतबिल र.रु.९०८९६०/- (नऊ लाख आठ हजार नऊशे साठ फक्त) महाराष्ट्र स्टेट इले. डिस्ट्रीब्युशन कं. लि. यांना अदा करणेस मा.आयुक्त पिं.चिं. मनपा याने क्र. भूजि/५/कावि/५७/२०१४ दि.२१/३/२०१४ आदेशान्वये मान्यता दिली आहे. तथापि याबाबत मा.महापालिका सभेची मान्यता न मिळालेस सदरचा विद्युत खर्च दिलीप वेंगसरकर फौंडेशन यांनी भरणे आवश्यक आहे. अशी अट सदर आदेशात आहे. सदरचा खर्च विद्युत विभाग ड क्षेत्रिय कार्यालय यांचेकडील तरतूदीमधुन केला असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.श्रद्धा लांडे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.शमिम पठाण** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,आमचे आदरणीय राष्ट्रवादी पक्षाचे अध्यक्ष इथे नाहीत. जो कोणी असेल ते सांगतीलच. या विषयाला विरोध नाही, नव्हता. या विषयाला कोणाचाच विरोध नव्हता. तुमच्या सन्माननीय सहकारी झामाबाई बारणे यांना बरे नाही म्हणून निघून गेल्या. त्यांनी सांगितले, हे स्पष्ट करा. याचा खूप बाऊ केला गेला. त्यांनी सांगितले, स्थानिक नगरसेविका असून सुद्धा प्रवेश देण्यासाठी आमच्या शिफारशीला महत्व दिले जात नाही. ज्यावेळी मॅच चालू असते, त्यावेळी आमच्या स्थानिक मुलांना तिथे प्रवेश देत नाहीत. आम्हाला कोणतीही किंमत दिली जात नाही. त्यांनी हे सुद्धा सांगितले, ते गायरान आहे. थेरगावाचे तिथले मुठभर सुद्धा मुरुम कधीही तिथून कोणाला नेऊ दिले नाही. त्यानंतर वेंगसरकर ऍकॅडमी झाली. त्याला नाही कोणी म्हणत नव्हते. फक्त एवढेच सांगितले, स्थानिक संघटनेची शिफारस होती. ते काही झाले नाही. हा विषय सन्माननीय नेत्यांपर्यंत गेला. त्यांची नाराजी झाली. इथे कोणतीही चर्चा न होता, हे काय प्रकरण झाले, ते महापौर साहेब तुम्हाला माहित आहे. या विषयाला कोणाचाच विरोध नाही आणि नव्हता, एवढेच सांगायचे आहे. हा विषय मंजूर करा.

**मा.कैलास थोपटे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आज आपण याठिकाणी वेंगसरकर ऍकॅडमीच्या लाईटबीलासाठी पैसे देतो आहोत. खरेतर आपल्या शहरात एक चांगला खेळाडू घडवावा ही संकल्पना आहे ती खूप चांगली आहे. परंतू अनेक वेळा त्याठिकाणी अनेक खेळाडूंची शिफारस केली होती. खरेतर ते खेळाडूसुद्धा चांगल्या पद्धतीचे खेळाडू आहेत. चांगल्या पद्धतीने खेळतात सुद्धा. याठिकाणी चाचणी घेत असताना खेळाडूंना सामिल केले पाहीजे. अनेक खेळाडू चांगल्या प्रकारे सिक्सर मारुन सुद्धा त्यांची आर्थिक बाजू कमी असेल तर ते सिलेक्ट केले जात नाहीत. ही खरेतर दूर्दैवी खंत आहे. खेळाडूंना सिलेक्ट करण्यासाठी काही मंडळी आहेत. खेळाडू पैसे घेऊन सिलेक्ट केले जात आहेत. सर्वसामान्य शाळेतील खेळाडू गरीब असताना चांगला खेळून सुद्धा त्याला सिलेक्ट केले जात नाही. वेंगसरकर ऍकॅडमीला खेळाडूंचे मैदान वापरण्यासाठी दिले आहे. आपण कोणीही त्यांच्याकडून मूल्य घेत नाही. एक रुपयाप्रमाणे घेतो. त्यांना खेळाचे मैदान वापरण्यासाठी डेव्हलप करुन दिले आहे. अजूनही लाईटची, पाण्याची असो ग्राऊंडची अडचण आलीतर ग्राऊंड डेव्हलप करायचे असेल तर सातत्याने मदत करत आहोत. परंतू चांगले खेळाडू सिलेक्ट झाले पाहीजेत. आपली मोठी यंत्रणा राहिली पाहीजे. पूर्वी सुद्धा पार्टी मिटींगमध्ये मी हे बोललो होतो. त्यांना एकदा बोलवा. त्यांना माहिती झाले पाहीजे. नगरसेवक काही शिफारस करतात. चांगल्या खेळाडूची शिफारस व्हावी म्हणून नेहमी प्रयत्न करत असतात. आपण त्यांना सूचविले पाहीजे. त्याठिकाणी पिंपरी चिंचवड शहरातील कोणत्याही खेळाडूचा एक रुपयासुद्धा घेतला नाही पाहीजे. मैदान विनामूल्य दिले आहे. विनामूल्य दिले असताना कोणताही भ्रष्टाचार झाला नाही पाहीजे. यासाठी मी विनंती करतोय.

**मा.जितेंद्र ननवरे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, हा विषय मुळात लाईटबिलासाठी आला आहे. आत्ता मा.शमिम पठाणताईंनी सांगितले, अनेक नगरसेवकांच्या शिफारसी मान्य केल्या जात नाहीत. क्रिडा प्रकार हा असा आहे, तिथे तंत्र व गुणवत्ता पाहिली जाते. जे तंत्रशुद्ध सिक्सर मारतात, त्यांचे सिलेक्शन होते. जो अंदाधुंदी खेळतो, त्याचे होत नाही. खरेतर मी हे पाहिलेले आहे. मी यांचा मुद्दा खोडून काढतो. वेंगसरकर ऍकॅडमी पिंपरी चिंचवडमध्ये आहे पण पिंपरी चिंचवडमधील मुले त्यात नाहीत, हा चुकीचा आरोप केला जातो आहे. माझी विनंती आहे, क्रिडा प्रकारात शिफारस अजिबात करु नका. जो तंत्रशुद्ध खेळतो, त्याचे शिक्षण आपोआप होते. हा ९ लाख लाईटबील भरण्याचा विषय आहे. मी सातत्याने पाहिले आहे. स्वतः सचिन तेंडूलकर व अन्य सहकारी येथे येत असतात. या विषयात छोट्या-छोट्या गोष्टींवर हा विषय थांबवायचा असेल, आरोप करत असतील तर ते चुकीचे आरोप केले आहेत. स्थानिक रहिवाश्यांना मॅच बघण्यासाठी जायचे असेतर त्यांना जाता येत नाही. माझी आपल्याला विनंती आहे, या विभागाचे विभागप्रमुख माछरे साहेब यांना विनंती आहे की, स्थानिक नागरिकांना तिथे क्रिकेटच्या मॅचेस बघण्यासाठी सोडण्यात यावे. क्रिडा धोरण बनवून ३ महिने झाले, त्यावर काय अंमलबजावणी केलीत. मैदान दहीहंडीसाठी द्यायचे. दीड कोटी खर्च केले. मदनलाल धिंग्रा मैदानाची अवस्था काय आहे. ही मैदाने अशीच देऊन टाकायची. दहीहांडी करण्यासाठी हजारो रुपये घेतले. त्या मैदानाचे मुळात नुकसान किती झाले ते पाहिले का. प्रचंड प्रमाणात झाले, २ लाखांचे नुकसान झाले आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, इथून पुढे

महापालिकेची मैदाने किंवा जागा कोणत्याही इतर कार्यक्रमांसाठी भाडेतत्वावर देऊ नयेत. महापालिकेचे क्रिडा धोरण बनविले आहे ते राबविलेच पाहीजे या मताचा मी आहे. नाहीतर करोडो रुपये खर्च करुन या मैदानांचा काहीच उपयोग होणार नाही.

**मा.अनंत को-हाळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आत्ता मा.जितेंद्र ननवरे जे बोलले, ते अतिशय योग्य आहे. वस्तुस्थिती हिच आहे. मैदान करायला, मैदान मजबूत करायला करोडो रुपये खर्च करतो. कोणत्याही सामाजिक, धार्मिक कार्यक्रमासाठी ही मैदाने भाडेतत्वावर वापरायला देतो. धार्मिक कार्यक्रम म्हटला की, मंडप येतो, खड्डे येतात. त्यानंतर खड्डे, खाण्यापिण्याचा कचरा साचतो. मैदान खराब होते. साऊंड सिस्टीम आली की आजूबाजुच्या लोकांना त्याचा त्रास होतो. या छोट्या छोट्या गोष्टी आहेत. क्रिडा धोरण बनवले आहे, ते वापरतो का. त्याविषयी थोडेसे कडक धोरण अवलंबवावे. मैदान फक्त क्रिडा स्पर्धांसाठी द्यावे. कंपन्यांना क्रिडांगणे भाड्याने देतो. या कंपन्यांचे टूर्नामेंटच्या नावाखाली गेटटूगेदर चालते. तिथे स्टॉल लागतात. जेवणाचे पदार्थ बनवले जातात. आपण एक हजारामध्ये कमीत कमी लाख रुपयाच्या गोष्टी भाड्याने देतो. नवरात्रीच्या उत्सवात क्रिडांगणे भाड्याने देतो. मागे देखील मी बोललो होतो. मी गेले वर्षापासून पाठपुरावा करतोय. क्रिडांगणे देऊ नका. त्यांच्याकडून लिहून घ्या, करार घ्या की, कोणत्याही प्रकारचा सेल टाकणार नाही. इतर गोष्टी करु नयेत. कार्यक्रम रात्री असेल तर संध्याकाळी ६.०० पासून रात्री १०.०० पर्यंत हॅलोजन सारख्या मोठमोठ्या लाईटस् चा वापर करतात. त्याचे लाईटबील त्यांच्याकडून घेत नाहीत. ३/४ तासांसाठी रु.५,०००/- लाईट बील येत असेलतर याचा दाखला घेऊन याचा उपयोग फक्त खेळाडूंसाठी, स्पर्धांसाठीच व्हावा.

**मा.विनोद नढे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, माझा या विषयाला विरोध नाही. परंतू या अनुषंगाने आपले एका गोष्टीकडे मी लक्ष वेधू इच्छितो की, इंटरनॅशनल खेळाडू, राज्यातील नामवंत खेळाडू यांच्यासाठी ४/५ वर्षांपूर्वी अनेक बक्षिकांच्या रकमा जाहीर केल्या आहेत. परंतू मागील ३/४ वर्षे बरेच वेळा आपले काही खेळाडू त्यांनी क्रिडा विभागात चक्कर मारली. पेपर्स सबमिट केले आहेत. परंतू आपल्या क्रिडा धोरणात ही बाब बसत नाही असे सांगतात. नवीन क्रिडा धोरण अंमलात आणले आहे. त्या खेळाडूंना ही रक्कम देत नाहीत. निश्चितपणे महापालिकेसाठी ही अतिशय लाजिरवाणी गोष्ट आहे. माझ्या माहितीप्रमाणे दि.१९ सप्टेंबर २००८ रोजी जो ठराव झाला होता. तेव्हा अभिनव बिंद्रा व सुशिलकुमार यांना प्रत्येकी पाच लाख बक्षिस देण्यात आले होते. ३ लाख रक्कम होते तेव्हा राज्य शासनाची परवानगी आवश्यक असते. महापालिकेने याठिकाणी शासनाची कोणतीही परमिशन घेतली नाही. कबड्डी स्पर्धेसाठी श्री.विराज लांडगे, श्री. मोमीन शेख यांना र.रु.२,९०,०००/- बक्षिस देण्यात आले होते. केवळ याच खेळाडूंना बक्षिसे देण्यात आली आहेत. ज्या खेळाडूंना बक्षिस दिले नाही, त्यांची नावे माझ्याकडे आहेत. पाचव्या राष्ट्रकूल स्पर्धेतील खेळाडू अनिसा सय्यद हिला ५ लाख बक्षीस जाहिर केले होते. आशिया कबड्डीपटू नितीन घुले यांना ५ लाख देण्याचे ठरले होते. महाराष्ट्र केसरी व्ही.टी बनकर यांना रु.२,५१,०००/- बक्षीस जाहीर केले होते. आंतरराष्ट्रीय जलतरण पटू श्री.अमोल आढाव यांना एक लाख, किकबॉक्सिंगपटू जयदेव माने यांना रु.२५,०००, रेखा दमटे यांना एक लाख बक्षिस जाहिर करुन सुद्धा बक्षीस दिलेले नाही. पीसीएमसी खेळाडू दत्तक

योजनेत दत्तात्रय भोसले, कृष्णा नलावडे व कु.वैष्णवी जगताप या खेळाडूंना इंटरनॅशनल स्पर्धेत सहभागी होण्यासाठी रु.१,००,०००/- निधी दिला. विशेष बाब म्हणून त्यांना निधी देण्यात आला. ज्या खेळाडूंना बक्षिस देणार आहोत, बक्षिसे जाहिर केली आहेत, त्यांना का देत नाही. भारतात धर्मानंतर काय असेलतर क्रिकेट हा खेळ आहे. क्रिकेटकडे तरुणांचा कल जास्त आहे. परंतू इतर खेळांकडे तरुणांचे लक्ष वेधण्यासाठी आपण ज्या काही बक्षिस योजना जाहीर करतो, ती त्यांना द्या. ऑलिम्पिक स्पर्धेत आपली पदक संख्या सुद्धा वाढेल आणि या खेळाडूंना प्रोत्साहन देखील मिळेल. एवढीच विनंती मी याठिकाणी करतो.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,आत्ता खरेतर ही व्यथा मांडली आहे. पिंपरी चिंचवडचा क्रिडा विभाग आहे. असे वाटतच नाही का पिंपरी चिंचवडचे नाव झळकले गेले पाहीजे. आत्ता मा.जितेंद्र ननवरे यांनी सांगितले. मा.उल्हास शेट्टी यांना सुद्धा हिच गोष्ट बोलायची होती, हे खरे आहे. आत्ता खुलासा झाला पाहिजे, दहीहांडीसाठी किती ग्राऊंड दिले होते. त्यातून आपल्याला किती उत्पन्न मिळाले आणि आत्ता ग्राऊंड खराब झाल्यानंतर किती खर्च करणार आहोत का. क्रिडा अधिकारी यांना पहिले विचारा, त्यांना क्रिडा धोरण कळते का. क्रिडा धोरण बनवताना ते स्वतः होते आहेत का. त्यांना क्रिडा धोरण कळत असलेतर त्याची अंमलबजावणी ते तंतोतंत करतात का. या प्रश्नाचा आत्ताच खुलासा झाला पाहीजे. जर क्रिडा धोरणात लिहीले आहेत, कोणतेही क्रिडांगण जिथे बनवले आहे, ते कोणालाही भाडेतत्वावर द्यायचे नाही. आज सांगा जिथे दहीहांडीचे प्रोग्रॅम झाले तिथल्या दारुच्या बाटल्या कोणी उचलायच्या. तुम्हाला हजार रुपये कमी पडलेत का. आज आपण का म्हणून दहीहांडीसाठी ग्राऊंड भाड्याने दिले. ग्राऊंडवर पोलिस भरती झाली. मा.दत्ता सानेंसारखा सहकारी पोलिस भरतीसाठी पुढाकार घेतला. मुलांना चांगल्या पद्धतीने ट्रेनिंग देण्यासाठी स्वखर्च केला. त्यातून २२ मुले सिलेक्ट झाली. महापालिकेने असा कोणता प्रोजेक्ट राबवला का. पिंपरी चिंचवडमधील पोलिस भरतीसाठी प्रशिक्षणासाठी काही क्रिडा शिक्षक नेमावेत. त्यांना क्रिडांगणे द्यावीत. सगळे मेंबर्स आले पाहीजेत अशातला भाग नाही. जे क्रिडा अधिकारी आहेत, त्यांना हे धोरण कळाले का. ते त्यांनी बनवले होते का. यात ग्राऊंड भाड्याने देणे हा विषय आहे का. खुलासा करावा. ही क्रिडांगणे आहेत, त्यांच्यावर पर्यवेक्षक असलेतरी काही उपयोग नाही. ही टीमच बदली करा. सगळी टिम बदली करा. आमचे सहकारी मा.रामदास बोकड यांना विचारा. ते क्रिडा समितीचे सभापती असताना डोके आपटआपटून गेले तरी त्यांच्या हाती काही आले नाही. नशिबाने आरक्षण त्यांचे झाले आहे. क्रिडा धोरणात काय ठरले आहे. एक उदाहरण सांगते, महापालिकेचे अधिकारी कसे असतात. एक क्रिडांगण आहे. त्याला पूर्वीपासून स्टेज आहे. तिथे एक वॉल आहे. आधार कार्ड योजना निघाली. आपण दुरुस्त्या केल्या. आधार कार्ड दिले. त्यानंतर महाभागांनी त्यांचे फोटो जाळून टाकले. अक्षरशः दारूच्या बाटल्या पडल्या होत्या. फिल्टर फोडले होते. नागरीकांनी सूचना दिली होती, तिथे लायब्ररी चालू करा. लायब्ररी चालू करण्यासाठी आजही तिथे योग्य स्टाफ नाही. क्रिडांगणावर साधी लायब्ररी सुरु करताना एवढा त्रास दिला. हजार रुपयासाठी क्रिडांगणे भाड्याने देतात. आता दांडीया आला. मुलांनी खेळायला कुठे जायचे. आज धनुर्विद्येची जिल्हास्तरीय स्पर्धा होती. त्यांना खेळायला ग्राऊंड नव्हते. ते वणवण भटकत होते. ते जिथे प्रॅक्टीस करत होते, तिथे तुमचे बांबू आणून टाकले

होते. मी तुमच्याकडे फोन करुन कंम्प्लेण्ट केली होती. तुम्ही धोरण आणताना तुम्ही तुमच्या मनाने करा. सभागृहाचा वेळ कशाला घालवताय. आमची परमिशन असताना क्रिडा धोरणासाठी जवळजवळ पाच मा.महापालिका सभा तहकूब केल्या. एक वॉर्ड घ्या, तिथे किती क्रिडांगणे आहेत. एक क्रिडांगण असेल तर ते अजिबात द्यायचे नाही. तुम्ही ठरवा. याचा विरोध नाही. दोन ग्राऊंड असतील तर एक ग्राऊंड सभेसाठी, सांस्कृतिक कार्यक्रमासाठी ठेवा. कोणाला लावणी करु देत. एक ग्राऊंड खेळासाठी ठेवा. पण ग्राऊंडवर तसा खर्च करु लागा. त्या प्रभागात एकच ग्राऊंड असेल तर कसे काय भाड्याने देतो. धोरणात काय टाकले आहे, कोणतेही क्रिडांगण द्यायचे नाही. का द्यायचे नाही याचा खुलासा होऊ दे. नंतर मला बोलायचे आहे. धोरण बनवताना माछरे साहेब नव्हते. मी नाव घेतले नाही म्हणजे त्याचा अर्थ असा नाही होत. त्यांना माहित नाही. तीनदा धोरण बदली करायला त्यांच्याकडे फाईल दिली.

**मा.अतिरिक्त आयुक्त** - मा.महापौर साहेब, सर्व उपस्थित सन्मा.सदस्य, आदरणीय गटनेत्यांनी जो प्रश्न विचारला आहे, तो शाहूनगरमधील क्रिडांगणासंबंधी आहे.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मी कमिश्नर यांना फोन केला होता. मी सगळ्या भागातील लोकांचा विचार केला आहे. मी तुमच्याशी फोनवर बोलले म्हणजे हा विषय आत्ता होऊ शकत नाही. मी धोरणाविषयी विचारले आहे.

**मा.अतिरिक्त आयुक्त** – मा.महापौर साहेब, सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, आपल्या धोरणात दोन भाग आहेत. विविध क्रिडा धोरणे आहेत. मनपाच्या बहुउद्देशीय मैदाने देणे याचा सबक्लॉज दोन मधील २ चा १ आहे. त्यात म्हटले आहे, मनपाची बहुउद्देशीय मैदाने क्रिडासाठी उपयोगात आणता येतील. अपवादात्मक परिस्थितीत धार्मिक, सांस्कृतिक व अन्य कार्यक्रमांसाठी क्रिडा मैदाने भाड्याने देण्याचा अधिकार मा.आयुक्त किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-याला राहतील. मा.आयुक्त यांस हे अधिकार आहेत.

**मा.आयुक्त** – मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, हा मोठा सेन्सिटीव्ह विषय आहे. यात धर्म भावना पण अडकलेल्या आहेत. दरवर्षी सालाबादप्रमाणे करु द्यायचे नाही याचा सुद्धा विचार करावा लागेल. सभागृह सार्वभौम आहे. आपण पॉलिसी डिसीजन घेतो यात काही वाद नाही. वेगळे धोरण करायचे अधिकार आपल्याला आहेत. या विषयाबाबतीत विचारपूर्वक आणि जे योग्य आहे त्याची खात्री करुन खात्री होत असेलतर कोणत्याही सांस्कृतिक गोष्टीसाठी क्रिडांगण द्यावे लागते हे योग्य नाही. सर्वांनी मिळून ठरवले पाहीजे. तीन क्रिडांगणे असतील तर दोन खेळांसाठी ती देता कामा नये. एखादे दुसरे क्रिडांगण राखून ठेवले पाहिजे. एखाद्या खेळासाठी असेल तर खेळ कम इतर गोष्टींसाठी असे करत असाल तर क्रिडांगण करताना दांडीया,दहीहांडीसाठी क्रिडांगणे रिकामे आहेत. यांना क्रिडांगण दिले नाहीतर ते पब्लिक प्लेसमध्ये जातील. ते क्रिडांगणावर गेले नाहीतर फूटपाथवरुन चालणा-यांना अडथळा होईल. म्हणून याबाबतीत कमिटी आहे अशी कमिटी स्थापन करता येईल. बाकी क्रिडा धोरण चांगले असेल तर एवढे मुद्दे पाहीजेत. प्रत्येक वॉर्डात इतर काही मुद्दे येतात. यावर कायमस्वरुपी सोल्युशन काढण्यासाठी सर्वांनी मिळून सोल्युशन काढलेतर आम्ही सुद्धा खुष होऊ व त्या धोरणाप्रमाणे आम्हाला देखील करता येईल.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, कमिश्नर यांनी छानपैकी गोलगोल गप्पा मारल्या आहेत. एकच धोरण आणले. तुम्हाला त्याचा अधिकार ठेवला आहे. तुम्ही सांगा, आम्ही आमचे धोरण वापरणार आहोत. आम्ही दहीहांडीच्या, दांडीयाच्या विरोधात नाही. परंतू क्रिडांगणाची परमिशन देताना त्याची किती वाट लागणार आहे. एकाला परमिशन देता, दुस-याला परमिशन देताना विचार करता. असा दूजाभाव होता कामा नये. आत्ता मदनलाल धिंग्रा मैदानाची काय अवस्था आहे. फूटबॉल मॅचेससाठी मी उद्घाटनाला गेले होते. तिथे इतकी वाईट परिस्थिती आहे. जर एखादा मुलगा स्लिप झाला असतातर त्याच्या आई-वडीलांची कंडीशन काय झाली असती आम्हाला माहित नाही. पिंपरी चिंचवडमध्ये मोठी ग्राऊंडस् आहेत. जिल्हास्तरीय स्पर्धा होतात. तुम्ही ठरवा. मी कोणत्याही कार्यक्रमाच्या विरोधात नाही. जे होणार ते जनकल्याणासाठीच होणार आहे. परमिशन देताना असा दूजाभाव करु नका. तुम्हाला सगळ्या विषयांत आत्ता जसे केले गेले, तसे धोरण करावे लागेल. आम्हाला १२८ नगरसेवकांना परमिशन द्यावी लागेल. जशी मला परमिशन दिली. तुमचे २अचे धोरण टाकणारे कोण आहेत? हे धोरण अवलंबणार असाल तर सर्व पक्षांचे १२८ नगरसेवक ज्यांनी ज्यांनी मागणी केली त्यांना २ अ चा अवलंब करुन आम्हाला मैदाने दिली पाहीजेत. त्यावेळी तुम्ही सांगायचे नाही दुस-या नगरसेवकाचा मैदान देण्यासाठी विरोध आहे. मी त्यावेळी त्याचे ऐकणार असे होणार नाही. दुरुस्ती पाहीजे तर त्यात करुन घ्या, पण सगळ्यांना द्या. मग त्या क्रिडांगणाची वाट लागू दे. त्यानंतर खर्च करण्यासाठी सुद्धा तयारी ठेवा. आम्ही एक हजार भाडे देणार आहोत, दहा लाख खर्च करायचा असेल तरी तुम्ही मंजुरी दिली पाहिजे. तिथे मांडव टाकला त्यामुळे दुरुस्तीसाठी दहा लाख खर्च यासाठी सुद्धा परमिशन दिली पाहीजे. धोरण आणणार असालतर धोरण या शब्दाचा अर्थ सभागृहात सगळ्यांच्या लक्षात आला पाहिजे. माझे सहकारी क्रिडा क्षेत्रात काम करतात. त्यांना अनुदान डिक्लेअर होते. त्यात किती अटीशर्ती. विरोधी पक्षनेते यांना गोल गोल फिरवून कोणतेही अनुदान देऊन टाकले नाहीत. आत्ता ते बोलले. दांडीयाला, दहीहांडीला ग्राऊंड देता आले पाहीजे. उद्या लोकांना सुद्धा ग्राऊंड देता आले पाहिजे. लग्नाची कार्यालये कमी पडत आहेत तर ग्राऊंड भाड्याने द्यायचे आहे. माझ्या नातीच्या लग्नासाठी मी उद्या ग्राऊंड मागणार आहे. तुम्हाला धोरण निश्चित करावे लागणार आहे. माझे जे सहकारी आहेत. मा.विरोधी पक्षनेते आहेत. माणसाच्या शब्दाला सुद्धा किंमत असली पाहिजे. खेळाडू खेळत असतात म्हणून का फक्त स्वतःच्या मनाला वाटले तरच द्यायचे. समोरची १२८ माणसे ओरडणार त्यांना द्यायचे नाही. त्यांचा विचार करायचा नाही. खेळाडू तयार झाले पाहिजेत. खेळाडूंप्रमाणे त्यांना मानधन दिले पाहीजे. आपल्याकडे कोंडे साहेब होते. त्यांची आठवण येते कारण त्यांनी क्रिडा धोरण खूप छान पद्धतीने केले होते. आण्णासाहेब मगर स्टेडियमवर तुम्ही अचानक जा. तिथे कचराकुंडी नसेलतर सांगा. आत्ता लगेच जा. एवढे मोठे स्टेडियम आहे. त्या जागेची किंमत बघा. आज शून्य किंमतीत आहोत. सगळे नगरसेवक आरडाओरडा करतात. विषय आजच मंजूर करायचा आहे. परंतू नगरसदस्य काही म्हणत असतील तर आमच्या लोकांची परीक्षा घ्या. आमचे लोक पास झाले नाहीत तर ट्रेनिंग कोर्स सुरु करावा. एखाद्या मुलाचे सिलेक्शन झाले नसेल म्हणजे त्याने प्रॅक्टीससाठी क्रिडांगण मागायचे नाही हे योग्य आहे का? संबंधित कुटूंब यांच्याकडे नुसती लाईटही नाही. पिंपरी चिंचवडमधील मुले घडली पाहीजेत. त्या विद्यार्थ्यांवर खर्च करावा लागेल. गरज शोधून पैसे देऊ. या महापालिकेच्या

शाळेतील विद्यार्थी असेल, मोलमजुरी करणारे गरीब पालक असतील, त्यांना पैसे देऊ. परंतू त्या ऍकॅडमीत नगरसेवकाचा मान राखला पाहीजे. विचारले पाहीजे. त्याचे म्हणणे ऐकून घेतले पाहीजे. त्या दृष्टीकोणातून ऍकॅडमीतील लोकांना सांगा. थोपटे साहेबांनी सांगितले. ते कधी बोलत नाहीत. त्यांना तिथे विचारत सुद्धा नाहीत. त्यासाठी त्यांनी चार हेलपाटे मारले. एकदा आपल्या लोकांबरोबर मिटींग सुद्धा घेऊ दे. त्या लोकांना पण सहकार्य करु दे व हा विषय मंजूर करावा.

**मा.राहूल जाधव** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खूप चांगला विषय सभागृहापुढे आला आहे. मंगलाताईंचे मी मनापासून अभिनंदन करतो. परंतू एक खंत वाटते,मंगलाताईंना जर समाविष्ट गावातली नात भेटली तर कोणत्या मैदानावर लग्न लावायचे हे प्रशासनाने सांगावे. ९७ साली १८ गावे महापालिकेत समाविष्ट झाली. मंगलाताईंना १८ समाविष्ट गावातली नात भेटली तर आयुक्त साहेब आपण त्यांना कोणते ग्राऊंड  देणार याचा खुलासा करावा. आज मनाला खंत वाटते, इतक्या दिवसांत आम्हाला आमच्या मुलांना खेळण्यासाठी ग्राऊंड देऊ शकलो नाही. आरक्षण टाकले आहे, सर्व काही झाले आहे. काही काही जागा ताब्यात सुद्धा आल्या आहेत. सन्मा. नगरसदस्यांकडून प्रायोरीटीने काही आरक्षणे घेतली पाहीजेत. आम्हाला नगरसेवक होऊन दीड वर्ष झाले. एकाही ग्राऊंडचे आरक्षण पूर्णपणे ताब्यात घेतलेले नाही. त्यामुळे बरेच वेळा खेळाचे मैदान नसल्यामुळे मुलातील खेळाडू घडत नाही. त्यासाठी लवकरात लवकर करणार असालतर खेळाचे मैदान असेल गार्डन असेल निवडून आल्यापासून मागणी करतोय. परदेशी साहेब आले, आत्ता तुम्ही तिसरे आयुक्त आलात. म्हणून पुन्हा मागणि करतोय. प्रत्येक गावात एक गार्डन, एक ग्राऊंड छान विकसित झालेले आम्हाला पाहिजे. परंतू आपल्याला मिळत नाही. काहीतरी आश्वासन देऊन २०१२ची निवडणूक निवडून आलो आहोत. विरोधी पक्षात असलो तरी सत्ताधारी राष्ट्रवादी पक्षाचे नगरसेवक सुद्धा समाविष्ट गावांतील आहेत. त्यांच्या सुद्धा अपेक्षा पूर्ण केलेल्या नाहीत. प्रकत्येक पक्षाचे नगरसेवक सभागृहात आलेले असतात. प्रत्येक समाविष्ट १८ गावांमध्ये प्रभागात एक गार्डन व एक खेळाचे मैदान झाले पाहीजे. ते लवकरात लवकर करावे. कादाचित या १८ समाविष्ट गावांतील नात वय १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर लग्नाला आल्यानंतर मंगलाताईंबरोबर आम्ही सुद्धा भव्यदिव्य लग्न लावू शकतो. आपण मला बोलायला संधी दिलीत त्याबद्दल मनसेकडून धन्यवाद!

**मा.राजेंद्र काटे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आपण खुलासा करावा. दरवेळी आरक्षणावर बोलतो. खेळाचे मैदान असो. मी गेले दोन अडीच वर्षांपासून पाठपुरावा करतोय. काय प्रोव्हिजन केली होती याचा खुलासा करावा. मग प्रभागामध्ये मिटींग घेतली. प्रायोरिटी लिस्ट झाली. सगळ्या गोष्टी झाल्या. नक्की आपण काय करतोय याचा कृपया खुलासा व्हावा.

**मा.दत्ता साने** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आत्ता क्रिडांगण भाड्याने देण्याच्या विषयावर चर्चा चालू झाली आहे. मी आमच्या पक्षनेत्यांचे मनापासून आभार व्यक्त करतो. परंतू मला एक खंत वाटते की, ज्याप्रमाणे रुढी, परंपरा, आदर्श घडवून दिला आहे. लोकमान्य टिळक यांच्या माध्यमातून गणपती उत्सव असेल नवरात्र असेल दहीहांडी असेल, सांस्कृतिक कार्यक्रम यांच्या माध्यमातून क्रिडांगण भाड्याने द्यायचे असे धोरण ठरवून दिले आहे. परंतू मला आयुक्त

साहेब व सभागृहाला प्रश्न विचारायचा आहे की, गेले १५ ते २० वर्षांपासून हे सगळे कार्यक्रम राबवतोय. या कार्यक्रमांतून, मंडळांतून कार्यकर्ता घडत असतो. आम्ही देखील कोणत्यातरी मंडळाच्या माध्यमातून घडलो आहोत. सामाजिक रुढी परंपरा जतन करायच्या आहेत. कालांतराने आपल्याला रावणदहन काय, गणपती उत्सव काय, हे पुढील पिढी विसरुन जाईल. या परंपरा जतन केल्या पाहीजेत. म्हणून हे समाजापुढे आणत असतो. शासनाचे निर्देश आहेत, कोणताही कार्यक्रम सार्वजनिक चौकात घ्यायचा नाही. आम्ही ज्यावेळी पोलिस परमिशन घ्यायला जातो, त्यावेळी आम्हाला बंधनकारक असते. पोलिसांकडून असे सांगितले जाते, एकतर बंद जागा असावी. कंपाऊंडच्या आतमध्ये असावी. सार्वजनिक रस्त्यावर कार्यक्रम घेऊ नयेत. म्हणून हा कार्यक्रम ग्राऊंडवरच घ्यावा लागतो. त्याशिवाय दुसरा पर्याय आमच्यासमोर नाही. धोरणात्मक निर्णय घेतला तर रस्त्यावर कार्यक्रम घ्यायला सुरुवात केली तर आपले अभिनंदन करेल. आपण ज्ञाते आहात. आपल्याला सर्व गोष्टींची जाण आहे. आपल्याला विनंती आहे, ही आरक्षणे आमच्या लोकांची कोणाचीतरी आहेत. कवडीमोल किंमतीने ती आमच्याकडून घेतलेली आहेत. आम्ही जागा उपलब्ध करुन डेव्हलप करुन देत असतो. त्यावेळी त्या नागरीकांच्या हितासाठीच दिल्या गेल्या पाहीजेत. लोकांसाठी हे कार्यक्रम करा. लोक भाड्याने आणत नाहीत. बघा या. गणपती बघायला तिकिट ठेवतात आणि आम्हाला त्यातून काहीतरी मिळते असेही नाही. हे कार्यक्रम मंडळाच्या सार्वजनिक खर्चातून केले जातात. यातून सामाजिक प्रबोधन घडते. हे कार्यक्रम ग्राऊंडवर करायचे बंद करायचा प्रयत्न केलातर मंडळे जे काम करतात, समाजातून या रुढी परंपरा बंद कराव्या लागतील. गणपती, नवरात्री उत्सव कोणी करु नये असे जाहिर करावे लागेल. तिथे सिक्युरीटी ठेवावी लागेल, तिथे झोपड्या पडतील. मी सहमत आहे, शेत, हिरवळीचे ग्राऊंड नसावे, जे महापालिकने डेव्हलप केलेले नसावे. खेळाचे मैदान असेल तर हरकत नाही. खेळ, काही क्रिडा प्रकार होत असतील तर ते सोडून मोकळे ग्राऊंड असेल तर दे द्यायला हरकत नाही. असे आनंदाने डिक्लरेशन करावे. शहरातील सगळे कार्यक्रम बंद करावेत. ग्राऊंडची वर्गवारी करावी. मा.राहूल जाधव यांनी सांगितले, ही अतिशय गंभीर बाब आहे. आमच्या भागातील लोकांनी ठरवले तर मुश्किल आहे. मी गेले १० वर्षांपासून नगरसेवक आहे. गेले ५ वर्षांपासून यांच्यासाठी बोलतोय. प्रत्येक वॉर्डात एक हॉस्पिटल असेल, शाळा असेल, क्रिडांगण किंवा उदयान असेल ते विकसित करावे. ओरडून ओरडून घसा कोरडा पडायला लागला आहे. आजून किती बोंबलायच. आमची अजून अडीच वर्षे राहीली आहेत. याच कामासाठी पुन्हा निवडून यायचे का असे वाटतेय. शाळा क्रमांक ९२ म्हेत्रे वस्तीत मी अनेक वेळा गेलो. शाळा अतिशय सुंदर बनवली आहे. मा.एकनाथ थोरात यांच्या वॉर्डात अनेक वेळा मागणी करुन ही सुंदर शाळा बनवली. मूळ मालकाची शाळा होती, ती पाडली. प्राधिकरणाच्या जागेत बांधली. ती डेव्हलप करुन सुंदर बांधली. मी या शाळेतील विद्यार्थ्यांना साहित्य द्या असे अनेक वेळा रज्जाक पानसरे असतील, माछरे साहेब असतील या अधिका-यांना सांगितले आहे. आम्ही सांगितलेल्या विषयाचे गांभिर्य अधिका-यांकडे अजिबात नाही. या जागेवर बसायची या अधिका-यांची पात्रता नसावी. कुठे कुठे काही शुल्लक शुल्लक कामे असतील. मी अनेकवेळा सांगतो. मग शाळेचे ग्राऊंड नीट करु शकत नाही का. या शाळेत पहिलीपासून सातवीपर्यंत एकूण सातशे ते आठशे विद्यार्थी आहेत. खाली पार्किंग आहे. त्याचा मेंटेनन्स करु शकत नसाल, शाळेत मागितलेल्या वस्तू देत नसाल, क्रिडा साहित्य देत नसाल तर यापेक्षा दुर्दैवी

गोष्ट काय आहे. टेरेसवरील फ्लज बदलणे, ड्रेनेज पाईपलाईन बदलणे, याला एक वर्ष लागले. मैदानाची पूर्व बाजू सपाटीकरण करणे, शाळेला स्पिकर नाहीत. अति. आयुक्त यांना १५ ऑगस्ट च्या आधी दोन दिवसांपूर्वी मी कल्पना दिली होती, शाळेला स्पिकर नाहीत. चिखली, मोरे वस्ती, अशा शाळांना स्पिकर सेट द्यावा लागतो असे सांगितले होते. दर वेळी काही कार्यक्रम असला की आम्हाला शाळेला स्पिकर सेट द्यावा लागतो. यापेक्षा चुकीचे धोरण कोणत्या शाळेत असेल असे मला वाटत नाही. माझी आपल्याला विनंती आहे की, शाळेच्या माध्यमातून संगणकाची मागणी असेलतर आयुक्त साहेबांनी सांगितले होते, भाड्याने देतो. ते कसे देता येतील ते  बघा. मी उद्या आणून देतो. कोण कोण शाळेला स्पीकर भाड्याने देतात ते कशा पद्धतीचे असतात. या शाळेत सर्वसामान्य कुटूंबातील मुले आहेत, श्रीमंतांची नाहीत. एखादा वक्ता घडला पाहीजे. तिथे मुले घडली पाहीजेत. गोरगरीबांची मुले शिकत असताना तिथे अशी बेकार अवस्था असेल तर यापेक्षा दयनीय अवस्था काय असेल. उद्या विधान सभेत, निवडणूक आयोगाच्या सुद्धा कायद्यात आहे, रस्त्यावर सभा घ्यायची नाही. अशी निवडणूक आयुक्तांची ऑर्डर आहे. या सभांसंदर्भात ग्राऊंडचा उपयोग करत नसतील, तसे धोरण राबवायचे असेल तर पिंपरी चिंचवडमध्ये कोणत्याही पक्षाची सभा ग्राऊंडवर होता कामा नये अशी मी उपसूचना मांडतो. कोणत्याही राजकीय पक्षाच्या सभेला ग्राऊंड द्यायचे नाही असे काही करु नका अशी विनंती आहे. प्रामुख्याने पक्षनेत्यांना सांगू इच्छितो की, पर्याय काढावा. हे ग्राऊंड लोकांसाठीच असतात. ते सार्वजनिक कार्यक्रमासाठी उपयोगात यावेत. तिथे ग्राऊंडवर नागरीकच येऊन थांबणार आहेत. म्हणून हे ग्राऊंडस् त्यासाठी देण्यासाठी असावेत अशी विनंती करतो.

**मा.उल्हास शेट्टी** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, वेंगसरकर ऍकॅडमीच्या संदर्भात आलेला विषय मंजूर करायचे सभागृहाने ठरवले आहे. या ऍकॅडमीच्या संदर्भात बोलत आहोत. पिंपरी चिंचवडमध्ये चांगल्या प्रकारचे ग्राऊंड कदाचित प्रायव्हेट असल्यामुळे ते चांगले मेंटेन होते आहे. रु.९०,०००/- चे लाईट बील मोफत करण्यासाठी हा विषय आला आहे. या ग्राऊंडचा आदर्श बाकी ग्राऊंडसाठी घेतला पाहिजे. मदनलाल धिंग्रा स्टेडीयमसाठी एक कोटींच्यावर खर्च केला आहे. हे स्टेडीयम प्राधिकरणात आहे. मल्टीपर्पज ग्राऊंड आहे. क्रिकेट, फूटबाल, अथलेटीक सगळ्या प्रकारचे खेळ तिथे खेळले जातात. विद्यार्थी, मुले खेळत असतात. आपण वेंगसरकर ऍकॅडमीसारखे ग्राऊंड का करु शकत नाही. ग्राऊंड ब्युटीफूल बनवले आहे. कमर्शियल टॅक्स नाही. पिंपरी चिंचवडमधील खेळाडूंना चांगल्या भावनेने तयार करण्यासाठी प्रयत्न करत आहोत. मध्ये मध्ये ग्राऊंड भाड्याने देतात. परंतू त्याशिवाय पर्याय नाही. तिथे क्रिडा प्रकार शिकवणारे कोचेस आहेत. त्यांना सुद्धा मानधन द्यावे लागणार आहे. वेंगसरकर ऍकॅडमी यांनी जे क्रिकेट ग्राऊंड तयार केले आहे. ते पिंपरी चिंचवडमध्ये खेळाडू तयार व्हावेत. कॉमन वेल्थ स्पर्धा झाल्या होत्या त्यात देशाला खूप मेडल्स गोल्ड, सिल्व्हर मेडल्स मिळाले. शासनाने खेळाडूंना पंचवीस लाख, पन्नास लाख बक्षीस दिले आहे. आपल्याकडे असे खेळाडू तयार का होऊ नयेत. अशी एखादी संस्था इंटरेस्ट घेत असेल तर आपल्याला स्टेडियम मोफत करायला काय हरकत आहे. लाईटबील हा फार मोठा विषय नाही. त्याठिकाणी चांगल्या मेरीटमधील खेळाडू तयार होत असतील तर त्यासाठी प्राधान्य दिले पाहिजे. गरीब घरातला चांगला खेळाडू तयार होत असेल तर नक्कीच झाला पाहीजे. उद्या उल्हास शेट्टींचा मुलगा चांगला खेलत नाही तरी टिममध्ये आला पाहीजे. तर ते चुकीचे आहे. मी चर्चेत भाग घेतला. बोकड साहेबांनी बरेच वेळा

प्रयत्न केला. पण यशस्वी झाले नाहीत. एक साधे टेंडर काढताना एक्सवायझेड माहितीचा शूज घ्यायचा तर कशाला त्यांच्यात स्पर्धा घडवून आणायच्या. एका ॲथेलेटिक शूज घेण्यासाठी टेंडरमध्ये कॉस्ट टाकली. त्यामुळे टेंडर ओपन करता आले नाही. अशा पद्धतीने टेंडर फ्लोट केलेतर टेंडरचा रेट आढळून येणार आहे. स्पोर्टस् संदर्भात क्रिडा अधिकारी केपेबल आहेत असे वाटत नाही. ग्राऊंड बनवायला एक्सवायझेड ठेकेदार येणार, ट्रॅक कसा असावा हे त्याला माहिती नसते. साईज माहित नसते. याची कितीवेळा चर्चा केलीतरी उपयोग नाही. इथे बेसिकली टॅलेंटेड, टेक्निकल माणूस आवश्यक आहे. आज तुम्ही आहात. खांडकेकर साहेब ३ वर्षे आहेत. अधिकारी किती वर्षे आहे असे नसते. तिथे अधिकारी डिव्हिएशन असणारा, खेळाची आवड असणारा पाहिजे. आजही वेंगसरकर ॲकॅडमी तशीच आहे. आत्ता मगर स्टेडीयम बघा. त्याची अवस्था काय आहे. का डेव्हलप करु शकत नाही पिंपरी चिंचवड शहराला मोठमोठ्या अवार्डस् नॅशनल लेव्हलवर मिळतात. कोणत्या बेसिसवर अवॉर्डस् देतात याचा प्रश्न पडतो. रस्ते, लाईटसची एवढी आवश्यकता आहे का. कबड्डी या खेळाला किती ग्लॅमर आलेला आहे. पासेस मिळत नव्हते. बरे कबड्डीला एवढा ग्लॅमर आलेला आहे. मग आपले २५० ते १००० कोटींचे बजेट का करु शकत नाही. आपल्या विद्यार्थ्यांना तयार करायचे असेलतर मग अशा पद्धतीने करा. विरोधी पक्षनेत्यांनी खंत व्यक्त केली आहे. आपण इंटरनॅशनल खेळाडूंचा किती मोठा अपमान करतो. मा.अजित गव्हाणे यांनी रु.३०,००,०००/- खर्च केले. लाखोंनी बक्षिसे दिली. मग आपण त्यांना शाबासकी देणे गरजेचे वाटत नाही का. धिंग्रा स्टेडीयमचे बॅडमिंटन कोर्ट गेले सहा महिने बंद आहे. बजेट खर्च करायला प्रॉब्लेम आहे का. ६/६ महिने बॅडमिंटन कोर्ट बंद आहे. काही ठिकाणी चांगले आहे. काही ठिकाणी दुरुस्ती करायला इतका प्रॉब्लेम आहे. ऑनलाईन करतोय. शंभर टक्के विद्यार्थ्यांना लुटायचे काम चालले आहे. विद्यार्थी फिज देतात. त्यांच्याकडूनच शूज घ्या, त्यांच्याकडूनच बॅट घ्या. एक माणूस एक तासासाठी ग्राऊंड बुक करतो. महिन्याला रु.१२००/- भाडे देतो. पण तो महिन्याला रु.२०,०००/- कमवतो. तिथे तो माणूस ऑनलाईन बुकींग करतो. तिथे डिलिंग करायला उल्हास शेट्टी नावाचा माणूस ऑनलाईन बुकींग करतो. टेनिसमध्ये आईवडीलांना सगळ्यांना वाटते, माझा मुलगी सानिया मिर्झा व्हावी. प्रत्येकाची लाईन लागायला लागली आहे. तिथे एक कोच नेमला आहे. तो एकटाच कोच चार वाजल्यापासून नऊ वाजेपर्यंत प्रत्येकाला बोलवतो. प्रत्येकाकडून तीन ते चार हजार फी घेत असतो. कसे होणार छान. आपण म्हणतो क्रिडा धोरण, क्रिडा धोरण. एका टिमची बेसिकली तयारी केली पाहीजे. क्रिडा शिक्षक, स्टाफ यांचे कौतुक किती करावे तेवढे कमीच आहे. शहरात महापौर चषक घेणे यातच त्यांचे काम संपलेले आहे. त्याच्यापेक्षा काहीच काम त्यांच्याकडे नाही. रिझर्वेशन कसे टाकतात. १९९५ चे रिझर्वेशन आहे, जागा अजून ताब्यात नाही. २० वर्षे झालीतरी जागा ताब्यात येत नाही तर सोडून द्या. मालकाला तरी खुष करा. पुन्हा घेऊ शकत नाही. ॲवार्ड करु शकत नसाल तर परत देऊन तरी टाका. याला अर्थ नाही. भोसरी इथे सिंथेटीक ग्राऊंड आहे. त्याची परिस्थिती बघा. क्रिडा विभागाची काय परिस्थिती आहे. कोणत्या बेसिसवर आशा लावतोय की, आपले खेळाडू आंतरराष्ट्रीय लेवलवर जावेत. होऊ शकत नाही. म्हणून वेंगसरकर ॲकॅडमीसारखी ॲकॅडमी असेल तर त्यांना फ्रिमध्ये ग्राऊंड द्या. त्यांना सांगा, खेळाडू तयार करा. आम्हाला अभिमान आहे की, किती कौतुक करतो. दहीहंडीला किती सेलेब्रिटीजला बोलवतो. उद्या आपल्या खेळाडूला सेलेब्रिटी म्हणून बोलवा.

आपल्याकडे ग्राऊंड नाही. संजय गांधी ग्राऊंड व मदनलाल धिंग्रा ग्राऊंडवर मॅचेस घेण्यासाठी दिवसभरासाठी बुक करावे लागते. मेंटेनन्स करायला पाहीजे. डेफिनेटली टेक्निकल माणसाला, डिपार्टमेंटला एक हेड देऊन टाका. वॉचमन नसतो. दारुच्या पार्टया चालतात. त्याठिकाणी अंधार असतो. रस्ता नाही, कंपाऊंड नाही. त्यामुळे या सगळ्या गोष्टी होत असतात. माझी स्पेशल विनंती आहे की, शहरात हेल्थ कॉन्शस भरपूर झाले आहेत. मुले, सिनिअर सिटीझन, त्यांना खेळायला, बॅडमिंटन कोर्ट नाही. मॅक्सिमम बॅडमिंटन कोर्ट तयार करा. जेणेकरुन लोक हेल्थ कॉन्शस होतील. लोक वॉकींगसाठी जातात. डेफिनेटली पुण्यासारखे वातावरण होईल. पुण्यात गणेश कला, नेहरु स्टेडीयम, सणस ग्राऊंड इथे ट्रॅक्स आहेत, हे ट्रॅक्स वाहत असतात. एवढे लेडिज, ज्येष्ठ नागरीक वॉकिंग करत असतात. आपल्याकडे फक्त दुर्गा टेकडी आहे. गल्लीबोळात ट्रॅक डेव्हलप करा. आरक्षणातील प्रॉपर्टीजचा ताबा घ्या. नाहीतर परत देऊन टाका. मैदानात अननेसेसरी बांधणार मग कचरा होणार. वेंगसरकर ऍकॅडमीचे बील माफ करा. व हा विषय मंजूर करण्यात यावा.

**मा.भाऊसाहेब भोईर** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आपण मला बोलायला दिल्याबद्दल शतशः आभार मानतो. खरेतर क्रिडांगणसंदर्भात चर्चा करतोय. महापालिकेकडे जे धोरण करतात. सांस्कृतिक धोरण असू दे, क्रिडा धोरण असू दे. हे मनपाचे महाराष्ट्राचे.दूर्दैव आहे की, ज्यांच्या घरात कधी कोणी क्रिकेट खेळला नसेल, .जो कधी कोणता खेळ खेळला नसेल हे लोक धोरण तयार करतात. मग ते कोणत्याही पद्धतीने माहिती घेतात. माहितीचा आधार घेऊन धोरण तयार करतात. विस्तारपूर्वक शब्द प्रयोग करुन आमच्या हातात देतात. लॉस प्रॉफीटचा विषय क्रिडामध्ये कसा येतो. लॉस प्रॉफीटवर क्रिडा प्रकार चालत असता तर नेमक्या धोरणामध्ये काय ते विस्तारपूर्वक विचार करुन आमच्या ताब्यात दिले पाहीजेत. क्रिडा हे उत्पन्नाचे साधन आहे का. आपली प्रायव्हेट लिमिटेड कंपनी आहे का. हे कोण ठरवणार. या ग्राऊंडमधले हेच ग्राऊंड घ्या, तेच ग्राऊंड घ्या. नेहरु स्टेडीयम इथे मोठमोठ्या इंटरनॅशनल स्पर्धा सुद्धा झाल्या आहेत. पार्कींगची व्यवस्था नसेल, कुठे काय नसेल, कशा पद्धतीने कुठे चाललो आहोत. मी असेल, तुपे साहेब असो, आम्ही रसिक आहोत. कार्यकर्ते आहोत. नाट्यक्षेत्रात गेले २० वर्षांपासून काम करतोय. म्हणजे आम्हाला साहित्यातले फार कळते अशातला भाग नाही. आम्ही काहीही करतो. याचा अर्थ आम्हाला त्यातील खूप कळते अशातला भाग नाही. कोणीतरी फुटबॉलबद्दल माहिती वाचून घेऊन येतो. आणि पोपटासारखे बोलत असतो. जसे आम्हाला काहीच कळत नाही काय. समाजात काहीतरी क्रिएटीव्ह करावे असे कोणीच नाही का. क्रिडांगण उत्पन्नाचे साधन आहे का. काय चर्चा करतो आहोत आपण. भारतातील एकंदर नाट्यगृहे उत्पन्न देतात का. मग ती बंद करायची का. मुलभूत सुविधा गरजा पुरवण्याचे काम महापालिकेचे आहे. ग्राऊंडचा अर्थ काय, ग्राऊंड म्हणजे तिथे पब्लिक प्लेस आहे. अत्यावश्यक गोष्टी/घटना घडू नयेत, पब्लिक प्लेसमध्ये लोकांना त्रास होऊ नये म्हणून खबरदारी घ्यायची. लाईटस्, स्पीकरचा विषय पूर्ण केला तरी, वेंगसरकराचे नाव घेऊन चर्चा करणे उचित नाही. परंतू विनंती आहे, मुळात धोरण, नियम पाहीजे. धोरण का ठरवायचे ते ठरवले पाहीजे. सांस्कृतिक धोरण ठरवताना मी तुपे साहेबांना म्हणालो. मला तेवढा वेळ देता आली नाही. मी त्या क्षेत्रातील साधा कार्यकर्ता आहे. मला फार कलाक्षेत्रातले ज्ञान नाही पण कलाक्षेत्रातली किंवा क्रिडाक्षेत्रातली जी मान्यवर मंडळी आहेत. त्यांना फोन करता येत

नाही. कला क्षेत्रात दिवसागणीक प्रमोशन होत नाही. तिथे कर्तृत्वच सिद्ध करावे लागते. आपल्याला वाटते, महापालिकेत बसले म्हणजे सगळे शासकीय पद्धतीने त्याच डोळ्याच्या रितीने पाहत आहेत. जशी त्यांची उन्नती होते, त्याचपद्धतीने मग कोणालाच व्हॅल्यू नाही. क्रिकेट प्रकारातला एखादा खेळाडू आलातर ठिक. यांची उंची नाही. ते म्हणतात, दोन तासांनी या. जरा बाहेर बसा. आयुक्त साहेब, यांचे  कौन्सिलींग घ्या. त्यांना संस्कार शिकवा. नेमके कशासाठी करतो आहोत व आपण काय आहोत. हा चर्चेचा विषय नाही. बालेवाडीसारखे स्टेडीयम लोकांसाठी घेतो. उखडले तर उखडले काय फरक पडतो. ते पुन्हा करा. त्यासाठी रु.१० कोटींची तरतूद करुन ठेवा. बाकीचे खर्च कमी करा. कोणतेही धोरण काही नाही. क्रिडा प्रकारामध्ये मा.उल्हास शेटी यांनी सांगितल्याप्रमाणे महापौर चषक स्पर्धा भरवणे म्हणजे क्रिडा धोरण. महोत्सव करणे. म्हणजे सांस्कृतिक धोरण राबविणे. उदाहरण,नंदकिशोर कपोते यांच्यासारखा जागतिक किर्तीचा माणूस, पद्माकर तोडकरी संगित नाट्या क्षेत्रातील आहेत. ते वसंतराव देशपांडे यांचे शिष्य आहेत. त्यांना बोलवतो का. काही नाही. ते काय वशिल्याचे माणूस आहेत. पु.ल.देशपांडेंच्या घरी जावून पाया पडलेली ही मंडळी आहेत. आपल्या भक्तीशक्ती शिल्पात छत्रपती वाकलेले आहेत व तुकाराम महाराज वरती आहेत. यातून काहीतरी घ्या. कोणत्याही क्रिडा प्रकारात तुम्ही मनुष्याला इतका त्रास देता त्याची परत तुमच्याकडे यायची इच्छा होत नाही. विरोधी पक्षनेत्यांना सांगितले आहे. बिंद्रा, सुशीलकुमार इथे म्हणतील, मग आम्हाला राहीलेले चेक द्या. तिथे बोलत जातील. पद गेले की प्रतिष्ठा परत कधी येत नाही. ही चर्चा सोडून द्या. नेमके धोरण म्हणजे काय याचा विस्तारपूर्वक लेखाजोखा सांगा. अर्जून पुरस्कार मिळालेले खेळाडू आहेत. बॉक्सिंगवर पुस्तक वाचून भाषण करणे म्हणजे मी बॉक्सिंगचा खेळाडू झालो का. बॉक्सिंगमधले खेळाडू आहेत. त्यांना बोलवा. नामवंत व्यक्तिंना सन्मानपूर्वक घरी जाऊन फोन करुन नव्हे. श्रीमंत महापालिकेची आपल्याला मस्ती आहे. त्यांचे संस्कार, विचार आपल्याकडे अजिबात नाहीत. धोरण ठरवताना योग्य माणसे बसवा. ज्या कामासाठी जे आहेत ते त्यांना दिलेच पाहीजेत, ते द्या. क्रिडा हे काही आपल्या उत्पन्नाचे साधन नाही. ठेकेदार जे आपले दत्तक पूत्र आहेत. काम उशीरा झाले तरी एकाला तरी आजपर्यंत दंड केलात का. ही गोष्ट गांभिर्याने घ्या. हे सर्व करत असताना मूळ संस्कृती जतन करायचे काम देखील आपले आहे. आपले मा.उल्हास शेट्टी व मी एकाच कॉलेजमधले  खेळाडू आहेत. आयुक्त मला भेटत नाहीत म्हणून मी अर्ज केला नाही असे शक्य आहे का. म्हणून मी काम करायचे सोडून देतो का. असे कोणीही सांगू शकत नाही, या ग्राऊंडवर हेच घ्या, त्या ग्राऊंडवर तेच घ्या. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रिडा प्रकारांत नेहरु स्टेडीयमवर मोटो क्रॉस होत असेलतर अजून किती उद्ध्वस्त करायचे. दर्जेदार ग्राऊंड करा. क्रिडा समिती करा, त्यांना मानधनावर ठेवा. त्यांच्याकडे सर्वे करायला द्या. त्यांना सांगावे, या ग्राऊंडवर हे करा, त्या ग्राऊंडवर हे करा. दरवेळी अपमान करतो. तिथपर्यंत जायला काय दिव्य असतात, काय संघर्ष करत असतो हे तोच सांगू शकतो. जो जाणकार आहे त्यांची कमिटी असावी. स्थापत्यच्या माणसांना स्थापत्य करु द्या. विद्युतच्या माणसांना कुठे करंट करायचे ते माहित असते, त्यांना तेच काम द्या. खेळाच्या या भूमित एवढे पदव्युत्तर आहेत. तिथे कतृत्वाची पूजा केली जाते. बैठकीत भौतिक प्रगतीची चर्चा कुठे जात नाही. जास्त वेळ चर्चा करत बसण्यापेक्षा विषय मंजूर झाला असेल तर, क्रिडा धोरणासंदर्भात नामवंत क्रिडापटूंचा सन्मान करा. ऍथेलेटीक

असेल ऍथेलेटीकची कमिटी करा, बॉक्सिंगचा असेल त्याच्यासाठी बॉक्सिंगची कमिटी करा. त्यांना ठरवू दे, कुठे काय करायचे ते.

**मा.अजित गव्हाणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,इथे दिलीप वेंगसरकर फाऊंडेशनच्या विषयाच्या अनुषंगाने सर्वजण आपआपले मत मांडत आहोत. मा.उल्हास शेट्टी, मा.भाऊसाहेब भोईर यांनी मुद्दे मांडले आहेत. खरेतर मा.दिलीप वेंगसरकर ऍकॅडमीचा अतिशय चांगला विषय मंजूर झाला पाहीजे आमची भावना आहे. शहरात प्रायव्हेट ऍकॅडमी चांगल्या पद्धतीने चालू शकते, तर एवढे बजेट आपण खर्च करतो. परंतू प्रत्यक्षात त्याचे आऊटपुट काय येते? दरवर्षी महापौर चषक घेतोय, दरवर्षी स्पर्धा होते, त्याचा प्रत्येक खेळाडूला काय उपयोग होतो. क्रिडा हे सगळ्यात बोगस डिपार्टमेंट आहे. सगळ्यात खालच्या दर्जाचा कोणता विभाग असेलतर क्रिडा विभाग आहे. खालून पहिला असा त्यांना पुरस्कार दिला पाहीजे. त्यांना काम करायची इच्छा नाही. त्यांच्या बुद्धीला गंज लागला आहे. ज्यांची क्षमता नाही असे लोक तिथे काम करतात. काही लोकांना तर अधिकार नाहीत. अनेक विभागांत क्रिडा विषयाचे ज्ञान असणारे खेळाडू आहेत. कोणीसुद्धा सूचना केलीतर त्यांना क्रिडा विभागांत घ्या. शहरातील क्रिडापटूंना प्रोत्साहन मिळाले पाहीजे. या शहराची एवढी मोठी लोकसंख्या आहे. पुणे शहरात क्रिडा या विषयाकडे खूप चांगल्या पद्धतीने पाहीले पाहीजे. आपल्या शहरात जी काही मोजकी क्रिडांगणे आहेत, ती सुधारा. मगर स्टेडीयम इथे २/३ वर्षांपूर्वी टेंडर काढले. त्याचे काम किती वर्षे चालावे. २/३ वर्षे कामे चालली होती, त्या कामाला सहा महिने लागतात. अशी मानसिकता अधिका-यांची असेल तर खेळाडू कसे घडणार. लोकसंख्येचा विचार केलातर किती क्रिडांगणे अपेक्षित आहेत. पूर्वी मुलांना खेळायला शहरामध्ये मोकळ्या जागा होत्या. आज तशी परिस्थिती राहीलेली नाही. तरुण पिढीला मोबाईलवर खेळणे, टि.व्ही. पाहणे या पलिकडे मुलांना स्कोप राहीलेला नाही. अपण त्यांना चांगली क्रिडांगणे उपलब्ध करुन दिलीतर शहरात चांगले खेळाडू नक्की घडू शकतात. कबड्डीला किती मोठे ग्लॅमर आले आहे. महापालिकेकडे इतका प्रचंड पैसा आहे. एक प्रॉपर टार्गेट करुन शहरात चांगले खेळाडू घडविण्यासाठी प्रयत्न करावेत. आपण प्रयत्न केला आहे. क्रिडा प्रबोधिनीचे काम अतिशय उत्कृष्ट चालते. आपण केले नाही असे नाही. परंतू क्रिडा प्रबोधिनीमध्ये महापालिकेच्या वेगवेगळ्या शाळांमधून अनेक मुले घेतली जातात. त्यांना चांगले डेव्हलप केले जाते. वेगवेगळ्या ठिकाणी क्रिडा प्रबोधिनी करावी. त्याठिकाणी अतिशय सामान्य कुटूंबातील विद्यार्थी आहेत. कबड्डी स्पर्धा चालू आहे. अनेक खेळाडू क्रिडा प्रबोधिनींतून शिकून गेलेले आहेत. त्यांना अतिशय चांगले प्रोत्साहन दिले जाते. आत्ता मा.भाऊसाहेब भोईर यांनी सूचना मांडली होती. ज्यांना खरोखरच खेळाची आवड आहे, त्यांना घेतले जावे. शहरात अनेक क्रिडापटू आहेत. फ्रि ऑफ क्लास सल्ला द्यायला ते इच्छुक आहेत. पिंपरी चिंचवडमधील खेळाडूंची परिस्थिती सुधारावायची असेल, त्यांना तयार करायचे असेल तर खूप लोक नक्की पुढे येतील. त्यांनी महाराष्ट्रासाठी योगदान दिलेले आहे. ते आपल्या शहरात उपलब्ध आहेत. त्यांचा उपयोग शहरात आपण करुन घेतला पाहीजे. डी.पी.ची आरक्षणे विकसित केली आहेत. प्रत्यक्षात क्रिडासाठी असलेली किती आरक्षणे ताब्यात घेतली गेलीत. ती प्रत्यक्षात डेव्हलप झालीत का. आमची सूचना आहे, जर बजेट नसेल तर गार्डनचे आरक्षण असेल ती आरक्षणे क्रिडासाठी वापरावीत. त्यासाठी खूप खर्च येत नाही. प्रत्येकाला वाटते, माझ्या वॉर्डात एखादे

टेनिस कोर्ट असावे, हॉकी ग्राऊंड असावे. स्केटींग कोर्ट असावे, याचे प्लॅनिंग केले पाहीजे. नेमकी गरज काय. कशा पद्धतीने आरक्षणे वेगवेगळ्या ठिकाणी विकसित व्हावीत. प्राधिकरणात वेगवेगळ्या खेळांसाठी आरक्षणे डेव्हलप करायचे ठरवले. वेगवेगळे खेळ घेतो आहेत. तसेच महापालिकेत सुद्धा केले पाहीजे. इंद्रायणी नगरचे ग्राऊंडवर इतका प्रचंड खर्च केला. ते व्यवस्थित मेंटेन होते का. मुळीच होत नाही. चांगले लोक नेमलेतर नक्की मेंटेन होईल. पण तसे होत नाही. आपण कोट्यावधी रुपये आरक्षणावर खर्च करतो. प्रत्यक्षात तिथे कुठेही वॉचमन नाही. ही आरक्षणे कशासाठी वापरली जातात. आयुक्त साहेब, यासाठी रात्री व्हिजिट करा. तुम्हाला कळेल काय धंदे चालतात. अतिशय दूर्दैवाची बाब आहे. ठराविक आरक्षणे असतील तर तुमच्याकडे खरोखर सिक्युरीटी आहे का. कुठलीही नाही. काहीपण उद्योग करायचा. कुठलीही सिक्युरीटी नाही. माझी तुम्हाला कळकळीची विनंती आहे की, यासंदर्भात आपण बारकाईने लक्ष घालावे. नवीन लोक अपॉईंट करा, त्यांना सूचना करा. क्रिडा विभाग साफ करुन टाका. यासंदर्भात वारंवार बैठका घ्या. शहरातील चांगले खेळाडू घडवू शकतो. यासंदर्भात लक्ष घालावे व आमची अपेक्षा पूर्ण करावी अशी विनंती आहे.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरेतर मंगलाताईंचे मनापासून कौतुक करते, अभिनंदन करते. चांगला विषय मांडला. काही लोकांनी विषय भरकटवला. परंतू विषय चांगला आहे. प्राधिकरणात म्हाडा इथे फिरलात तर दिसेल ज्या मोकळ्या जागा होत्या, तिथे मंदीरं झाली आहेत. मक्तेदारी झाली आहे. लहान मुलांना खेळायला मज्जाव केला जातो. मुलांनी कुठे खेळायचे. काही मंडळींच्या नावावर सातबारा झाला आहे. दरवर्षी तिथेच कार्यक्रम केला जातो. आपण त्यांचे नोकर नाही आहोत. जे आपल्याकडे परमिशनसाठी पहिले आले, त्यांनाच परमिशन दिली पाहिजे. तुम्हीसुद्धा राजकीय दबावात येता. एखाद्याने कार्यक्रम केला असेल तर तो दरवर्षी तिथेच कार्यक्रम करतो. बाकीच्यांना संधी मिळणार नाही का. तिथे अशा प्रकारे सातबारा देण्याचे काम बंद करा. लहान मुले-मुलींना, तरुणांना खेळण्यासाठी ग्राऊंडचा वापर झाला पाहीजे. बाजारीकरण झाले आहे. एकीकडे आपण म्हणतो,आपल्याकडे उत्पन्नाचे साधन नाही का. दुसरीकडे लाखो रुपये खर्च करुन केलेले ग्राऊंड हजार रुपयात ठराविक लोकांना द्यायचे. त्यांना देताना मुळात मग तुम्ही आलटूपालटून द्या. सगळ्यांना समान संधी मिळू शकते. व्यवस्था करायची तर खुल्या मनाने करा. चौकासाठी जसे नियम लावत असाल तर तसे ग्राऊंडसाठी लावत नसालतर तुम्ही ज्या लोकशाहीत राहता याची मला लाज वाटते. पहिली परमिशन घेतलेली असताना तुम्हीच खो घालता. त्याच जागेवर दुस-याला परमिशन दिली याप्रकारे काम करता असाल तर याचा मी निषेध करते. चौक म्हणजे सातबारा नाही. सार्वजनिक ठिकाणी पहिल्यांदा परमिशन दिली असेलतर तुम्हाला परमिशन नाकारायची गरज नाही. मंगलाताईंनी त्यांच्या वॉर्डातला विषय मांडला त्याला मी आवर्जून अनुमोदन देते. दरवर्षी प्रत्येक वेळी एकच कार्यक्रम होणार असेल तर तसे झाले नाही पाहीजे. प्रत्येकाला संधी मिळाली पाहीजे. खेळाचे मैदान आहे, तिथे वेगवेगळे कार्यक्रम होत असतील तर तसे झाले नाही पाहीजे. आमच्याकडे इंद्रायणीनगर भागात सिंथेटीक ट्रॅकसाठी रु.१५ कोटी खर्च केले. आज त्या मैदानावर जाऊन पहा. तिथे दारुच्या बाटल्या, जुगार सगळे प्रकार चालू झाले आहेत. कोणाला बोलायची सोय नाही. वॉचमनचे वय असे आहे की त्याला सांगून उपयोग नाही. पोलिसांना सांगितले तर ते म्हणतात,

महापालिकेला सांगा. महापालिकेला सांगितले तर म्हणतात पोलिसांना सांगा. आपण स्विमिंग पूल इथे झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प केला. आता गोधड्या वाळत घातलेल्या दिसतात. बाजूला ग्राऊंड होते. त्यासाठी सव्वा कोटी खर्च केले होते. आज तिथे चिखलाने माखलेल्या अवस्थेत मुले बॅट बॉल खेळत असतात. पैसे कमवले पाहीजेत. पण जे पैसे टाकतात त्या सर्वसामान्य नागरीकांना विचारा, त्यांचे काय मत आहे. तुम्ही परवानग्या देता. तुमचा डी.जे. ढाण ढाण रात्री १० वा. पर्यंत वाजत असतो. सर्वसामान्य नागरीकांना दुजाभावाची वागणूक देतात. कार्यक्रम भरवस्तीत चालू असतो. त्याला काहीतरी नियम लावा. नियम लावायचा नाही. बेभानपणे खर्च करताय. याच पैशाचे जतन करायची जबाबदारी आमची नाही. तुमची सुद्धा आहे. तिथे क्रिडांगणासाठी परमिशन द्यायची आहे. मी कोणत्याही हिंदू सणांच्या, कुठल्याही जातीच्या विरोधात नाही. पण तुम्हाला सर्वांना परमिशन द्यावी लागेल. मा.उल्हास शेट्टी यांनी सांगितले, बॅटमिंटनसाठी ऑनलाईन परमिशन देता. वेगवेगळ्या नावाने परवानग्या घेतात. सर्वांमागे एकच व्यक्ती आहे, तो काय करतो ते सुद्धा बघितले पाहीजे. तोच प्रकार आपली जेवढी प्रेक्षागृहे आहेत, तिथे सुद्धा होतो. त्यांचे बुकींग आधीच झालेले असतात. आपण दुस-या, तिस-या आठवड्यात गेलात तर कार्यक्रम झाला का नाही. नाही त्यांनी कार्यक्रम रद्द केला. महिन्यातून १५ ते २० वेळा एखादी व्यक्ती बुकींग करत असेलतर ती जबाबदारी कोणाची आहे. त्याच कामाचे पैसे घेतले पाहीजेत. माझी विनंती आहे एकूण ही सातबारा पद्धत बंद करा. नाहीतर सगळ्यांना समान संधी द्या.

**मा.सुलभा ऊबाळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,आज एका चांगल्या आणि गंभीर विषयाला वाच्यता फोडलेली आहे. तुम्ही हा विषय अत्यंत गंभीरपणे घ्या असे मला तुम्हाला सांगणे आहे. हा विषय मा.मंगलाताई कदम यांनी सुरु केला. मा.सिमाताई सावळे जसे म्हणाल्या, त्याप्रमाणे खरे बोलायला काळीज असावे लागते. घाव सोसावा लागतो. आज क्रिडांगण सर्वांना, सर्व उपक्रमांना ओपन असू शकत नाही. दांडीयाने क्रिडांगण खराब होत नाही. सार्वजनिक कार्यक्रमांमुळे क्रिडांगण खराब होत नाही. ही क्रिडांगणे लाखो करोडो रुपये खर्च करुन, करदात्यांचे पैसे टाकून करतो, त्याची अशाप्रकारे वाट लागताना बघत बसलोलतर आपण त्यात दोषी आहोत. याठिकाणी माझे स्वतःचे वैयक्तिक मत आहे, क्रिडा विभाग बरखास्त करुन टाकावा. प्रभाग समितीची बैठक झाली तर, त्यात सध्या काहीच कामे नाहीत. नामकरण करणे हा एकमेव कार्यक्रम दिसतो. दोन प्रभाग समित्या वाढल्यामुळे नगरसेवकांची संख्या कमी झालीतरी ते तिथे येत नाहीत. आले तर रस्त्याला काय नाव द्यायचे, बिल्डींगला काय नाव द्यायचे एवढेच काम आहे. क्रिडा विभागाला प्रभाग स्तरावर जबाबदारी वाटून दिलीतर निश्चितपणे तिथे अधिकारी असतात. ते नगरसेवकांना वेळ देऊ शकतात. इकडच्या अधिका-यांना त्या विभागात काम करायला कंटाळा आला आहे. त्यांना बदली पाहीजे. त्यांचा इंटरेस्ट फक्त नगरसेवकाच्यापुढे गोंडा घोळवण्यात असतो. महापौर चषक असेल तर क्रिडा विभागातील कर्मचारी कुठेही दिसत नाही. मा.अजित गव्हाणे म्हणाले, क्रिडा प्रबोधिनी उत्तम चालली आहे. तिथे जाऊन बघा. जेव्हा क्रिडा प्रबोधिनी सुरु झाली त्यावेळी असलेली विद्यार्थी संख्या, त्यावेळचे शिक्षक व आत्ता घटलेली विद्यार्थी संख्या व कार्यक्रम यात खूप तफावत आहे. इथेसुद्धा विद्यार्थ्यांकडे दूर्लक्ष होते आहे. ज्या अपेक्षेपोटी कोंडे साहेबांनी क्रिडा प्रबोधिनी सुरु केली होती. एकही असे प्रशिक्षण नाही, तिथे व्यवस्थित चालत नाही. प्रशिक्षकांना ब्रेक दिला जातो. तिथेही मोठे लॉबिंग आहे. आम्ही जेवढे राजकारण करत नाही, तेवढे

राजकारण इथे मोठ्या प्रमाणात क्रिडा विभागात आहे. क्रिडा धोरणावर बोलत असताना अनेक विषयांना स्पर्श केला गेला. जलतरण तलाव या विषयाकडे मी लक्ष वेधू इच्छिते. माझ्या वॉर्डात एक जलतरण तलाव दीड दोन वर्षांपूर्वी सुरु केला आहे. मी अतिरिक्त आयुक्त यांना अनेक वेळा, वारंवार पत्र दिले. तिथे क्लेरिकल जॉबसाठी लोक पाठवता. ते पावत्या देत नाहीत. तिकिटाचे पैसे डायरेक्ट कॅश घेतात. तिकिट दिले जात नाही. लेडीजसाठी टाईम मुव्हेबल असतो. या टाईमला यायचे नाही, दुस-या दिवशी वेगळ्या टाईमला यायचे. कारण मे महिन्यात ऑनलाईन बुकींग होते. त्यात सगळे फिक्स होते. आपलेच लोक सांगतात. स्थानिक नागरीकांना पोहण्यासाठी मज्जाव केला जाईल तर त्याचा उपयोग काय. तिथे सिक्युरीटी नाही. त्याठिकाणी अनेक वेळा पत्र दिले. त्या क्रिडांगणात स्विमिंगपूल आहे, बॅडमिंटन हॉल आहे, सभागृह आहे. जॉगिंग ट्रॅक आहे. रेसिडेन्शियल विभागात हे सभागृह आहे. तिथे सिक्युरीटीची गरज आहे. चारही बाजूंनी बंगले असल्यामुळे रात्रीचे उद्योग चालतात. प्रत्येक नगरसेवकाला या गोष्टीला तोंड द्यावे लागते. याला उत्तर काय देणार. सिक्युरीटी देणार नसालतर प्रॉपर्टी कशासाठी डेव्हलप करतो. प्रॉपर्टीला चार प्रॉपर्टी असताना तिथे सिक्युरीटी मिळत नाही ही अत्यंत शर्मनाक गोष्ट आहे. एव्हरेस्ट वीर यांना सभागृहाने रु.२२,८०,०००/- मंजूर केले होते. शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. आपण त्यांचा मान ठेवत नाही. पण अपमान करतोय. रु.३ लाख पेक्षा अधिक रक्कम मंजूरीचा अधिकार शासनाला असल्यामुळे प्रत्यक्षात रु.२,९०,०००/- मंजूर केले. नंतर त्यांना सांगण्यात आले, ते संस्थेला दिले जातील. व्यक्तीला देता येणार नाही. ते एव्हरेस्ट वैयक्तीकच चढले होते. त्यांनी त्यांचा सगळा इतिहास लेखी दिला आहे. त्यांनी फोटो दाखवले होते. विषय मंजूर करुन किती वर्षे झाली. त्यांचा अपमान केला गेला आहे. मग आपण काय करतोय. कशासाठी करतोय. कोणत्याही माणसाला बक्षीस जाहीर करतो. दुस-या दिवशी पेपरमध्ये बातमी येत असते. त्याप्रमाणे नागरीक वाचतात. त्यांना समजते या लोकांना रक्कम मिळाली आहे. त्यांना दुस-याकडून मदत होत असेल तर होत नाही. त्यांना वाटते, यांना महापालिकेने मदत केली आहे. आपल्या नाकर्तेपणामुळे या लोकांना तोंड दाबून बुक्यांचा मार सहन करावा लागतो आहे. शहरात गोरगरीब नागरीक यांना लग्नकार्यासाठी सांस्कृतिक भवन भाड्याने देण्याची, सांस्कृतिक धोरणातून संकल्पना दिली होती, ती सुरुवातीला राबविली होती. पीसीएनटीडीएने सुद्धा सांस्कृतिक भवन अल्पदरात भाड्याने देण्याची योजना राबविली होती. प्रत्येकाला गार्डन कार्यालये परवडत नाहीत. जास्तीत जास्त भाडे देऊन कार्यक्रम करु शकत नाही. अशा वेळेला कोणी भाड्याने घेतलेतर अशीच व्यवस्था सुद्धा केली पाहीजे. जेणेकरुन गोरगरीबांची व्यवस्था करु शकतो. क्रिडा विभाग कितीही बोंबललो तरी काही करणार नाही. मा.भाऊसाहेब भोईर यांनी सांगितले, मा.जितेंद्र ननवरे यांनी चांगली सूचना मांडली. आम्ही बोललो म्हणजे आम्ही शहाणे आहोत अशातली गोष्ट नाही. सत्ताधारी पक्षातल्या लोकांची ही अवस्था असेलतर कारभार कोणत्या दिशेने चालला आहे याचाही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. प्रत्येकाने बोलायचे. तुम्ही काही उपाययोजना करायची नाही हे कुठेतरी थांबले पाहीजे.. आयुक्त साहेब, तुम्ही या विषयावर गांभिर्याने विचार करावा. सगळ्यांची सूचना तयार करावी. एका प्रभागात दोन/तीन क्रिडांगणे असतील तर त्या क्रिडांगणांचा वापर कसा करावा याची योजना ठरवा. जिथे क्रिडांगण नाही तिथे काय केले पाहीजे. कोणाची मोनोपॉली झाली नाही ना. हे राजकीयदृष्ट्या घातक आहे. आयुक्त साहेब, तुम्ही कोणाला नाही म्हणू शकत नाही. हा तुमचा वीक पॉईंट असावा. आपण चावडीवर उत्तर देत नाही,आपण

सभागृहात उत्तर देताय. मी मागेच तुम्हाला म्हणाले होते, ऊस गोड लागला म्हणून तो मुळासकट खाणारे आहेत. हा विषय अजेंडावर नाही. अशाप्रकारचे उत्तर खूप महागात पडेल. मा.मंगलाताईंनी सांगितल्याप्रमाणे तुम्हाला १२८ नगरसेवकांचे नाव लिहावे लागेल. याचा निर्णय आजच आत्ता करा. या ग्राऊंडची कशाप्रकारे विल्हेवाट लावणार आहोत. नगरसेवकांनी ज्या-ज्या सुविधा मागितल्या आहेत. किती ग्रेडसेपरेटर केलेत, किती उड्डाणपूल केलेत याच्याशी नागरीकांना काही देणे-घेणे नाही. जी-जी आरक्षणे आहेत, ती डेव्हलप झाली पाहीजेत. तो नागरीकांचा अधिकार आहे म्हणून तिथे पर्याय पहिला हातात घ्या. जिथे जे काही शक्य आहे, ते लवकर झाले पाहीजेत. व्यायामशाळा बांधून ठेवल्या आहेत. माझ्या प्रभागात तीन व्यायामशाळा आहेत. एकाच ठिकाणी तीन व्यायामशाळा झाल्या आहेत. एक/दोन बंद करुन वेगळे काहीतरी करु म्हणून सूचवणारे आहेत. काही होत नाही. आमच्यासारखे सिनिअर नगरसेवक सुन्न होतात. आमच्या मागणीला अर्थ नसेल तर नवीन निवडून आलेल्या नगरसेवकांचे काय होईल, होणार. प्रत्येक विषयात गांभिर्याने घ्या. पदाधिकारी, अधिकारी देशोदेशी फिरून येतात, तिथे जाऊन बघतात. बालेवाडीसाऱखे क्रिडांगण असताना मोठमोठ्या लोकांची तिथे लग्ने होतात. उत्पन्नाचे साधन ही दुसरी दुय्यम बाजू आहे. पाण्याचा तुटवडा पडला त्यावेळी तुम्ही दिवसाआड पाणी केले. जेव्हा महापालिका रसातळाला जाईल, त्यावेळी तुम्ही विचार कराल. या ग्राऊंडचे काय भाडे घेऊ, काय उपाययोजना करायला पाहीजे. वाट्टोळे झाल्यावर करणार असालतर महापालिकेला कोणीही वाचवू शकणार नाही. घरातल्या कार्यक्रमासाठी एक हॅलोजन लावला तरी त्याने लाईटच्या बीलात तातडीने फरक पडतो. तुम्ही हायमास्क वापरा. त्यावेळी सबमीटर लावले पाहीजेत. एमएसईबीकडून घ्या. राजकीय असू देत किंवा कोणीही असू देत. त्याच्याकडून त्या लाईटबीलाचे पैसे घेतले गेले पाहीजेत. महापालिका हे बील भरते ते आम्ही सोडणार नाही. मी काही करणार नाही. प्रत्येकाला प्रत्येकाची भिती आहे. मला प्रमोशन पाहिजे. मला इथे बदली पाहीजे. आम्हाला परमिशन सगळे द्या. सगळे एकमेकांवर राहिले आहेत. त्या माणसाकडे एक्झम्पशन पॉवर आहे. ही तुमची जबाबदारी आहे. आम्ही बोलतो, त्याचे मिनिटस् रेकॉर्ड होतात. त्यापुढे त्याचे काय होते का. त्यावर काय अंमलबजावणी होते. आम्ही बोललो, प्रत्येक नगरसेवक बोलला, त्याची अंमलबजावणी येणा-या काळात झाली पाहीजे. इथे आत्ताच्या आत्ता क्रिडांगण धोरण कशाप्रकारे करणार, त्यांची मिटींग घेणार आहोत का. यात ज्या-ज्या नगरसेवकांना इंटरेस्ट आहे त्यांना बसवून त्यांची मिटींग घ्या. प्रभाग स्तरावर अधिका-यांना अधिकार प्राप्त करुन द्या. जेवढे अधिकारी क्रिडा विभागात आहेत, त्यांना बोलवून २/३ वर्षांतले त्यांचे काम त्यांना दाखवायला सांगा.

**मा.आर.एस.कुमार** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मला जास्त बोलायचे नाही. मदनलाल धिंग्रा स्टेडीयमची ओळख करायची आहे. आकुर्डी भागात हे एकमेव स्पोर्टस् ग्राऊंड आहे. गेले चार वर्षांपासून आम्ही लॉन करायला सांगितले होते. त्यानुसार टेंडर झाले. रु.६० लाखाची कामे सुरु करायला लागले. एक वर्ष क्रिडांगण बंद आहे. लॉनचे काम करण्यात आले. ल़ॉनचे उद्घाटन झाले पण त्याप्रमाणे त्याचे मेंटेनन्स झाले नाही. त्यामुळे आजची ही परिस्थिती आहे. स्थापत्यवाले म्हणतात क्रिडाकडे जा. स्थापत्य म्हणते आमचे काम आम्ही फक्त करायचे, देखभाल फक्त क्रिडा विभाग करणार. मेंटनन्स कोण करणार. याच्यासाठी चीफ इंजिनिअर आहेत. ऍडिशनल कमिशनर

यांच्याकडे मी कमीत कमी दहा चकरा मारल्या असतील. प्रत्येक जण जबाबदारी झटकतो आहे. शाळांच्या क्रिडा स्पर्धा चालू होतील. ते बोलवायला आले होते. तशा परिस्थितीत तिथे फक्त चिखल व माती आहे. ६० लाख खर्च केला होता. ही ठेकेदाराची चूक आहे. लॉन कुठे गेला, लोक आम्हाला विचारतात, ग्राऊंडमध्ये काय परिस्थिती आहे. स्पोर्टस् ग्राऊंडसारखे दिसत नाही. गावातील शेतासारखे दिसते. ऍडीशनल कमिशनर उद्या क्रिडा विभागात व्हिजिट करा. अजून ६ महिने थांबा. तुम्ही जाऊन रिपेअरींग करा. मला लाज वाटते, मी गेले ३० वर्षांपासून नगरसेवक आहे. माझ्या वॉर्डातील ग्राऊंडची अशी परिस्थिती आहे. कोणी लक्ष देत नाही. आमच्यासारख्या सगळ्या नगरसेवकांना फक्त फेकून देतात. काय चालले आहे. असे काम कुठेही बघितलेले नाही. अकाऊंटॅबिलिटी नाही. अधिका-यांनी चांगले काम केलेतर डबल इन्क्रिमेंट घ्या, पण चूक केलीतर पनिशमेंट द्या. अधिका-याने चूक केलीतर त्यांना हेच सभागृह वाचवते. त्यामुळे अधिका-यांना भिती वाटत नाही. इतका केअरलेसपणा कुठेही नाही. प्रायव्हेट कंपनी असतीतर दोन्ही अधिका-यांना कामावरुन काढले असते. चौकशी करा. जबाबदारी फिक्स करा. या साठ लाखासाठी कोण जबाबदार आहे?

**मा.नितीन काळजे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, या विषयावर चर्चा करावी का नाही. कारण चर्चा करण्यासारखे काही राहिलेले नाही. क्रिडा विभागाचे आमच्याकडे अजिबात लक्ष नाही. एका व्यायामशाळेला बांधून २ वर्षे झाली. दोन/तीन खोल्या बांधल्या होत्या. त्या व्यायामशाळेसाठी मैदान मागितले होते. ताबा न झाल्यामुले मिळाले नाही का. ताबा नाही म्हणून दोन/तीन वर्षांपासून भांडतोय. क्रिडा विभागाकडे गेलोतर ते म्हणतात भूमि आणि जिंदगी विभागाकडे जा. आमच्याकडे काहीच नाही कमीत कमी आहे ते तरी पूर्ण द्या. एवढी आरक्षणे टाकली आहेत. आख्ख्या पिंपरी चिंचवडचे आरक्षण च-होली इथे सगळ्यात जास्त  दिसले आहे. मोकळी जागा दिसली तिथे आरक्षण टाकले. सगळ्या गोष्टींसाठी च-होली इथे काहीच विरोध नाही. अडीच वर्षे झालीतरी एकही ग्राऊंड झाले नाही. कुठेही व्यायामशाळा नाही. अद्ययावत स्विमिंग टँक नाही. कशासाठी नगरसेवक झालो. यायला जायला रस्ता सुद्धा नाही. कुठल्याही गोष्टीसाठी तरतूद देत नाहीत. नेमाणे नावाचा कोण माणूस आहे. व्यायामशाळा कधीही लगेच उघडलेल्या दिसल्या नाहीत. तो कोण माणूस कधी दिसलाच नाही. कृपा करुन माझी आपल्याला कळकळीची विनंती आहे की, एकतर तुमच्या कारकीर्दीत आरक्षणे डेव्हलप करा. आमच्या कारकीर्दीत नाही पण तुमच्या कारकीर्दीत तरी डेव्हलप करा. व्यायामशाळा साहित्याची पहिली नोंद करा. चोविसावाडीसाठी मटेरीअल आजपर्यंत मिळाले नाही, का मिळाले नाही. स्थापत्य विभागाची एवढीच चूक झाली. व्यायामशाळा बांधली, ते म्हणतात, आपल्या नावावरच नाही. कमीत कमी त्याचा पाठपुरावा करावा. आपण त्यात लक्ष घालावे. एकंदरीत कमीत कमी एकतरी व्यायामशाळा, एकतरी ग्राऊंड व गार्डनचे काम करावे अशी विनंती आहे. जे मटेरीअल आहे त्याची चौकशी करा. त्यासाठी धोरणच नाही, धोरणाचे डिटेल्स नाहीत. मला काहीच माहित नाही. तिथे कोणी येत नाही.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, चार/पाच वर्षे झाली, मी ओरडतेय. टेनिस व स्केटींग ग्राऊंडचे उद्घाटन झाले. आता त्या क्रिडांगणाची अवस्था काय झाली आहे, ते पूर्णपणे पाण्याखाली आहे. सिंथेटीक कोर्ट आहे. तिथे सिक्युरीटी नाही. मा.अजित गव्हाणे यांनी

सांगितले. सिक्युरीटीचा प्रश्न फार गंभीर आहे. ग्राऊंड शेजारी स्विमिंग टँक आहे. स्विमिंग टँक बंद असेलतर तो सिक्युरीटी तिथे उपलब्ध नसतो. रात्री ७.०० नंतर ग्राऊंडवर जाणे मुश्कील असते. सुलभाताईंनी सांस्कृतिक भवनाचा विषय काढला. सांस्कृतिक भवनाचे उद्घाटन होऊन सहा महिने झाले. ते गोरगरीबांना लोकांना लग्नासाठी उपलब्ध करुन द्यावे किंवा ज्येष्ठ नागरीकांसाठी उपलब्ध करुन द्यावे. त्याची भाडे आकारणी असे म्हणत नाही. डिपॉझिट म्हणते. रु.१५,०००/- भाडे आकारले जाते. मी विचारले, दिवसासाठी किती वेळ प्रोग्राम असेलतर रु.१५,०००/- भाडे आकारले जाते. दिवसासाठी पंधरा हजार आकारले जातात. आपल्याकडे छान प्रॉपर्टी झाली पाहीजे. आज तीन/चार महिने पण त्याचे मेटेनन्स झाले नाही. वॉश बेसिनची सोय नाही का. रु.१५,०००/- का आकारले जातात. ज्यादिवशी लोकांना लगेच भाड्याने द्यायचे होते, तिथे सिक्युरीटी उपलब्ध नव्हती. मॅडमनी मला फोन केला. मला लग्नाची तयारी करायची आहे. चौकशी करुन भाडे आकारणी कमी करण्यात यावी. सगळ्या प्रभागांत सांस्कृतिक भवन फ्रि ऑफ कॉस्ट मध्ये दिले जाते. मग असा दूजाभाव का करता. माझ्या भागात रु.१५,०००/- का आकारतात?

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, क्रिडांगणाचा विषय सर्वांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. माझ्याकडे क्रिडांगण आहे पण अशा पद्धतीने कोणतेही काम करु दिले नाही याचा मला अभिमान वाटतो. संत तुकारामनगर मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर क्रिडांगण आहे. पण तिथे कोणत्याही पद्धतीने वेगळ्या पद्धतीने सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी काम दिलेले नाही. आम्ही प्रत्येक मंडळाला समजावून सांगतो, असे काम करु नका. ते क्रिडांगण म्हणून आपण वापरणार आहेत. माझी विनंती असेल की, गणेशोत्सव असेल, नवरात्रोत्सव असेल त्यासाठी असे काही सांस्कृतिक स्पॉट तयार केले, ते उपलब्ध करुन दिलेतर जास्त उपयुक्त होईल. माझ्या भागात व्यायामशाळेचा विषय वेगळा आहे. गेले अडीच वर्षांपासून मागणी आहे, माझ्या भागातील महिलांसाठी एक व्यायामशाळा उपलब्ध करुन द्या. अडीच वर्षापासून ठराव केला आहे. अजूनही त्याची अंमलबजावणी आजपर्यंत झालेली नाही. तिथे कोणत्याही पद्धतीने महिलांसाठी साधने दिलेली नाहीत. सांस्कृतिक भवनासारखे जिजाऊ सांस्कृतिक भवन आहे. तिथे कोणताही रखवालदार नाही. माझ्या इथे डि.वाय.पाटील इंजिनिअरींग कॉलेज, नर्सिंग कॉलेज इथे आहे. तिथे आज कोणाचाही ताळेबंद नाही. त्यामुळे त्याचा पार्किंगसाठी वापर केला जातो. महापालिकेच्या मिळकती कोणत्या पद्धतीने वापरायच्या. त्याचा चांगला उपयोग होत नसेल तर कोणत्या पद्धतीने काम करायचे. त्याचे उत्तर मला हवे आहे. माझ्याकडे चरस, गांजाचे जाळे निर्माण झाले आहे. माझ्या भागात फुलेनगर झोपडपट्टी आहे. नेहरुनगरची झोपडपट्टी आहे. या झोपडपट्टीतले टोळके जिजाऊ सांस्कृतिक भवनात बसलेले असतात. आज मी आठवड्यातून २/३ वेळा रात्री पोलिस चौकीत बसलेली असते. अडीच वर्षांपासून रखवालदार मागतोय मला दिलेला नाही. अतिरिक्त आयुक्त यांना हा एरिया दाखवला आहे. रिलायंस मोबाईलचा टॉवर लावलेला आहे. तिथे सुरक्षारक्षक नाहीत. तिथे लोक दारू पीत बसलेले असतात. बाजूला रेसिडेन्शियल झोन आहे. माझ्या मुलींना अर्वाच्य भाषेत उत्तरे मिळतात. माझा प्रश्न आहे, आम्ही जायचे कुठून. दारूच्या बाटल्या वरुन फेकल्या गेल्या. त्या ज्येष्ठ नागरीकांना लागल्या होत्या. मी संत तुकाराम नगरच्या पोलिस चौकीत चार एफआरआय दिलेले आहेत. वारंवार दाखवले आहे. मला महिलांना या जिजाऊ सांस्कृतिक भवनाचा योग्य वापर करायचा आहे. एवढी छान वास्तू आहे. त्याचा पूरक उपयोग

जनतेसाठी व्यवस्थितरित्या झाला पाहीजे. त्यासाठी तिथे सिक्युरीटी पाहीजे. क्रिडांगणे वाढवून, नुसतीच संख्या वाढवून उपयोग होणार नाही. याचा खुलासा व्हावा. या सांस्कृतिक भवनाचे आपण काय करणार आहात याचे उत्तर मिळावे.

**मा.चंद्रकांता सोनकांबळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मी गेले दोन वर्षांपूर्वी व्यायामशाळा साहित्याची मागणी केली होती. अजून एकही साहित्य मिळालेले नाही. कारण वेगवेगळी दिली जातात. आम्हाला आमची लाज वाटायला लागली आहे. कृपया या विषयावर बोलावे.

**मा.आयुक्त** – मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, क्रिडा या विषयावर महासभा इतका वेळ बोलू शकते ही अतिशय चांगली बाब आहे. मी स्वतः शासकीय पब्लिक स्कूलमध्ये शिकलो आहे. तालुका प्लेसमधून शाळेत गेलो त्यावेळी क्रिकेट काय ते माहित नव्हते. बास्केट बॉल, खोखो, कबड्डी, टेबलटेनिस कुठला कोणताही बॉल माहित नव्हता. तरीसुद्धा शासकीय खर्चातून ते स्कूल होते. तिथे सगळी साधने होती. त्यामुळे मला प्रत्येक खेळ खेळता आला. हाताळता आला. महत्वाचे म्हणजे ज्यावेळी मी कॉलेजमध्ये गेलो त्यावेळी विद्यापीठामध्ये कॉलेजचे प्रतिनिधीत्व करता आले. बास्केट बॉलमध्ये, खो-खोमध्ये देखील प्रतिनिधित्व केले आहे. देशातील हैद्राबाद असेल, कानपूर असेल, उज्जैन असेल सगळे युनिव्हर्सिटी कॅम्पस अटेंड करुन आलो आहे. क्रिडा व त्याच्याशी रिलेटेड गोष्टी किती आवश्यकता आहे हे मी स्वतः खेळाडू असल्यामुळे हे सांगायची आवश्यकता नाही. तथापि, डेव्हलप नंतर ज्यावेळी ऍनॅलिसिस केले, शासकीय किंवा इंटर स्कूल असेल कोणता तरी हॉलीबॉल असायचा. कोणतीही गेम असेल, शासकीय खर्चातून इतक्या गेमस् उपलब्ध होऊ शकतात हे त्यावेळी कळाले. मनपामार्फत आपण चांगले क्रिडासाहित्य व ग्राऊंडस् उपलब्ध करुन देऊ शकतो. महापालिकेकडे पैसा आहे, इच्छा आहे. मनपाकडे आरक्षणातील जागा आहे. महापालिकेत एवढी जनता असते की ती त्याचा उपभोग घेऊ शकते. त्यामुळे क्रिडाधोरण आणखी राबवण्याची, चांगले ग्राऊंड तयार केलेतर त्याचा गैरवापर टळेल, जनतेने त्याचा फायदा घ्यावा यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे यात दुमत नाही. गेल्या ५/६ महिन्यांत दररोज बाकी कामे भरपूर होती त्यामुळे क्रिडाकडे पाहीजे तेवढे लक्ष द्यायला वेळ मिळाला नाही. परंतू सर्वांच्या भावना बघितल्या तर त्या अतिशय तीव्र आहेत. वायसीएम हॉस्पिटलबद्दल असेल किंवा क्रिडाबद्दल असेल त्यामुळे यात विशेष लक्ष देऊन ब-याच ठिकाणी स्थळ पाहणी करुन, त्याठिकाणी बैठका घेऊन जे काही करणे शक्य आहे ते करण्याचा प्रयत्न राहील. परवा १२ उद्घाटने मा.मुख्यमंत्र्यांच्या हस्ते केली, त्यात एक आपले आहे. बाकी क्रिडा व क्रिडा विषयाची झालेली आहेत. प्राधिकरण झालेतर मोठ्या प्रमाणात क्रिडा विषयक गोष्टी विकसित करायचे ठरवलेले आहे. शहरात जेवढे स्विमिंग पूल आहेत, तेवढे कुठेच दिसले नाहीत. दोन/तीन स्विमिंग पूल बघितले, थोड्या फार प्रमाणात ब-याच अंशी ते चांगले आहेत. शहराला जसे चांगले रस्ते प्राप्त झालेत, तशी गार्डनची चांगली पार्श्वभूमी असल्यामुळे गार्डन चांगले मेटेन करावे असे सन्मा. सदस्य व महापालिकेचे स्वप्न आहे. त्याचप्रमाणे चांगले ग्राऊंड क्रिएट करायला व स्विमिंग पूल असण्याची प्रथा आहे. त्याचा फायदा बरेच लोक घेतात. ऑनलाईनचा गोंधळ काय तो बघता येईल. एवढे लोक स्विमिंगसाठी जातात तेही दुस-या शहरात बघायला मिळणार नाही. लोकांना स्विमिंग करण्यासाठी, खेळण्यासाठी वेळच नाही. याठिकाणी तो आहे ही चांगली बाब आहे. याचा अर्थ

सुखवस्तू कुटूंबातील लोक इथे राहतात. अदर ऍक्टीव्हीटीज मधून ते क्रिडा याचा पाठपुरावा करतात. त्यामुले याप्रसंगी हे सांगावेसे वाटते, जसे पर्यावरण धोरण आपण करणार आहोत. तसे क्रिडा व आरोग्य या दोन्ही महत्वाच्या गोष्टी आहेत. त्यासुद्धा प्रामाणिकपणे करायचा प्रयत्न राहील. सगळ्यांच्या मोठ्या-छोट्या अडचणी दूर करायचा प्रयत्न राहील. आरक्षणाबाबतीत सर्वांना ओपनली सांगू इच्छितो की, आपल्याकडे डी.पी. रिझर्वेशनमध्ये जी आरक्षणे आहेत ती जास्तीत जास्त जनतेला उपलब्ध करुन देणे, त्यासाठी आपल्याकडे चार पर्याय आहेत. टीडीआर देऊन, आरक्षणे ताब्यात घेऊन, एफएसआय देऊन यासाठी लोक तयार आहेत. त्याव्यतिरिक्त कलेक्टर ऑफीसकडे न जाता अक्रॉस द टेबल रेडीरेकनर दर, त्याव्यतिरिक्त शेवटी कोणी जागा ताब्यात देत नसेलतर संबंधित जागा मालकाकडून भूसंपादन करणे. त्याची प्रायोरीटी ठरवली पाहीजे. प्रायोरीटी ठरवली तरी महापालिकेच्या काही मर्यादा आहेत, त्याचा सर्वांनी विचार केला पाहीजे. बजेटमध्ये नगररचना विभागाला १०० कोटी देतो. जागांचे रेट आकाशाला भिडणारे आहेत. यासंदर्भात बैठक घेऊन मध्यम मार्ग म्हणून टीडीआर घेण्याची तयारी असेलतर अ फ़ॉर्म, ब फ़ॉर्म घेऊन जा. यात नवीन काही नाही. एक गार्डन, एक वॉर्ड, एक प्ले ग्राऊंड असे करता येईल. त्याप्रमाणे पुढे जाता येईल. पैशांची कमी आहे. जास्तीत जास्त टीडीआर घेऊन आरक्षणे ताब्यात घेता येतील. नाहीतर एफएसआय घेऊन प्रायोरीटी ठरवा. एकदम ४/४ आरक्षणे घेऊ नका. आरक्षणे ताब्यात घेण्याबद्दल काही दुमत असण्याचे कारण नाही. स्थायी समिती अध्यक्ष आज इथे नाहीत. त्यांनी या विषयावरुन स्थायी समिती अक्षरशः डोक्यावर घेतोली होती. ते सुद्धा खेळाडू आहेत. तीन लाख, पाच लाख असा घोळ आहे. म्हणून सरसकट ब-याच लोकांचा विरोध आहे. काही लोक कागदपत्रांमुळे राहीले असतील. त्यामुळे माछरे साहेबांना स्पष्ट सूचना आहेत. काही अडचण नसेलतर शंभर टक्के पैसे देण्यात यावेत.

**मा.कैलास थोपटे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आत्तापर्यंत ९५च्या डि.पी.ला मान्यता मिळाली आहे. १९९५ पासून आत्तापर्यंत बघितले तर कमीत कमी ९५ टक्के आरक्षणांत अनधिकृत बांधकामे झाली आहेत. जागा ताब्यात घेतलेल्या नाहीत. पण काही आरक्षणे टीडीआर, एफएसआय च्या माध्यमातून ताब्यात आलेली आहेत. मनपाच्या नावाचे सात बारा झाले आहेत. तरीसुद्धा तिथे काही अतिक्रमणे झाली आहेत. हे मी अनेकवेळा बोललो आहे. ही अतिक्रमणे काढा. पण ही अतिक्रमणे काढायची सुद्धा अधिका-यांची मानसिकता नाही. ७/१२ असताना अनेक ठिकाणी व्यवसाय चालू आहेत. दुसरी दुकाने चालू आहेत. माझी विनंती आहे, जिथे महापालिकेच्या जागा ताब्यात आलेल्या आहेत, त्या ठिकाणी अतिक्रमणे ताबडतोब काढावीत ही विनंती करतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८१ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे**-मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – ५५६ विषय क्रमांक – ९
दिनांक - १९/८/२०१४ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ– १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.जा.क्र.दवनि/६/कावि/७०/२०१४ दि.०४/०८/२०१४

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी श्रीमती जयश्री डांगे विरूध्द पिंपरी चिंचवड महानगरपालिका व इतर या जनहित याचिका क्र.२०७/२०१० च्या सुनावणी मध्ये दि.४ ऑक्टोबर २०१३ रोजी महानगरपालिकेस निर्देश दिलेले आहेत. त्यानंतर मनपाने केलेली कार्यवाही व त्याबाबतच्या अंमलबजावणीसाठी येणा-या अडचणीबाबत सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राचा विचार करून दिनांक ०५/०५/२०१४ रोजी मा. उच्च न्यायालयात तपशिलवार चर्चा व सुनावणी झालेली आहे. त्याअनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने दि. ०५/०५/२०१४ रोजी प्रामुख्याने खालील निर्देश दिलेले आहेत.

(१) **मा.उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार महापालिका परिसरात सध्या ६६००० पेक्षा जास्त अनधिकृत बांधकामे असुन त्यांची व्याप्ती विचारात घेता महापालिकेकडे सध्या असलेले तांत्रिक व अतांत्रिक अधिकारी व कर्मचारी यांचेकडे सध्या नेमून दिलेली इतर कामे व अनधिकृत बांधकामांवर करावयाची कारवाई यांची तुलना करता सदर मनुष्यबळ कमी असुन या अतिरिक्त व कालबध्द कार्यवाहीसाठी वाढीव पदांची आवश्यकता असून त्याबाबतचा प्रस्ताव मनपाने तयार करून त्यास महासभेची मान्यता घेणेची कार्यवाही पूर्ण करून त्यांचेकडील प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी शासनास आदेशाच्या दिनांकापासून दोन महिन्यात सादर करावा.**

(१) **म.न.पा.ने शासनाकडे सादर केलेल्या नवीन पद निर्मितीच्या प्रस्तावास राज्य शासनाने त्यापुढील ९० दिवसात मान्यता देणेबाबतची कार्यवाही पूर्ण करावी.**

(२) महापालिकेकडून महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५३(१) नुसार नोटीस दिल्यानंतर जर संबंधित व्यक्तीने सदर अधिनियमाचे कलम ५३(३) नुसार नियमितीकरणाकामी अर्ज केल्यानंतर सदर प्रकरण लवकरात लवकर निकाली काढणे व त्यानुसार पुढील योग्य ती कायदेशिर कार्यवाही करणे.

**<u>महाराष्ट्र शासनाकडील २ मार्च २००९ च्या शासन निर्णयातील ठळक निर्देश खालील प्रमाणे आहेत-</u>**

<u>संरचनात्मक सुधारणा</u> –

**(१) स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अनधिकृत बांधकाम /अतिक्रमण नियंत्रण व निर्मूलनासाठी समर्पित, सक्षम यंत्रणा निर्माण करणेः-**

**(अ) अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मूलन पथक निर्माण करणे**

**(आ) नागरी पोलीस  प्रतिनियुक्तीवर महानगरपालिकांकरिता अनिवार्य**

**(२) नागरी गुन्ह्यांसाठी स्वतंत्र विशेष पोलीस ठाणे स्थापन करणे**

**(३) नागरी गुन्ह्यांसाठी स्वतंत्र न्याययंत्रणा स्थापन करणे**

वरील ठळक निर्देशामधील मुद्दा क्र **(I)** मधील **(२) " नागरी गुन्ह्यांसाठी स्वतंत्र विशेष पोलीस ठाणे स्थापन करणे "** स्वतंत्र पोलीस पथकास मान्यता मिळणेबाबत पत्र क्र. प्रशासन/१अ/कावि/७४२/२०१३, दि.१०/०७/२०१३ अन्वये प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी महापालिकेकडून स्था/शअ/पीए/५२९/२०१३ दिनांक २३/१०/२०१३ अन्वये स्मरणपत्र पाठविणेत आले आहे. अद्यापही सदर प्रकरण शासन स्तरावर प्रलंबित आहे.

"**स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मूलनासाठी समर्पित, सक्षम यंत्रणा निर्माण करणे"** यासाठी स्वतंत्र पदे निर्माण करणे व त्यास शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे. या कामी आवश्यक त्या पदनिर्मितीचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही गट 'क' मधील असून महानगरपालिकेबाबतची भौगोलिक माहिती खालील प्रमाणे आहे-

| | |
|---|---|
| महानगरपालिकेचे क्षेत्रफळ | १७७.३० चौ.कि.मी. |
| महानगरपालिकेची सन २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या | १७,२९,३५९ |
| महानगरपालिका क्षेत्रात एकुण द्विस्तरीय निवडणूक प्रभाग संख्या | ६४ |
| नगरसदस्य संख्या | १२८+५(स्विकृत) |
| क्षेत्रीय कार्यालये संख्या | ६ |
| मिळकतींची संख्या मार्च २०१४ अखेर | ३,८०,३२७ |
| प्रत्येक निवडणूक प्रभागनिहाय अंदाजे सरासरी लोकसंख्या | २७,०२१ |

महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत बांधकाम / अतिक्रमण नियंत्रण व निर्मूलनासाठी उपाययोजना करणेसाठी सद्यस्थितीत स्थापत्य विभागाचे कनिष्ठ अभियंता, उपअभियंता व कार्याकारी अभियंता यांचे मार्फत कारवाई करण्यात येत आहे. तसेच, सद्यस्थितीत बीट निरिक्षक म्हणून मनपाचे निवडणूक वार्ड निहाय कार्यरत असलेले आरोग्य निरिक्षक / मिटर निरिक्षक / करसंकलन निरिक्षक कामकाज करीत आहेत. तथापि, सदर यंत्रणा वरील कामकाजात व्यस्त असल्यामुळे मनपाच्या विकास कामांवर व इतर नागरी सुविधांवर विपरीत परिणाम होत आहे. सबब अनधिकृत बांधकामांवरील कार्यवाही / कारवाईसाठी महापालिकेकडे समर्पित यंत्रणा असणे आवश्यक आहे.

याबाबत मा. उच्च न्यायालयाने दोन महिन्यांचे कालावधीत महापालिकेने अंतिम निर्णय घेऊन नवीन पद निर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याचे बंधनकारक केले आहे. महापालिकेकडील पद निर्मितीचा प्रस्तावाचा तपशील खालीलप्रमाणे राहील.

सद्यस्थितीत मनपा कार्यक्षेत्रातील अनधिकृत बांधकामांवर/अतिक्रमणावर स्थापत्य विभागामार्फत कारवाई करण्यात येत आहे. त्यामध्ये अनधिकृत बांधकामाचा पंचनामा करणे, अनधिकृत बांधकामधारकास नोटीस तयार करून प्रत्यक्ष बजाविणे, संबंधितांवर गुन्हा दाखल करणे व त्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणे, अनधिकृत बांधकाम प्रत्यक्ष निष्कासन करणे, या संदर्भात संबंधित पोलीस स्टेशन येथे आवश्यकतेनुसार हजर राहणे, व मा. न्यायलयात सुनावणीसाठी हजर राहणे,इ. कामकाजाचा अंतर्भाव आहे. काही प्रकरणी अनधिकृत बांधकामास नोटीस बजाविल्यानंतर संबंधित अनधिकृत बांधकामधारक महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमातील तरतूदीनुसार सदर बांधकाम नियमीतीकरणासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम मधील कलम ५३(३) नुसार मनपाच्या बांधकाम परवानगी विभागाकडे प्रकरण सादर करतो. बांधकाम परवानगी विभाग मा. शहर अभियंता यांच्या अधिपत्याखाली स्वतंत्र कामकाज करते. त्यामुळे सदर विभागाकडे अशा प्रकारे नियमितकरणासाठी प्राप्त झालेल्या प्रकरणांबाबत झालेल्या निर्णयाबाबत स्थापत्य विभागास कल्पना नसल्याने कायदेशिर अडचणी निर्माण होण्याची शक्यात नाकारता येत नाही.

त्यासाठी, बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मूलन यासाठी एकत्रित स्वतंत्र कक्ष निर्माण केल्यास कामकाजात सुसुत्रता राहून निर्माण होऊ शकणा-या कायदेशिर अडचणी टाळल्या जाऊ शकतील.

अनधिकृत बांधकामांना कायदेशीर तरतुदीस अनुसरुन नोटीसा देणे, तदनुषंगिक सर्व कार्यवाही पूर्ण करणे. सदर कामाची व्याप्ती मोठया प्रमाणावर असुन त्यावर रितसर कायदेशीर तरतुदीस अनुसरुन कार्यवाही करण्यासाठी काही वर्षांचा कालावधी लागणार आहे. या कामी कायदेशीर कार्यवाही/कारवाई ही सातत्याने व निरंतर चालू ठेवणेसाठी सदर बाबतची जबाबदारी महापालिकेमध्ये बांधकाम परवानगी विषयक कार्यवाही ज्या विभागाकडून होत आहे त्याच विभागातील संबंधित क्षेत्रासाठी नियुक्त असलेल्या पदनिर्देशित अधिका-यांना यांना देणे योग्य होईल. नियुक्त केलेल्या भागासाठीचे पदनिर्देशित अधिकारी हे बांधकाम परवानगी देणे, सदर भागातील अनधिकृत बांधकामाबाबत आवश्यक ती कायदेशीर रितसर कार्यवाही/ कारवाई करणे ही जबाबदारी त्याच पदनिर्देशित अधिका-याच्या नियंत्रणाखाली ठेवल्यास त्याची प्रभावी अंमलबजावणी होऊ शकेल.

वरील नमूद केले प्रमाणे मा.उच्चन्यायालयाचे आदेश व शासनाचे निर्देशानुसार अनधिकृत बांधकाम / अतिक्रमण नियंत्रण व निर्मूलनासाठी उपाययोजना करणेसाठी **स्वतंत्र, समर्पित, सक्षम यंत्रणा निर्माण** करणेसाठी सोबतच्या **परिशिष्ट क** नुसार **विविध संवर्गातील नव्याने निर्माण करावयाची पद संख्या** अधिकारी/कर्मचारी संख्या निश्चित करण्यात आलेली आहे व त्यासाठी लागणारा संभाव्य आस्थापना विषयक खर्चाचा तपशील **परिशिष्ट इ** प्रमाणे सादर करणेत आलेला आहे.

वरील परिशिष्ट क व त्यासोबतचे प्रपत्र-१ यामध्ये नमूद अधिकारी / कर्मचारी यांची कार्यपध्दती व जबाबदारी विहित करण्यात आली असून त्याचे कृपया अवलोकन व्हावे.

**प्रस्तावित विभाग एकुण दोन कक्षात विभागला जाईल-**

**१) बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम/अतिक्रमणावरील नियंत्रण कक्ष**

**२) विभागाचा आस्थापना कक्ष**

वरील कक्षांची संक्षिप्त कार्यपध्दती व जबाबदारी खालील प्रमाणे-

**बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम/अतिक्रमणावरील नियंत्रण कक्षः-**

सदर कक्षाचे कामकाज मा. शहर अभियंता यांचे नियंत्रणाखाली असेल. प्रत्येकी दोन क्षेत्रीय कार्यालयासाठी एक कार्यकारी अभियंता, प्रत्येकी दोन क्षेत्रीय कार्यालयासाठी १ नायब तहसिलदार, प्रत्येक दोन क्षेत्रीय कार्यालयासाठी ७ उपअभियंता, प्रत्येक वार्डासाठी १ कनिष्ठ अभियंता, प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयासाठी २ सर्व्हेअर, १ आरेखक,१ अनुरेखक, प्रत्येक वार्डासाठी १ बीट निरिक्षक / स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयासाठी १ कॉम्प्यूटर ऑपरेटर, १ लिपिक, १ अतिक्रमण निरिक्षक,१ वायरमन, १ प्लंबर,१ वेल्डर, १ जेसीबी/पोकलॅन ऑपरेटर, २० मजूर, इ. याप्रमाणे विविध संवर्गातील पदे आवश्यक आहेत. सहा क्षेत्रीय कार्यालयांसाठी एकुण पदसंख्या बाबतचे **परिशिष्ठ क** सोबत जोडले आहे. व यासाठी संभाव्य वार्षिक आस्थापना खर्चाचा तक्ता **परिशिष्ठ इ प्रमाणे** सोबत जोडला आहे**.**

प्रचलित पध्दतीनुसार, बांधकाम परवानगी प्रकरणांचे कामकाज सदर कक्षामार्फत करण्यात येईल. तसेच, वार्डात बीट निरिक्षकास आढळून आलेल्या अथवा इतर तक्रारीद्वारे उपलब्ध झालेल्या अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण प्रकरणांबाबत संबंधित बीट निरिक्षक सदर प्रकरणाबाबतचे सर्व कागदपत्रे उपलब्ध करणे, सविस्तर पंचनामा करून सदर प्रकरण संबंधित कनिष्ठ अभियंता (बां.प.) यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी देणे, संबंधित कनिष्ठ अभियंता यांनी सदर प्रकरणाची खातरजामा करून संबंधित अनधिकृत बांधकाम/अतिक्रमणधारकास कायदेशिर नोटीस तयार करणे व संबंधित उपशहर अभियंता (बां.प.) यांच्या स्वाक्षरीने सदर नोटीस संबंधितास बजाविणे,सदरचे अनधिकृत बांधकाम धारकाने कायद्यातील तरतूदीनसार मनपाकडे नियमीतीकरणासाठी प्रकरण सादर केल्यास त्याबाबतची छाननी करून प्रकरणाबाबत निर्णय घेणे, नोटीस मधील विहित मुदत संपल्यानंतर संबंधिताने अनधिकृत बांधकाम स्वतः काढून घेतल्यास अनधिकृत बांधकामधारकाविरूध्द गुन्हा दाखल करणे, पोलीस संरक्षणासाठी पत्रव्यवहार व वारंवार पाठपुरावा करणे, पोलीस संरक्षण उपल्बध झाल्यानंतर प्रत्यक्ष निष्कासनाची कारवाई करणे. केलेल्या कारवाईचा अहवाल वरिष्ठांकडे सादर करणे, या संपूर्ण प्रक्रियेबाबत ठरलेल्या टप्प्यांनुसार अनधिकृत बांधकामाबातच्या संकेतस्थळावर नियमित माहिती अद्यावत करणे, दाखल केलेल्या गुन्ह्याबाबत मा.न्यायालयात सुनावणीसाठी वेळोवेळी उपस्थित राहणे,इत्यादी कामकाज सदर कक्षामार्फत करणे प्रस्तावित आहे.

**विभागाचा आस्थापना कक्ष**

सदर कक्षामध्ये नायब तहसिलदार, लेखापाल, उपलेखापाल, मुख्यलिपिक, लिपिक इ. पदांचा समावेश असेल. सदर कक्षामार्फत संपूर्ण कक्षाचे मासिक वेतन काढणे, वाहन इंधन व दुरूस्ती व इतर आस्थापना विषयक कामकाज करणे प्रस्तावित आहे.

सदर समर्पित कक्षासाठी नवनिर्मित पदावर नियुक्त कर्मचा-यांना किमान ५ वर्षे या कक्षाकडेच काम करणे बंधनकारक ठेवणे उचीत राहिल.

वर नमूद केलेप्रमाणे महाराष्ट्र शासनाकडील २ मार्च २००९ च्या शासन निर्णय व मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या दि. ०५/०५/२०१४ रोजीच्या निर्देशांचे तपशीलवार विवेचन व अवलोकन करता अनधिकृत बांधकामे/अतिक्रमण निर्मुलनासाठी नव्याने समर्पित यंत्रणा निर्माण करणेसाठी **त्याबाबतचा प्रस्ताव मनपाने तयार करून त्यास सक्षम समितीतची मान्यता घेणेची कार्यवाही पूर्ण करून त्यांचेकडील प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी शासनास आदेशाच्या दिनांकापासून दोन महिन्यात सादर करणे बंधनकारक आहे.** व त्याबाबतचा पूर्तता अहवाल प्रतिज्ञापत्र स्वरूपात मा. उच्च न्यायालयास दि. ४ जुलै २०१४ रोजी सादर करावयाचा आहे. **मा.उच्च न्यायालयाने निर्देश दिल्यानुसार विहीत मुदतीत म्हणजेच ३० जून २०१४ पर्यंत सदर बाबतचा प्रस्ताव राज्य शासनाकडे मान्यतेसाठी सादर न केल्यास मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.**

**त्यासाठी सदरचा विषय मान्यतेसाठी नजीकच्या होणा-या मा. महापालिका सभे पुढे ठेऊन मान्यता घेणे आवश्यक आहे.**

त्यानुसार, **मा. स्थायी समितीने ठराव क्र. ७०१४, दि. १२/०६/२०१४** अन्वये **समर्पित, सक्षम यंत्रणेसाठी नव्याने पदे निर्माण करणे** व त्याअनुषंगाने येणा-या वार्षीक संभाव्य खर्चास (सोबतच्या परिशिष्ट क व इ मध्ये नमूद केले प्रमाणे) मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस केलेली आलेली आहे.

तथापि, सदरचा विषय दि.०४/०७/२०१४ रोजी झालेल्या मा.महापालिका सभेने ठराव क्रमांक ४८७ अन्वये दप्तरी दाखल केला आहे. त्यास अनुसरून मा.उच्च न्यायालयाने दि. ३०/०७/२०१४ रोजीच्या आदेशान्वये सदर विषय माहे ऑगस्ट २०१४ मध्ये होणा-या मा.महापालिका सभेच्या कार्यक्रमपत्रीकेवर ठेवण्यास आदेशित केले आहे. त्याअनुषंगाने सदरचा विषय मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक ३०/०७/२०१४ च्या आदेशान्वये माहे ऑगस्ट २०१४ मध्ये होणा-या मा. महापालिका सभेसमोर विचारार्थ ठेवणेत येत असून त्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक ३०/०७/२०१४ रोजीच्या आदेशातील परिच्छेद क्र.९ नुसार मा. उच्च न्यायालयाचे दिनांक ०५/०५/२०१४, दिनांक ०८/०७/२०१४ व दिनांक ३०/०७/२०१४ रोजीचे आदेशांचे देखील अवलोकन करणेत आले आहे.

( मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.दवनि/६/कावि/७०/२०१४ दिनांक ४/८/२०१४
व मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ५५६ दि.१९/८/२०१४ चे लगत )

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११०१८

**परिशिष्ट क**

बांधकाम परवानगी व अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मुलनासाठी कक्ष
मनपा आस्थापनेवर नव्याने निर्माण करावयाचा सेवक वर्ग

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी अधिक मान्य भत्ते | आवश्यक पद संख्या | सद्या अस्तित्वातील पदे | नव्याने निर्माण करावयाचे पदे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | शहर अभियंता | १५६००-३९१०० ग्रेड पे ७६०० | १ | १ | ० | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | कार्यकारी अभियंता | १५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० | ३ | १ | २ | |
| ३ | उपअभियंता | १५६००-३९१०० ग्रेड पे ५४०० | २२ | ३ | १९ | |
| ४ | कनिष्ठ अभियंता | ९३००-३४८०० ग्रेड पे ४६०० | ७२ | १० | ६२ | |
| ५ | बीट निरीक्षक/ स्थापत्य अभियांत्रिकी सहा. | ५२००-२०२०० ग्रेड पे २८०० | ७२ | ० | ७२ | |
| ६ | सर्व्हेअर | ५२००-२०२०० ग्रेड पे २८०० | १२ | १२ | ० | |
| ७ | आरेखक | ५२००-२०२०० ग्रेड पे ४२०० | ६ | ६ | ० | |
| ८ | अनुरेखक | ५२००-२०२०० ग्रेड पे २४०० | ६ | ६ | ० | |
| ९ | कॉम्पूटर ऑपरेटर | ५२००-२०२०० ग्रेड पे ४३०० | ६ | ६ | ० | |
| १० | नायब तहसिलदार | ९३००-३४८०० ग्रेड पे ४४०० | ३ | ३ | ० | |
| ११ | लिपिक | ५२००-२०२०० ग्रेड पे २४०० | २७ | २७ | ० | |
| १२ | उपलेखापाल | ९३००-३४८०० ग्रेड पे ४३०० | ३ | ३ | ० | |
| १३ | अतिक्रमण निरीक्षक | ५२००-२०२०० ग्रेड पे २४०० | ६ | ६ | ० | |
| १४ | मजूर | ५२००-२०२०० ग्रेड पे १९०० | १२० | १२० | ० | |
| १५ | लघुलेखक | ९३००-३४८०० ग्रेड पे ४३०० | ३ | ३ | ० | |
| १६ | शिपाई | ५२००-२०२०० ग्रेड पे १९०० | १४ | १४ | ० | |
| १७ | वाहन चालक | ५२००-२०२०० ग्रेड पे २४०० | ७ | ७ | ० | |
| १८ | जेसीबी/पोकलेन ऑपरेटर | ५२००-२०२०० ग्रेड पे २४०० | ६ | ६ | ० | |
| १९ | वायरमन | ५२००-२०२०० ग्रेड पे २४०० | ६ | ६ | ० | |
| २० | प्लबंर | ५२००-२०२०० ग्रेड पे २४०० | ६ | ६ | ० | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २१ | वेल्डर | ५२००-२०२००<br>ग्रेड पे २४०० | ६ | ६ | ० | |
| | **एकुण** | | **४०७** | **२५२** | **१५५** | |

सही/-
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे १८.

मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.दवनि/६/कावि/७०/२०१४ दिनांक ४/८/२०१४
व मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ५५६ दि.१९/८/२०१४ चे लगत)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११०१८

**परिशिष्ट क**

बांधकाम परवानगी व अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मुलनासाठी कक्ष
मनपा आस्थापनेवर नव्याने निर्माण करावयाचा सेवक वर्ग

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी अधिक मान्य भत्ते | आवश्यक पद संख्या | सद्या अस्तित्वातील पदे | नव्याने निर्माण करावयाचे पदे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता | १५६००-३९१००<br>ग्रेड पे ६६०० | ३ | १ | २ | |
| २ | उपअभियंता | १५६००-३९१००<br>ग्रेड पे ५४०० | २२ | ३ | १९ | |
| ३ | कनिष्ठ अभियंता | ९३००-३४८००<br>ग्रेड पे ४६०० | ७२ | १० | ६२ | |
| ४ | बीट निरीक्षक/ स्थापत्य अभियांत्रिकी सहा. | ५२००-२०२००<br>ग्रेड पे २८०० | ७२ | ० | ७२ | |
| | **एकुण** | | **१६९** | **१४** | **१५५** | |

सही/-
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे १८.

(मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.दवनि/६/कावि/७०/२०१४ दिनांक ४/८/२०१४ व मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ५५६ दि.१९/८/२०१४ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११०१८

**परिशिष्ट इ**

बांधकाम परवानगी व अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मुलनासाठी कक्ष

मनपा आस्थापनेवर नव्याने निर्माण करावयाचा सेवकांचा संभाव्य वार्षिक आस्थापना खर्च

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी अधिक मान्य भत्ते | नव्याने निर्माण करावयाचे पदे | संभाव्य वार्षिक खर्च / आर्थिक भार रक्कम रुपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता | १५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० | २ | १४५८८६० | |
| २ | उपअभियंता | १५६००-३९१०० ग्रेड पे ५४०० | १९ | ११८९०५८० | |
| ३ | कनिष्ठ अभियंता | ९३००-३४८०० ग्रेड पे ४६०० | ६२ | ३१३११४८८ | |
| ४ | बीट निरीक्षक/ स्थापत्य अभियांत्रिकी सहा. | ५२००-२०२०० ग्रेड पे २८०० | ७२ | २३८९७९५२ | |
| | **एकुण** | | **१५५** | **६८५५८८८०** | |

सही/-
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे १८.

( मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ५५६ दि.१९/८/२०१४ चे लगत )

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११०१८

प्रपत्र - १

बांधकाम परवानगी व अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मुलनासाठी कक्ष अधिकारी / कर्मचारी यांची कार्यपद्धती व जबाबदारी

**<u>बीट निरिक्षक / स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक :-</u>**

१. संबंधित उपअभियंता यांचे नियंत्रणाखाली कामकाज करावयाचे आहे.
२. कोणत्याही बीट मध्ये अनधिकृत बांधकाम, अतिक्रमण, अनधिकृत फेरीवाले इ. नागरी गुन्हे घडू नयेत यादृष्टीने संबंधित बीट निरिक्षक यांनी नेमून दिलेल्या बीट मध्ये गस्त घालणेचे कामकाज करावे.
३. बीट निरिक्षकाने बीट मध्ये चालू असलेल्या बांधकामाचे मनपाकडील बांधकाम परवानगीचे कागदपत्र इ. ची तपासणी करून आवश्यक परवानगी घेतली नसेल अशा प्रकरणांचा तपशील / अहवाल संबंधित उपअभियंता यांचेकडे लेखी स्वरूपात निदर्शनास आणून देण्यात यावा.
४. अशा प्रकारचे अनधिकृत बांधकाम करणा-या मालकाचे संपूर्ण नाव व पत्ता, अनधिकृत बांधकामाचा सविस्तर पत्ता / ठिकाण, अनधिकृत बांधकामाचे वर्णन, सदर बांधकामधारकाचे कागदपत्रे (मालकी हक्काचे कागद पत्रे,इ.) इ. माहितीसह अहवाल सविस्तर पंचनामा, फोटो सह बीट निरिक्षकाने उपअभियंता यांचेकडे सादर करावा.
५. त्याच प्रमाणे बीट मधील अनधिकृत होर्डिंग्ज व फेरीवाले याबाबतचा तपशील / अहवाल संबंधित उपअभियंता यांचेकडे लेखी स्वरूपात निदर्शनास आणून देण्यात यावा.
६. प्रभाग स्तरावर बीटनिहाय नोंदवही ठेवणेत यावी आणि बीट निरिक्षक यांनी या नोंद वहीमध्ये त्यांचे बीट मधील अनधिकृत बांधकाम, अतिक्रमण, अनधिकृत फेरीवाले इ. नागरी गुन्ह्यांशी संबंधित घटनांच्या दैनंदिन नोंदी ठेवणेत याव्यात.
७. बीट निरिक्षकाने नेमून दिलेल्या कार्यक्षेत्रामध्ये कामकाज करणे बंधनकारक राहील.
८. वरीलप्रमाणे कार्यवाही न केल्यास संबंधित बीट निरिक्षकास जबाबदार धरणेत येईल.
९. बीटमधील अतिक्रमण/अनधिकृत बांधकामांची एकही घटना निदर्शनास न आल्यास, त्याचीही सुस्पष्ट नोंद बीट नोंदवहीमध्ये करण्याची जबाबदारी बीट निरिक्षकाची राहील.
१०. संबंधित कनिष्ठ अभियंता यांचेकडून अनधिकृत बांधकामधारकास बजाविण्याची नोटीस प्राप्त झाल्यानंतर सदर नोटीस संबंधितांस बजाविणे.

**<u>उपअभियंता :-</u>**

१. नेमून दिलेल्या कार्यक्षेत्रातील प्राप्त होणा-या बांधकाम परवानगी प्रकरणांबाबत नियमानुसार कार्यवाही करणे.
२. उपरोक्त प्रमाणे बीट नोंद वहीमध्ये संबंधित बीट मधील नोंदविलेल्या अनधिकृत बांधकाम, अतिक्रमण, अनधिकृत फेरीवाले, अनधिकृत होर्डिंग्ज, इ. नागरी गुन्ह्यांशी संबंधित घटनांच्या नोंदीं पैकी अनधिकृत बांधकामांच्या व्यतिरिक्त इतर प्रकरणांबाबत उपअभियंता यांनी क्षेत्रीय कार्यालय स्तरावर उपलब्ध अतिक्रमण विरोधी पथकामार्फत कारवाई करावयाची आहे.
३. बीट निरिक्षकांनी बीट रजिस्टरमध्ये नोंदवलेल्या प्रकरणांची /घटनांची व सदर

प्रकरणांबाबत सादर केलेल्या कागदपत्रांची शहानिशा करणेकामी उपअभियंता यांनी संबंधित प्रभागाचे कनिष्ठ अभियंता यांचेकडे देण्यात यावी. संबंधित कनिष्ठ अभियंता यांनी सदर प्रकरणांबाबत त्यांचा अहवाल अविलंब सादर करणेकामी उपअभियंता यांनी सूचना / आदेश पारीत करावेत.

४. संबंधित कनिष्ठ अभियंता यांनी प्राप्त प्रकरणांबाबत शहानिशा केल्यानंतर वस्तुनिष्ठ अहवाल २४ तासांत उपअभियंता यांचेकडे सादर करावा.
५. अनधिकृत बांधकामांच्या प्रकरणांबाबत उपअभियंता यांनी वरील प्रमाणे प्राप्त झालेल्या अहवालावर शहानिशा करून, अनधिकृत बांधकामांबाबतची खात्री झाल्यानंतर सदरचे प्रकरणांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी नुसार पुढील आवश्यक ती कायदेशिर कार्यवाही करावी.
६. आवश्यकते नुसार अनधिकृत बांधकामधारका विरुद्ध संबंधित कनिष्ठ अभियंता यांच्या सहकार्याने गुन्हा दाखल करणे.
७. आवश्यकते नुसार गुन्हा दाखल केलेल्या प्रकरणांबाबत पोलिस स्टेशन व न्यायालय येथे संबंधित कनिष्ठ अभियंता यांच्यासह हजर राहणे.
८. अनधिकृत बांधकाम, अतिक्रमण, अनधिकृत फेरीवाले व अनधिकृत होर्डिंग्ज इ. या सर्व प्रकरणांबाबत संबंधित कनिष्ठ अभियंता, बीट निरिक्षक व पथक यांच्या मार्फत कायदेशिर कारवाई करणे.
९. उपअभियंता यांनी संबंधित कनिष्ठ अभियंता व बीट निरिक्षक यांचेबरोबर समन्वय व वरील प्रमाणे कामकाजाचा आढावा घेण्यासाठी त्यांच्या अध्यक्षतेखाली साप्ताहिक बैठकीचे नियोजन करावे.
१०. सदर बैठकीचा वृत्तांत शहर अभियंता, क्षेत्रीय कार्यालयाचे संबंधित कार्यकारी अभियंता आयुक्त प्रतिनिधी व मा.आयुक्त कक्षास वेळोवेळी सादर करावा.
११. वरील बाबत केलेल्या कारवाईचा अहवाल वेळोवेळी संबंधित कार्यकारी अभियंता यांच्याकडे सादर करणे

**<u>कनिष्ठ अभियंता :-</u>**

१. नेमून दिलेल्या कार्यक्षेत्रातील प्राप्त होणा-या बांधकाम परवानगी प्रकरणांबाबत नियमानुसार कार्यवाही करणे.
२. कनिष्ठ अभियंता यांना नेमून दिलेल्या कार्यक्षेत्रातील अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण बाबत बीट निरिक्षकाकडून संबंधित उपअभियंता यांच्या मार्फत प्राप्त झालेल्या प्रकरणांबाबत प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून शाहनिशा करणे.
३. सदर प्रकरणातील बांधकाम अनधिकृत असल्याचे आढळून आल्यास सदर अनधिकृत बांधकामधारकास कायद्यातील तरतुदीनुसार नोटीस तयार करून त्यावर संबंधित उपअभियंता व कार्यकारी अभियंता (बां.प.) यांची स्वाक्षरी घेणे.
४. तदनंतर सदर नोटीस संबंधित बीट निरिक्षक यांच्याकडे संबंधितास बजाविण्यास देणे.
५. अनधिकृत बांधकाम, अतिक्रमण, अनधिकृत फेरीवाले व अनधिकृत होर्डिंग्ज इ. या सर्व प्रकरणांबाबत संबंधित उपअभियंता यांच्या समवेत बीट निरिक्षक व पथक यांच्या मार्फत कायदेशिर कारवाई करणे.
६. निष्कासन कारवाईसाठी पोलीस संरक्षणासाठी पोलीस विभागाकडे पत्रव्यवहार करणे.
७. वरील बाबत केलेल्या कारवाईचा अहवाल वेळोवेळी संबंधित उपअभियंता यांच्याकडे सादर करणे

<u>कार्यकारी अभियंता –</u>

१. नेमून दिलेल्या कार्यक्षेत्रातील प्राप्त होणा-या बांधकाम परवानगी प्रकरणांबाबत नियमानुसार कार्यवाही करणे.
२. बीट निरिक्षक यांचेकडून संबंधित उपअभियंता व कनिष्ठ अभियंता यांच्या मार्फत अनधिकृत बांधकामाबाबतच्या प्राप्त झालेल्या प्रकरणांबाबत कार्यकारी अभियंता यांनी तातडीने उचित कार्यवाही त्यांचे अधिपत्याखालील उपअभियंता, कनिष्ठ अभियंता या पदनिर्देशित अधिकारी व पथक यांचेमार्फत करावी. जसे, संबंधित प्रकरणाबाबत विहित नमुन्यात सविस्तर फोटोसह पंचनामा करणे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार संबंधितांना नोटीस बजाविणे, संबंधित व्यक्ती नोटीस कालावधीत आवश्यक कागदपत्रे सादर करू न शकल्यास त्या प्रकरणांवर नियमानुसार पुढील आवश्यक कारवाई (एफ.आय.आर. दाखल करणे,निष्कासन इ.) करावी.
३. कार्यकारी अभियंता तथा पदनिर्देशित अधिकारी यांनी त्यांचे अधिपत्याखालील उप अभियंता व कनिष्ठ अभियंता या पदनिर्देशित अधिकारी यांचेमार्फत अनधिकृत बांधकामांविरूध्द केलेल्या कारवाईचा दैनंदिन अहवाल “अनधिकृत बांधकाम व्यवस्थापन” या अनधिकृत बांधकामाच्या संगणकीय प्रणालीमध्ये (Dashboard) त्यांचे अधिपत्या खालील कॉम्प्युटर ऑपरेटर यांचेकडून अद्यावत करावा.
४. कार्यकारी अभियंता यांनी संबंधित उपअभियंता, कनिष्ठ अभियंता व बीट निरिक्षक यांचेबरोबर समन्वय व वरील प्रमाणे कामकाजाचा आढावा घेण्यासाठी त्यांच्या अध्यक्षतेखाली साप्ताहिक बैठकीचे नियोजन करावे.
५. सदर बैठकीचा वृत्तांत शहर अभियंता, संबंधित आयुक्त प्रतिनिधी व मा.आयुक्त कक्षास वेळोवेळी सादर करावा.
६.

सही/-
**आयुक्त,**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८

**मा.श्रध्दा लांडे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावास मी अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – ५५७ विषय क्रमांक – १०
दिनांक - १९/८/२०१४ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्थासंक/६/कावि/५६४/२०१४ दि.०४/८/२०१४

०१ एप्रिल २०१३ पासुन स्थानिक संस्था कराची (Local Body Tax) अंमलबजावणी सुरु झालेली आहे. सन २०१३-१४ मध्ये स्थानिक संस्था कर पध्दतीत एकूण ८८८.५५ कोटी इतके उत्पन्न मिळाले आहे. यामध्ये एस्कॉर्ट फी चे उत्पन्न र.रु. १५.९६ कोटी इतके उत्पन्न मिळाले आहे.

(Amt. on Cr.)

| YEAR | LBT | STAMP DUTY | ESCORT |
|---|---|---|---|
| **२०१३-१४** | **७५३.७५** | **९२.६७** | **१५.९६** |
| **२०१४-१५ (Up to July)** | **२७६.७४** | **२४.६२** | **४.७६** |

मा.प्रधान सचिव सो, नगर विकास विभाग (नवि-२) यांनी दिनांक १८ जुलै २०१४ रोजी राज्यातील सर्व मा.आयुक्त सो यांचेबरोबर आयोजीत केलेल्या एस्कॉर्ट फी बाबतचे बैठकीत एस्कॉर्ट हा जकातीचा भाग होता, यापूर्वीच जकात जावुन एल.बी.टी. आला आहे. जकातीमध्ये नाक्यावरती गाडया थांबविणे, यामुळे वेळ व इंधन यांचा अपव्यय होत होता ते टाळण्यासाठी **LBT** ची प्रणाली आणली. परंतु, एस्कॉर्ट गोळा करणेसाठी नाक्यावरती गाडी थांबविणेत येते, त्यामुळे जकात जावुन **LBT** येणेचा उद्देश परिपूर्ण होत नसल्याने पारगमन शुल्क (एस्कॉर्ट फी) वसूली १५ ऑगस्ट २०१४ पासून बंद करणेबाबत सूचना दिलेल्या आहेत. तसेच एस्कॉर्ट फी पासून मिळत असलेल्या उत्पन्नाची तूट भरुन काढणेसाठी **LBT** चे दरात सुधारणा करणेबाबत सूचित केले आहे. एस्कॉर्ट फी वसूली बंद केल्यास वार्षिक १६ कोटी तूट मनपास होणार आहे.

मा.प्रधान सचिव सो यांचे सूचनेनुसार सदर उत्पन्नाची तूट भरुन काढणेकामी **LBT** दरात सुधारणा करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९९ (ड) तसेच स्थानिक संस्था कर नियम २०१० मधील नियम २३ मधील तरतूदीनुसार शासन मान्यतेकामी पत्र क्र.स्थासंक/६/कावि/५६३/२०१४ दिनांक ०४/८/२०१४ अन्वये प्रस्ताव सादर केला आहे. तसेच एस्कॉर्ट फी ची वसूली दिनांक १५ ऑगस्ट २०१४ रोजी मध्यरात्री पासून बंद करणेत येत आहे.

तरी सदर विषय मा.महापालिका सभेपुढे माहितीसाठी सादर केला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

**मा.श्रद्धा लांडे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावास मी अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ११

दिनांक - १९/८/२०१४ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पअक/१/कावि/३६२/२०१४ दि.४/०८/२०१४

कच-यावर वेगवेगळया प्रकारच्या प्रक्रिया करणेत येणारा कचरा डेपो तसेच केवळ डंपींग करण्यात येत असलेला कचरा डेपो याचा विचार करुन यापासून रहिवास अथवा अन्य अनुषंगिक वापर करण्यासाठी सुरक्षा अंतर आवश्यक असल्यास ते किती असावे? या व तत्सम अनुषंगिक बाबींवर शासनास निर्णय घेण्यासाठी विद्यमान कचरा डेपोच्या सभोवतालच्या माती, पाणी, हवा यांच्या प्रदुषणाबाबत शास्त्रोक्त अभ्यास करुन आरोग्याच्या दृष्टीने अंतर सुचविणेकामी या क्षेत्रातील NEERI सारख्या शासकीय तज्ञ संस्थेची नेमणूक करुन त्याचा अहवाल शासनाकडे पाठविणेबाबत नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र. टिपीएस-१८९३/१०५०/प्र.क्र.३४१/नवि-१३, दि.१४/०५/२०१३ चे पत्रानुसार निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार NEERI, नागपूर या संस्थेची स्थायी समिती ठराव क्र. ३५०५ दि.०४/०६/२०१३ अन्वये नेमणुकीस मान्यता घेऊन . २४/०९/२०१३ रोजी कामाचे आदेश देण्यात आलेले आहेत.

NEERI, नागपूर यांचेमार्फत कचरा डेपोच्या सभोवतालच्या माती, पाणी, हवा यांच्या प्रदुषणाबाबत आवश्यक चाचण्या व तपासण्या करणेकामी माहे डिसेंबर २०१३ व फेब्रुवारी २०१४ मध्ये प्रत्यक्ष भेट देऊन माती, पाणी, हवा इत्यादींच्या आवश्यक चाचण्या / तपासण्या घेणेत आल्या, त्यानुसार NEERI, नागपूर यांनी बनविलेला अहवाल दि. ३१.०७.२०१४ रोजी मनपास प्राप्त झालेला आहे. सदर अहवालाबाबत पुढील योग्य तो निर्णय घेणेकामी महाराष्ट्र शासनाकडे दिनांक ०१/०८/२०१४ रोजी सादर करणेत आलेला आहे. सदर अहवालाचे अवलोकन करणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.धनंजय आल्हाट** - मा.महापौर साहेब,सन्मा.आयुक्त साहेब, निरी संस्थेचा ५०० मी.चा बफर झोन, नाविकास क्षेत्राची मर्यादा कमी करुन ३०० मी. कायम ठेवणेचा जो काही अहवाल आहे तो सभागृहामध्ये अवलोकनार्थ याठिकाणी आलेला आहे. तत्पुर्वी त्या भागातील नागरीकांच्या

भावनेची पार्श्वभूमी आपल्यासमोर याठिकाणी मांडणे उचित समजतो. मोशी कचरा डेपोचा विषय जर आलातर त्याठिकाणच्या नागरीकांच्या भावना या अत्यंत तीव्र असतात. त्याच कारण संपुर्ण शहराचा कचरा हा केवळ मोशी कचराडेपो मध्ये टाकला जातो. २०१० मध्ये संबंधीत डी.पी. जाहीर झाला त्याबरोबरच पुनावळे याठिकाणी कचरा डेपोचा डी.पी. सुध्दा त्याठिकाणी होता. त्या संदर्भात ज्या काही हरकती सुनावनी होती त्या कचराडेपोच्या संबंधी तो डेपो स्थलांतरीत व्हावा, बफर झोन कमी व्हावा सन २०१० पासून त्याठिकाणच्या नागरीकांनी आंदोलन केलेले आहे. त्या आंदोलनामध्ये बंडातात्या कराडकर असतील, विजय कोळसे पाटील असतील आम्ही सर्वांनी त्याठिकाणी कचरा डेपो स्थलांतरीत व्हावा, बफर झोन कमी व्हावे म्हणून २०१० पासून आंदोलन केले. त्यानंतरचा डी.पी. ज्यावेळेस जाहीर झाला त्यावेळेस त्याठिकाणच्या सर्वात जास्त नागरीकांनी हरकती नोंदविल्या आणि त्याच्या सुनावणीमध्ये सर्व नागरीकांना बोलावलं व त्यांनी आपआपल मत मांडल. आणि नगररचना पुणे या विभागाच्या माध्यमातून अहवाल त्याठिकाणी सादर झाला. त्या अहवालामध्ये सुध्दा त्याठिकाणचा बफर झोन कमी करावा. नागरीकांच्या आरोग्याना अत्यंत त्रासदायक आहे त्याठिकाणचा कचरा डेपो स्थलांतरीत का करु नये अशाप्रकारचा अहवाल पुणे नगररचनाच्या माध्यमातून शासनाला देणेत आला. परंतु हा अहवाल सादर करत असताना त्याठिकाणच्या नागरीकांची मागणी होती की बफर झोन हा शंभर टक्के कमी झाला पाहिजे. त्याठिकाणी मोठया प्रमाणात नागरी वस्ती येते जवळ जवळ १५ हजार लोकसंख्या, आणि जवळ जवळ ३५० कुटूंबे त्याठिकाणी वास्तव्याला राहतात महापालिकेची दहा आरक्षण त्याठिकाणी आहेत. अनेक अधिकृत परवानगी घेतलेल्या मिळकती सुध्दा त्याठिकाणी आहेत. म्हणून आमची त्याठिकाणी मागणी होती की सर्वप्रथमत: तुम्ही निरी संस्थेला या सूचना करायला पाहिजे होत्या. पुनावळे याठिकाणचा जो कचरा डेपो प्रस्तावीत आहे त्याठिकाणी आम्ही निम्मा कचरा प्रोसेससाठी त्याठिकाणी शिफ्ट करणार आहोत. म्हणजे ५० मी. बफरझोनची मर्यादा त्याठिकाणची कमी झाली असती. त्याचप्रमाणे हॉटेल वेस्ट पासून बायोगॅस तयार करणे हा जो प्रोजेक्ट आहे त्याचे सुध्दा टेंडर पब्लिश झालेले आहे. निरी संस्थेला याची कल्पना दिली असती, तसे पत्र त्यांना दिले असतेतर मला वाटतं १०० मी. मर्यादेचा बफरझोन अजून कमी झाला असता. आणि त्याची अंतीम मर्यादा २०० मी. राहीली असती. तरी याबाबतची आपण अहवालाच्या सोबत अजून माहिती पुरवली तर हे अजून बफरझोन कमी होईल. संपुर्ण शहरातील कचरा त्याठिकाणी आणला म्हणून यावर अनेकप्रकारचे आंदोलन झालेले आहेत आणि पुढे या मागणीचा विचार केला गेला नाहीतर भविष्यात सुध्दा अशाप्रकारचे आंदोलन करणार आहोत. पुनावळे याठिकाणी कचराडेपो त्वरीत चालू करावा, शासनाला सुध्दा पैसे दिलेले आहेत व ती जागा आपण घेतलेली आहे. तसेच प्रत्येक प्रभागामध्ये स्वतंत्र कचरा डेपो सुरु करावा. सहा प्रभागामध्ये सहा ठिकाणी कचराडेपो व पुनावळयामध्ये कचराडेपो सुरु केलातर याठिकाणच्या नागरीकांचे आरोग्य अबाधीत होईल. या सूचनांची गांभीर्याने दखल घ्यावी व त्याठिकाणच्या नागरीकांना नागरी सुविधा कशी देता येईल याची आपण अंमलबजावणी करावी एवढीच सूचना याठिकाणी करतो.

**मा.सुलभा उबाळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह. धनंजय आल्हाट यांच्या प्रभागातील हा विषय आहे. याच्यामध्ये मोशी कचरा डेपो भोवती ३०० मी. अंतराची आवश्यकता आहे अशी शिफारस निरी या संस्थेनी केलेली आहे. आणि त्याच्यानंतर कळवलयं की ग्रीन बेल्ट तयार केल्यानंतर ३० ते ४० मी. बफरझोन कमी होईल. पुढे सांगीतले आहे की अजून काही व्यवस्था केल्यानंतर ७० ते १०० मी. कमी होईल असे मिळून २५० ते २७० मी. कमी होईल असे सुचविलेले आहे. बफरझोनचा एवढा बाऊ आणि कचराडेपोचा एवढा ऊहापोह त्या भागामध्ये झाला आणि यापुर्वी बफरझोन त्याचे प्लॅनींग ऑथोरेटी आपल्याकडे असताना, प्लॅन मंजूर झालेला आहे. बफर झोन नंतर झालेला आहे. आणि आता ३०० मी. च्या शिफारशीनंतर असे चित्र उभे राहिलेले आहे. आदर्शनगर, खानदेशनगर हा जो रेसीडेन्शीअल भाग आहे याठिकाणी एक ते दिड गुंठे जमिनी घेवून लोक राहतात तेथील विकास कामाच्या सुविधा आपण बंद केलेल्या आहेत. या ३०० मी. मुळ तो भाग आता यातून वगळला जात नाही. आता ३०० मी. झाल्यामुळे आजूबाजूच्या रीकाम्या जमिनी कोणाच्यातरी मालकीच्या असतील त्या जमिनीना संरक्षण मिळाले आहे. प्रत्येक वेळेस शासनाकडे जावे लागणार. तरी अशाप्रकारचे काही करता येईल का हे बघावे. निरी संस्था मदत करणार आहे. बफर झोन कमी करण्यासाठी काय काय उदिष्ट आहेत, आपल्याला त्याच्यामध्ये किती खर्च होणार आहे. आपण बघतो की बाहेरच्या देशामध्ये कचरा डेपो सगळीकडे आहे जेथे माणस तेथे कचरा आहे. परंतु थ्रू आवूट डीपीचे रस्ते सुध्दा केलेले आहेत. आपण त्या कचरा डेपो पासून जात असताना आपल्याला कळत सुध्दा नाही की आपण त्या कचरा डेपोच्या बाहेर पडलोय म्हणून. किंवा त्याच्यावर सुध्दा विकास काम केली गेलेली आहेत. पण आपण कुठेतरी कमी पडतोय. तेथील लोकांवर अन्यायाची भूमीका आहे असे वाटते. ३०० मी. ची शिफारस असताना आमचा रहिवास भाग आतातरी त्यातून सुटलेला नाही. घाईघाईने आचारसंहिता लागू होण्याच्या अगोदर आपण ही शिफारस केलेली आहे, ती कोणीतरी राजकीय हेतूने प्रेरीत आहे. जर याच्यामध्ये घरे सोडवायची असतीलतर आपल्याकडून काय प्रयत्न केला जाणार आहे. अजून किती दिवस लागणार आहेत याचा सुध्दा खुलासा याठिकाणी होणे गरजेच आहे. पुढची जी प्रक्रिया आहे त्याला किती वेळ लागणार आहे.

**मा.मंदा आल्हाट** - मा.महापौर साहेब, मोशी कचराडेपोमध्ये गेल्या तीन वर्षापासून राबवलेल्या वेगवेगळया प्रकल्पामुळे या भागातील त्रास कमी झालेला नाही. त्याचप्रमाणे निरीच्या अहवालामध्ये या विवीध उपाययोजनेमूळे ५०० मी. चा ३०० मी. बफर झोन कमी करावा असे दिलेले आहे. कचरा डेपोमध्ये राबवलेल्या कंपोष्ट, यापुर्वीच्या कच-याचे शास्त्रोक्त सॅनीटरी इ.प्रकल्प यशस्वीपणे राबवल्याने बफर झोन कमी झालेला आहे त्याबद्दल पर्यावरण विभागाचे कार्यकारी अभीयंता व भोसरी विधानसभेचे आमदार मा.विलासशेठ लांडे यांचे मी सर्वप्रथम अभिनंदन करते. तसेच सूचविलेल्या उपाययोजना राबवल्यास हा प्रकल्प अजून कमी होण्यास मदत होईल त्यासाठी आवश्यक बजेट देवून हा प्रकल्प राबवावा ही नंम्र विनंती आहे. हा विषय मंजूर करावा. धन्यवाद.

**मा.विमल जगताप** – मा.महापौर साहेब, प्रभागाच्या मिटींगमध्ये मी सारखा विषय मांडत असते. ज्यावेळेला आयुक्त साहेब आपण वॉर्डामध्ये आलात त्यादिवशी घाण काढलेली होती, खुप सुंदर केलेले होते तुम्हांला वाटलच नाही की याठिकाणी खूप घाण आहे म्हणून. लोकवस्ती आहे, लोक राहतात, लोक म्हणतात की आयुक्त साहेब आले त्यावेळेला किती स्वच्छता होती. माझ्या वॉर्डातील कचराडेपो काढला पाहिजे.

**मा.महापौर –** आयुक्त साहेब खुलासा करतील.

**मा.आयुक्त** – सन्मा.महापौर मॅडम, सन्मा.सभागृह. एकतर आपल्या महाराष्ट्रात सगळीकडेच अशाप्रकारचे डंपींग ग्राऊंड आहे. प्रत्येक ठिकाणीच बफर झोन आहे असे नाही. आपल्याकडे ५०० मी. चा बफर झोन लागू केलेला होता. त्याबद्दल राज्यशासनाच्या सूचनेप्रमाणे आपण निरी या नागपुरच्या संस्थेकडे गेलो त्यांचा अहवाल प्राप्त करुन घेतला जो आपण शासनाला सुध्दा दिलेला आहे. त्या अहवालामध्ये त्यांनी काय रिक्मंडेशन दिलेले आहे त्याची माहिती सन्मा. सभागृहाला व्हावी म्हणून हा विषय आज आपण याठिकाणी ठेवलेला आहे. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, शासनस्तरावर देखील प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांचेशी माझे बोलणे झालेले आहे आणि त्यांनी हा अहवाल प्राप्त झाल्याबरोबर तात्काळ यावरती शासन निर्णय घेईल असे सांगीतलेले आहे. या अहवालावरुन असं दिसतयं की, ५०० मी. चे ३०० मी. करण्यास शासनाला किंवा महापालिकेला वेगळ काही कष्ट घेण्याची गरज नाही. उर्वरीत ३०० मी. कमी कुठपर्यंत होईल, आणखी २०० मी. कमी करता येईल यासाठी तीन ते चार गोष्टी करायला सांगीतलेल्या आहेत. आज मी एवढंच सदस्यांना सांगू इच्छितो की, ३० मी. हद्दीमध्ये झालेले आहे. बाकीच्या गोष्टी त्याचा खर्च काढण्यात येईल त्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात येईल त्यासाठी प्रशासकीय मान्यता घेण्यासाठी आपल्याकडे येवू जेणेकरुन उर्वरीत काम पुर्ण करु. हे माहितीस्तव आलेले आहे मान्यतेसाठी आपल्याकडे येणार आहे.

**मा.मंदा आल्हाट** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते - १. डेपो भोवती सुमारे ३० मीटर रुंदीचा ग्रीन बेल्ट (वृक्षारोपन) तयार केलेस अंदाजे सुमारे ३० ते ४० मीटर बफर झोन कमी होईल. २. कचराडेपोचे योग्य व्यवस्थापन, स्वच्छता, चालन, देखभाल रोजच्या कच-यावर माती पसरणे, मेकॅनिकल कंपोस्ट प्लॅन्टची क्षमता ८०० टन प्रतिदीन इतकी वाढवणे, दैनंदीन कच-यावर कायमस्वरुपी दूर्गंधीनाशक फवारणे इत्यादी उपाययोजना केल्यास अजून ७० ते १०० मिटर अंतर कमी होऊ शकेल. ३. अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित लिचेट ट्रिटमेंट प्लॅन्ट उभारल्यास व त्यामध्ये रासायनिक स्क्रबर इत्यादी केल्यास अजून ४० ते ७० मिटर अंतर कमी होईल. ४. ओल्या कच-याचे अलगीकरण यामध्ये हॉटेल वेस्ट इत्यादीवर बायोगॅस प्रकल्प त्याच भागात/वॉर्डात प्रक्रिया करणेच्या उपाययोजना राबवल्यास अजून ५० मिटर बफर झोन कमी होईल.

वरील सर्व बाबीसाठी येणा-या खर्चास मान्यता देणेस तसेच त्यानुसार सदरचा बफरझोन ५० मिटरपर्यंत कमी करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.धनंजय आल्हाट** - मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक- ५५८ विषय क्रमांक – ११
दिनांक - १९/८/२०१४ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पअक/१/कावि/३६२/२०१४ दि.४/०८/२०१४

कच-यावर वेगवेगळया प्रकारच्या प्रक्रिया करणेत येणारा कचरा डेपो तसेच केवळ डंपींग करण्यात येत असलेला कचरा डेपो याचा विचार करुन यापासून रहिवास अथवा अन्य अनुषंगिक वापर करण्यासाठी सुरक्षा अंतर आवश्यक असल्यास ते किती असावे? या व तत्सम अनुषंगिक बाबींवर शासनास निर्णय घेण्यासाठी विद्यमान कचरा डेपोच्या सभोवतालच्या माती, पाणी, हवा यांच्या प्रदुषणाबाबत शास्त्रोक्त अभ्यास करुन आरोग्याच्या दृष्टीने अंतर सुचविणेकामी या क्षेत्रातील NEERI सारख्या शासकीय तज्ञ संस्थेची नेमणूक करुन त्याचा अहवाल शासनाकडे पाठविणेबाबत नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र. टिपीएस-१८९३/१०५०/प्र.क्र.३४१/नवि-१३, दि.१४/०५/२०१३ चे पत्रानुसार निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार NEERI, नागपूर या संस्थेची स्थायी समिती ठराव क्र. ३५०५ दि.०४/०६/२०१३ अन्वये नेमणुकीस मान्यता घेऊन दि.२४/०९/२०१३ रोजी कामाचे आदेश देण्यात आलेले आहेत.

NEERI, नागपूर यांचेमार्फत कचरा डेपोच्या सभोवतालच्या माती, पाणी, हवा यांच्या प्रदुषणाबाबत आवश्यक चाचण्या व तपासण्या करणेकामी माहे डिसेंबर २०१३ व फेब्रुवारी २०१४ मध्ये प्रत्यक्ष भेट देऊन माती, पाणी, हवा इत्यादींच्या आवश्यक चाचण्या / तपासण्या घेणेत आल्या, त्यानुसार NEERI, नागपूर यांनी बनविलेला अहवाल दि. ३१.०७.२०१४ रोजी मनपास प्राप्त झालेला आहे. सदर अहवालाबाबत पुढील योग्य तो निर्णय घेणेकामी महाराष्ट्र शासनाकडे दिनांक ०१/०८/२०१४ रोजी सादर करणेत आलेला आहे. सदरच्या अहवालाचे अवलोकन करणेत येत आहे तसेच १. डेपो भोवती सुमारे ३० मीटर रुंदीचा ग्रीन बेल्ट (वृक्षारोपन) तयार केलेस अंदाजे सुमारे ३० ते ४० मीटर बफर झोन कमी होईल. २. कचराडेपोचे योग्य व्यवस्थापन, स्वच्छता, चालन, देखभाल रोजच्या कच-यावर माती पसरणे, मेकॅनिकल कंपोस्ट प्लॅन्टची क्षमता ८०० टन प्रतिदीन इतकी वाढवणे, दैनंदीन कच-यावर कायमस्वरुपी दूर्गंधीनाशक फवारणे इत्यादी उपाययोजना केल्यास अजून ७० ते १०० मिटर अंतर कमी होऊ शकेल. ३. अत्याधुनिकतंत्रज्ञानावर आधारित लिचेट ट्रिटमेंट प्लॅन्ट उभारल्यास व त्यामध्ये रासायनिक स्क्रबर इत्यादी केल्यास अजून ४० ते ७० मिटर अंतर कमी होईल. ४. ओल्या कच-याचे अलगीकरण यामध्ये हॉटेल वेस्ट इत्यादीवर बायोगॅस प्रकल्प त्याच भागात / वॉर्डात प्रक्रिया करणेच्या उपाययोजना राबवल्यास अजून ५० मिटर बफर झोन कमी होईल.

वरील सर्व बाबीसाठी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे तसेच त्यानुसार सदरचा बफरझोन ५० मिटरपर्यंत कमी करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ५५९ विषय क्रमांक – १२

दिनांक - १९/८/२०१४ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/८/कावि/१२८/२०१४
दि. ०७/०८/२०१४

सहसंचालक (म.न.पा.ले.प.) स्थानिक निधी लेखापरिक्षा, रायगड भवन, ७ वा मजला, सेक्टर-११, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई- ४०० ६१४. यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सन २०११-२०१२ चे लेखापरिक्षण केलेले असून अहवाल सादर केलेला आहे. त्यानुसार प्रथम अनुपालन अहवाल संबंधित विभागाकडून प्राप्त करुन घेण्यात आलेला आहे.

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० चे नियम १० (१) अन्वये मा.सहसंचालक (म.न.पा.ले.प.) स्थानिक निधी लेखापरिक्षा यांचेकडे सदर प्रथम अनुपालन अहवाल सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.श्रध्दा लांडे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.शमीम पठाण** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, याची माहिती दयावी. आपल्याकडून कोणकोणते उपाय योजीलेले आहेत. आपल्याकडून जे राहून गेलेले विषय आहेत, निधी मागण्याचे, किंवा आपल्याकडून निधी मिळवण्याचे. कोणकोणत्या बाबतचे अनुदान आपण शासनाकडून घेवू शकतो? त्याची काही सुची तयार केलेली आहे का? कारण अनेक अनुदान अशी आहेत की ती घ्यायची राहून गेलेली आहेत. हा विषय अनुपालनासाठी आलेला आहे. याची माहिती दयावी.

**मा.महापौर** - मुख्यलेखापाल खुलासा करतील.

**मा.भोसले (मुख्यलेखापाल**) – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह हा विषय महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाच्या सहसंचालक (म.न.पा.ले.प.) यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सन २०११-१२ चे लेखापरिक्षण केलेले होते आणि या लेखापरीक्षणानुसार त्यांचा अहवाल आपल्याला प्राप्त झालेला आहे आणि त्या अहवालावर आपण आपले म्हणणे मांडलेले आहे. ते आपल्या मान्यतेने त्यांच्याकडे पाठवायचे आहे. हा विषय ऑडीटच्या संदर्भातील आहे.

**मा.महापौर** - आयुक्त साहेब खुलासा करतील.

**मा.आयुक्त** – मा.महापौर मॅडम, सन्मा.सभागृह. हा ऑडीट प्यारा काढलेला आहे. शासनाकडून किती निधी मिळतो असे विचारलेले आहे. त्यामध्ये आपल्याला तीन महत्वाचे सोर्सेस आहे त्यात रस्ते निधी, दलितवस्तीचा निधी मिळतो हा थोडयाथोडया प्रमाणात निधी मिळत असतो. तीन निधी मागच्या वर्षापर्यंत प्राप्त झालेले आहेत. त्याचा तपशील देता येईल परंतु हा ऑडीटचा मुद्दा आहे. ऑडीट प्यारा काढलेला आहे त्याचा कम्प्लायन्स आपण करणार आहोत.

**मा.दत्तात्रय साने –** मा.महापौर साहेब, यापुर्वी दहा-पंधरा दिवसा पुर्वीच्या वर्तमानपत्रामध्ये आले होते की मारुती भापकर, माजी नगरसेवक यांनी ऑडीट मधील अनेक त्रुटी, ७०० ते ८०० कोटी अहवालामध्ये दिसत नाही असा जो विषय त्या ऑडीटमध्ये आहे. त्या त्रुटी काय आहेत या कळू दयाव्यात. त्याला कोण दोषी आहे, कोणाकडून पैसे घेणे देणे हा विषय आहे.

**मा.आयुक्त** - मा.महापौर मॅडम, सन्मा.सभागृह. सन्मा.सदस्य काकांनी विचारलेला विषय आहे तो या ऑडीटपेक्षा वेगळा आहे. हे स्थानिक निधी लेखापरीक्षण आहे. आपल्याकडे तीन-चार प्रकारचे ऑडीट होतात. त्यामध्ये आपल्याकडे ए.जी.चे ऑडीट होते. फडांचे ऑडीट होते. आपण जो प्रश्न उपस्थित केला तो इन्टरनल ऑडीटचा आहे. आपल्याकडे मुख्यलेखापरीक्षक असतात त्यांच्याकडे पथक असते ते आपल्या सर्व फाईली बघून काही प्यारा काढतात. मारुती भापकर यांनी विचारलेली माहिती आपण देणारच आहोत. ज्यावेळेला महापालिका झाली त्यावेळेला १९८५ पासून आजपर्यंतचे दरवर्षीचे त्यांनी ऑडीट प्यारा काढलेला आहे. मागच्या २५ वर्षाच्या ऑडीटमध्ये एकूण १००० प्यारा असतील त्यापैकी ५० टक्के प्यारा आपण निकाली काढलेले आहेत उरलेले ५० टक्केचा जो हिशोब त्यांनी दिलेला आहे त्यामध्ये दोन प्रकार येतात एक प्रशासकीय आणि दुसरा वसुलीचा प्यारा असतो. प्रशासकीय प्यारा असेलतर प्रशासकीय दृष्टया आहे त्याबाबतची २५ वर्षाच्या ४०० ते ५०० च्या प्या-याची बेरीज त्यांनी केलेली आहे. याप्रसंगी एवढेच सांगेल की हे इन्टरनल काम आहे. ५० टक्के प्यारे सोपे सोपे होते ते त्यांनी पुर्ण केले आहेत आता आपण त्यांना टार्गेट दिलेले आहे. त्यांची दर आठवडयाला बैठक घ्यायची आहे. सर्व एचओडीना याचे परिपत्रक काढतो आहोत, प्रत्येक एचओडीकडे लेखापाल किंवा उपलेखापाल आहे त्यांच्यावर ही जबाबदारी देतो आहोत. समजा त्यांच्याकडे ५०० प्यारे असतीलतर प्रत्येकाकडे ५० ते ६० येतील ते त्यांनी युध्दपातळीवरती निकाली काढावे अशी अपेक्षा आहे. परंतु हे फार वर्षापुर्वीचा बॅकलॉग आहे तो मागच्या एक वर्षाचा, दोन वर्षाचा, तीन वर्षाचा आहे असंही नाही. आणि सायमेनटेन्शली त्यांनी मागच्या तीन वर्षाचे ऑडीट पण पुर्ण करावे असे सांगीतलेले आहे.

**मा.दत्तात्रय साने** – मा.महापौर साहेब, ७०० ते ८०० कोटीचे आहे. २५ वर्षाचे सांगता. ऑडीट त्रुटी राहतात, आपण नक्की कुठल्या दिशेने चाललो आहोत. ज्या त्रुटी आहेत त्या ७०० ते ८०० कोटीच्या आहेत. माझी विनंती आहे की ज्या काही ऑडीटमध्ये त्रुटी आलेल्या आहेत, जे काही आरोप झालेले आहेत, ते सिध्द करण्याचा प्रयत्न केलेला आहे. ७०० ते ८०० कोटीचा फ्रॉड आहे असं त्यांच म्हणण आहे. विधानसभेच्या इलेक्शनमध्ये तुम्हांला दोन-तीन महीने वेळ आहे तरी पुढच्या जी.बी.मध्ये हा विषय सभागृहापुढे यावा. चुकीचे असेलतर तसंही आपण सांगाव अशी माझी विनंती आहे. आणि दुसरी माझी विनंती आहे की हा विषय थोडासा वेगळा

आहे आपण सहा वेगवेगळे प्रभाग केलेले आहे त्याठिकाणी अधिकारी कमी आहेत, शिपाई कमी आहेत, यंत्रणा कमी आहे. परवा प्रभागामध्ये विषय झालेला आहे त्याला अनुसरुन सांगतो की आपल्याकडे रिक्त पद आहेत, डॉक्टरांचे सुध्दा रिक्त पद आहेत. नऊ नंबरचा पदनिर्मितीचा विषय आहे. डॉक्टरांचा विषय आहे त्याला अनुसरुन पदनिर्मितीचा विषय घेता आलातर, स्थापत्य विभाग, पाणीपुरवठा विभाग, आरोग्य विभाग, विदयूत विभाग, आमच्या प्रभागामधील यादी तसेच ग्रामीण भागाचे दोन भाग केलेले आहेत, अ, ब त्यामध्ये अधिका-यापासून शिपाया पर्यंत कर्मचारी कमी आहेत, जे अधिकारी पाहिजेत ते प्रभागामध्ये मिळत नाहीत. तसे होत नसेलतर अ- अ-च राहू दयावा. आम्हांला जो माणूस पाहिजे तो अव्हेलेबल होत नाही. आरोग्यासाठी एक माणूस दिलेला आहे. २० हजार लोकसंख्या आहे, स्प्रेकुली एकच दिलेला आहे तोही आठवडयातून एक वेळा येणार. मला सांगायचे होते की या विषयाला अनुसरुन काही पद घेता आलेतर घ्यावे.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा विषय लेखापरीक्षण अहवाल सादर करावयाचा आहे. तो सादर करण्यासाठी सहा महिन्याचे टाईम लिमीट दिलेले होते ते संपत आलेले आहे. आम्हांला सांगीतलेतर आम्ही सगळया गोष्टी करायला तयार आहोत. यात त्रुटी राहता कामा नये. हा विषय वेगळा आहे. दत्ता साने जे बोलले तो ऑडीटचा विषय वेगळा आहे, लेखापरीक्षणाचा विषय वेगळा आहे. आम्ही परवा माहिती घेतली त्यावेळेला सांगीतले २०११-१२ चे लेखापरीक्षण कळवायचे आहे. त्यांनी सांगीतल्यानंतर परत तुम्हांला काही दुरुस्ती सुचवायची असेलतर अधिकारी लोकांची कमिटी असली पाहिजे. या कमिटीने व्यवस्थीतरीत्या त्याचा फॉलोअप पुढे केला पाहिजे. आज भोसले साहेब येथे आहेत काही दिवसानी ते निघून जातील परत आम्ही भोसले साहेबांना कुठं बोलवायचे. लेखापरीक्षण जे आहे ते व्यवस्थीत झाल पाहिजे. स्टॅण्डींगलाच खरंतर ऑडीट कमिटी असली पाहिजे. स्टॅण्डींगला ऑडीट कमिटी असलीतर हा ७०० ते ८०० कोटीचा कुठेही गोंधळ होणार नाही. ऑडीटच्याच विषयावर तेथे तुम्ही ऑडीट कमिटी नेमा. मग तुम्ही बघा इतका चोख कारभार होईल पारदर्शक कामकाज चालेल पण मानसीकता असली पाहिजे. माझीतर आहे, सभागृहाची पण असू शकते. परंतु अधिकारी लोकांची असली पाहिजे स्टॅण्डींगला ऑडीट कमिटी असली पाहिजे. त्यादृष्टीकोनातून या विषयाला मंजूरी देतोत, व्यवस्थीत कामकाज व्हावे. व्यवस्थीत असे लेखापरीक्षणाचे काम असावे एवढीच विनंती आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ५६० विषय क्रमांक – १३
दिनांक - १९/८/२०१४ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र लेखा/३५/५६३/२०१४
दि.०७/०८/२०१४

चौथा महाराष्ट्र वित्त आयोगाचे अध्यक्ष मा.श्री.जे.पी.डांगे (आय.ए.एस) यांनी त्यांचे शिष्ट मंडळासह पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दिनांक १०/०६/२०१२ रोजी भेट देवून चौथा महाराष्ट्र वित्त आयोगासंबंधी विविध विषयावर चर्चा केल्यानुसार १ ते १० मुद्दयाची माहिती तयार करुन मा.सह सचिव चौथा महाराष्ट्र वित्त आयोग यांना पत्र क्र.लेखा/३५/कावि/२९८/२०१२ दि. ११/०७/२०१२ अन्वये पाठविणेत आली होती. मा.सह सचिव चौथा महाराष्ट्र वित्त आयोग यांचेकडील दिनांक १५/१२/२०१२ च्या अर्धशासकीय पत्रानुसार सदर विषयसुचीस मा.महापालिका सभेची मान्यता घेणेकामी कळविले असुन त्यानुसार सदर विषयसुचीस मा.महापालिका सभा ठराव क्र.२८२, दिनांक ०९/०५/२०१३ अन्वये मान्यता घेण्यात येवून माहीती यापूर्वी पाठविणेत आली आहे.

मा.श्री.जे.पी.डांगे (आय.ए.एस) अध्यक्ष चौथा महाराष्ट्र वित्त आयोग यांनी दिनांक १६/०७/२०१४ रोजी विभागीय आयुक्त पुणे विभाग येथे आयोजित बैठकीमध्ये दिलेल्या सुचनेप्रमाणे १ ते १० मुद्दयाची सुधारीत माहितीस पुन्हा मा.महापालिका सभेची मंजूरी घेवून त्यासह माहिती वित्त आयोगाकडे पाठविण्यात यावी अशा सुचना दिल्या असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.श्रध्दा लांडे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावास मी अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता —
अनुकूल-८१ प्रतिकूल- ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुमन नेटके** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ५६१ विषय क्रमांक – १४
दिनांक - १९/८/२०१४ विभाग – मा.नगरसचिव

**<u>मा.क्रिडा समिती</u>**

अ) दिनांक २/४/२०१४, १६/४/२०१४ व ७/५/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक २/८/२०१४ (विशेष सभा) चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.अनुराधा गोफणे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावास मी अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – १५

दिनांक - १९/८/२०१४ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.आयुक्त यांचे जा.क्र.वैद्य/२/कावि/९०२/२०१४ दि.१९/०८/२०१४

**विषयाचा संक्षिप्त आशय**

वाय.सी.एम. रुग्णालयामध्ये कार्यान्वित असलेल्या मे.रुबी ऐलकेअर संचलित कॅथलॅब सुविधेचा राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत समावेश करुन त्याअंतर्गत होणा-या प्रक्रिया/शस्त्रक्रियांकरिता पिंपरी चिंचवड शहरातील महानगरपालिकेच्या हद्दीतील पात्र लाभार्थ्यांवर होणा-या प्रक्रिया/शस्त्रक्रियांसाठी प्रत्यक्ष रकमेची भरपाई मे.रुबी ऐलकेअर यांना महानगरपालिकेमार्फत करुन देणेबाबत तसेच त्याकामी मे.रुबी ऐलकेअर यांचेसमवेत करारनामा करणेकरिता मा.महापालिका सभेची मान्यता घेणे.

**विषयाचा सविस्तर तपशिल**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत पिवळे व केसरी शिधापत्रिकाधारक नागरिकांसाठी यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना १ मे २०१४ पासून लागू करण्यात आलेली आहे. सदर योजनेअंतर्गत उपलब्ध असलेल्या ९७२ प्रकाराचे उपचारांपैकी ३७८ प्रकारचे उपचारांची सुविधा वाय.सी.एम. रुग्णालयामध्ये उपलब्ध आहे.

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये रुबी ऐलकेअर संचलित हृदयरोग केंद्र कार्यान्वित असून त्याचाही राजीव गांधी योजनेमध्ये समावेश करणेकामी मा.महापालिका सभेने ठराव क्र. ४४६ दि. १८/०१/२०१४ अन्वये मान्यता दिलेली आहे. महानगरपालिकेने रुबी ऐलकेअर साठी ठराविक दर ठरविले आहेत. सदर दर हे राजीव गांधी जीवनदायी योजनेच्या दरापेक्षा जास्त आहेत. परंतु रुबी ऐलकेअर यांनी त्यांचे दि.८/०४/२०१४ रोजीचे पत्रान्वये राजीव गांधी योजनेअंतर्गत असलेल्या दरामध्ये हृदयरोग विभागाची सेवा पुरविणे त्यांना शक्य नसल्याचे कळविलेले आहे. त्यामुळे राजीव गांधी जीवनदायी योजना व रुबी ऐलकेअरचे महानगरपालिकेने मान्य केलेले दर यामधील फरकाच्या पडणा-या अतिरिक्त बोजाची भरपाई महानगरपालिकेमार्फत करुन दिल्यास त्यांनी कॅथलॅब राजीव गांधी योजनेअंतर्गत उपलब्ध करुन देण्यास सहमती दर्शविलेली आहे.

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये हृदयरोगाच्या १४० प्रकारच्या प्रक्रिया / शस्त्रक्रियांचा समावेश होतो. त्यापैकी ५४ प्रकारच्या प्रक्रिया/शस्त्रक्रिया ह्या मे.रुबी ऐलकेअर संचलित कॅथलॅब विभागामध्ये करण्यात येतात. तसेच रुबी ऐलकेअर यांचेमार्फत सादर करण्यात आलेल्या मागील ३ वर्षांच्या प्रक्रिया/शस्त्रक्रियांचे तक्त्याचे अवलोकन करता राजीव गांधी अंतर्गत असणारे दर व रुबी ऐलकेअर यांचेकडील दराची तफावत ही वर्षाकाठी अंदाजे २ कोटी रुपये इतकी असल्याचे दिसून येते.

परंतु त्यामध्ये पांढरे, पिवळे व केसरी रेशनकार्ड धारक नागरिक, महानगरपालिकेचे कर्मचारी व पी.सी.एम.टी. चे कर्मचारी यांचाही सहभाग आहे. सदरचे रुग्णांची संख्या वजा करता सदरचा २ कोटींचा अंदाजित खर्च हा र.रु. १.५ कोटी (पिंपरी चिंचवड शहराचे हद्दीतील राजीव गांधी योजनेअंतर्गत पात्र पिवळे व केसरी रेशनकार्डधारक नागरिकांचे उपचारापोटी) इतका होण्याची शक्यता आहे.

| मे.रुबी ऐलकेअर यांचेमार्फत करण्यात येणा-या प्रक्रिया / शस्त्रक्रियांची मागील ३ वर्षांची सरासरी अंदाजित संख्या (१) | सदर प्रकिंया / शस्त्रक्रियांकरिता महानगरपालिकेमार्फत निश्चित करण्यात आलेल्या दरानुसार होणारी रक्कम (२) | सदर प्रकिंया / शस्त्रक्रियांकरिता राजीव गांधी योजनेअंतर्गत असलेल्या दरानुसार होणारी रक्कम (३) | क्रमांक २ व ३ मधील तफावत |
|---|---|---|---|
| १०३६२ | ३९७२२९६७/- | १९०९६०००/- | २०६२६९६७/- |

तथापि, उपरोक्त बाबींचा विचार करता महानगरपालिकेच्या हद्दीतील राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत पात्र ठरणा-या रुग्णांकरिताच मे.रुबी ऐलकेअर यांना भरपाई अदा करण्याचा निर्णय घेतल्यास सदरची रक्कम ही २ कोटींवरुन कमी होऊन अंदाजे १.५ कोटी पर्यंत वार्षिक इतकी होऊ शकते. त्यामुळे राजीव गांधी योजनेअंतर्गत दाखल होणारे शहरातील नागरिकांकरिताच रकमेची भरपाई मे.रुबी ऐलकेअर यांना करण्यात यावी. तसेच पिंपरी चिंचवड शहराचे हद्दीबाहेरील रुग्णांवर होणारा खर्च योजनेअंतर्गत समाविष्ट असलेल्या दरामध्ये मे.रुबी ऐलकेअर यांनी करावा लागेल अशी अट नमूद करून मे.रुबी ऐलकेअर यांचेसमवेत करारनामा करणे संयुक्तिक होईल. या अटीस मे.रुबी ऐलकेअर यांची तयारी आहे.

सबब, वाय.सी.एम. रुग्णालयामध्ये कार्यान्वित असलेल्या मे.रुबी ऐलकेअर संचलित कॅथलॅब सुविधेचा राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत समावेश करुन त्याअंतर्गत होणा-या प्रक्रिया/शस्त्रक्रियांकरिता पिंपरी चिंचवड शहरातील महानगरपालिकेच्या हद्दीतील पात्र लाभार्थ्यांवर होणा-या प्रक्रिया/शस्त्रक्रियांसाठी राजीव गांधी योजना व महानगरपालिकेमार्फत मंजूर करण्यात आलेल्या दरामधील फरकाच्या रकमेची भरपाई मे.रुबी ऐलकेअर यांना महानगरपालिकेमार्फत करुन देणेबाबत तसेच त्याकामी मे.रुबी ऐलकेअर यांचेसमवेत करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.श्रध्दा लांडे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, पिंपरी चिंचवडचे काही नागरीक असतील या लोकांना राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत हार्टच्या ऑपरेशनसाठीची अशा वेगवेगळया प्रकारच्या ऑपरेशनसाठी पैसे देत असतात, ऍन्जीओग्राफी असेल, वॉल बदली करणे असेल, एक लेन चोकअप असेल, दुसरी असेल त्यात कुठल्या पध्दतीचा वॉल टाकणार असेल त्यासाठी येणारा खर्च आणि राजीव गांधी योजनेमधुन मिळणारा खर्च आणि उरलेला खर्च कसा पेड करणार हा खुलासा झाला पाहिजे. खुलासा झाला नाहीतर आपल्याला त्या पध्दतीने उपसूचना दयावी लागेल. या गोष्टीचा व्यवस्थीतरीत्या खुलासा झालातर आम्हांला व्यवस्थीतरीत्या उपसूचना देता येईल जेणेकरुन पिंपरी चिंचवडच्या नागरीकांना या गोष्टीचा लाभ मिळाला पाहिजे.

**मा.महापौर** – आयुक्त साहेब खुलासा करतील.

**मा.आयुक्त** – मा.महापौर मॅडम, सन्मा.सभागृह. राजीव गांधी जीवनदायी योजनेवर सविस्तर चर्चा केलेली आहे. ही चांगली योजना आहे. ९७२ रोगावर विलाज केल्यास त्याचे पैसे इन्शूरन्स कंपनी देते. त्यापैकी जवळपास ३७८ प्रकारचे उपचारांची सुविधा वाय.सी.एम. रुग्णालयामध्ये उपलब्ध आहे. ही योजना १ मे पासून सुरु केलेली आहे. परंतु त्यापैकी ५४ प्रकारच्या प्रक्रिया/शस्त्रक्रिया ह्या मे.रुबी ऐलकेअर संचलित कॅथलॅब विभागामध्ये करण्यात येतात. हार्टच्या आजाराचा रुबी ऐलकेअरमध्ये सहभाग नसल्यामुळे त्याचा फायदा जनतेला देता येत नाही. राजीव गांधी जीवनदायी योजनेमध्ये आपल्याला माहिती आहे की, शहरातील सर्व पिवळे रेशनकार्डधारक आणि केशरी रेशनकार्ड धारकांचा समावेश होतो. आपण जर कुठल्याही ग्रामीण भागाचे अनॅलेसेस केलेतर १०० टक्के पैकी फक्त दहा ते बारा टक्के पांढरे कार्डधारक आहेत आणि बाकी ९० ते ९२ टक्के लोक हे पिवळे किंवा केशरी रेशनकार्डधारक आहेत. याचा अर्थ असा आहे की सर्वच जनतेला याचा फायदा मिळतो. मग हा फायदा जर आपण देत असू तर ३७८ च का, त्यामध्ये आणखी हार्टचे ५४ ला का नाही. त्याचाही फायदा आपण आपल्या जनतेला दिला पाहिजे जेणेकरुन हे रुबी ऐलकेअर किंवा वायसीएममध्ये त्यांचे उपचार घेतील. फ्रि ऑफ कॉस्टची ट्रिटमेंट मिळेल म्हणून ऐलकेअरमध्ये ज्या काही स्किम्स् आहेत त्या सुध्दा या योजनेमध्ये समाविष्ट झाल्या पाहिजेत त्यादृष्टीने आपण चाचपणी केली तर एकच अडचण आहे की रुबीवाले तयार नव्हते, ते म्हणाले की तुम्हीजर १०० रुपये ठरविले असतीलतर राजीव गांधी जीवनदायी योजनेमध्ये त्या केसेससाठी किंवा त्या ऑपरेशनसाठी ८० रुपये आहेत त्यामुळे आमचे २० रुपयाचे नुकसान होते मग २० रुपये कोण देणार, आता आम्हांलाही शक्य नाही म्हणून आता आम्ही महापालिका सभेसमोर असा प्रस्ताव ठेवलेला आहे की ८० रुपये इन्शुरन्स कंपनी, राज्यशासन देणार आहे फक्त २० रुपये आपण टाकायचे आहेत. जेणेकरुन रुबी ऐलकेअरचे सुध्दा नुकसान होणार नाही आणि आपल फक्त २० रुपयाच योगदान राहिल. २० रुपयाचा हिशोब केलातर जवळपास एकूण दिड कोटी होईल त्यापेक्षा जास्त होईल असे नाही. याकामी महापालिका सभेची मान्यता आवश्यक आहे. म्हणून हा विषय महासभेसमोर आलेला आहे. माझी विनंती

अशी राहील की दिड कोटीमध्ये आपल्या शहरातील ५४ हार्टशी रिलेटेड आहे त्याचा फायदा जनतेला देवू शकू. मॅक्झीमम दिड कोटी आहे कदाचित त्यापेक्षा कमीही खर्च होईल तेवढा आपल्याला करावा लागेल.

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, आपण जर पिंपरी चिंचवडमधील रहिवाशांना हा लाभ देणार असूतर मग पिवळे आणि केसरीच कार्डधारक का? यामध्ये पांढरे कार्डधारक का घेणार नाहीत, कारण ते सूध्दा आपले टॅक्सधारकच आहेत.

**मा.आयुक्त** – मा.महापौर मॅडम, राजीव गांधी जीवनदायी योजनेमध्ये राज्यशासनाने जी विमा पॉलीसी केलेली आहे त्यामध्ये तेवढेच पात्र आहेत. राज्यशासनाच्या योजनेमध्ये ९० टक्के जनता कव्हर होते ते केले पाहिजे व त्याबरोबर आपली इच्छा असेलतर १० टक्केसाठी आपण करु.

**मा.शमीम पठाण** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह. मी राज्य शासनाचे अभीनंदन करते की त्यांनी राजीवगांधी जवीनदायी योजना सुरु करुन गोरगरीब जनतेला आधार दिलेला आहे. मोठयाप्रमाणामध्ये जवळ जवळ ९७२ आजाराच्या यादीचा त्यामध्ये समावेश केलेला आहे. खरं म्हणजे ते देतात पण आपल्याकडे घ्यायला नाहीय. मला असं वाटते की ३७८ आजारा संबंधी विलाज करणार आहोत. त्यामध्ये कॅन्सर, हार्टच्या बाबत काही आजार असेल, पॅरेलेसेस, ब्रेनटयूमर असे मोठमोठे आजार जे इलाज करायला लागतात ते तसेच किडनी ट्रान्सपरन्ट आहे किंवा किडनी फेल्यूअर झाल्यानंतर तसेच गयनीकचे काही आजार आहेत. मोठयाप्रमाणात यामध्ये खर्च होत असतो. डॉ.रॉयने सांगावे की हे जे मोठे आजार आहेत ते या ३७८ मध्ये समाविष्ट केलेले आहेत का? का फक्त सर्दी, खोकला, एखादयाचा पाय फॅक्चर झाला असे आहेत. १ लाख ५० हजारामध्ये ते होणे शक्य नाही. जे मोठे आजार सांगीतलेले आहेत त्याचा अंतर्भाव केलेला आहे का. रुबी हॉल सेंटर आपल्याकडे आहे त्यामध्ये ते नया पैसा सुध्दा कमी करत नाहीत. आमच्या सारखे गेले, खुप विनवनी केलीतर दोन हजार रुपये कमी करतात. आपण त्यांना जागा दिलेली आहे, ते युनिट आपण सुरु करु शकत नाहीत का? आपण रुबी ऐलकेअरला या आपल्या योजनेमध्ये समाविष्ट केलेले आहे का? म्हणजे त्यांच्याकडून आम्ही हा फायदा घेवू. जेव्हा पेशंट घेवून जातो तेव्हा आम्ही तेथे सांगू. आम्ही त्याचा फायदा घेतो परंतु ते का क्लिष्ट आहे. आम्ही दादांनाही सांगीतलेल आहे म्हणजे जिल्हा नियोजन कमिटीमध्ये बोललेलो आहोत की खुप कमी लोकांना त्याचा लाभ मिळतो. आपल्याकडे आमच्या बरोबर असलेल्या लोकांना तुम्ही सवलत देतात. परंतु रुबी ऐलकेअर युनीट जे आहे ते फार महत्वाचे आहे, तेथून आम्हांला सवलत मिळणं फार महत्वाचे आहे. त्याठिकाणी खुप खर्च होतो, बाकी ठिकाणी आयसीयूमध्ये सवलत देतात त्या बद्दल वाद नाहीय. परंतु कोणते मोठे आजार आहेत ते सांगावे.

**मा.चंद्रकांता सोनकांबळे** - मा.महापौर साहेब,यामध्ये हार्टशी संबंधीत जे काही आजार असतील ते तुमची जी यादी आहे ती यादी बघीतल्यानंतर त्या यादीमध्ये तो आजार बसणार नाही अशा पध्दतीच त्या आजाराच नाव घेतात आणि सांगतात की तुमचा आजार हा यामध्ये

बसत नाही. रुबी केअरमध्ये आपण ती यादी दयालच परंतु त्यामध्ये सांगीतल पाहिजे की हार्टच्या संबंधीत जो काही आजार असेल त्या सगळया आजाराच निदान तेथे झाले पाहिजे. पठाणताई म्हणतात ते अगदी बरोबर आहे, रुबी केअरला प्रायव्हेट हॉस्पिटलपेक्षा हार्टचे जे उपचार होतात ते महागडे आहेत आणि दोन हजार एवढेच कमी केले जातात. आपली जी नियमावली आहे त्याप्रमाणे त्यांना आपण जागा दिलेली आहे त्यामध्ये एकूण बीलाच्या किती टक्के माफ केले पाहिजे किंवा पिंपरी चिंचवड शहरामध्ये राहणा-या नागरीकांसाठी तुम्ही जे काय बील देतात त्याच्या ५० टक्के बीलात सुट पाहिजे. तुम्ही मागच्या दोन तीन वर्षाच्या बीलाचा आढावा बघा त्यांची मागची बील काढा आणि किती सुट दिली ते बघा. त्या पध्दतीने ती सुट त्या हॉस्पिटलमधून मिळत नाही. त्यामुळे आपण आपले जे ॲग्रीमेंट आहे त्याप्रमाणे त्यांनी कार्यवाही केली पाहिजे. दुसरी महत्वाची गोष्ट अशी आहे की, पिवळे रेशन कार्ड मागच्या पाच वर्षापासून मिळत नाहीत, पिवळे राशनकार्ड देण्याची पध्दत मागच्या पाच वर्षापासून बंद झालेली आहे. दहा वर्षा पुर्वी पिवळे रेशन कार्ड होते. त्यानंतर दुसरी यादी आलेली आहे दारिद्रय रेषेखालील लोकांची त्यांना पिवळे रेशनकार्ड दिलेले नाही. त्यामुळे मागच्या पाच वर्षामध्ये पिवळे रेशनकार्ड जे काही एक दोन टक्के दिले असतील ते बेकायदेशीर असतील किंवा हार्टच्या ऑपरेशनसाठी टेम्परारी दिलेले आहेत. याला पर्याय म्हणून उत्पन्नाचा दाखला वगैरे जर ठेवलातर त्या प्रमाणपत्रामध्ये नोंद करावी की ज्याच उत्पन्न एक लाखाच्या कमी किंवा लाखापर्यंत असेल.

**मा.डॉ.रॉय (आरोग्य वैद्यकीय अधिकारी)-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. राजीव गांधी जीवनदायी योजना आपण १ मे पासून सुरु केलेली आहे आणि तेव्हापासून मागच्या तीन महिन्यात ८५०५ पेशंट वायसीएम मध्ये दाखल झाले त्या पैकी ५५०७ पेशंटना मोफत उपचार दिलेले आहे. राजीव गांधी योजनेमध्ये ९७२ आजार आहेत त्यापैकी आपल्याकडे ३७८ आजारावर ट्रिटमेंट होते. उर्वरीत जे आहे ते राजीव गांधी योजनेत पात्र असेल किंवा नसेल तरीपण ट्रिटमेंट देतो. आजार म्हणजे मोठे-छोटे असे नाहीये. सर्पदंश झाला त्या व्यक्तीला व्हेन्टीलेटर लागलातर तो राजीव गांधी योजने मध्ये येतो नाहीतर नाही. राजीव गांधी योजनेमध्ये जे पात्र ठरतील त्यांना मोफत उपचार करणार आहोत.

**मा.तानाजी खाडे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. राजीव गांधी जीवनदायी योजना आपल्या शहरामध्ये आपल्या वायसीएममध्ये रुबी ऐलकेअर येथे चालू करण्यासंदर्भातील विषय आहे, विषय अतीशय चांगला आहे. रुबी ऐलकेअरमध्ये हृदयाच्या संदर्भात ज्यावेळेला ऑपरेशनसाठी पेशंट येतो त्याची तपासणी, अमंक-तमंक करेपर्यंत त्याची कंडीशन नसते. परंतु राजीव गांधी जीवनदायी योजनेमुळे लोकांना आधार आलेला आहे. मागे मी बोललो होतो माझा एक नातेवाईक आहे त्याच्या हृदयाच ऑपरेशन होतं, तेथे स्प्रींग संदर्भातील विषय होता स्प्रींग चांगली टाकायची असेलतर पैसे दयावे लागतील. ती जर टेस्ट रुबी ऐलकेअरमध्ये झालीतर गरीब लोकांनी करायच काय? त्यासाठी काय करता येईल हे बघावे यावर आपली देखरेख असणे आवश्यक आहे. आपल्या शहरात केसरी रेशनधारकांना, आताच सांगीतल आहे की पिवळ रेशनकार्ड बंद झालेल आहे. केसरी रेशनकार्डधारक शहरामध्ये जेवढे रेशनकार्ड आहेत ते ब-याचशा रेशनींग अधिका-यांनी ते रेशनकार्ड

आपल्याकडे ठेवलेले आहेत. त्यांच बँकेचे पासबुक दिलेले नाहीत, आधारकार्ड दिलं नाही म्हणून ते कागद सध्या त्यांच्याकडे पडून आहेत. आजार कोणालाही सांगून येत नाही. आचानक एखादया माणसाला आजार आलातर, दवाखान्यामध्ये जायची वेळ आलीतर त्यांच्याकडे ते कार्ड नसते. त्या माणसाला कार्ड मिळवून देण्याची सोय महापालिका मार्फत काही करता येईल का? आपण लोकांच्या जीवनाशी संबंधीत विषय करतो. करोडो रुपये वायसीएममध्ये खर्च करणार आहोत. त्यांच्या पर्यंत पोहचण्यासाठी जे कार्ड लागते ते कार्डच त्यांच्याकडे नसेलतर या योजनेचा काय उपयोग आहे. करोडो रुपये त्यांच्या बीलासाठी आपण वायसीएम मध्ये खर्च करणार आहोत म्हणून ते कार्ड त्या लोकांपर्यंत कसे पोहचेल या संदर्भात आपल्याला काही करता आलेतर त करणे गरजेचे आहे. त्यासाठी तुम्ही कायदयाच्या चौकटीच्या बाहेर जावुन काही करता आलतर सभागृह तुमच्या पाठीशी आहे, ते आपण निश्चित कराव. आपल्या शहरामध्ये मोठमोठे हॉस्पिटल आहेत. निरामय हॉस्पिटल आहे, बिर्ला हॉस्पिटल आहे, आयुर्वेदीक हॉस्पिटलमध्ये स्टर्लींग हॉस्पिटल आहे. एवढे मोठमोठे हॉस्पिटल एवढे पैसे लावतायेत की भरमसाठ. तेथून आयसीयू मधून पेशंट काढायचा असेलतर आम्ही रॉय सर असतील, भगत सर असतील त्यांना फोन करुन वायसीएममध्ये जागा आहे का आपला एक पेशंट आहे असे विचारतो. वायसीएममध्ये बरेचसे गोरगरीब आयसीयू असल्यामुळे जगतायेत, लोक वाचतायेत. परंतु आयसीयूची देखील आपल्याकडे कमतरता आहे. ज्यावेळेस डिलेव्हरी होते, ते लहान बाळ कुपोशीत असेलतर त्या बाळाच वजन कमी भरतय त्यामुळे त्यांना पेटीची गरज असते. त्यात हॉस्पिटलचे डॉक्टर सांगतील तसे करतात. त्या लोकांना उत्तर देता देता नाकीनऊ येते. यासंदर्भात लक्ष घालावे. राजीव गांधी जीवनदायी योजना अंमलात आल्यापासून आपल्या भागातील लोकांना चांगल्या चांगल्या सेवा दयाव्यात. नागरीकांना कार्ड त्यांच्या पर्यंत कसे पोहचविता येतील हे बघावे, धन्यवाद.

**मा.चंद्रकांता सोनकांबळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. याठिकाणी मला एक माहिती तुम्हांला सांगायची होती की आश्विनी विक्रम कांबळे या मुलीने रशीयामध्ये एमएमबीएस आणि एम.डी केलेले आहे ही चिंचवडची मुलगी आहे. समाजकल्याण तर्फे तीचे पुर्ण शिक्षण झालेले आहे आणि विशेष म्हणजे पहिला एक लाख रुपयाचा चेक आपल्या महापालिकेच्या नागरवस्ती विभागामधून तीला दिलेला आहे. तीची सुरवात आपल्या महापालिकेतून झालेली आहे. त्यामुळे नागरवस्ती विभागाचे, महापौरांचे, आयुक्तांचे मी अभीनंदन करते. ती मुलगी आली असती परंतु तीला चार महीन्यासाठी दिल्लीला ट्रेनींगसाठी जायला सांगीतलेले आहे, ती मुलगी आल्यानंतर आपल्याला भेटणार आहे.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपल्या योजनेतून एक लाख या मुलीला मिळाले आणि ती डॉक्टर होवून रशीयामधुन आलेली आहे. म्हणूनच आम्ही नेहमी म्हणतो की आपल्या ज्या योजना आहेत त्या खुप चांगल्या लेव्हलला आहेत, मग ती क्रिडा विभाग असू देत, महिला बालकल्याण विभाग असू देत, उदयान विभाग असू देत कोणतेही विभाग असू देत ते सर्व विभाग कार्यक्षम होणे गरजेच आहे. आपल्या सर्व टिमने खुप चांगले काम केलेतर पिंपरी चिंचवड सारख खुप सुंदर आणि चांगल दुसर शहर होणार नाही, इतक सुंदर शहर आपण करु शकतो. राजीव गांधी जीवनदायी योजनेतून मघाशी सांगीतले पिंपरी चिंचवड शहरातील

सर्व सिनीअर डॉक्टरांची मिटींग लावावी त्यांना विनंती करावी की आठवडयातील तुमचा फक्त एकच दिवस आम्हांला दयावा, ते आपल्याकडे यायला तयार आहेत ते जर जास्त दिवस जास्त वेळ देणार असतीलतर त्यांना मानधन स्वरुपामध्ये दयावे ते पेट्रोल खर्च करुन जर आपल्याकडे येणार असतीलतर, आपल्याला वेळ देणार असतीलतर त्यांना कमीत कमी २५ हजार मानधन दयावे. ते सुध्दा कमी आहेत, कारण एक डॉक्टर जर एका ऑपरेशनला उभा राहिलातर कमीत कमी एक ते दिड लाख एका टाईमींगची त्यांची ऑपरेशनची फि असते. परंतु ते आपल्या वायसीएममध्ये येवून सर्वसामान्य लोकांसाठी सहकार्य करणार असतीलतर त्यांना कमीत कमी एक हजार ऐवजी पंचवीस हजार मानधन कराव. कारण आपल्याकडे जे सेवाभावी वृत्तीने येणारे डॉक्टर आहेत त्यांना २५ हजार मानधन करावे. आपल्याकडे काही पेशंट ऍडमीट होतात, त्या पेशंटला एमआरआय, सीटी स्कॅन कराव लागतं, हे सिटीस्कॅन करायला सांगीतलतर त्यावेळेला आपल्या सवलतीचा रेट काय? किंवा राजीव गांधी योजनेतून तो माणूस जाणार असेलतर ते एकूण पेमेंट कोण करणार हा सुध्दा प्रश्न आहे, तो सुध्दा विषय आहे म्हणून मी मगाशी म्हणल की या विषयाला मी उपसूचना देणार आहे. शिवाय वायीसीएम असेल, तालेरा असेल, जिजामाता हॉस्पिटल असेल इतर ठिकाणच्या ओपीडी असतील इतर ठिकाणचे रुग्णालय असतील, शहरासाठी मी बोलते यांच्यासाठी जो स्टाफ लागणार असेल जसं मगाशी दत्ता सानेनी सांगीतल की आपल्या काही लोकांवर प्रमोशनच्या बाबतीत अन्याय झालेला आहे. त्यांचे प्रमोशन झाले पाहिजे. क्लार्क लोक आहे त्यांना प्रमोशन दया, एक ते दिड वर्षे सर्व्हिस राहिलेली आहे त्यांना प्रमोशनपासून वंचीत ठेवू नका. पगारामध्ये काही फरक पडणार नाही. फक्त त्यांना जाता जाता समाधान होईल की मला या महापालिकेतून एक प्रमोशन मिळाले. तो सुध्दा विषय खुप दिवसाचा पेन्डींग आहे तोही विषय घेतला गेला पाहिजे.

मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- राजीव गांधी जीवनदायी योजनेंतर्गत पात्र होणा-या पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील पिवळे व केशरी रेशनकार्ड धारक रुग्णांना (लाभार्थ्यांना) एम.आर.आय व सीटी स्कॅनसाठी यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील रुबी एलकेअर येथे रेफर करणेत आले नंतर येणा-या खर्च रक्कमेची प्रतिपुर्ती महानगरपालिकेमार्फत करुन देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.मंदाकिनी ठाकरे** - मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देते.

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ५६२ विषय क्रमांक – १५

दिनांक - १९/८/२०१४ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.आयुक्त यांचे जा.क्र.वैद्य/२/कावि/९०२/२०१४ दि.१९/०८/२०१४

**विषयाचा संक्षिप्त आशय**

वाय.सी.एम. रुग्णालयामध्ये कार्यान्वित असलेल्या मे.रुबी ऐलकेअर संचलित कॅथलॅब सुविधेचा राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत समावेश करुन त्याअंतर्गत होणा-या प्रक्रिया/शस्त्रक्रियांकरिता पिंपरी चिंचवड शहरातील महानगरपालिकेच्या हद्दीतील पात्र लाभार्थ्यांवर होणा-या प्रक्रिया/शस्त्रक्रियांसाठी प्रत्यक्ष रकमेची भरपाई मे.रुबी ऐलकेअर यांना महानगरपालिकेमार्फत करुन देणेबाबत तसेच त्याकामी मे.रुबी ऐलकेअर यांचेसमवेत करारनामा करणेकरिता मान्यता देणेत येत आहे.

**विषयाचा सविस्तर तपशिल**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत पिवळे व केसरी शिधापत्रिकाधारक नागरिकांसाठी यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना १ मे २०१४ पासून लागू करण्यात आलेली आहे. सदर योजनेअंतर्गत उपलब्ध असलेल्या ९७२ प्रकाराचे उपचारांपैकी ३७८ प्रकारचे उपचारांची सुविधा वाय.सी.एम. रुग्णालयामध्ये उपलब्ध आहे.

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये रुबी ऐलकेअर संचलित हृदयरोग केंद्र कार्यान्वित असून त्याचाही राजीव गांधी योजनेमध्ये समावेश करणेकामी मा.महापालिका सभेने ठराव क्र. ४४६ दि. १८/०१/२०१४ अन्वये मान्यता दिलेली आहे. महानगरपालिकेने रुबी ऐलकेअर साठी ठराविक दर ठरविले आहेत. सदर दर हे राजीव गांधी जीवनदायी योजनेच्या दरापेक्षा जास्त आहेत. परंतु रुबी ऐलकेअर यांनी त्यांचे दि.८/०४/२०१४ रोजीचे पत्रान्वये राजीव गांधी योजनेअंतर्गत असलेल्या दरामध्ये हृदयरोग विभागाची सेवा पुरविणे त्यांना शक्य नसल्याचे कळविलेले आहे. त्यामुळे राजीव गांधी जीवनदायी योजना व रुबी ऐलकेअरचे महानगरपालिकेने मान्य केलेले दर यामधील फरकाच्या पडणा-या अतिरिक्त बोजाची भरपाई महानगरपालिकेमार्फत करुन दिल्यास त्यांनी कॅथलॅब राजीव गांधी योजनेअंतर्गत उपलब्ध करुन देण्यास सहमती दर्शविलेली आहे.

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये हृदयरोगाच्या १४० प्रकारच्या प्रक्रिया / शस्त्रक्रियांचा समावेश होतो. त्यापैकी ५४ प्रकारच्या प्रक्रिया / शस्त्रक्रिया ह्या मे.रुबी ऐलकेअर संचलित कॅथलॅब विभागामध्ये करण्यात येतात. तसेच रुबी ऐलकेअर यांचेमार्फत सादर करण्यात आलेल्या मागील ३ वर्षांच्या प्रक्रिया / शस्त्रक्रियांचे तक्त्याचे अवलोकन करता राजीव गांधी अंतर्गत असणारे दर व रुबी ऐलकेअर यांचेकडील दराची तफावत ही वर्षाकाठी अंदाजे २ कोटी रुपये इतकी असल्याचे दिसून येते.

परंतु त्यामध्ये पांढरे, पिवळे व केसरी रेशनकार्ड धारक नागरिक, महानगरपालिकेचे कर्मचारी व पी.सी.एम.टी. चे कर्मचारी यांचाही सहभाग आहे. सदरचे रुग्णांची संख्या वजा करता सदरचा २ कोटींचा अंदाजित खर्च हा र.रु. १.५ कोटी (पिंपरी चिंचवड शहराचे हद्दीतील राजीव गांधी योजनेअंतर्गत पात्र पिवळे व केसरी रेशनकार्डधारक नागरिकांचे उपचारापोटी) इतका होण्याची शक्यता आहे.

| **मे.रुबी ऐलकेअर यांचेमार्फत करण्यात येणा-या प्रक्रिया / शस्त्रक्रियांची मागील ३ वर्षांची सरासरी अंदाजित संख्या (१)** | **सदर प्रकिंया / शस्त्रक्रियांकरिता महानगरपालिकेमार्फत निश्चित करण्यात आलेल्या दरानुसार होणारी रक्कम (२)** | **सदर प्रकिंया / शस्त्रक्रियांकरिता राजीव गांधी योजनेअंतर्गत असलेल्या दरानुसार होणारी रक्कम (३)** | **क्रमांक २ व ३ मधील तफावत** |
|---|---|---|---|
| १०३६२ | ३९७२२९६७/- | १९०९६०००/- | २०६२६९६७/- |

तथापि, उपरोक्त बाबींचा विचार करता महानगरपालिकेच्या हद्दीतील राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत पात्र ठरणा-या रुग्णांकरिताच मे.रुबी ऐलकेअर यांना भरपाई अदा करण्याचा निर्णय घेतल्यास सदरची रक्कम ही २ कोटींवरुन कमी होऊन अंदाजे १.५ कोटी पर्यंत वार्षिक इतकी होऊ शकते. त्यामुळे राजीव गांधी योजनेअंतर्गत दाखल होणारे शहरातील नागरिकांकरिताच रकमेची भरपाई मे.रुबी ऐलकेअर यांना करण्यात यावी. तसेच पिंपरी चिंचवड शहराचे हद्दीबाहेरील रुग्णांवर होणारा खर्च योजनेअंतर्गत समाविष्ट असलेल्या दरामध्ये मे.रुबी ऐलकेअर यांनी करावा लागेल अशी अट नमूद करून मे.रुबी ऐलकेअर यांचेसमवेत करारनामा करणे संयुक्तिक होईल. या अटीस मे.रुबी ऐलकेअर यांची तयारी आहे.

सबब, वाय.सी.एम. रुग्णालयामध्ये कार्यान्वित असलेल्या मे.रुबी ऐलकेअर संचलित कॅथलॅब सुविधेचा राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत समावेश करुन त्याअंतर्गत होणा-या प्रक्रिया / शस्त्रक्रियांकरिता पिंपरी चिंचवड शहरातील महानगरपालिकेच्या हद्दीतील पात्र लाभार्थ्यांवर होणा-या प्रक्रिया / शस्त्रक्रियांसाठी राजीव गांधी योजना व महानगरपालिकेमार्फत मंजूर करण्यात आलेल्या दरामधील फरकाच्या रकमेची भरपाई मे.रुबी ऐलकेअर यांना महानगरपालिकेमार्फत करुन देणेबाबत तसेच त्याकामी मे.रुबी ऐलकेअर यांचेसमवेत करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे तसेच राजीव गांधी जीवनदायी योजनेंतर्गत पात्र होणा-या पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील पिवळे व केशरी रेशनकार्ड धारक रुग्णांना (लाभार्थ्यांना) एम.आर.आय व सीटी स्कॅनसाठी यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील रुबी एलकेअर येथे रेफर करणेत आले नंतर येणा-या खर्च रक्कमेची प्रतिपुर्ती महानगरपालिकेमार्फत करुन देण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुमन नेटके-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – १६

दिनांक - १९/८/२०१४ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/इक्षे/कावि/७०७/२०१४ दि.१९/०८/२०१४

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,निगडी यांच्याकडून पोलिस ठाणे बांधण्यासाठी डिस्ट्रीक्ट सेंटर येथील प्लॉट नं. ४ मधील २२.०५ आर जागा पोलिस विभागाकडे हस्तांतरीत करणेची कार्यवाही चालू आहे. त्याबाबत पोलिस विभागाकडून दि. ७/७/२०१४ च्या पत्रान्वये कळविले आहे. सदर ठिकाणी महानगरपालिकेमार्फत पोलिस स्टेशनसाठी इमारत बांधणेबाबत महानगरपालिकेचे धोरण आहे.

विषयांकीत कामाचा सन २०१४/१५ चे अंदाजपत्रकांमध्ये समावेश नाही, सदरचे काम तातडीने करणे आवश्यक असल्याने विषयांकीत कामाचा सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकात विशेष योजना लेखाशिर्षाअंतर्गत नव्याने समावेश करणे आवश्यक आहे पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणामार्फत अशा स्वरुपाचे काम वाकड येथे करणेत येणार असून त्याचे क्षेत्रफळ ८४० चौ.मी. आहे. त्याचधर्तीवर सदर कामाचे सा.बा. विभागाचे सन २०१३-१४ चे दरसुचीनुसार ढोबळ अंदाजपत्रक तयार केले असून र.रु. २,३०,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार सदरचे र.रु. २.३०,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी विषयांकीत कामाचा सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकात विशेष योजना लेखाशिर्षाअंतर्गंत नव्याने समावेश करणे व त्यासाठी येणा-या र.रु. २,३०,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.आशा सुपे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- दिघी भारतमातानगर व परिसरातील नागरिकांना भोसरी आळंदी रस्त्याला येण्यासाठी रस्ता नाही. सद्दस्थितीत नागरिक कच्च्या रस्त्याने भोसरी आळंदी रस्त्याला येतात. परंतू सदरचा रस्ता कच्चा असल्यामुळे व सध्या पावसाचे दिवस असल्यामुळे ब-याच वेळा नागरिकांची वाहने चिखलात व पाण्यात अडकतात. त्यामुळे भारतमातानगर ते भोसरी आळंदी रस्ता सद्दस्थितीत दिघी गायरानातून सरळ पुढे करणे आवश्यक आहे. सदरचे काम करणेसाठी म.न.पा.चे सन २०१४-२०१५ चे अंदाजपत्रकात तरतूद नाही. त्यामुळे भोसरी आळंदी रस्ता ते दिघी भारतमातानगर रस्ता दिघी स.नं. ७६,७७ गायरानातून (रेडझोन मधून) करण्यास व त्यासाठी लागणा-या सुमारे रक्कम रुपये ८०,००,०००/- (र.रु.ऐंशी लाख रुपये फक्त) एवढया रक्कमेस प्रशासकीय मान्यता मिळण्याचे विषय व सदर कामाचे नांव मनपाचे सन २०१४-२०१५ च्या अंदाजपत्रकात समाविष्ठ करण्यास व विषयाचे गांभीर्य लक्षात घेता याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.श्रध्दा लांडे** – मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देते.

**मा.प्रशांत शितोळे** - मा.महापौर साहेब, मी पुढील प्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील मौजे सांगवी येथील स.नं. ८३ मधील मनपाच्या ताब्यात असणारा मोकळी जागा या प्रयोजनाकरीता असणा-या भूखंडावर सांगवी पोलीस स्टेशन बांधणेकरीता रक्कम रु. ५०,००,०००/- (रु.पन्नास लक्ष) खर्च करणेसाठी प्रशासकीय मान्यता देणेत यावी व त्याप्रमाणे अंदाजपत्रक २०१४-१५ मध्ये योग्य ते लेखाशिर्ष निर्माण करुन कामाचा व तरतूदीचा समावेश करणेस मान्यता देणेत यावी. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

**मा.उल्हास शेट्टी** - मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा.सुमन नेटके –** मा.महापौर साहेब, सर्व उपसूचना स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनांप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक – ५६३ विषय क्रमांक – १६
दिनांक - १९/८/२०१४ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/इक्षे/कावि/७०७/२०१४ दि.१९/०८/२०१४

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,निगडी यांच्याकडून पोलिस ठाणे बांधण्यासाठी डिस्ट्रीक्ट सेंटर येथील प्लॉट नं. ४ मधील २२.०५ आर जागा पोलिस विभागाकडे हस्तांतरीत करणेची कार्यवाही चालू आहे. त्याबाबत पोलिस विभागाकडून दि. ७/७/२०१४ च्या पत्रान्वये कळविले आहे. सदर ठिकाणी महानगरपालिकेमार्फत पोलिस स्टेशनसाठी इमारत बांधणेबाबत महानगरपालिकेचे धोरण आहे.

विषयांकीत कामाचा सन २०१४/१५ चे अंदाजपत्रकांमध्ये समावेश नाही, सदरचे काम तातडीने करणे आवश्यक असल्याने विषयांकीत कामाचा सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकात विशेष योजना लेखाशिर्षाअंतर्गत नव्याने समावेश करणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणामार्फत अशा स्वरुपाचे काम वाकड येथे करणेत येणार असून त्याचे क्षेत्रफळ ८४० चौ.मी. आहे. त्याचधर्तीवर सदर कामाचे सा.बा. विभागाचे सन २०१३-१४ चे दरसुचीनुसार ढोबळ अंदाजपत्रक तयार केले असून र.रु. २,३०,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार सदरचे र.रु. २.३०,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी विषयांकीत कामाचा सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकात विशेष योजना लेखाशिर्षाअंतर्गत नव्याने समावेश करणे व त्यासाठी येणा-या र.रु. २,३०,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे तसेच दिघी भारतमातानगर व परिसरातील नागरिकांना

भोसरी आळंदी रस्त्याला येण्यासाठी रस्ता नाही. सद्दस्थितीत नागरिक कच्या रस्त्याने भोसरी आळंदी रस्त्याला येतात. परंतू सदरचा रस्ता कच्चा असल्यामुळे व सध्या पावसाचे दिवस असल्यामुळे ब-याच वेळा नागरिकांची वाहने चिखलात व पाण्यात अडकतात. त्यामुळे भारतमातानगर ते भोसरी आळंदी रस्ता सद्दस्थितीत दिघी गायरानातून सरळ पुढे करणे आवश्यक आहे. सदरचे काम करणेसाठी म.न.पा.चे सन २०१४-२०१५ चे अंदाजपत्रकात तरतूद नाही. त्यामुळे भोसरी आळंदी रस्ता ते दिघी भारतमातानगर रस्ता दिघी स.नं. ७६,७७ गायरानातून (रेडझोन मधून) करण्यास व त्यासाठी लागणा-या सुमारे रक्कम रुपये ८०,००,०००/- (र.रु.ऐंशी लाख रुपये फक्त) एवढया रक्कमेस प्रशासकीय मान्यता मिळण्याचे विषय व सदर कामाचे नांव मनपाचे सन २०१४-२०१५ च्या अंदाजपत्रकात समाविष्ठ करण्यास व विषयाचे गांभीर्य लक्षात घेता याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यास मान्यता देणेत येत आहे तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील मौजे सांगवी येथील स.नं. ८३ मधील मनपाच्या ताब्यात असणारा मोकळी जागा या प्रयोजनाकरीता असणा-या भूखंडावर सांगवी पोलीस स्टेशन बांधणेकरीता रक्कम रु. ५०,००,०००/- (रु.पन्नास लक्ष) खर्च करणेसाठी प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे व त्याप्रमाणे अंदाजपत्रक २०१४-१५ मध्ये योग्य ते लेखाशिर्ष निर्माण करुन कामाचा व तरतूदीचा समावेश करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

अनुकूल- ८१ प्रतिकुल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – १७

दिनांक - १९/८/२०१४ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. नरवि/१७/पिंपरी/१४१/२०१४
दिनांक १६/०८/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील चिंचवड येथील सर्व्हे नंबर २५४ ते २५८ या मनपाच्या मालकीच्या जागेवर BSUP योजनेअंतर्गत झोपडपट्टीचे जागेवर पुनर्वसन प्रकल्प मनपा राबवित आहे. सदर प्रकल्पामध्ये एकुण ६७२ गाळे (६ इमारती ) बांधावयाचे आहेत. यापैकी ५ इमारतीचे बांधकाम पुर्णत्वास आलेले आहे.

उपरोक्त विषयाधिन जागेवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन १९७८ चे मंजूर विकास योजनेनुसार आ.क्र :- १३१ भाजी मंडई व शॉपींग सेंटर, आ.क्र:- १३२ खेळाचे मैदान,आ.क्र:-१२५ माध्यमिक शाळा, आ.क्र:- १२६ प्राथमिक शाळा. आ.क्र:-१२७ उद्यान, या प्रयोजनाची आरक्षणे होती. उक्त आरक्षणांची जागा भूसंपादन कायदयान्वये सन १९८६ साली महानगरपालिकेच्या ताब्यात मिळाल्या आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन १९९५ च्या सुधारीत मंजूर विकास योजनेनुसार या ठिकाणी आरक्षण क्र.२५३ अन्वये माध्यमिक शाळा व आरक्षण क्र. २५४ अन्वये प्राथमिक शाळा आणि आरक्षण क्र. २५१ अन्वये भाजी मंडईसाठी

या प्रयोजनासाठी आरक्षणे कायम केली आहेत. तदनंतर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ प्रमाणे शासन निर्णय क्र:-टिपीएस-१८९८/६४/प्र.क्र.७/९८/ नवि-१३ दि:- २२ जुन १९९८, अन्वये "माध्यमिक व प्राथमिक शाळेसाठी" आरक्षित जागा मैलाशुध्दीकरण प्रकल्प या प्रयोजनार्थ वापरणेस्तव आरक्षणाचे प्रयोजनात बदल करण्याचा फेरबदलाचा प्रस्ताव शासनाने मंजुर केला आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने आरक्षण क्र. २५१ भाजी मंडई आरक्षणाचे एकुण ४७०१.६० चौ.मी. क्षेत्रामधील ३१४९.८६ चौ.मी.क्षेत्रात बी.एस.यु.पी.योजनेतंर्गत ३ इमारतीचे बांधकाम केले असून भाजीमंडई आरक्षणासाठी १५५१.७४ चौ.मी.क्षेत्र कायम ठेवले आहे. तसेच आरक्षण क्र. २५३ मैलाशुध्दीकरण केंद्राचे एकुण २४८२१.५० चौ.मी.क्षेत्रामधील ५२३७.२३ चौ.मी. क्षेत्रावर बी एस यु पी योजनेतंर्गत ३ इमारती प्रस्तावित केल्या असून त्यापैकी दोन इमारतीचे काम केले आहे.

शासन निदेश दि. २४/१२/२००८ व शुध्दीपत्रक दि. २०/०५/२०१० यास अनुसरुन महानगरपालिका बी एस यु पी योजनेसाठी २.५ एफ एस आय अनुज्ञेय करुन योजना राबवू शकते. परंतू पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने बी एस यु पी योजना मंजुर विकास योजनेच्या आरक्षित जागेवर राबविल्यामुळे सदर प्रकल्पातील इमारतींना भोगवटा पत्र देण्यास कायदेशिर अडचणी येत आहेत. त्यामुळे या प्रकल्पातील सदनिका लाभार्थींना वाटप करणे शक्य होत नाही.

सदर प्रकल्पाबाबत मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र.७४/२०१३ दाखल आहे. सदर प्रकल्प पुर्णत्वास नेण्यासाठी व लाभार्थीना घरकुले वाटप करणे शक्य होण्यासाठी मंजुर विकास योजनेत फेरबदलाची कार्यवाही करुन प्रकल्पाची जागा आरक्षणातुन वगळून निवासी विभागात समाविष्ट करणे क्रमप्राप्त आहे.

सबब मौजे चिंचवड स.नं. २५४, २५५ पैकी ( सि.स.नं.४५०९, ११९३ पैकी ) मधील आरक्षण क्र. २५१ भाजी मंडई या एकुण आरक्षणाचे ४७०१.६० चौ.मी. क्षेत्रापैकी बी.एस.यु.पी. योजनेतंर्गत प्रकल्प राबविलेले ३१४९.८६ चौ.मी. क्षेत्र आरक्षणातून वगळून निवासी विभागात समाविष्ट करणे आणि स.नं.२५६, २५७,२५८ पै. (सि.सं.नं.११९३ ते ११९७ पै.) मधील आरक्षण क्र.२५३ मैलाशुध्दीकरण केंद्र क्षेत्र २४८२१.५० चौ.मी.यामधील प्रकल्प भूखंड क्षेत्र ५२३७.२३ चौ.मी. यामधील पवनानदीचे निळी पुररेषेतील ४२५.८७ चौ.मी. क्षेत्र वगळून उर्वरीत क्षेत्र प्रकल्प भूखंडाचे उत्तरेकडील ४२५.८७ चौ.मी. असे एकुण ५२३७.२३ चौ.मी. क्षेत्र आरक्षणातून वगळुन निवासी विभागात समाविष्ट करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची प्रक्रिया मा.महापालिका सभेच्या मंजूरीने कार्यान्वित करणे क्रमप्राप्त आहे. सोबत मंजूर विकास योजनेत प्रस्तावित करावयाचे फेरबदल दर्शविणारा विकास योजनेचा भाग नकाशा माहितीसाठी सोबत जोडला आहे यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीचे सुधारीत मंजूर विकास योजनेत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास, फेरबदलाची सर्व वैधानिक कार्यवाही करुन फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर करण्यास आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुमन नेटके-** मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.संजय वाबळे** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- मौजे रहाटणी येथील स.नं. ५९ पैकी जागातील आरक्षण क्र.६४९, उद्यान येथील जागेवर मोठया प्रमाणात निवासी घरे आहेत व स.नं. ७२, ७३ पैकी, आरक्षण क्र.६४५, दवाखाना व प्रसुतिगृह यांचे आरक्षण असून निम्या जागेवर गरिबांची घरे असून जवळच एक किलो मिटरच्या आत जिजामाता हॉस्पीटल व प्रस्तुतीगृह आहे. ही घरे गरीब कुटूंबातील कष्टकरी कामगारांची असल्याने ते बेघर होऊ नयेत म्हणून सदर आरक्षणाची जागा निवासी विभागात समाविष्ट करणेकामी म.प्र.अधिनियम व न.र. अधिनियमचे कलम ३७ नुसार कार्यवाही करणेस व तसा अहवाल शासनास पाठविण्यास मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देते.

**मा.तानाजी खाडे** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- स.नं.२२ मधील राहूलनगर येथील झोपडपट्टीधारकांची सन १९९० साली पिंपरी येथुन सुमारे ५०२ कुटूंबियांचे पुनर्वसन करण्यात आले आहे. त्यावेळी म्हणजे सुमारे २५ वर्षापूर्वी या झोपडपट्टीधारकांना केवळ १२५ स्क्वेअर फूटांची घरे दिली गेली. आता त्या झोपडपट्टीधारकांची मुले मोठी झाली आहेत. त्यांची लग्ने होऊन त्यांना मुले झाली आहेत. त्यामुळे २५ वर्षापूर्वीच्या १२५ स्क्वेअर फूटांच्या घरांमध्ये सदरचे कुटूंब राहू शकत नाही तसेच सदरचे राहुलनगर हे अधिकृत रहिवाशी असून देखील त्यांचे जे.एन.एन.यू.आर.एम. अंतर्गत अद्याप पुनर्वसन करण्यात आलेले नाही. १९९० साली देण्यात आलेल्या इमारतीचे स्लॅब हे आता गळतायेत. त्यामुळे सदर घरांच्या भिंतीमध्ये पाणी मुरुन त्या इमारती आता मोडकळीस आलेल्या आहेत. त्या ठिकाणच्या इमारतींच्या जिन्यांचे व लोखंडी कठडे गंजून निखळून गेलेल्या आहेत. त्यामुळे अंध, वृध्द लोकांना वरच्या मजल्यावर जाणे धोकादायक बनले आहे. सदर इमारतीची गॅरंटी आता संपली आहे. त्यामुळे महापालिकेने वेळीच लक्ष दिले नाही तर भविष्यामध्ये सदरच्या इमारती कोसळून मोठी जिवित व वित्त हानी होण्याची शक्यता आहे. सदर से.नं. २२ हे रेड झोन बाधित असल्यामुळे आहे त्याच ठिकाणी या नागरिकांचे पुनर्वसन होऊ शकत नाही. त्यामुळे शहरातील अन्य भागामध्ये अजमेरा, मासुळकर कॉलनी येथे मनपाच्या मालकीची सुमारे दोन एकर जागा नागरीकांसाठी घरे या प्रयोजनासाठी आरक्षित आहे. याठिकाणी सदर नागरीकांचे पुनर्वसन करुन देणेस मान्यता देणेत यावी.

**मा.दत्तात्रय साने** - मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा.विनोद नढे** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- मौजे रहाटणी येथील स.नं. ११४ पैकी जागातील आरक्षण क्र. ६४२, लहान मुलांचे खेळाचे मैदान व स.नं. ७५ पैकी, आरक्षण क्र.६४४, प्राथमिक शाळा यांचे आरक्षण आहे. सदर जागेवर मोठया प्रमाणात निवासी घरे आहेत. ही घरे गरीब कुटूंबातील कष्टकरी कामगारांची असल्याने ते बेघर होऊ नयेत

म्हणून सदर आरक्षणाची जागा निवासी विभागात समाविष्ट करणेकामी म.प्र. अधिनियम व न.र. अधिनियमचे कलम ३७ नुसार कार्यवाही करणेस व तसा अहवाल शासनास पाठविण्यास मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्यास मान्यता देणेत यावी. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

**मा.प्रमोद ताम्हणकर** - मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा.श्रध्दा लांडे** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- प्रभाग क्र. ३१ दिघी येथील स.नं. २ मध्ये आरक्षण क्र. २/१२१ ही जागा संप व पंप हाऊस साठी मनपा या विकास आराखडयामध्ये आरक्षित केलेली आहे. तसेच स.नं.८२ मध्ये आरक्षित क्र.२/११८ ही जागा कम्युनिटी सेंटर व सांस्कृतिक केंद्र तथा वाचनालय यासाठी आरक्षित करणेत आलेली आहे. वरील आरक्षणाची जागा मनपाने ताब्यात घेतलेली नाही. सदर जागेस विकास आराखडयामध्ये आरक्षण पडण्यापुर्वी गोरगरीब नागरिकांनी राहण्यासाठी घरे बांधलेली आहेत. त्यामुळे आरक्षणाची जागा ताब्यात घेतल्यास गरीब नागरिक बेघर होतील. त्यामुळे वरील दोन्ही ठिकाणची आरक्षणे रद्द करणेस व विषयाचे गांभीर्य लक्षात घेता याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.आशा सुपे** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देते.

**मा.अनुराधा गोफणे** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते - भोसरी वॉर्ड क्र.३३ गवळीनगर येथील सर्व्हे नं.२०० पै. आरक्षण क्र.४०७ खेळाचे मैदान येथील एकुण ९५ गुंठा जागेपैकी ८५ गुंठा मनपाच्या ताब्यात आलेली आहे. सदर परिसरामध्ये पाण्याची टाकी नाही. सध्या पांजरपोळ येथून पाणीपुरवठा केला जातो. सदर ठिकाणी नव्याने टाकी बांधलेस पुरेशा दाबाने पाणीपुरवठा होईल व नागरिकांचा कायमस्वरुपी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवला जाईल. त्याकरिता भोसरी सर्व्हे नं. २०० पै. आरक्षण क्र. ४०७ खेळाचे मैदान येथील एकुण ९५ गुंठा जागेपैकी ८५ गुंठा मनपाच्या ताब्यातील जागेपैकी अंदाजे २० गुंठा जागा पाण्याची उंच टाकी बांधणेस आरक्षित करणेत यावी त्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये आरक्षणाचे फेरबदलाची कार्यवाही करणेस मान्यता देणेत यावी. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

**मा.अनिता तापकीर** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देते.

**मा.आर.एस.कुमार** – मा.महापौर साहेब, मुळ विषय मंजूर करण्यास हरकत नाही. भाजीमंडईच्या या आरक्षणावर बिल्डींग कशी काय झालेली आहे. विषय पास करावा, प्रश्न असा आहे की, महापालिकेच्या आरक्षीत जागेवर, भाजीमंडईच्या आरक्षीत जागेवर बिल्डींग कशी काय बांधलेली आहे. बिल्डींग परमीशनने कसे काय बिल्डींग परमीशन दिले. बिल्डींग परमीशन विभाग नगररचना विभागाचे ॲडव्हाईज घेते. नगररचना विभागाने ॲडव्हाईज का दिले.

कमीशनर साहेबांनी विषय देताना विचार केला का? कॉर्पोरेशनने बिल्डींग परमीशन कसं दिलं. हे आमच्या लक्षात का अपण आणुन दिलेल नाही. तुम्ही असा विषय आणला की चुक घडलीच नाही. महापालिकेनी आरक्षीत जागेवर बिल्डींग कशी बांधली. असाच एक झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प रेडझोनमध्ये केला. आम्ही कोर्टात जावू शकलो नाहीत, सीमा सावळे कोर्टात गेल्या त्यानंतर इन्क्वॉयरी झालेली आहे. आरक्षीत जागेवर बांधलेतर अतीक्रमण पाडायला तुम्ही जाता. तुम्ही इन्क्वॉयरी केलेली नाही त्यावेळेला नगररचनामध्ये कोण अधिकारी होते. नगररचनेनी काय ॲडव्हाईज दिले, बिल्डींग परमीशन कोणी दिले. त्यावेळेला आयुक्त साहेब कोण होते. या चुका केलेल्या आहेत. स्वत: एवढी मोठी चुक करायची आणि नंतर तशीच गुंडाळायची. यामध्ये विषय पास करा पण इन्क्वॉयरी व्हायला पाहिजे. हा विषय मंजूर करावा. विषय पास करत असताना त्यामध्ये स्पष्ट मेन्शन करा की यामध्ये कमीशनरनी इन्क्वॉयरी करायला पाहिजे. इन्क्वॉयरी केल्यानंतर त्यामध्ये जे अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई व्हायला पाहिजे. नंतर त्यांना जनरल बॉडीने वाचवलेतर वाचवू दया आमच्याकडे नेते लोक वाचवण्यामध्ये एक्सपर्ट आहेत. पण इन्क्वॉयरी व्हायला पाहीजे. त्यांच्यावर कारवाई करायला पाहीजे. गेल्या मिटींगमध्ये दोन चुकीचे ठराव पास केलेले आहेत, ते दुरुस्त नाही केलेतर पब्लिक कोर्टात जाणार आहे, आणि याबद्ल सुध्दा कोर्टात जाणार. म्हणून आपण आपली चुक सुधारावी. यामध्ये सुध्दा इन्क्वॉयरी करावी. विषय पास करत असताना इन्क्वॉयरी ऑर्डर करावी. महापौर मॅडम तुमची शेवटची मिटींग आहे. या शेवटच्या मिटींगमध्ये अशा लोकांना तुम्ही साथ देवू नका. विषय पास करत असताना इन्क्वॉयरी ऑर्डर करावी, आणि त्यामध्ये कमीशनर सुध्दा रिस्पॉन्सीबल आहेत. नाहीतर आपल्या कॉर्पोरेशनमध्ये काय होत की ज्यू.इंजीनीअरवर करवाई होणार आणि कमीश्नर, डेप्युटी कमीशनर सगळे लोक सुटतात असे व्हायला नाही पाहीजे ही फार मोठी चुक आहे, आरक्षीत जागेवर तुम्ही बिल्डींग कशी बांधता एवढा अंदाधुंदी करभार कसा काय? याची इन्क्वॉयरी व्हायला पाहिजे आणि दोषी अधिका-यावर कारवाई व्हायला पाहिजे.

**मा.आयुक्त** – मा.महापौर मॅडम, सन्मा.सभागृह. मा.कुमार साहेब यांनी जी चुक झालेची गोष्ट निदर्शनास आणून दिलेली आहे ती वस्तुस्थिती आहे. त्याबाबतीत ऑलरेडी सन्मा.सदस्या मॅडम हायकोर्टात गेलेल्या आहेत त्यामुळे हे प्रकरण मा.हायकोर्टामधुन आलेले आहे. आता परत हायकोर्टात जाण्याची गरज नाही. मा.हायकोर्टाने या सर्व गोष्टीची नोंद घेतलेली आहे. आणि हायकेर्टाला आम्ही स्पष्ट सांगीतले आहे, आमची चुक झालेली आहे हा सोशल प्रोजेक्ट आहे. ६७२ गाळयांच्या इमारती बांधलेल्या आहेत, चार इमारती पुर्ण झालेल्या आहेत व एक राहिली आहे, म्हणून मा.उच्च न्यायालयाला विनंती होती पाचवी बिल्डींग बांधु दयावी. उरलेल्या सर्व बिल्डींग वाटू दयाव्यात. आणि हा जो पब्लिक मनी आपण बिल्डींगमध्ये घातलेला आहे त्याठिकाणी ते सर्व कुटूंब गेलीतर सर्वांचे भलं हेईल व ती विनंती मा.हायकोर्टाने मान्य केलेली आहे आणि आम्हांला डायरेक्शन दिलेल्या आहेत.

**मा.आर.एस.कुमार** – मा.महापौर साहेब, हे कोणाच्या काळामध्ये झालेले आहे त्यांचे नाव सांगावे. हायकोर्टाने ऑर्डर दिलेली आहे ती आम्ही मानतो. हा विषय पास करावा व ज्यांनी

चुक केलेली आहे त्यांच्यावर काय कारवाई केलेली आहे हे सांगावे. सगळयांना माहिती आहे चुक झालीतरी वाचविणारे लोक आहेत. चुक झाली असेलतर पनीशमेंट व्हायला पाहिजे. त्यावेळेला कोण अधिकारी होते त्यांचे नाव सांगावे, नाव डिक्लेअर करावे.

**मा.आयुक्त** – मा.महापौर मॅडम, सन्मा.सभागृह. मी फक्त सभागृहाच्या निदर्शनास हे आणून देतो की या दोन तीन चुका झालेल्या आहेत त्याची मा.उच्च न्यायालयाने नोंद घेतलेली आहे. त्यानंतर आपल्याला डायरेक्शन दिलेले आहेत की तुमची चुक झालेली आहे ती दुरुस्त करावी त्यासाठी ३७ करावे, त्यामुळे ही प्रक्रिया आपण सुरु केलेली आहे. त्यामुळे हा विषय महापालीका सभेसमोर आला. आणखी चार बिल्डींग पैकी एक बिल्डींग थांबवा, तीच रिटेंडर करा, अम्ही रिटेंडर केलेल आहे. त्यामुळे या सभागृहासमोर ज्या काही गोष्टी आहेत त्या मी समोर ठेवतोय. मा.उच्च न्यायालयाने डायरेक्शन दिलेले आहेत त्याप्रमाणे हा प्रस्ताव आलेला आहे. कलम ३७ ची आवश्यकता आहे त्यासाठी आपल्या समोर विषय आलेला आहे सभागृहाने निर्णय घ्यावा. त्यास आपल्या मान्यतेची आवश्यकता आहे नंतर शासनाकडे प्रस्ताव जाईल.

**मा.गोरक्ष लोखंडे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सभागृहातील माझे सर्व सहकारी. ज्या गरीब माणसासाठी हा पुनर्वसन प्रकल्प या शहरामध्ये राबविला गेलेला आहे ते वाट पाहत आहेत की नवीन घरात आम्ही कधी जाणार. गरीब माणस त्यामध्ये राहण्यासाठी गेले पाहिजेत. विषय मंजूर करावा पण, पण या शहरात जे जे पुनर्वसनाचे प्रकल्प झालेले आहेत त्या सर्व पुनर्वसन प्रकल्पाची चौकशी करावी. एखादया आरक्षीत जागेवर जर बिल्डींग परमीशन देत असालतर ते योग्य नाही. तुम्ही सर्वसामान्य माणसाला वेठीस धरता आणि तुमच्या अधिका-यांनी केलेल हे कृत्ये याचे समर्थन तुम्ही आज करता. एसआरएचे नियम कुठ लावायचे, पात्र अपात्र कडून पैसे खायचे हा धंदा आपल्या पालीकेच्या अधिका-यांनी सरासपणे आणि वर्षापासून केलेला आहे. नवगुणे म्हणून नावाचा एक माणुस होता, चिंचवडच्या वेताळनगर मधील एका माणसाने आत्महत्या केली आहे. या पुनर्वसन प्रकल्पामध्ये तुम्हांला नव्याने बघण्याची गरज आहे, हे यामुळे मी सांगतो की जो केंद्राकडून, आणि राज्याकडून निधी आपल्या महापालिकेला येतो, गरीब वस्तीच्या नावाखाली लाखो रुपये आलेले आहेत. प्रामुख्याने ही गरीब माणस झोपडपट्टी मध्ये राहणारे माणस आहेत. झोपडयातली माणसं मोर्च्याला चालतात, झोपडयातली माणस मतदानास चालतात. पण प्रशासकीय माणसास त्याठिकाणची जाणीव राहत नाही, तेथे काही जनावरं राहत नाहीतर गरीब माणसच राहतात. अनेकवेळा असे पुनर्वसनाचे विषय येतात त्यावेळेला महापालिकेच्या अधिका-यांनी एसआरएच्या नावाखाली, एसआरएची कुठलीही नियमावली फायनल झालेली नाही. नगरविकास अंतर्गत ती मॅाडीफिकेशनसाठी मंत्रालयात पडून आहे, परवा शहर सुधारणा समितीमध्ये हा विषय चर्चेला आलेला होता आम्ही विचारले अशी अक्षम्य चुक कशी करु शकता? त्यावेळेला त्यांनी आम्हांला सांगीतले, एसआरएचे नियम होते असे सांगीतले आहे, जेथे एसआरएची नियमावली फायनल नाही तेथे एसआरएच्या नावाखाली तुम्ही मोठमोठे गुन्हे खपवता का? ही महापालिका भ्रष्टाचाराचे कुरण झालेले आहे. एखादया तरी अधिका-यास तुमच्या कारकिर्दीमध्ये शिक्षा लावा त्याशिवाय हे प्रशासन सुधारणार नाही. या महापालिकेचे टॅक्स रुपाने एक-एक रुपया लोक भरतात. आण्णासाहेब

मगर यांच्या काळात भरती झालेली आहे, हे डेन्जर लोक आहेत. त्यामुळे एखादयालातरी तुमच्या काळात कामाला लावावे त्याशिवाय हे सुधारणार नाहीत. आम्ही आदरनीय न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत करतो. हा विषय मंजूर करावा परंतु ज्या अधिका-यांने पुनर्वसन प्रकल्पामध्ये आरक्षीत जागेवर परमीशन दिले त्यांची चौकशी करावी, आणि जे कोणी संबंधीत दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करावी आणि हा विषय मंजूर करावा.

**मा.सिमा सावळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह. कोर्टाने निर्देष दिल्यानंतर आपण कारवाई करतो. आयुक्तांना याठिकाणी एक सवाल आहे, एकीकडे आताच आपल्यावर हायकोर्टाच्या दट्याने अधिकारी नेमण्याची वेळ आलेली आहे. त्यामध्ये आपण आरक्षीत जागेवरचे बांधकाम पहिले काढणार आहोत. न्यायालय पण कसा न्याय करते ते बघा, एकीकडे आरक्षीत जागेवरचे बांधकाम काढा म्हणून आपण कर्मचा-यांची नियुक्ती करतो आणि दुसरीकडे तुम्ही संस्था आहात म्हणून तूमच्यासाठी ३७ करा म्हणते. संस्था म्हणून तुम्हांला वेगळा न्याय आणि आम्ही गरीब आहोत, आम्ही चुकीने आरक्षणाची जागा विकत घेतली तेथे गुंठा अर्धा गुंठयामध्ये बांधकाम केलेले आहे, ते आमच बांधकाम पाडायला मात्र आम्ही याच सभागृहाने न्यायालयाच्या दट्यामुळे आता परवानगी दिलेली आहे. आताच माझे बंधु गोरक्ष लोखंडे यांनी सांगीतल आहे की, इन्क्वॉयरी झाली पाहीजे. आर.एस.कुमार, म्हेत्रे साहेब, उल्हास शेट्टी आम्ही सगळयांनी त्या विषयाला परवानगी दिली होती. या विषयाच्या संदर्भात माझा पत्रव्यवहार झाला.  एकतर २५ कोटीच डायरेक्ट काम दिलं, टेंडर काढायला पाहीजे होतं, टेंडर न काढता त्याठिकाणी तुम्ही डायरेक्ट काम दिल आहे. दुसर म्हणजे आरक्षणाच्या जागेवर, ज्या संस्थेनी खरोखर नियम पाळायला पाहीजे होते त्या संस्थेनीच नियम पायदळी तुडवलेत हा दुसरा गुन्हा. तीसरा कायतर एसआरएचे अधिकार आपल्या बांधकाम परवानगीने वापरले त्या संदर्भात ज्यावेळेस कमीशनरांना पत्र दिलं, सभागृहात त्याचे प्रश्नोत्तर झाले आणि प्रश्नोत्तर झाल्यानंतर प्रशासनाने अत्यंत निर्लज्जपणाने मला उत्तर दिली, की हे आम्ही करु शकतो, आम्हीच परवानगी देवू शकतो. मी त्यावेळेस कमीशनरांना विचारल होत की बांधकाम परवानगीचे जे शहर अभियंता आहेत ते एसआरएचे सीईओ कधीपासून झालेले आहेत. साहेब, वृत्तपत्रामध्ये याच्या बातम्या आल्या, मी वारंवार याचा पाठपुरावा केला. माझा पाठपुरावा करण्यामागच दुसरं एक कारण सांगते, एकीकडे आरक्षणावरची बांधकाम काढायची म्हणून आपण पाठपुरावा करतो आणि दुसरीकडे जे गोरगरीब आहेत, तुम्हांला कोणी घर बांधायला लावल नाही, ते झोपडयात सुखी आहेत परंतु तुम्ही त्यांना देणार असालतर किमान अधिकृत घर दया. आरक्षीत जागेवर तुम्ही बांधकाम करु नका, आणि समजा करायच असेलतर ३७ ची कार्यवाही पहीली केली पाहीजे ती कार्यवाही पहीली न करता बांधकाम केले, नंतर आपण हे हस्तांतरण करु शकत नाही हे आपल्या लक्षात आल्यानंतर कोर्टाकडे आपल्याला विनवनी करावी लागली. म्हणजे तुमच्याकडच्या प्रत्येक चुकावर आम्ही पांघरुन घालायचं आणि कोर्ट सुध्दा तुमच्या बाजूने आहे त्यांनी सांगीतल ३७ करा. मग एखादया केसेसमध्ये आपण ॲफीडेव्हीड करतो, सन्मा. राजन पाटील यांनी माझ्या बद्दल ॲफीडेव्हीड केल, पर्सनली ॲफीडेव्हीड केल की सीमा सावळेनां असं वाटत की त्या कार्पोरेट आहेत, कोर्टाने त्यांना झापल. आपण ॲफीडेव्हीट वाचा, म्हणजे मी या सभागृहाची सदस्य आहे आणि माझा एक अधिकारी,

ज्यांनी की डायरेक्ट २५ कोटीच काम दिल, त्यांचा उद्देश सफल होत नाही किंवा त्यांना त्याच क्रेडीट मिळत नाही म्हणून हाय कोर्टात ॲफीडेव्हीड करतो की या केसमध्ये ज्या अप्लीकंट आहेत त्या स्वत:ला कार्पोरेटर समजतात, समजतात म्हणजे काय? मी कार्पोरेटर आहेच, मी निवडून आलेली आहे. तुमच्या चुकावर आम्ही पांघरुन घातल नाही म्हणून तुम्ही आम्हांला उभं करणार. साहेब, मला याठिकाणी अपल्याला असं सांगायच आहे की कोर्टाकडे आपण विनंती करा की, आमच्या अनेक आरक्षीत जागेवरती बांधकाम झालेले आहेत. ६७ हजार बांधकाम आहेत आपणच माहिती अधिकारामध्ये माहिती दिलेली आहे. मागच्या सभागृहात सुध्दा ही माहिती आलेली आहे. ती सगळी बांधकाम नियमीत करणार? त्या सगळयाच ३७ करणार? जो नियम तुम्हाला लागू असेल तोच नियम सर्वसामान्य नागरीकांना सुध्दा लागू असला पाहिजे. एकाला एक नियम आणि दुस-याला दुसरा नियम नाही चालणार. तुम्ही संस्था म्हणून काहीच नियम पाळत नाहीत. तुम्हांला कायदाच नाही. गोरगरीबांच्या नावाखाली किती आणि कसा कसा खेळ करणार आहोत. रेडझोन आहे, रेडझोन आहे, रेडझोन आहे, आम्ही कधी बोललो हो. शंभर लोकांना तुम्ही परवानगी नाकारली त्याच्यानंतर आम्ही त्याविषयी तुमच्याकडे पत्रव्यवहार केला. तुम्ही आमचा पत्रव्यवहार नाकारला आणि मग आम्हांला कोर्टात जाव लागल. तुम्हांला जर परवानगी मिळत असेलतर आम्हांला सुध्दा परवानगी मिळविण्याचा पुर्णपणे अधिकार आहे आणि मग तुमचा रेडझोन आला. आता आम्ही सांगतोत की झोपडपट्टीवासीयांच्या विरोधातला हा विषय नसुन हा प्रशासनाच्या विरोधातला विषय आहे. तुमच्या भ्रष्टाचाराचा विषय आहे आणि म्हणून आम्ही कोर्टात आहोत. साहेब, एकीकडे ६७२ लोकांची यादी आपण तयार केली आपण शासनाकडे मंजूरीला पाठवली, शासनाने मंजूर केली, आहो, मंजूर केल्यानंतर आता आपण पात्र-अपात्रतेच नाटक काढतात. आता पात्र-अपात्रतेच्या कागद तपासण्याच काम चालू आहे. ते गरीब आहेत ते तुमच्या दारात मागायला आले होते का? तुमच्या दारात ठिय्या मांडुन बसले होते का? अजीबात नाही. तरी तुम्ही केलयं ना, मग एकतर रितसर करा. आणि ज्यांना कोणाला कळवळा होता त्यांनी सांगाव, प्रशासनाला सांगीतल पाहीजे. की तुमची ६७२ लोकांची जी यादी शासनाकडे गेली होती त्याच लोकांना घर मिळाली पाहीजेत. वैयक्तीक नाव घेवून ॲलीगेशन केले जाते. मला आनंद आहे की मी काहीतरी चांगल करतेय, सुरवातीला सगळयांना वाईट वाटत असलतरी नंतर ते चांगल सिध्द होत. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब. जसं याच्यामध्ये आपण ३७ करणार आहोत तसं ज्या ज्या लोकांची, नागरीकांची घर आरक्षीत जमिनीवरती आहेत त्यांच्यासाठी सुध्दा प्रशासनाच्या वतीने तुम्ही ठराव मांडला पाहीजे. त्यांच सुध्दा ३७ करुन आपण कोर्टात त्यांना सुध्दा दिलासा दिला पाहीजे. कारण ते सुध्दा या शहराचे करदाते नागरीक आहेत, त्यांच्याकडून तीप्पट करवसुली करता. मागच्यावेळेस शहराध्यक्ष बोलले होते की, आओ जाओ घर तुम्हांरा हैं क्या, खुप लोकांनी त्यांच्या बोलण्याचा विपर्यास केला, त्यांच्या सांगण्याचा अर्थ एकच होता जो न्याय त्यांना, तोच न्याय यानांही दयावा. झोपडपट्टीवासीयांना जर आपण पक्की घर देत असूतर आमची पक्की घर पाडण्याचा तुम्हांला अधिकार काय? आणि त्यांचे घर नियमीत होत असेलतर सगळयांची घर नियमीत झाली पाहीजेत. धन्यवाद.

**मा.तानाजी खाडे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आताच आमचे बंधु गोरक्षनाथ लोखंडे यांनी अतीशय पोटतीडकीने विषय मांडला. माझा जन्म देखील झोपडपट्टीमध्ये झालेला आहे. पिंपरी चौकामध्ये असणारी झोपडपट्टी, त्याठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा बसलेला आहे. त्याठिकाणी माझा जन्म झालेला आहे. त्याठिकाणाहून चोवीस तासाची नोटीस देवून, रात्री नोटीस भेटते, सकाळी अतिक्रमणाच्या गाडया लागतात आणि बोरीबीस्तार बांधुन त्यांना गाडयामध्ये टाकून सेक्टर नंबर २२ येथे गाळयामध्ये टाकल जात. १९९१ साली मी तो त्रास सहन केलेला आहे. मी देखील अतिक्रमणच्या गाडीमध्ये बसून माझा बोरीबीस्तार बांधुन त्याठिकाणी गेलेलो होतो. आजपर्यंत मी तीथंच राहतो. आज त्या परीसरामध्ये शासनाकडून काहीतरी योजना आणावी म्हणून आम्ही जेएनएनयूआरएमच्या नावाखली पुनर्वसन प्रकल्प राबविला गेला. झोपडपट्टी सुधार समितीचा सभापती असल्यामुळे मला त्या परीसरामध्ये योजना राबविण्याच श्रेय मिळालं. त्या भागात राहणा-या लोकांना पक्की घर कुठतरी भेटतील असा आत्मविश्वास, आणि त्या आत्मविश्वासाने त्या परीसरामध्ये काम करत असताना, त्याठिकाणी पुनर्वसन प्रकल्प राबविला गेला त्याठिकाणी असणा-या लोकांच पुनवर्सन करण्यात आलं. अशाच मध्ये अचानक आडवी मांजर गेल्यासारख झाल, एखादं चांगल काम करत असताना एखादी अडचण येते ती आडचण आली आणि रेडझोनचा विषय त्याठिकाणी निर्माण झाला आणि आहे ती काम जागेवर थांबली गेली. आज मला एकच सांगायच आहे की त्या परीसरामध्ये राहणा-या लोकांचा काय दोष? काय गुन्हा केला त्या लोकांनी. आज त्यांची घर मोडकळीस आलेली आहेत, पाणी घरात गळतयं, घर गळतायेत, लोकांना राहायला जागा नाही, एवढयाशा घरामध्ये कसेतरी ते राहतात. कुटूंब मोठी झालेली आहेत त्यांच पुनर्वसन केल पाहीजे, या सगळया गोष्टी मी स्वत: पाहतोय, त्याठिकाणी राहतोय, मी स्वत: अनुभवतोय. आता त्या भागात रेडझोन आल्यामुळे तो विषय कधी मार्गी लागेल ते मला सांगता येत नाही. चोवीस तासाची नोटीस देवून त्याठिकाणी झोपडपट्टीला शिफ्ट केल. १२९ स्क्वे.फुटाच्या घरामध्ये, त्यात संडास, बाथरुम आतमध्येच. त्या घरात कोण जात नव्हंत. त्या लोकांना त्याठिकाणी नेवून टाकल्या गेलं, आज त्यांची अपेक्षा आहे की आम्हांला घर भेटल पाहीजे. आतातर रेडझोन आहे आणि देणार कसं. आज शहरामध्ये कुठे निळी लाईन आहे, कुठे लाल लाईन आहे, कुठे पिवळी लाईन आहे. आज त्या झोपडपट्टीच पुनर्वसन दुसरीकडे झाल पाहीजे. हे होत असताना रेडझोन आहे. साहेब, आपण आता सांगीतल मागच्या टाईमाला चुक झाली, अशी चुक आपल्या काळात झाली. ७५ मी. स्पाईन रोडच काम प्राधिकरणान चालू केलेल आहे, पावसाळयाचा सीजन आणि त्या पावसामध्ये त्याठिकाणच्या झोपडपट्टयाना काढलं. आणि माझ्या भागामध्ये काही ओपन जागा आहेत त्याठिकाणी त्या झोपडया नेवून टाकल्या. काही लोकांना पक्क्या पऱ्याच्यामध्ये दिले आहेत जे पात्र राहीले त्यांना पऱ्याच्यामध्ये दिले पण बाकीचे जे टाकले गेले तेथे आज थोडासा जरी पाऊस झाला तरी त्या पाऊसामध्ये कंबरे एवढे पाणी त्या लोकांच्या घरामध्ये साठलेले आहे. रात्रभर राबवून जे.सी.बी लावून त्या पाण्याची वाट काढून दिली. तोच विषय, रेडझोनमुळे पुनर्वसन होणार नाही, रस्त्याच्या झोपडया काढून त्याठिकाणी टाकल्या, तेथे झोपडया वाढत चालल्या आहेत. उदया तुम्हीच म्हणणार झोपडपट्टया नगरसेवक वाढवतात, काही संबंध नाही नगरसेवकांचा वाढविण्यामध्ये. आज प्राधिकरणाची झोपडपट्टी माझ्या वॉर्डात

टाकली, प्राधिकरणाकडून आपण काय जागा घेतली. प्राधिकरणाकडून जागा घेतलीतर त्या जागेवर झोपडपट्टयांच पुनर्वसन झाल पाहीजे. माझ्या वॉर्डातील लोकांना सुविधा देतांना मला अडचणी येतात. मी हागनदारीमुक्त ऐरीया केला होता आज ते लोक रस्त्यावर बसतात, त्याठिकाणी त्यांना संडास नाहीत. दुर्गंधी वाढत चाललेली आहे. आज प्रशासनाच्या चुकीच्या कारभारामुळे त्याठिकाणच्या नागरीकांना भोगावे लागते. रेडझोनची कोर्टात केस आहे, त्याठिकाणच्या लोकांच पुनर्वसन करता येत नाही. तरी त्याठिकाणी दुसरी झोपडपट्टी पाठवली गेलेली आहे. त्यामुळे प्राधिकरणाच्या भागातली प्राधिकरणाकडून जागा घ्यावी. आणि त्याठिकाणी पुनर्वसन करता येईल का याचा मला खुलासा करावा. दुसरी गोष्ट म्हणजे त्याठिकाणची राहूलनगर झोपडपट्टी ५०२ घर से.नं. २२ मध्ये टाकलेली आहेत, त्या लोकांच पुनर्वसन होण्याची गॅरंटी नाही. शहरामध्ये कुठ जागा असेल, माझ्या अंदाजाने ठाकरेताई म्हणाल्या आमच्याकडे आजमेरामध्ये दोन एक्कर जागा आहे, आमच्या झोपडपट्टीमधले सुशिक्षीत लोक आहेत, चांगले लोक आहेत त्या भागामध्ये त्यांच पुनर्वसन करावे.

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, सर्व उपसूचना स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनांप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक- ५६४ विषय क्रमांक – १७
दिनांक - १९/८/२०१४ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. नरवि/१७/पिंपरी/१४१/२०१४
दिनांक १६/०८/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील चिंचवड येथील सर्व्हे नंबर २५४ ते २५८ या मनपाच्या मालकीच्या जागेवर BSUP योजनेअंतर्गत झोपडपट्टीचे जागेवर पुनर्वसन प्रकल्प मनपा राबवित आहे. सदर प्रकल्पामध्ये एकुण ६७२ गाळे (६ इमारती ) बांधावयाचे आहेत. यापैकी ५ इमारतीचे बांधकाम पुर्णत्वास आलेले आहे.

उपरोक्त विषयाधिन जागेवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन १९७८ चे मंजूर विकास योजनेनुसार आ.क्र :- १३१ भाजी मंडई व शॉपींग सेंटर, आ.क्र:- १३२ खेळाचे मैदान,आ.क्र:-१२५ माध्यमिक शाळा, आ.क्र:- १२६ प्राथमिक शाळा. आ.क्र:-१२७ उद्यान, या प्रयोजनाची आरक्षणे होती. उक्त आरक्षणांची जागा भूसंपादन कायदयान्वये सन १९८६ साली महानगरपालिकेच्या ताब्यात मिळाल्या आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन १९९५ च्या सुधारीत मंजूर विकास योजनेनुसार या ठिकाणी आरक्षण क्र.२५३ अन्वये माध्यमिक शाळा व आरक्षण क्र. २५४ अन्वये प्राथमिक शाळा आणि आरक्षण क्र. २५१ अन्वये भाजी मंडईसाठी या प्रयोजनासाठी आरक्षणे कायम केली आहेत. तदनंतर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ प्रमाणे शासन निर्णय क्र:-टिपीएस-१८९८/६४/प्र.क्र.७/९८/नवि-१३ दि:- २२ जुन १९९८, अन्वये “माध्यमिक व प्राथमिक

शाळेसाठी" आरक्षित जागा मैलाशुध्दीकरण प्रकल्प या प्रयोजनार्थ वापरणेस्तव आरक्षणाचे प्रयोजनात बदल करण्याचा फेरबदलाचा प्रस्ताव शासनाने मंजुर केला आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने आरक्षण क्र. २५१ भाजी मंडई आरक्षणाचे एकुण ४७०१.६० चौ.मी. क्षेत्रामधील ३१४९.८६ चौ.मी.क्षेत्रात बी.एस.यु.पी.योजनेतंर्गत ३ इमारतीचे बांधकाम केले असून भाजीमंडई आरक्षणासाठी १५५१.७४ चौ.मी.क्षेत्र कायम ठेवले आहे. तसेच आरक्षण क्र. २५३ मैलाशुध्दीकरण केंद्राचे एकुण २४८२१.५० चौ.मी.क्षेत्रामधील ५२३७.२३ चौ.मी. क्षेत्रावर बी एस यु पी योजनेतंर्गत ३ इमारती प्रस्तावित केल्या असून त्यापैकी दोन इमारतीचे काम केले आहे.

शासन निदेश दि. २४/१२/२००८ व शुध्दीपत्रक दि. २०/०५/२०१० यास अनुसरुन महानगरपालिका बी एस यु पी योजनेसाठी २.५ एफ एस आय अनुज्ञेय करुन योजना राबवू शकते. परंतू पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने बी एस यु पी योजना मंजुर विकास योजनेच्या आरक्षित जागेवर राबविल्यामुळे सदर प्रकल्पातील इमारतींना भोगवटा पत्र देण्यास कायदेशिर अडचणी येत आहेत. त्यामुळे या प्रकल्पातील सदनिका लाभार्थींना वाटप करणे शक्य होत नाही.

सदर प्रकल्पाबाबत मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र.७४/२०१३ दाखल आहे. सदर प्रकल्प पुर्णत्वास नेण्यासाठी व लाभार्थींना घरकुले वाटप करणे शक्य होण्यासाठी मंजुर विकास योजनेत फेरबदलाची कार्यवाही करुन प्रकल्पाची जागा आरक्षणातुन वगळून निवासी विभागात समाविष्ट करणे क्रमप्राप्त आहे.

सबब मौजे चिंचवड स.नं. २५४, २५५ पैकी ( सि.स.नं.४५०९, ११९३ पैकी ) मधील आरक्षण क्र. २५१ भाजी मंडई या एकुण आरक्षणाचे ४७०१.६० चौ.मी. क्षेत्रापैकी बी.एस.यु.पी. योजनेतंर्गत प्रकल्प राबविलेले ३१४९.८६ चौ.मी. क्षेत्र आरक्षणातून वगळून निवासी विभागात समाविष्ट करणे आणि स.नं.२५६, २५७,२५८ पै. (सि.सं.नं.११९३ ते ११९७ पै.) मधील आरक्षण क्र.२५३ मैलाशुध्दीकरण केंद्र क्षेत्र २४८२१.५० चौ.मी.यामधील प्रकल्प भूखंड क्षेत्र ५२३७.२३ चौ.मी. यामधील पवनानदीचे निळी पुररेषेतील ४२५.८७ चौ.मी. क्षेत्र वगळून उर्वरीत क्षेत्र प्रकल्प भूखंडाचे उत्तरेकडील ४२५.८७ चौ.मी. असे एकुण ५२३७.२३ चौ.मी. क्षेत्र आरक्षणातून वगळुन निवासी विभागात समाविष्ट करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची प्रक्रिया मा.महापालिका सभेच्या मंजूरीने कार्यान्वित करणे क्रमप्राप्त आहे. सोबत मंजूर विकास योजनेत प्रस्तावित करावयाचे फेरबदल दर्शविणारा विकास योजनेचा भाग नकाशा माहितीसाठी सोबत जोडला आहे यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीचे सुधारीत मंजूर विकास योजनेत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास, फेरबदलाची सर्व वैधानिक कार्यवाही करुन फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर करण्यास आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच मौजे रहाटणी येथील स.नं. ५९ पैकी जागातील आरक्षण क्र.६४९, उद्दान येथील जागेवर मोठया प्रमाणात निवासी घरे आहेत व स.नं. ७२,७३ पैकी, आरक्षण क्र.६४५, दवाखाना व प्रसुतिगृह यांचे आरक्षण असून निम्या जागेवर गरिबांची घरे असून जवळच एक किलो मिटरच्या आत जिजामाता हॉस्पीटल व प्रस्तुतीगृह आहे. ही घरे गरीब कुटूंबातील

कष्टकरी कामगारांची असल्याने ते बेघर होऊ नयेत म्हणून सदर आरक्षणाची जागा निवासी विभागात समाविष्ट करणेकामी म.प्र.अधिनियम व न.र. अधिनियमचे कलम ३७ नुसार कार्यवाही करणेस व तसा अहवाल शासनास पाठविण्यास मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच सं.नं. २२ मधील राहूलनगर येथील झोपडपट्टीधारकांची सन १९९० साली पिंपरी येथुन सुमारे ५०२ कुटूंबियांचे पुनर्वसन करण्यात आले आहे. त्यावेळी म्हणजे सुमारे २५ वर्षापूर्वी या झोपडपट्टीधारकांना केवळ १२५ स्केअर फूटांची घरे दिली गेली. आता त्या झोपडपट्टीधारकांची मुले मोठी झाली आहेत. त्यांची लग्ने होऊन त्यांना मुले झाली आहेत. त्यामुळे २५ वर्षापूर्वीच्या १२५ स्केअर फूटांच्या घरांमध्ये सदरचे कुटूंब राहू शकत नाही तसेच सदरचे राहुलनगर हे अधिकृत रहिवाशी असून देखील त्यांचे जे.एन.एन.यू.आर.एम. अंतर्गत अद्याप पुनर्वसन करण्यात आलेले नाही. १९९० साली देण्यात आलेल्या इमारतीचे स्लॅब हे आता गळतायेत. त्यामुळे सदर घरांच्या भिंतीमध्ये पाणी मुरुन त्या इमारती आता मोडकळीस आलेल्या आहेत. त्या ठिकाणच्या इमारतींच्या जिन्यांचे व लोखंडी कठडे गंजून निखळून गेलेल्या आहेत. त्यामुळे अंध, वृध्द लोकांना वरच्या मजल्यावर जाणे धोकादायक बनले आहे. सदर इमारतीची गॅरंटी आता संपली आहे. त्यामुळे महापालिकेने वेळीच लक्ष दिले नाही तर भविष्यामध्ये सदरच्या इमारती कोसळून मोठी जिवित व वित्त हानी होण्याची शक्यता आहे. सदर से.नं. २२ हे रेड झोन बाधित असल्यामुळे आहे त्याच ठिकाणी या नागरिकांचे पुनर्वसन होऊ शकत नाही. त्यामुळे शहरातील अन्य भागामध्ये अजमेरा, मासुळकर कॉलनी येथे मनपाच्या मालकीची सुमारे दोन एकर जागा नागरीकांसाठी घरे या प्रयोजनासाठी आरक्षित आहे. याठिकाणी सदर नागरीकांचे पुनर्वसन करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच मौजे रहाटणी येथील स.नं. ११४ पैकी जागातील आरक्षण क्र. ६४२, लहान मुलांचे खेळाचे मैदान व स.नं. ७५ पैकी, आरक्षण क्र.६४४, प्राथमिक शाळा यांचे आरक्षण आहे. सदर जागेवर मोठया प्रमाणात निवासी घरे आहेत. ही घरे गरीब कुटूंबातील कष्टकरी कामगारांची असल्याने ते बेघर होऊ नयेत म्हणून सदर आरक्षणाची जागा निवासी विभागात समाविष्ट करणेकामी म.प्र. अधिनियम व न.र. अधिनियमचे कलम ३७ नुसार कार्यवाही करणेस व तसा अहवाल शासनास पाठविण्यास मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच प्रभाग क्र. ३१ दिघी येथील स.नं. २ मध्ये आरक्षण क्र. २/१२१ ही जागा संप व पंप हाऊस साठी मनपा या विकास आराखडयामध्ये आरक्षित केलेली आहे. तसेच स.नं.८२ मध्ये आरक्षित क्र.२/११८ ही जागा कम्युनिटी सेंटर व सांस्कृतिक केंद्र तथा वाचनालय यासाठी आरक्षित करणेत आलेली आहे. वरील आरक्षणाची जागा मनपाने ताब्यात घेतलेली नाही. सदर जागेस विकास आराखडयामध्ये आरक्षण पडण्यापुर्वी गोरगरीब नागरिकांनी राहण्यासाठी घरे बांधलेली आहेत. त्यामुळे आरक्षणाची जागा ताब्यात घेतल्यास गरीब नागरिक बेघर होतील. त्यामुळे वरील दोन्ही ठिकाणची आरक्षणे रद्द करणेस व विषयाचे गांभीर्य लक्षात घेता याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच भोसरी वॉर्ड क्र.३३ गवळीनगर येथील सर्व्हे नं.२०० पै. आरक्षण क्र.४०७ खेळाचे मैदान येथील एकुण ९५ गुंठा जागेपैकी ८५ गुंठा मनपाच्या ताब्यात आलेली आहे. सदर

परिसरामध्ये पाण्याची टाकी नाही. सध्या पांजरपोळ येथून पाणीपुरवठा केला जातो. सदर ठिकाणी नव्याने टाकी बांधलेस पुरेशा दाबाने पाणीपुरवठा होईल व नागरिकांचा कायमस्वरुपी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवला जाईल. त्याकरिता भोसरी सर्व्हे नं. २०० पै. आरक्षण क्र. ४०७ खेळाचे मैदान येथील एकुण ९५ गुंठा जागेपैकी ८५ गुंठा मनपाच्या ताब्यातील जागेपैकी अंदाजे २० गुंठा जागा पाण्याची उंच टाकी बांधणेस आरक्षित करणेत यावी त्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये आरक्षणाचे फेरबदलाची कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

अनुकूल- ८१ प्रतिकुल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १८ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – १८

दिनांक - १९/८/२०१४ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. नरवि/१७/पिंपरी/१४२/२०१४ दिनांक १६/०८/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचा पुर्णाकृती पुतळा बसविणेसाठी मातंग दलित बहुजन समाज वारंवार मागणी करीत आहे.

त्यास अनुसरुन जागेबाबतची माहिती खालीलप्रमाणे -

अ) पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या नियोजन व नियंत्रण कक्षा अंतर्गत असलेल्या जागेपैकी सेक्टर क्र. २२ येथील सुमारे ३९ हेक्टर जागा प्राधिकरणाकडून दिनांक ०३/०५/१९७६ रोजी महानगरपालिकेच्या ताब्यात आलेली आहे. से.क्र.२२ च्या म.न.पा. तर्फे तयार केलेल्या जागेच्या ले-आऊट मध्ये सदर जागेपैकी मुंबई-पुणे हायवेलगत सुमारे ११५०० स्क्वे.मी.जागा जकात नाक्याच्या वापरासाठी करणेत येत होती. प्राधिकरणाकडील १९९७ च्या मंजूर डी.पी.चे अवलोकन केले असता सदर जागा वापर हा सार्वजनिक व निमसार्वजनिक वापरासाठी दर्शविणेत आलेला आहे. जकातनाक्यासाठीच्या वापर कमी झाल्याने इतर विभागांकडून सदर जागेची मागणी करणेत आलेली होती.

तथापि स्थापत्य, बी.आर.टी. विभागाने सोबत जोडणेत आलेल्या नकाशात दर्शविणेत आलेप्रमाणे जकात नाक्याच्या जागेत बी.आर.टी. टॅन्झीट स्टेशनचा प्रस्तावित आराखडा तयार केलेला आहे. सदर आराखडयाअंतर्गत कै.अण्णाभाऊ साठे पुतळयासाठी व पुतळयासभोवतीचे सुशोभिकरणासाठी सुमारे ६५०.० चौ.मी. जागा प्रस्तावित केलेली आहे. सद्दस्थितीत वर नमूद जागा म.न.पा.च्या ताब्यात आहे ती सदर पुतळयासाठी देय होऊ शकते.

ब) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दी मधील संत तुकारामनगर येथील महाराष्ट्र शासनाच्या अंगीकृत असलेल्या मौजे पिंपरी येथील सर्व्हे नं. १७८ ते १८६, सिस.नं. ५२०२

मधील हाफकिन महामंडळाच्या सुमारे ७० एकर जागेमधील पाच एकर जागेमध्ये लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचा पुर्णाकृती पुतळा बसविण्याची मागणी वारंवार महानगरपालिकेकडे होत आहे. सदर जागा ही शासकीय असलेने हाफकिन महामंडळाच्या सुमारे ७० एकर जागेमधील पाच एकर जागा महाराष्ट्र शासनाकडून लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचा पुर्णाकृती पुतळा बसविण्यासाठी विनामुल्य पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे ताब्यात घेणेकामी मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी हाफकिन महामंडळाच्या सुमारे ७० एकर जागेमधील पाच एकर जागा महाराष्ट्र शासनाकडून लोकशाहीर कै.आण्णाभाऊ साठे यांचा पुर्णाकृती पुतळा बसविण्यासाठी विनामुल्य पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे ताब्यात घेणेकामी मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी संत तुकारामनगर येथील सदरची शासकीय जागेची तातडी लक्षात घेता, सदरची जागा शासनाकडून विनामुल्य मिळणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करणेस मान्यता देणेत येत आहे

**मा.अनुराधा गोफणे** – मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.दत्तात्रय साने** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- देहु आळंदी रोड, (पूर्व-पश्चिम) चिखली चौक कमानीवर तुकाराम महाराजांचा टाळ टाकलेले शिल्प, मा.शिवाजी महाराजांचे शिल्प व मा.ज्ञानेश्वर महाराजांचे शिल्प बसविणेस मान्यता देणेत यावी.

**मा.तानाजी खाडे** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

**मा.मंदा आल्हाट** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- पुणे आळंदी पालखी मार्गावर वडमुखवाडी स.नं. ७८ येथे उभारावयाच्या संत नामदेव महाराज व संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या भेटीवर आधारीत समुहशिल्पासाठी शिल्पांच्या संख्येतील वाढ, म्युरल्स बसविणे, स्वागत कमान बांधणे, रिटेनिंग वॉल बांधणे, सिमाभिंतीची उंची वाढविणे, जागेचे समतलीकरण करणे इ. कामासाठी प्रकल्पाचे सुधारीत अंदाजपत्रकीय खर्च रक्कम रुपये २० कोटी फक्त या रक्कमेस सुधारीत मान्यता देणेत यावी.

**मा.अरुणा भालेकर** – मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देते.

**मा.सुमन नेटके** - मा.महापौर साहेब, आण्णाभाऊ साठेंचा विषय घेतलेला आहे. आम्ही निवडून येवून आडीच वर्षे झालेले आहेत. आडीच वर्षापासून मुर्ती पुर्णाकृती तयार झालेली आहे ती बसविण्यासाठी जागा उपलब्ध होत नाही. यासाठी आम्ही वारंवार विनंती करत होतो की लवकरात लवकर जागा उपलब्ध करुन मुर्ती बसविण्यात यावी. आज स्वतंत्र चळवळीतील लोकांची जागृती करण्यासाठी आण्णाभाऊ साठे यांचा पुर्णाकृती पुतळा शहरात उपयुक्त

ठरणार आहे.  म्हणून मी आपणास विनंती करते की आपण  लवकरात लवकर जागा ठरवून हा पुतळा बसवून घ्यावा अशी विनंती करते.

**मा.गोरक्ष लोखंडे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सभागृहातील सर्व सहकारी आणि अधिकारी वर्ग.  गेल्या अनेक वर्षापासून या शहरातील मागासवर्गीय समाजाचा अत्यंत जिव्हाळयाचा हा विषय आहे. अनेक वर्षापासून या शहरामध्ये काबाडकष्ट करणारा हा दलीत समाज या झोपडपट्टयामध्ये राहतो आणि जे आराध्य दैवत आहे, फुले, शाहू, आंबेडकर, आण्णाभाऊ या विचारांच्या बरोबर हा बांधल्या गेलेला आहे. आणि म्हणून गेल्या अनेक वर्षापासूनचा असा लढा होता की आण्णाभाऊंचा एक पुतळा निगडीला होता.  त्याठिकाणी रिझर्व्हेशन आले तो पुतळा हालवावा लागणार की काय, नवीन पुतळा तयार झाला आणि मग जागेचा शोध सुरु झाला. अनेक राजकीय पक्षानी राजकीय भांडवल केली. अनेक वेळेला आण्णाभाऊना सुध्दा राजकारणात वापरल. पण आण्णाभाऊ वरती प्रेम करणारा एक, फुले, शाहू, आंबेडकरांचा कार्यकर्ता म्हणून या शहरामध्ये आण्णाभाऊ साठेंचा पुर्णाकृती पुतळा असावा आणि मग या पुतळयासाठी जागेची शोधा शोध सुरु झाली.  काल परवा महापौर साहेब आणि आयुक्त साहेब यांच्या उपस्थितीमध्ये आपण आण्णाभाऊ साठेंचा महोत्सव शहरामध्ये महापालिकेच्या वतीने महापालिकेच्या खर्चाने तो साजरा केला. त्याठिकाणी मा.आयुक्त साहेब आले होते आणि महापौर प्रमुख होत्या आणि  सगळया समाजाच्या समाज बांधवाची मागणी होती, एकतर काही जणांचा मतप्रवाह होता की निगडीच्या जकातनाक्यावरची रीकामी झालेली जागा आहे त्या जागेवर दयावे.  काही जणांनी सांगीतले डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळयाच्या मागे जागा दयावी, आणि काही समाज बांधवानी असं सांगीतल की हाफकीन इन्स्टिटयूटची जागा आहे तेथील जागा आण्णाभाऊ साठे यांच्या पुतळयासाठी दयावी. मा.महापौरांनी वेळोवेळी पाठपुरावा केलेला होता. प्रत्येकवेळेला महोत्सवामध्ये हा प्रश्न विचारला जायचा. त्यांच्या भाषणातून देखील याचा ऊहापोह  व्हायचा. यावेळेला पहिल्यांदा आयुक्त साहेब आले होते आम्हांला बरं वाटल. एका प्रशासकानं येवून आम्हांला अभिमानानं सांगीतल की, थोडयाच दिवसामध्ये याची इन्क्वॉयरी करायला सांगतो आणि दोन तीन जागा कुठे आहेत त्या देता येतील का, त्या योग्य आहेत का, या सगळया गोष्टीचा ऊहापोह करुन आणि ख-या अर्थाने आज समाधान असं वाटते की हा विषय याठिकाणी आलेला आहे. दोन ठिकाणच्या जागा सुचविण्यात आलेल्या आहेत. हाफकीन इन्स्टिटयूटची जागा शासनाकडे मंजूरीसाठी पाठवून देण्याच आश्वासनही देण्यात आलं. निगडीची जागा देता येते असंही झाल. प्रशासनाचे आभार मानावे तेवढे कमी आहेत, नक्कीच कमी आहेत. फुले, शाहू, आंबेडकरांचे विचार या महाराष्ट्रामध्ये, या शहरामध्ये टिकले पाहिजेत, आण्णाभाऊंचे विचार टिकले पाहिजेत म्हणून ख-या अर्थाने उत्तमतेच एक सामाजीक रचनेचं पाऊल या महापालिकेनी  टाकलेलं आहे. अनेक समाज बांधवाची अशी विनंती आहे की, निगडीची जागा छोटी पडेल आणि म्हणून पाच एक्कर जागा आहे तेथे आण्णाभाऊ साठेंच स्मारक असेल त्याठिकाणी एक सुसज्ज वाचनालय असेल, एक कार्यालय असेल, अभ्यासीका असेल. गरीब समाजाची माणस त्याठिकाणी ख-या अर्थाने युपीएससी, एमपीएससीचा अभ्यास करतील, तुमच्या सारखे मोठे अधिकारी होतील, मोठया खुर्चीत बसतील आणि गरीब माणसाचा सन्मान होऊन झोपडपट्टीमध्ये सुध्दा ख-या अर्थाने दिवा लावण्याच्यासाठी म्हणून प्रशासनाने

उचललेले हे पाऊल आहे. आणि म्हणून फुले, शाहू, आंबेडकरांच्या महाराष्ट्रामध्ये या महानगरपालिकेनी उचललेल हे पुढच पाऊल आहे. आज ग्लोबल जगामध्ये वावरत असताना सुध्दा एक सामाजीक समता आपण विचारात घेतली. माझ असं म्हणण आहे की जर आपण हाफकीनची पाच एक्कर जागा मिळालीतर त्याठिकाणी आण्णाभाऊ साठे यांचे स्मारक आणि त्या सगळया अभ्यासीका आणि आण्णाभाऊ साठेंचे विचार पुढे घेवून जाण्यासाठी एक क्रिडांगण, समाजासाठी उठण्याबसण्यासाठी जागा आणि त्यांचा एक पुतळा तेथे व्हावा म्हणून हाफकीनची जागा घेणेत यावी अशी मी प्रशासनाला विनंती करतो आणि थांबतो, जयहिन्द, जय महाराष्ट्र.

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, सर्व उपसूचना स्विकारल्या आहेत.

**मा.सुलभा उबाळे** - मा.महापौर साहेब ऐतिहासीक विषयाला मंजूरी दिलेली आहे त्याबद्दल मी आयुक्तांचे, महापौरांचे मनापासून अभिनंदन करते. आयुक्त साहेबांना याठिकाणी येवून जास्त दिवस झालेले नाहीत. अत्यंत कमी काळात आण्णाभाऊ साठे यांचा पुतळा या इमारतीमध्ये आहे. आणि त्यांना ख-या अर्थाने आपल्या माध्यमातून सुटका मिळणार आहे. आणि हाफकीनच्या पाच एक्कर जागेमध्ये त्या नवीन ठिकाणी त्यांचे पदार्पण होणार आहे. प्रत्येक गोष्टीला काळ आणि वेळ यावा लागतो असे म्हणलेतरी काही वावग ठरणार नाही. आज महापौरांची शेवटची बैठक आहे. आणि आयुक्त साहेब आपला ऐतिहासीक हा पहिला निर्णय आहे. पण आपल्याला माहिती आहे की जेव्हा मुंबईमध्ये इंदु मिलची जागा भांडन करुन ती जागा मिळवावी लागली. आपल्याकडून हा विषय आपण आता राज्यशासनाच्या कोर्टामध्ये नश्चितपणे ढकललेला आहे. पण येणा-या काळामध्ये समाजबांधवाना माझं एकच सांगण आहे की हा विषय येथून मंजूर झालेला आहे. परंतु पुढे मंजूर होण्यासाठी प्रत्येकांना आपल्या सगळया उपस्थितांना प्रयत्न हे निश्चितपणे करावे लागणार आहेत. आपण निगडीच्या संदर्भात याठिकाणी सांगीतल आहे, आमच्या काही समाज बांधवाच्या भावना जोडलेल्या आहेत त्याठिकाणी आण्णाभाऊ साठे वसाहत आहे त्याठिकाणी आम्ही दरवर्षी महोत्सव साजरा करतो. तरी तीकडची जागा सुध्दा जास्तीत जास्त मिळेल त्या जागेसाठी आपल्याला प्रयत्न करायचा आहे. महापौरांच्या बाबतीत मी दोन मिनीटे बोलेल, आज त्यांची शेवटची मिटींग आहे. सभागृहातील जुने सभासद म्हणून १९९७ साली पहिल्यांदा आम्ही निवडून आलो होतो. एकदातर आम्ही निवडून आल्यानंतर आमचा पक्षविरहीत एक मोठा महिलांचा ग्रूप एक मैत्रीनी म्हणून आमचा ग्रूप झालेला आहे. त्याच्यापैकी काही आज माजी नगरसेवीका म्हणून आहेत परंतु आजही आम्ही संपर्कामध्ये आहोत. आणि एक वेगळी ओळख आम्ही सामाजामध्ये ठेवलेली आहे की राजकारणात मैत्री असावी पण मैत्रीत राजकारण असू नये. अशाप्रकारे महापौरांनी याठिकाणी निभावलेले आहे त्यासाठी मी सभागृहाच्या वतीन महापौरांचे अभिनंदन करेल. आपण विरोधी पक्ष म्हणून याठिकाणी कोणाला वागणूक दिलेली नाही. खास करुन मिटींग भरपूर तहकूब झालेल्या आहेत. योगेश बहल यांनी पायंडा पाडलेला होता मिटींग तहकूब करायच्या नाहीत ते पाळलेले आहे. त्यांच्या वडीलांचे निधन झाल्यानंतरही त्यांनी मिटींग घेतलेली होती. त्याचप्रमाणे याठिकाणी आपण काम करत असताना गावकी भावकीच्या राजकारणाकरिता आपल्यावर दबाव येत असेल, की सभा तहकूब झाली पाहिजे किंवा अनेक

कारण असतील त्यात जायच नाही परंतू ३३ मिटींग आपण महापौर झाल्यापासून अधिकृत घेतलेल्या आहेत व ५० ते ६० मिटींग तहकूब झाल्या असतील. परंतु आपण प्रत्येक नवीन नगरसेवक असतील किंवा जुने नगरसवेक असतील त्या नगरसेवकांना बोलण्याची संधी पूरेपूर दिलेली आहे. बजेटच्या मिटींगच्या वेळेस विस्तृत चर्चा करत असताना सुध्दा आपण याठिकाणी बसून सगळयांच ऐकूण घेतलेल आहे. याठिकाणी बसून ऐकूण घेण्याची जी क्षमता आपल्यामध्ये आहे ती वाखण्यासारखी आहे. मैत्री म्हणूनच मी आज बोलले आहे, परंतु भावना कधीही दाबून ठेवू नयेत. उदयाच राजकारण काय होईल कस होईल हे कोणाला माहिती नाहीय. परंतु आज जे बोलले ते उदया बोलू शकेल असे नाही त्यामुळे आज आपल्या सर्वांच्या परवानगीने मा. महापौरांचे मनापासून अभिनंदन करते. आपली कारकिर्द चांगली गेलेली आहे. धन्यवाद.

**मा.योगेश बहल -**मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह, एक चांगला निर्णय आजच्या या सभेमध्ये होत आहे. विशेषत: महापौर म्हणून आपण आणि आपले पालकमंत्री व राज्याचे उपमुख्यमंत्री मा.अजीतदादा पवार यांना सुध्दा हे शिष्टमंडळ भेटले तेंव्हा त्यांनी सांगीतले की हा निर्णय ताबडतोब या जी.बी.मध्ये व्हायला पाहिजे. १ के खाली हा विषय दाखल केला. मा.महापौर, आयुक्त आपले व सर्व पक्षाच्या सदस्यांचे मी आभार मानतो. आण्णाभाऊ साठे यांना मानणारा जो समाज आहे आणि त्यांचे जे कार्यकर्ते आहेत त्यांना सुध्दा मी मनापासून धन्यवाद देतो. त्यांची चिकाटी आणि इतक्या वर्षे या विषयासाठी ते भांडतात. माझी त्यांना पण एक नम्रं विनंती आहे की हा ठराव आपण करतो ती हाफकीन महामंडळाची जागा आहे. आणि ठराव महापालिका करते शासन त्याच्यावर निर्णय घेणार आहे. वास्तविक पाहता आपण दान दयायच काम करतोय परंतु ते दान आपल्या खिशातून न देता दुस-याच्या खिशातून देतोय, अशी परिस्थिती आहे. परंतु निर्णय का होईना आपण घेतोय. आपल्या महापालिकेची जी जागा आहे, माझा सांगायचा तात्पर्य असा आहे की, आपण निर्णय चांगला घेतोय. आपण त्याचा पाठपुरावा करण्याची गरज आहे. पाठपुरावा करुन त्या पर्टिक्यूलर महामंडळाकडून हा विषय मंजूर करुन घेवून शासनाने त्यामध्ये हस्तक्षेप करावा लागणार आहे आणि मग ही जागा महापालिकेकडे वर्ग केल्यानंतर पुढचे डेव्हलपमेंट होणार आहे तत्पुर्वी त्या समाजाच्या सर्व सन्माननीयांना माझी अशी विनंती आहे की जोपर्यंत आपल्या ताब्यामध्ये जकात नाक्याजवळची जी जागा आहे त्यात आपल्याला काही अधिकची जागा देता येते का हे बघावे व त्याठिकाणी व्यवस्थीतरीत्या पुतळा बसवून चांगले सुशोभीकरण करुन जे सहा गुंठे देण्याचं जाहीर केलेल आहे, अधिकची देता आलीतर आणखी उत्तम आहे. परंतु जी हक्काची आणि ताब्यातली आपल्या हातामध्ये जागा आहे ती अगोदर मिळवू यात आणि ते करत असताना हा सुध्दा पाठपुरावा आपण करु यात. कारण ते महामंडळ आहे त्यांचीही कमिटी वेगळी आहे त्यातही शासनाचा हस्तक्षेप लागेल, वर्गीकरण असेल मग हे करत असताना ती जागा सुध्दा आपण सोडू नये अशी माझी विनंती आहे आणि महापालिकेनी सुध्दा त्यामध्ये पुढाकार घेवून हे सुशोभीकरण करावे. बाकीचे सर्व मान्यवरांनी सांगीतल्याप्रमाणे आपण तेही प्रयत्न करावेत ही जागा ताब्यात घेवून त्याही जागेचा प्रयत्न चालू ठेवूयात अशाप्रकारची विनंती करतो आणि पुन:श्च एकदा सर्व सभागृहाचे आभार मानतो, धन्यवाद.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक – ५६५ विषय क्रमांक – १८
दिनांक - १९/८/२०१४ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. नरवि/१७/पिंपरी/१४२/२०१४
दिनांक १६/०८/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचा पुर्णाकृती पुतळा बसविणेसाठी मातंग दलित बहुजन समाज वारंवार मागणी करीत आहे.

त्यास अनुसरुन जागेबाबतची माहिती खालीलप्रमाणे-

अ) पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या नियोजन व नियंत्रण कक्षा अंतर्गत असलेल्या जागेपैकी सेक्टर क्र. २२ येथील सुमारे ३९ हेक्टर जागा प्राधिकरणाकडून दिनांक ०३/०५/१९७६ रोजी महानगरपालिकेच्या ताब्यात आलेली आहे. से.क्र.२२ च्या म.न.पा. तर्फे तयार केलेल्या जागेच्या ले-आऊट मध्ये सदर जागेपैकी मुंबई-पुणे हायवेलगत सुमारे ११५०० स्क्वे.मी.जागा जकात नाक्याच्या वापरासाठी करणेत येत होती. प्राधिकरणाकडील १९९७ च्या मंजूर डी.पी.चे अवलोकन केले असता सदर जागा वापर हा सार्वजनिक व निमसार्वजनिक वापरासाठी दर्शविणेत आलेला आहे. जकातनाक्यासाठीच्या वापर कमी झाल्याने इतर विभागांकडून सदर जागेची मागणी करणेत आलेली होती.

तथापि स्थापत्य, बी.आर.टी. विभागाने सोबत जोडणेत आलेल्या नकाशात दर्शविणेत आलेप्रमाणे जकात नाक्याच्या जागेत बी.आर.टी. टॅन्झीट स्टेशनचा प्रस्तावित आराखडा तयार केलेला आहे. सदर आराखडयाअंतर्गत कै.अण्णाभाऊ साठे पुतळयासाठी व पुतळयासभोवतीचे सुशोभिकरणासाठी सुमारे ६५०.० चौ.मी. जागा प्रस्तावित केलेली आहे. सद्दस्थितीत वर नमूद जागा म.न.पा.च्या ताब्यात आहे ती सदर पुतळयासाठी देय होऊ शकते.

ब) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दी मधील संत तुकारामनगर येथील महाराष्ट्र शासनाच्या अंगीकृत असलेल्या मौजे पिंपरी येथील सर्व्हे नं. १७८ ते १८६, सिस.नं. ५२०२ मधील हाफकिन महामंडळाच्या सुमारे ७० एकर जागेमधील पाच एकर जागेमध्ये लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचा पुर्णाकृती पुतळा बसविण्याची मागणी वारंवार महानगरपालिकेकडे होत आहे. सदर जागा ही शासकीय असलेने हाफकिन महामंडळाच्या सुमारे ७० एकर जागेमधील पाच एकर जागा महाराष्ट्र शासनाकडून लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचा पुर्णाकृती पुतळा बसविण्यासाठी विनामुल्य पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे ताब्यात घेणेकामी मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी हाफकिन महामंडळाच्या सुमारे ७० एकर जागेमधील पाच एकर जागा महाराष्ट्र शासनाकडून लोकशाहीर कै.आण्णाभाऊ साठे यांचा पुर्णाकृती पुतळा बसविण्यासाठी विनामुल्य पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे ताब्यात घेणेकामी मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी संत तुकारामनगर येथील सदरची शासकीय जागेची तातडी लक्षात घेता, सदरची जागा शासनाकडून विनामुल्य मिळणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करणेस मान्यता देणेत येत आहे तसेच देहु आळंदी रोड, (पूर्व-पश्चिम) चिखली चौक कमानीवर तुकाराम महाराजांचा टाळ टाकलेले शिल्प, मा.शिवाजी महाराजांचे शिल्प व मा.ज्ञानेश्वर महाराजांचे शिल्प बसविणेस मान्यता देणेत येत आहे तसेच पुणे आळंदी पालखी मार्गावर वडमुखवाडी स.नं. ७८ येथे उभारावयाच्या संत नामदेव महाराज व संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या भेटीवर आधारीत समुहशिल्पासाठी शिल्पांच्या संख्येतील वाढ, म्युरल्स बसविणे, स्वागत कमान बांधणे, रिटेनिंग वॉल बांधणे, सिमाभिंतीची उंची वाढविणे, जागेचे समतलीकरण करणे इ. कामासाठी प्रकल्पाचे सुधारीत अंदाजपत्रकीय खर्च रक्कम रुपये २० कोटी फक्त या रक्कमेस सुधारीत मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १९ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – ५६६ विषय क्रमांक – १९

दिनांक - १९/८/२०१४ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१५/पिंपरी/८८/२०१४ दि.१९/०८/२०१४

मे.इंडोलिंक व युरोसिटी इंडस्ट्रीयल प्रिमायसेस को. ऑ. सो. लि. सोसायटीच्या जागेतुन मनपाच्या सुधारीत मंजूर विकास योजनेतील ४५.०० मी रूंद रस्त्याच्या दोन्ही सोसायटींच्या बाधित २२८५ चौ. मी. क्षेत्रामुळे सदर परिसरात बी.आर.टी.एस. ची केंद्र शासन पुरस्कृत योजना रखडली असलेने सदरची जागा खाजगी वाटाघाटीद्वारे ताब्यात घेणेकामी आयुक्त यांचे अध्यक्षते खाली दिनांक १७।०६।२०१४ रोजी बैठक आयोजित करणेत आलेली होती. सदर बैठकीमध्ये मे. इंडोलिंक व युरोसिटी इंडस्ट्रीयल प्रिमायसेस को. ऑ. सो. लि. सोसायटी यांना त्यांचे बांधकामासाठी रक्कम रु. ६,२५,००,०००।– (रक्कम रु. सहा कोटी पंचवीस लाख फक्त ) अदा करणे बाबत निर्णय घेणेत आलेला आहे. तसेच सदर व्यवहारात होणारे अदलाबदल रस्ता बाधित क्षेत्र २२८५ चौ. मी. क्षेत्राबाबतचे दस्त (deed of exchange) नोंदणी करणेकामी लागणारी आवश्यक स्टँम्प ड्युटी व नोंदणी शुल्क यांचा खर्च महानगरपालिकेने करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुमन नेटके** - मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.महापौर** – सर्वांचे आभार मानून ही सभा संपल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक – नस/४/कावि/९८५/२०१४
दिनांक – १५/१२/२०१४



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.